म. ग्रं. सं. ठाणे.
विषय ... विविध ... ...
सं. क्र. 3999

REFBK-0024676

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचनाः—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५[८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.


30 OCT 1985
17 NOV 1985
24 NOV 1985
6 AUG 1986
20 AUG 1986
4 SEP 1986
7 DEC 1986
29 JAN 1988

(क्र. मा. पत्र
५०००-३-८

# वेदना जपणारी मीरा–इंदिरा संत




डॉ. स. ग. यादव







प्रचार प्रकाशन, कोल्हापूर-४१६००८

वेदना जपणारी मीरा
- इंदिरा संत

Vedana Japanari Meera
- Indira Sant

डॉ. स. ग. यादव

Dr. S. G. Yadav

प्रकाशन क्रमांक । ४२

प्रथम आवृत्ती । १९८५

प्रकाशक /
सौ. नंदिनी तु. गवळी
५१३ ब, प्लॉट नं. ४ अ, नलवडे माळ,
प्रतिभानगर पिछाडीस, सागरमाळ,
कोल्हापूर–४१६ ००८

मुद्रक /
श्रीपाद सीताराम गोसावी
राजहंस प्रिंटिंग प्रेस,
नागाळा पार्क, कोल्हापूर–४१६ ००३
फोन : २३९०६

मूल्य – तीस रु. फक्त

© डॉ. स. ग. यादव, प्राचार्य
श्री शिव–शाहू महाविद्यालय,
मु. पो. सरूड, ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर

मुखपृष्ठ / स्टुडिओ मयूर / मधुकर ओतारी

ब्लॉक / उदय प्रोसेस


– प्रमुख वितरक –
मे. सिद्धार्थ बुक सेंटर
२०, प्रतिभानगर मार्केट, सागरमाळ,
कोल्हापूर–४१६००८

अर्पण

प्रा. पां. ना. कुलकर्णी

तुम्ही मला उभे केले–

– डॉ. स. ग. यादव



# वेदना जपणारी मीरा : इंदिरा संत

**प्रास्ताविक**

मीरा हे भक्ती संप्रदायातील एक चेटूक आहे. गेली चारशे वर्षे तिने भारतातील भाविक मनाला वेड लावले आहे. ती एक ऐतिहासिक सत्य असूनही काल्पनिक राधेइतकी अद्‌भूत वाटावी इतका तिचा भक्तीभाव अलौकिक आहे. राधेप्रमाणेच गोकुळातील तीही एक गौळण वाटते. फरक इतकाच की राधा तृप्त होती. तिला तिचा श्याम वारंवार भेटत असे. तिच्या खोड्या काढीत असे. मीरा मात्र त्या गिरीधराच्या भेटीसाठी जन्मभर तळमळत राहिली. आणखी एक फरक आहे तो दोघींच्या भूमिकेत.

राधा नवऱ्याचा संसार करून कृष्णावर चोरटे प्रेम करत होती. मीरा मात्र जगरहाटीप्रमाणे दुसऱ्याशी लग्न झाले तरी एकट्या मुरलीधराची अव्यभिचारीनी पत्नी होती. ती आपल्या जन्मोजन्मीच्या पतीला भेटण्यासाठी ऐहिक आयुष्यात जोगीण बनली होती.

मीरेचे संपूर्ण जीवन कृष्णभक्तीत समर्पित झाल्यामुळे मीरेची गणना संत मंडळीत होते. संतांच्या कुठल्याही परंपरेत ती बसत नाही. तिची स्वतःची काही शिष्य परंपरा दिसत नाही हे तिचे एक वेगळेपण, ती अगदी एकांतिक आहे. तिची पतिभक्ती वैयक्तिक आहे व या वैयक्तिकतेत अनेक संत परंपरांची अनेक वैशिष्टये एकवटली आहेत अशा या मीरेचे आणि मराठी साहित्यातील इंदिरेचे समर्पण साहित्यात आपल्याला जाणवते.

मीरा जशी सर्वांहून वेगळी आहे. तशाच इंदिराबाई सर्व कवयित्रीत वेगळ्या ठरल्या आहेत. त्यांची कविता आत्मनिष्ठ आहे. त्यांच्या कवितेत

भावरम्यता ओतप्रोत आहे. त्यांची कविता मीरेप्रमाणे त्यांच्या हृदयाचा उद्‌गार आहे. त्यांनी आपले हृदय पतीच्या पावलावर वाहिले आहे. अनंताच्या प्रवासाला गेलेला तो पती कधीच भेटत नाही. त्यामुळे विरहिणीच्या हृदयाच्या विविध कळा त्यांच्या काव्यात उमटतात. मीरा जशी विरहाने बेभान होते लाज सोडण्या-इतकी बेभान होते. कधी ती त्याच्या तंद्रीत पायात घुंगरु बांधून नाचू लागते. कधी त्याच्या प्रेम समाधीत दंग होते तर कधी तो भेटायला आला म्हणून लाजेने चूर होते, आनंद विभोर होते, तरी तिची भूमिका विरहिणीची, तिचा भाव विप्रलंभ शृंगाराचा, इंदिराबाई सन्तांची भूमिका व अवस्था हीच आहे. त्यांची ही भूमिका विरहिणीची, जोगीणीची आहे. प्रियकरासाठी मीरेने सर्वसंग परित्याग केला. इंदिराबाई मात्र त्याच्या आठवणीने संसार करत आहेत. रात्रंदिवस तळमळत आहेत. त्याची मूर्ती जिथे जिथे फिरली त्या त्या वस्तूकडे पहात रानोमाळ हिंडत आहेत. त्यांना ठाऊक आहे की, आपली शेज सुळावर अंथरली आहे व आपला जिवलग गगन मंडळात आहे.

स्त्रीच्या हृदयातील मार्दव, भक्ती, आर्तता यांचे उत्कट दर्शन इंदिराबाईच्या कवितेत आपल्याला इतके होते की, त्या आपल्याला संत मीराबाईच वाटतात.

स्त्रीत्व व संतत्व यांचा एकजीव संगम या दोघांच्या ठिकाणी जाणवत रहातो. आपल्या प्रेमभावनेच्या बळावर आपल्या प्रियकरावर त्या स्वतःला झोकून देतात. त्यांची कविता, त्यांचे जीवन उपदेशाचा प्रपंच मांडत नाही. सामाजिक रीती - अरितीच्या व सोंगाढोंगाच्या वाटेला जात नाही तर जीवनाचा रोखठोक अनुभव ठामपणे व्यक्त करीत रहाते.

'बाहरी वातावरण जितनाही प्रतिकूल होता है उतनाही अशरण, भगवानकी शरण का आकर्षण बढता है' [१]

बाहेरचे वातावरण व नियती प्रतिकूल असल्यामुळे या दोघींच्यातील प्रियकराविषयीची ओढ अधिकच जागृत झाली. एकच एक वेदना त्या जपत राहिल्या. ऐहिक आयुष्यात आलेले जोगिणपण सांभाळत त्यांनी कृष्णभक्ती व पतीभक्ती केली. मीरेने देवाशी, पतीचे नाते जोडले तर इंदिराबाईनी पतीशी देवाचे नाते जोडले. प्रियकर पतीपेक्षा त्या दोघींना वेगळे जीवन नाही व त्यातूनच त्यांची कविता साकारली गेली आहे.

## कोरीव शिल्पासारखी कविता

इंदिराबाईची सर्व कविता एखाद्या कोरीव शिल्पासारखी आहे. गर्द धुक्यात एखादे शिल्प न्याहाळावे त्यामुळे त्या शिल्पातील सौंदर्य अधिकच जाणवत रहाते. अशी शिल्पसदृश्य रचना इंदिराबाईनी केली आहे. 'आधि कळस मग पाया' या न्यायाप्रमाणे फक्त शिल्पच उभे रहाते. इमारत उभी रहात नाही. इमारत बांधत

असताना जर एखादा चिरा निखळला तर दुसरा बसविता येतो. पण शिल्पाचा कवचा उडला तर शिल्पच बाद ठरते असे हे कोरीव शिल्प मन वेधून घेते. इंदिराबाईच्या कवितेत तेवढे सामर्थ्य आहे.

इंदिराबाईच्या सर्व कवितांचे अवलोकन केल्यानंतर एक शिल्प आपल्या मनात रूजते. कोणत्याही शिल्पाचे मोठेपण लक्षात घ्यायचे असेल तर ते शिल्प पहाणाऱ्याच्या, अनुभवणाऱ्याच्या काळजात किती खोलवर रूजलेले आहे हे पहाणे महत्वाचे असते. शिल्पाच्या दर्शनानंतर त्याचे विस्मरण होता उपयोगाचे नाही. ती ताकद इंदिराबाईच्या कवितेत आहे.

## इंदिराबाईचा जीवनपट

इंदिराबाईचे पूर्ण नाव इंदिरा नारायण संत असे असून त्यांचा जन्म विजापूर जिल्ह्यात 'डंडी' या तालुक्याच्या ठिकाणी दिनांक ४ जानेवारी, १९१४ रोजी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव श्री. गोपाळ सीताराम दीक्षित असे होते. वृत्तीने वडिलांचा पेशा मामलेदार. 'तवंदी' हे निपाणी – बेळगाव रस्त्यावरील त्यांचे इनाम गाव डोंगर माथ्यावर वसलेले. निसर्गाच्या राईत ज्वारीच्या पिकात स्वतःस शोधणारे त्यांचे तवंदी गाव. इंदिराबाई लहान असतानाच त्यांचे वडील १९२० साली गदग या ठिकाणी मृत्यू पावले. वय अवघे सहा वर्षाचे. या वयात समज ती काय असणार ?

इंदिराजींचे शिक्षण बेळगांव, कोल्हापूर व पुणे या तीन ठिकाणी झाले. त्यांचे माध्यमिक शिक्षण 'वनिता विद्यालय बेळगाव' या मिशनरी शाळेत झाले. महाविद्यालयीन शिक्षण पुणे व नंतर कोल्हापूरच्या राजाराम महाविद्यालयात झाले. फर्ग्युसनमध्ये शिकत असतानाच व प्रसिद्ध लघुनिबंधकार नारायण माधव संत यांच्याशी परिचय झाला. हा परिचय काव्याच्या आवडीतून. याच परिचयाची सांगता त्यांच्या विवाहात झाली. त्यांचा विवाह पुणे या ठिकाणी झाला. महाविद्यालयात शिकत असतानाच प्रेमाचे घुमारे जीवनवृक्षाला फुटले. १९३५ साली त्या राजाराम महाविद्यालयातून बी. ए. ची परीक्षा पास झाल्या.

१९४७ साली बी. टी. परीक्षा बेळगावच्या बी. टी. कॉलेजमधून व बेसिक एज्युकेशनचा सरकारी डिप्लोमा १९४७ साली त्यांनी निवडला. एवढीच त्यांची शिक्षणातील जमेची बाजू.

वडिलांची बदली ज्या ज्या ठिकाणी होईल त्या त्या ठिकाणी त्यांना जावे लागले. ही बदली नेहमी तालुक्याच्या ठिकाणी कर्नाटकात होत असे. त्यामुळे कानडी मुळाक्षरे व थोडेसे वाचनही. मराठी लेखन वाचन घरीच करावे लागले. वडील रजेवर यायचे तेव्हा तवंदीची ओळख व्हायची. १९२१ पासून बेळगाव येथेच रहाणे.

नारायण माधव संत यांच्यावर त्यांचे प्रेम होते तरीही त्यांचा विवाह घरच्या संमतीने १९३५ जूनमध्ये झाला. श्री. संत हे कवी व लघुनिबंधकार म्हणून प्रसिद्ध. 'उघडे लिफाफे' हा त्यांचा लघुनिबंध संग्रह प्रसिद्ध आहे. लग्नानंतर त्यांचे रहाणे पुणे, मुंबई व बेळगाव येथे. १९४२ मध्ये ना. मा. संतांना बेळगाव येथील मराठी ट्रेनिंग कॉलेजमध्ये प्राचार्य म्हणून बोलावले होते. त्यांचेही शिक्षण बी.ए.,बी.टी.होते. दुर्दैवाने त्यांचा मृत्यू १९४६साली झाला.

१९३६ पासून इंदिराबाई मुंबई, पुणे, बेळगाव या ठिकाणी जमेल त्या शाळेत जमेल तितके दिवस नोकरी करीत राहिल्या. १९४७ पासून मराठी ट्रेनिंग कॉलेजमध्ये प्रथम शिक्षिका म्हणून त्यांनी नोकरीस सुरुवात केली. १९५३ ला 'त्या' त्याच कॉलेजच्या प्राचार्या झाल्या. जवळजवळ १९ वर्षे म्हणजे १९७२ पर्यंत त्यांनी अनेक प्रयोग या ट्रेनिंग कॉलेजमध्ये केले. आज बेळगावच्या वडगाव भागात काव्यदेवतेची उपासना करत त्या जीवन जगत आहेत.

**इंदिराबाईंची काव्यरचना**

| संग्रह | प्रकाशन वर्ष | संग्रह | प्रकाशन वर्ष |
|---|---|---|---|
| १. सहवास | १९४१ | ४ मृगजळ | १९५७ |
| २. शेला | १९५१ | ५. रंगबावरी | १९६४ |
| ३. मेंदी | १९५५ | ६. बाहुल्या | १९७२ |

**कथासंग्रह** १. श्यामली २. चैतू ३. कदली

'सहवास' हा इंदिरा संत व श्री. ना. मा. संत या उभयतांचा काव्यसंग्रह. या संग्रहावर कवी यशवंत, ना. सी. फडके यांनी आपले अभिप्राय व्यक्त केले आहेत. कवीवर्यांनी स्वतःची भूमिकाही मांडली आहे. या संग्रहात इंदिराबाईच्या सदतीस व ना. मा. संतांच्या पंचवीस कविता आहेत. 'प्रीति' ची सफल अवस्था या संग्रहात आहे. उभयतांच्या मनात एकमेकाविषयी वाढलेली ओढ 'सहवास' मध्ये आहे. कारण –

"तुझा सहवास
जसा पहाटेचा वारा
फूले फूल झरझरा"

असे इंदिराबाई म्हणतात व ना. मा. संत –

"ओसरेल सर आता
काय दुजा ओढ फास ?
आता जीवां हुरहुर
व्हावा तुझा सहवास"

असे प्रत्युतर देतात.

' सहवास ' नंतर दहा वर्षांनी ' शेला ' हा संग्रह प्रसिद्ध झाला. ' सहवास ' मधील कांही कविता याही संग्रहात घेतल्या आहेत. शेलामध्ये एकूण कवितांची संख्या ऐंशी असून ' माझी कविता व मी ' ही इंदिराबाईची भूमिका या संग्रहास जोडली आहे.

' मेंदी ' हा संग्रह कुणाच्याही प्रस्तावनेविना प्रसिद्ध झालेला आहे. यात एकूण ' बासष्ट ' कविता आहेत. पावलावरील, हातावरील ' मेंदी ' उडाल्याचे दुःख आहे. ' मृगजळासारखे ' सारे सुख वाटू लागले आहे. ' रंगबावरी ' सारखी अवस्था बाईची झाली आहे. मृगजळ, रंगबावरी हे मेंदी नंतरचे इंदिराबाईचे संग्रह व अखेरचा संग्रह म्हणजे " बाहुल्या. "

१९७२ साली प्रसिद्ध झालेला ' बाहुल्या ' कवितासंग्रह आत्मविषयक, चिर दुःख, निसर्ग, समाज, तात्विक, स्त्री जीवन, प्रासंगिक, वात्सल्य गीते इत्यादी विशेषांनी नटलेला आहे. अठ्ठयानऊ कवितांच्या या संग्रहात कवयित्री पूर्णतः स्थिरावली आहे.

१९३१ साली इंदिराबाईनी आपली पहिली कविता लिहिली व अजून त्या लिहित आहेत. ४५ वर्षांचा त्यांचा हा काव्यप्रवास आहे. या त्यांच्या काव्यप्रवाहातील काव्यविषयांचा विचार पुढीलप्रमाणे आपणास करता येईल.

## त्यांचे काव्यविषयक विचार

माझी प्रत्येक कविता ही त्या त्या मनोवृत्तीच्या लहरीची 'अभिव्यक्ती आहे' असे स्वतःच्या काव्याविषयी इंदिराबाईनी लिहिले आहे. आत्मानुभूती ही काव्यात महत्त्वाची असते, ते त्याच अर्थाने. कविता लेखन झाल्यानंतर दूरस्थ होऊन त्या काव्याचे वाचन कवीने करायला हवे.

काव्यविषयक इंदिरांची मते इतरत्र नोंदविली आहेतच. त्यांच्या काव्यातून ती अधिक कशी स्पष्ट होतात ते पहाणे महत्त्वाचे आहे. म्हणून वर स्पष्ट केलेला मुद्दा पुन्हा विचारात घ्यायला हवा. ' कविता लिहित असताना ती कवीची असते, पूर्ण झाल्यानंतर ती त्याची नसते.' त्याच्यापेक्षा निराळी होते.

" होऊन माझ्यातून निराळी
मीच घेतसे रूप निराळे
तुझ्या संगती सदा रहाते
अनुभविते ते सुखचि आगळे "

इंदिराबाईच्या कविता म्हणजेच त्यांचे व्यक्तिमत्व. त्यांचे रूप, त्यांचे व्यक्तिमत्व त्यांच्या काव्यातच शोधता येते. ही काव्यमूर्ती निराळी झाल्यानंतर इंदिराबाई मोठ्या तृप्त मनाने त्या मूर्तीस निरखत रहातात. तिच्या संगतीतील अनुभवाचे सोहाळे भोगतात. काव्यदेवतेबरोबर चंचल संध्यारंगातून फिरणे त्यांना

प्रिय आहे. नक्षत्रांचे गुलाबपाणी अंगावर घेणे त्यांना प्रिय आहे. कवितेबरोबर हिंडून निसर्गाचा आनंद घेत असताना एका काव्यासक्त आत्म्याच्या भूमिकेतून त्या उत्कट होतात, निश्चल होतात.

कविता ही कवीची प्रिया असते. जिवाभावाची मैत्रीण असते. तिच्याशी सुखसंवाद करणे कवयित्रींना प्रिय असते. तिचे बोलणे, ऐकणे, हृदयसंपुष्टात साठवणे प्रिय आहे. काव्याची निर्मिती पूर्ण झाल्यानंतर मन कसं आभाळ भरून आल्यासारखं वाटतं.

" आणि बिलगुनी तशीच बसते
तुला पहाते डोळे भरूनी
डोळे भरूनी तुला पहाता
खरेच पावे देही भरूनी " [२]

इथे इंदिराबाई कवितेशी एवढी सलगी करतात की, स्वतःचे दुःख त्या कवितेला केल्याविना रहात नाहीत.

काव्यलेखन करायचे तर . . . . बाहेर काजवा झुकत असताना दिसावा, वाऱ्यासंगे ओल्या गवताचा गंध हवेत दरवळत असावा, रात्र घुंद असावी, पाखरे झोपलेली असावीत-- त्याचवेळी--

" हवा असा थाटमाट
असे गूज लिहायला
हवी चांदण्याची वाळू
ओळीवरी शिंपायला " [३]

अनुभूतीशी प्रामाणिक रहाणे हा कवीचा धर्म असतो. तो इंदिराबाईंनी पाळला आहे. स्फूर्ती नसताना त्या काव्यलेखन करत नाहीत. रिकाम्या मनाने रिकामे लिहिणे त्यांना प्रिय नाही. तसे झाले तर त्या अक्षरा-अक्षरात त्यांना भुताटकीचे घर दिसते.

" शून्य रिकामे विषण्ण दालन
वाजे पाऊल उगाच चाहुल
खोल कुठे तरी कातर संगित
नदीतळाची जाणीव व्याकुळ " [४]

नदीतळाची जाणीव टिपण्यास त्यांचे मन आतुर असते म्हणून माधव आचवल म्हणतात, व्यक्तिमत्वाला जाणवणारे अनुभव काव्यरूप धारण करतात.[५] हे इंदिराबाईंच्या संदर्भातील वचन यथार्थ वाटते. अनुभूतीची प्रामाणिकता त्यांच्या काव्यात आहे त्यांचे अनुभव उसने नाहीत असे म्हटले पाहिजे.

## निसर्गात रमणारे कवी मन

इंदिराबाईची लहानपणापासूनच असणारी काव्यात्म वृत्ती, तसाच रसिक, गुणी पती लाभल्यामुळे त्यांचे काव्य अधिकच प्रवाहित झाले.

इतर कवियित्रीप्रमाणे 'प्रेम' हाच विषय इंदिराबाईच्या काव्यात प्राधान्याने दिसतो. पण त्यांच्या काव्याचे वैशिष्ठ्य हे की त्यात एक प्रकारची विविधता, मुग्धता, रसिकता व संयमी वृत्ती आहे. शब्दजंजाल किंवा भावनांचा भडक विलास हा त्यांच्या प्रतिभेचा धर्म नव्हे. सोने तापवले की त्यातला हिणकसपणा जाऊन त्यातील शुद्ध सोनेच तेवढे रहाते. तद्वत जीवनातील विविध अनुभवांच्या भट्टीतून त्यांचे मन तावून सुलाखून निघाले आहे. त्याचा परिणाम अपरिहार्यपणे त्यांचे काव्य व त्यांची रचना यावरही झाला आहे. मात्र परिस्थितीच्या आघातांनी त्यांचे व्यक्तिमत्व कणखर व खंबीर बनले असले तरी त्यांच्या काव्याचे स्वरूप कोमल तरल असेच राहिले आहे.

विवाहोत्तर काळात जीवनाचे नंदनवन फुलले असताना लिहिलेली त्यांची प्रेमगीते ही जशी हृदय वाटतात तशीच पती निधरोत्तर त्यांची वियोगचित्रेही. याचे कारण असे की, ज्या ज्या भावनेने त्यांच्या मनाला सुख दिले दुःख दिले त्या त्या भावनेबरोबर काव्यरचनेच्यावेळी इंदिरा सर्वस्वी एकरुप झाल्या आहेत. भोवतालच्या जगाचा पार विसरच त्यांना जणू पडला. त्या स्वतःशी म्हणतात, जो जो अनुभव मला जिव्हाळ्याचा वाटत होता ते ते विषय मला जिव्हाळ्याचे वाटू लागले. " कवीच्या काव्यात माधुरी येते ती या अनुभवाच्या बोलानीच. या प्रांजळपणाशिवाय काव्यात रस निर्माण होणे कठीण. इंदिराजींच्या भाषेत कृत्रिमता किंवा दुर्बोधता येत नाही. याचेही कारण त्यांचीही जिवंत अनुभूती हेच असावे " [६]

हा जिव्हाळ्याचा अनुभव टिपण्यास इंदिराबाईना निसर्गातील प्रतीके अधिक रुचतात, पती असताना त्यांच्या सहवासातील सोनियाचे क्षण जसे त्यांनी निसर्गाच्या माध्यमातून साकारले तशीच नंतरची वेदनाही.

वसंतसेनेच्या अंगावर चारूदत्ताने शेला टाकून द्यावा आणि तो निघून जावा, चिरंतनाच्या प्रवासात, इंदिराबाईच्या जीवनातही असे घडले आहे. शेल्याचा गंध, माधुरी, सहवास जवळ आहे पण ज्याने 'शेला,' दिला तो त्याचे दुःख साकारण्यास ती वेदना शब्दबद्ध होण्यास त्यांना निसर्ग जवळचा वाटतो. मानव हा निसर्गाचे उपकरण आहे. मातीची ओढ मानवाच्या रक्तातच असते. त्यामुळे तो निसर्गाकडे आई, प्रिया, सहचारिणी या भूमिकेतून पहातो. इंदिराबाईच्या सुखदुःखाच्या हुंकारात निसर्ग काव्य आहे.

प्रियकराच्या तरळत्या आठवणी उराशी कवटाळण्यात कमालीचे सुख असते.

निर्भर वातावरणात धुक्याचा सागर पसरलेला असावा. कार्तिक मासातील गुलाबी थंडी असावी त्याचवेळी त्यांचा नाजूक मादक स्पर्श हवाहवासा वाटतो.

" चारूदत्त हा कोण कोठूनी
अंगावरती फेकीत शेला,
वसंत सेना वसुंधरेने
झेलून तो हृदयाशी धरला " [७]

आकाश हा पुरूष, धरती स्त्री अशी कल्पना आपल्या जुन्या साहित्यात आढळते. आपल्या प्रियकराचे दर्शन असेच आकाशाच्या माध्यमातून त्यांना दिसते. त्या स्वत: धरित्री होतात. प्रश्न यातून उद्‌भवतो, आभाळ व धरती यांचे कधी मीलन होते का ? यातूनच इंदिराबाईच्या वेदनेचा जन्म होतो. ती वेदना त्या जपत रहातात.

मनाचं पाखरू अधीर होऊन जातं. दूरवरून शीळ मनाच्या गाभाऱ्यात उमटत रहाते. पण तो सूर कोणाचा ? आडदांड वारा येतो. पदराला धरून बोलावयाचा प्रयत्न करतो. आभाळातली एखादी चांदणी खुणावते. सागराच्या लाटा पायावर आदळतात. मन भांबावून जाते. ' अधिरून गेले मन । पंख राहे फुगवून । कुठे जाणार उडून ' हे त्याना उमजत नाही.

" नको बाई करू घाई,
जीव माझा भांबावला
कुठे येऊ सांग मला " [८]

इंदिराबाईचे भांबावलेले मन प्रियकरास भेटण्यास एवढे उत्सुक झाले आहे की त्या कुठे येऊ ? असा प्रश्न विचारत रहातात.

कधी तरी सोन्याच्या इमल्यात आपला प्रियकर होता. गुलाबी आनंदात संसार न्हालेला होता. त्यावेळी इंदिराबाईनी सूर्याचे केलेले स्वागत त्यांच्या उत्फुल मनाचे प्रतीक आहे. सूर्याच्या सोन्याच्या पावलानी आपले भूषवलेले घर त्यांना आवडते. सारवलेले अंगण, रेखिलेले स्वस्तिक, उघडी दालने, कौलाराची झरोकी व पित्याच्या मायाळ हाताप्रमाणे डोकावणारे किरण हे सारे आनंदमयी शब्दात त्या पकडतात.

' निळी पांढरी ' ही कविता शारदातील दुपारचे रेखीव शब्दचित्र आहे. दुपारचे वातावरण कसे साकारते अन् त्याचे स्वरुप डोळ्यापुढे कसे उभे रहाते "दाटली साय की स्निग्ध शुभ्र आकाशी । फिरतात तशा या शुभ्र ढगांच्या राशी । त्या उन दुधाचे घुटके घेत खुशाल । सुस्तित लोळतो हिरवा खाली माळ । " शुभ्र सायीचे ढग तळ्याचे गढूळ पाणी रवंथ करणाऱ्या गाई, पाण्यात डुबणाऱ्या म्हशी, दगडावर कपडे धुवून बसणारा परीट या साऱ्यांचे आपल्याला मुर्तीमंत दर्शन घडते. नेमकी अर्थोत्कट विशेषणे वापरण्याची इंदिराची हातोटी या काव्यात पहाण्याजोगी

आहे. गाईवासरांचे संथ चरणे, बंद वाऱ्याची धुंद स्थिती, सुस्तीत डोलणारा माळ, नजरेसमोर शब्दाकार बनून रहातो. शेवटी स्त्रीत्वाचे आगळेच दर्शन घडते. [९]

" दिस भरलेली ही काय तरी गर्भार
टाकीत पावले चाले रम्य दुपार. " [१०]

नलदमयंती आख्यानात रघुनाथ पंडित दमयंतीच्या विरहाचे वर्णन ज्या वेधक शब्दात करतो तसेच हे वियोगाचे दर्शन नाही का ? चांदणेसुद्धा अंगाला दाह करणारे वाटले असे सामराजाने, रुक्मिणी स्वयंवरात म्हटले आहेच. प्रियकराचे निघून जाणे, मनात चांदणे उमलणे असत्यच वाटू लागले कवयित्रीला.

" कापुरापरी हे मनातले चांदणे
घेतसे पेट अन् असह्य होई जिणे " [११]

सागराचा निवांत किनारा पाखराच्या पिसासारखी पसरलेली संध्याकाळ. उष्ण–शीत खारा वारा, सुखावलेली धरणी, रेतीवर सुस्त पडावे अशी वेळ. या निसर्गदृश्यांचे इंदिराजीना वेड आहे. अस्ताचलास जाणारा सूर्य –

" प्रेमळ सावली कोण ही जननी
गोमटे तान्हुले पायावर न्हाणी ।
तेज हळदीचे पिवळे कोवळे
सतेज बालक रूपच आगळे । " [१२]

पाहून त्यांना आई बाळाची आठवण होते. स्त्रीची निर्मिती ही तिच्या प्रकृती धर्मानुसार असते.

संध्याकाळच्या रंगाचे इंदिराबाईना वेड आहे. नकळत संध्येचे चित्र त्यांच्या काव्यात उमटतेच. लाजलेली संध्यारमणी सोन्याची घागर कडेवर घेऊन पाण्यास जाते. एवढ्यात तिला कुणाची तरी चाहूल लागते. व्याकूल नजरेने ती पहाते तर 'तो' अंगातून एक नवथर थर निघून जाते. तो श्यामल, सुंदर पुरुषोत्तम तिला खुणावतो. ती . . . . पदर सावरते, डोळ्यातील दौलत गालावर उमटलेली असते. लगबग ती मागे फिरते पण पायातला पैंजण कधीच ओघळलेला असतो. त्या पैंजणाकडे पाहून त्यास

" आणि उभा तो तसाच तिथे
काय लागली प्रीतिसमाधी
नयनांतरी ये धुंद चांदणे
धुंद श्वसन अन् पुष्प सुगंधी " [१३]

प्रीतिसमाधीत तो मात्र बुडून गेलेला.

'मेंदी' भरल्या नखानखांचे, चाहूल घेणाऱ्या बाळमनाचे, थरथरणाऱ्या पाल्याचे आकर्षण इंदिराबाईना आहे. संध्याकाळ म्हणजे पृथ्वीचा रंगमंच आहे

असे मोहक चित्र त्या रेखाटतात. तसेच तगमगणारी भर दुपार त्यांना जाणवते.

" भर दुपार: मार्गावर
क्यू रंगीत डगमगतो,
भर दुपार आणि कुठे
गुलमोहोर झगमगतो " [१४]

रंगीबेरंगी 'क्यू' नजरेसमोर तरळतो तसाच तांबडा भडक गुलमोहरही, भाबडी रूक्ष, पारंबी, गाण्यातला पोपटी भाव, ओली न्हाली रंगीत वाकळ, हिरवे रूपेरी उन्ह, काळी पिवळी फुलपांखरे सारेच शब्द कसे नादमयी.

निसर्गाची भाषा त्यांना उमगते. काळाकभिन्न मेघ त्यांना वृद्ध आजोबाचे रूप वाटतो. शुभ्र रेशमी झगा, पांढरी दाढी माळावरील मुलांना कुरवाळू लागते.

" माळाच्या शिरी भुरके जावळ
त्यातून त्यांची बोटे फिरती,
उभ्या दूर जरी निळ्या टेकड्या
जाऊन त्यांची हनुवटी धरीती "

अल्लड, निरागस, धीट टेकड्या आजोबांची हनुवटी धरतात पण–

" अवचित जाती निघून आजोबा
नादी लावूनी असे चराचर,
जाताना परी जाती घेऊन
बालमुठीच्या खुणा झग्यावर " [१५]

घरात नित्य घडणारे हे आजोबांचे दर्शन नाही का ?

पावसाची सर येते. निघून जाते. तारेवर दवांचे थेंब दिसतात. हिरवे पिवळे त्यांच्या मनातच हे दाटलेले असतात.

'थेंबाथेंबी' (मृगजळ) या कवितेत इंदिराबाई निसर्गात पूर्ण बुडलेल्याच आहेत. दूरवरचा पाखरांचा निळा–काळा थवा, सुखदु:खाची आठवण त्यांना करून देतो. जीवनाची तार थरथरू लागते. डोळ्यांचे तळ बनते. व कवयित्री होतात 'जलराशी' झिजण्याचा योग प्रियकरासाठी नाही म्हणून त्यांचे मन खंतावते. त्यांना वाटते आपल्या गाठी एवढे पुण्यच नसावे.

" पुण्य न तितुके असते गांठी
शापायाला तुला असे–पण
ओघ गोठला जलराशीतील
नभात उरले फक्त निळेपण " [१६]

नभातल्या निळेपणातच त्या हरवून जातात. त्यांच्या या हरवण्याचे, दु:खाचे भान 'दगडांना' आहे. कासवासारखा पडून असणारा काळा पत्थर 'कळते पण

त्याला सगळे, सगळे कळते ' असे कवयित्री स्पष्ट करते. निसर्गातील वस्तूमात्रावर त्या मानवी व्यक्तित्व लादतात. त्यामुळे वातड आकाश, हिरवट वारा, तिरसट झाडे, साजरे उन्ह, आज्ञाधारक बाळ, स्तब्ध क्षितीज, काळी नागीन, मंत्रविद्ध कदंबनी, भुके वाळवंट, सारे जणू त्यांचे सहचारी असतात. त्यामुळे पावसातही इंद्रधनु होऊन प्रियकराचे त्या स्वागत करतात.

" तुला सामोरे येताना
अशी कांही नवी झाले
लगबग पायखुणा
इंद्रधनुष्य सांडले " १७

निसर्ग राणीबरोबर कवयित्री नवी होते. इंद्रधनुचे वस्त्र लेवून त्याचे स्वागत करते.

लपवू कुठे मुळी कळेना
नटरंगी हा अवखळ कान्हा "

उदाच्या बनात कितीतरी युगांनी भेटलेला त्याला पहाता स्त्री-धर्मानुसार डोक्यावरून हात फिरला. पण जुन्या स्मृतीने इंदिराबाईचा हात वेणीमधील फुलांच्या घोसावरच गोठला.

इंदिराबाई संतांचे बालपण ' तवंदी ' या खेडचात गेल्यामुळे त्या खेडचातील निसर्गाची दृष्ये त्यांच्या अंतःकरणात ठसलेली आहेत. बालपणीचे संस्कार मग ते मानवाचे असोत वा निसर्गाचे, महत्वाचे असतात. मेंढचा राखणाऱ्या धनगराची पोरं पाहून स्वतः कवयित्री रंगबावरी होते. मेंढचा राखणारी रंगबावरी शब्दरूप होते. उंच पहाडावरती खुरटी झुडपे हुंगत हिंडणारी बकरी, चकित नजरेची तिची धनीण रंगबावरी –

" जरी किनारी लाल लेहंगा
उघडचा रानावर घुटमळतो
माथ्यावर रुमाल पिवळा
काळचा कुडत्यावर फडफडतो " १८

या पोषाखात सजते एक वेधक शब्द चित्र ! वाचकांच्या अंतःकरणावर ते ठसून जाते. ही रंगबावरी रंगारूपाने उजळ आहे. तिचे हे सौंदर्य म्हणजे ग्रामकन्येचे मादक सौंदर्य आहे. तिच्या डोळचात धुंदी आहे. अंगात मस्ती आहे. चेहरा हिमाने उजळून निघाला आहे.

" नभसन्मुख हिम उजळ चेहरा
हिमगंगेच्या जोष जयावर
डोळचामध्ये झुकलेले अन्
देवदारबन गहन गूढतर " १९

डोळ्यामध्ये झुकलेले देवदारवन वेड लावणारे आहे. प्रीतीचे दृष्य इंदिराबाई पहातात. त्यांना जाणीव होते एकाकीपणाची. निर्झराच्या काठावरचे उंच गवत स्वत:चे श्रीमंती रूप वाऱ्यात निरखत असते. गिरीमाला आभाळाच्या भक्तीत स्वप्नदंग असतात. या गोष्टींना चतूर सारसपक्षी साक्षी असतो. याचवेळी त्यांना जाणीव होते वेदनेची –

" मी न कुणी माझ्याशी
कीती कठोर असहकार
चित्रांकित दवबिंदूही
मज बघता . . . . वाहणार " [२०]

सुखदु:खाच्या झुलावर त्यांचे मन नेहमी हिंदोळत राहिले आहे. सुखाची एखादी लकेर उमटू लागते. पण घश्यातच अडकून राहते. मन अधिर होते, पण क्षणात कासाविस करणारी कातरता, व्याकुळता विद्ध करून टाकते. पूर्ण अर्थाने सुख मग ते निसर्गातील असो, इंदिराबाई भोगू शकल्या का ? अनंताच्या तारेवर त्यांना दु:ख तोलणे कठीण जाते आहे. शब्दसमूहाचे आभाळ झुलते, गाढ मौनाचे कल्लोळ बोलणे जड वाटू लागले तरीही व्रतस्थ होऊन त्या उभ्या आहेत.

निसर्गच अस्वस्थ झालाय. वारा वेडा होऊन घोंगावतो आहे. मेघ झपाटल्यासारखे गर्जना करीत आहेत. सारे कसे अस्वस्थ. ही अस्वस्थता छे याच्याही पलीकडची अस्वस्थता भोगण्यात त्यांना आनंद आहे.

" तरी अजूनही उभी
व्रतवेडी सोनकेळ
जीर्ण विदीर्ण पानात
दंव ताजे रक्तफूल " [२१]

व्रतवेडच्या सोनकेळीचेही दर्शन शालीन करणारे आहे. पावसानेसुद्धा अघोर चित्राने येऊ नये. आपले घर चंद्रमौळी आहे. घरात पाण्याचे ओहोळ येऊ लागले तर तांब्या, भांडी कुठून आणायची ? म्हणून त्या पावसाची विनवणी करतात. 'पावसा' अशी झोंबाझोंबी करू नको. बाबा माझी वेल मोठी नाजूक आहे. ती चोळामोळा होऊन जाईल. तुझ्या या घुसमुसळेपणाने. इंदिराबाईंचेही रागावणे अल्लड पोराबरोबरच आहे. 'आडदांडा' तू दारातून असा झेपावत येऊ नकोस. माझं नेसू जुनेरं आहे नां ते भिजेल की. आजपर्यंत मी किती सोसलंय. माझं एवढं ऐक ना.

" वाटेवरी माझा सखा
त्याला माघारी आण ना "

या प्रवाशास पाठीमागे आणता येणार आहे का ? रस्त्यातून वेशीपुढे तो

पोहचायच्या आत तू विजेबाई जा. या पांथस्थास माघारी फिरव. माझ्या राजसास नीट सांभाळून आणा, मग हवा तेवढा धिंगाणा घाला. मी तुम्हास परतून बोलणार नाही. 'माझ्या सख्याच्या डोळ्यात मी विजेस पूजेन' पण हा आडदांडपणा थांबवा पाहूं.

प्रियकर येईल म्हणून त्यांनी आकाशविडा बांधला. तेवढ्याने शहाणपण आले व या शहाणपणापासून रक्त ठिबकायला लागले. वेदनेस बहर आला. तरीही मातृत्व ही श्रेष्ठ शक्ती आहे. स्त्रीत्वात तेज आहे त्याचे हे मातृत्वपण निसर्गात वृक्ष पहात नाहीत तर एखादा कुटुंबवत्सल फणस, मनस्वी आम्रतरू, सूर्योपासक पांगीरा त्यांना दिसतो. त्यांची मातीवर असीम निष्ठा असते. ती निष्ठा त्यांना जीवनात धीर देणारी असते. म्हणून त्या–

" असिम त्यांची मातीवरची
निष्ठा पाहून मी नत होते,
त्यांच्यासंगे मीहि कपाळी
मृदगंधाचा तिलक लावते " [२२]

भारतीय सृष्टीचा रम्य खेळ श्रावणमासी प्रकट होत असतो. ऊन सावलीचे ते मधूर नृत्य असते उन्हाचे पाटव नेसले जाते, टाकले जाते. वाऱ्याचे पैंजण घातले जाते. पण ते फेकावेही लागते. डोळ्यातील काजळास घालायला आणि धुवायलाही अवधी नाही. हर्षाचे हिंदोळे असे सोडले जातात हे श्रावणाचे मनस्वी क्षण म्हणजे कवयित्रीचे मन असते. निसर्गातील ती स्वतःचे स्पंदन शोधते. गेला कुठे बाळमित्र? मी इथे मुकी एकाकी कोणत्या गुन्ह्याचे दुःख भोगते आहे? कधीतरी एखादाच क्षण मोहरलेला असतो. अवघा वाकीचा भातुकलीचा खेळ. जीवन या खेळासारखेच ठरले आहे. पण या खेळातूनही 'स्व' चा शोध आहे–स्वर वेडी होऊन स्वतःच साद, स्वतःच ऐकण्याची विश्वंवेगळी कल्पनाही इथे आहे माझे आनंद निधान तोच एक सायंतारा माझ्या जीवनाचा तोच. पूर्ण निरास हसरा. प्रांगणात असंख्य तारे, तारका असतील पण कवयित्रीचे आनंद निधान मात्र तोच सायंतारा आहे. क्षितीजावर नागचाफ्याचे केशर सांडलेले असावे, वृक्षाच्या माथ्याशी चांदी असावी.

कणाकणात रानारानात ओला वास भरला असतो–

" माळावरून एकटी
पाय ओले गवतात . . . .
कसे सांडले केशर
माझ्या मनाच्या पाण्यात " [२३]

इंदिराजींच्या गवतातील ओल्या पायाने निसर्गातील जसे दर्शन स्पष्ट होते तर इंदिराजींच्या मनातील सुद्धा. म्हणून इंदिराच्या निसर्गकाव्याचा विचार करत

असताना स्पष्ट होते की, ' इंदिराची वेदना निसर्गचित्रात साकारली आहे. ' मन लागेना घरात कधी येशील तू सांग? ' असा व्याकुळ स्वर मनात आहे. तर–

" रान वारा झाला वास
गंध रंगला चैतन्यात
घट गौरी मी पूजियेली
माझ्या तनामानसात " [२४]

असा अध्यात्मिक शोधही आहे. कोसळणारा पाऊस पृथ्वीस बाहूत घेतो व इंदिरा दुःखाच्या पावसात तृप्त होतात.

**तात्पर्य**

पाण्याला जीवन म्हणतात. मनुष्य जीवनात या जीवनाचे स्थान केवढे आहे? तहानलेल्या अमृत आणि पाणी यातून एक निवडायला सांगितले तर तो पाणीच निवडील. खिन्न, हताश मरगळलेल्या माणसाच्या डोळ्यावरून पाण्याचा गार फवारा फिरावा की, तो एकदम तजेलदार, सचेतन सोत्कंठ होतो. जलधारांच्या वर्षावात गात्रागात्रातून फुटणारा तृप्तीचा नाच माणसाला अपरिचित नाही. जलधारांनी भिजून भेटायला आलेल्या प्रिया ज्या पुरूषाला अलिंगन देतात त्याला तर भाग्याचा पुरूष असे म्हणणारा शुद्रक आम्हास परिचित आहे. पाऊस म्हणजे चैतन्य, पाऊस म्हणजे उन्माद, पाऊस म्हणजे केवळ आनंद.

रात्री सपाटून पाऊस कोसळत असतो, वारा नसूनही चमत्कारिक गारवा घरभर पसरून राहिलेला असतो. सुरक्षित जागी राहून या वेडचा पावसाची वलये इंदिराबाईची स्मृती रेखाटीत असते. त्या वलयांना असतो तृप्तीचा स्पर्श. त्यांना असतो लयबद्ध नाच. कवयित्रीच्या मनात पाऊस निसर्ग फुलवतो तो असा.

इंदिराबाईच्या मनात येणारी, पालवणारी, भरून रहाणारी पावसाची संवेदना किती भिन्न, किती भयानक, त्या म्हणतात.

" अंधारानी कडे घातले
घरोघरी
जलधारांनी झडप घातली
कौलारावर
एकाकीपण आले परत
दिशा दिशातून
घेरायास्तव "

पावसाच्या अनुभूतीचे हे किती विपरीतपण ? प्रत्येकाचे एक आगळे व स्वतः पुरतेच एक संवेदनाविश्व असते. या संवेदना विश्वाचे दार ठोठावून ' का ' असे

असले प्रश्न विचारणे अप्रस्तुत ठरते. या प्रश्नांना दरवाजातून हिरमुसून परतण्या-पलिकडे काही करता येत नाही. अतिव्यक्तीवादी - कविमनांच्या संवेदनालाही का हा प्रश्न विचारणेच अजाणपणाचे ठरेल. त्यामुळे पावसाची एक रात्र ? यासारख्या काव्यातील इंदिराबाई संतांच्या मनाला पावसाचे हे उफराटे दर्शन का घडले ? याचा शोध घेणे म्हणजे एखाद्या नव्या संशय ( रात्र ) मालेला जन्म देण्यासारखे आहे. पावसाची एक रात्र या रात्रीची स्पर्शसंवेदना पालीची असावी. अशुभातून अशुभ असा हा भिंतीभिंतीवरून सरकणारा गलिच्छ प्राणी जिवंत ठेवला तरी माणसाला ओंघळ बनविणारा, माणसाला अपराधी ठरविणारा, रात्री वेळ कुंद होणारे वातावरण आणि त्यात आपले अस्तित्व तीव्रतेने जाणवून देणारी ही काळी पाल नुसतीच काळी नव्हे 'थंड पाल.'

'पावसाची रात' या कवितेच्या संदर्भात लिहित असताना प्रा. ल. ग. जोग लिहितात– [१५] एखाद्याला विचारले तर तो म्हणेल प्रियेशी बोलता बोलता रात्र कशी गेली ते समजलेच नाही. पण ही पावसाची रात्र भिंतीवरील पालीसारखी गतीशून्य निश्चल पालीचे दर्शन इच्छा असो वा नसो व्हायचेच. तशी ही रात्र निश्चल होऊन स्थिर होऊन मनाला छळते आहे. 'कशी रात सखे पुनवेची घडते बाई सदाची' असेही आवर्जून हळवेपणाने सांगणारे प्रेमिक आहेत. कवयित्रीला ती पावसाची रात्र म्हणजे निश्चल आपल्या तनमनावर पहारा करणारी सावध थंडगार पाल वाटते. काळसर निळचा भिंतीवर पाल बसून रहावी तशी निळसर आभाळाच्या छतावर बसून राहिलेली पावसाची थंडगार काळी रात्र. छतावरच्या पालीवरचे – छतावरचे दडपण अगदी नकळत शब्दांच्या संयोगाने येऊन बसते. आणि मग तो काळेपणा वा गारवा याना वजन येते दडपण येते. नी तेच कवी मनाचा ताबा घेते. अशीही नको असणारी पण अपरिहार्य दरवेळी रात्र जीवन रात्रीतला मृताच्या शरीराचा थंडगारपणा घेऊन आलेली ही रात्र एकदाच येत नाही. अगदी सुरूवात केलेल्या माणसाच्या आयुष्यात क्वचित असे शहारे आणणारी इंद्रिये थिजवून टाकणारी रात्र आली असेल परंतु कवयित्री त्या रात्रीसारख्या रात्री पुन्हा पुन्हा अनुभवते. अथवा त्या रात्रीचा तो काळासारखा अनुभव तिला वारंवार रात्र रात्र छळीत राहिलेला असावा. तो अथवा तसाच अनुभव येतो. पालीच्या जागी फक्त बेडकीचे रूप पांघरून त्या कुठल्यातरी काळरात्रीचा अनुभव आकार घेतो. तोही कसा विचित्र बेडूक शब्दाइतकाच बेडूक ओंगळ. लवलवणारे पोट, त्रिकोणी बैठक सार खरे पण हाच बेडूक ओरडावा म्हणून मनाचे कान करून ऐकत नसतो का ? तो पावसाच्या आगमनाचे निशान आहे. एक वेडच्या प्रेमविराचे तर 'मंडुक द्विज गातील जळी' असे म्हणत म्हणत देशील ना मज कसुनी खेंव म्हणून अलिंगनाची ओढ त्या मंडूकाच्या गाण्याने सजवली आहेच का नाही ? प्रेमवेडच्याचा अंदाज

चुकला तरी वेदकाळापासून ऋचांच्या अरोहवराहोत रतिमात्र न चुकणारे वेदोनारायण वेद म्हणत. तेव्हा त्यांना ह्या मंडूकाचीउपमा मिळाली नव्हती का ? अशा प्रज्ञा प्रतिभावनांना भारणारा हा मंडूक या पावसाच्या रात्री केवळ बेडकी होतो. एवढेच नव्हे तर ती फुगू लागते. ओरडू लागते. एका नव्या संवेदन केंद्राला इथे जागृती लाभली आहे. श्रुतीसंवेदना आपल्या प्रतिमेत अभत्वाने होती. आता तिला अस्तित्व आले तेही किती ओंगळ, अभद्र, नको असलेले अटळ रूप.

काळी पाल असो अथवा फुगून ओरडणारी विद्रूप बेडकी असो, त्या दोघी दूर आहेत. माणसाला साक्षात भिडणाऱ्या नाहीत. त्या पालरूप वा बेडकीरूप रात्रीमध्ये आता एक नवा प्रत्यय आला आहे. ती आक्रमक बनली आहे. तिचे पालीचे निश्चल रूप पालटले. तिचे बेडकीचे फुगीर निरूत्साह करणाऱ्या ओरडीचे रूपांतर झाले. ती उतरू लागली. झाडावरून जमिनीवर. समोरून हल्ला करण्याइतकी ती रात्र आक्रमक झाली. त्या नागिनीच्या गतीने प्रत्ययकारी व अल्पाक्षरी चित्र अन्य कुठेच पहायला मिळणार नाही. ती नागिन आहे. तिने डूक धरला आहे. ती दंश करणारच करणार. आपली आता सुटका नाही. पळणे अशक्य. एखाद्या धरणाच्या समोर आपण जात असावे. धरण फुटल्याचे कळावे. सर्व शक्ती पायात खेचून पळायचा यत्न करावा. अनपेक्षीतच असते, अशा दोन क्षणात पाण्याचा आभाळस्पर्शी लोंढा आपल्यावरून जाणार.... जाणार या अपरिहार्यतेचीच आवृत्ती नागीणीच्या वळवळण्यात आहे. इंदिराबाईच्या काव्यातील ' नागीणीची ' ही प्रतिमा नाना संवेदनादर्शक आहे.

" त्या झुबक्यामधी
क्षण वळवळली पाच फण्यांची
काळी नागीण
मिटता मिटता फडा मनस्वी (क्षिताजावाचून)
तर– मन खुळमुळले, पुढे निघाले,
पाय पायरीवरून उचलला
वळवळली अन पायाखाली नागीन "

ही नागीण वेगळी भावछटा निर्माण करते. पावसाची रात्र मधील नागीण मातीचा डंख घ्यायला धावते आहे. कुणाचा तरी राग आणि कुठेतरी सूड असा आंधळा न्याय नागीण अंमलात आणते आहे. या नागीणीने मातीला डंसून काय मिळवले? वेडे समाधान? सूडाची तृप्ती ? ती रात्र बेभान होऊन समरसतेने मातीला डंक करते. माती आणि स्मृती या शब्दात नादसाम्य आहे. स्मृतीच्या नागीणी वळवळत त्या रात्री डंसू लागतात. इथे दडपण आक्रमक झाले. अस्तित्वावर घाला घालू लागले.

कवी मनाला स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व आहे काय ? ती जगते पण जगण्याच्या प्रेमाने नव्हे, वेडाने नव्हे. जगणे सुद्धा हेतू शून्य असेल तर मरणाहून त्यात काय वेगळे असेल ?

जगात सहानुभूती आहे–मिळते. सहानुभूती हवी जगवायला पण रात्रीमागून रात्र नको असलेल्या दडपणाखाली असहाय्यपणे जगणाऱ्या कविमनाला सहानुभूती कशी हवी ? अमरत्व हा आभाळाचा शाप भयंकर. मग तो गोड शाप हवा कशाला ? पाल, बेडूक, नागीण यांना सहानुभूती कुठून असणार ? माणूसच माणसाला दाखवू शकेल. नको असलेल्या अटळ रात्रीपासून सुटायला एकच हवे आहे, माणसाची सहानुभूती. हा माणूससुद्धा त्या रात्रीसारखा एका परीने हवा. डॉक्टरला असाध्य रोग्यालाही विषाची सहानुभूती देता येत नाही. कायदा त्याला अडवील. इथे कायदा वेगळा. माणूस बनून रात्र येते आणि सहृदयतेने सहानुभूतीने ?

मला विष पाजते. माझ्या दुःखाला तिच्या डोळ्यात स्थान आहे. तिची कृती दिसते. हृदयी हे विष कसले ? विष हे अमृत झाले असे तर नव्हे ना ? संवेदना त्या विषाने मरून जातील. मग पाल, बेडूक, नागीण या सर्वांच्या रूपाने छळणारे स्मरण या जळणाऱ्या विषाने नाहीसे होते. ते विष तिला हवे आहे. मिळते आहे. हे दुःख विषय मी आनंदाने प्राशन करते ते का ?

पुन्हा तो न सुटणारा प्रश्न व्यक्तिमत्वाच्या तळाशी जाणारा वेडा प्रकल्प. व्यक्तिमत्वाच्या तळाशी कधी तरी पोचू शकतो का ? इंदिराच्या ' उपसावे .... उपसावे .... ' या कवितेत कितीही उपसले तरी तळ स्वप्नांचा लागेना, असे म्हटले आहे. वाचक तर फारच उपरा दूरचा. असे का ? या प्रश्नाचे उत्तर त्याला सापडणार नाही. तो बुद्धीचातुर्यावर शोधण्याचा यत्न करील. कवयित्रीच्या जीवनात डोकावून पाहिल असे कां ? " अटळ जगणे नि नाना स्मरणे उभी करणारी उग्र भयानक रात्र अनेकांच्या जीवनात अनेक रूपाने अवतरत असेल. आपले परमप्रिय हरवले की झालेल्या व्यथीत मनाचे हे चित्र असे कवी जीवनाच्या मर्यादेत अडवून ठेवणे म्हणजे एकामागून एक येणाऱ्या लाटा मुळात अडवून दूरवर पसरून फुटून जाणाऱ्या लाटेवरच लक्ष केंद्रीत करणे ठरेल. " [१५]

जीवनाची रात्र. एक पावसाळी रात्र. अशाच एका पावसाळी रात्री कवयित्री आपल्या अंथरूणावर विमनस्क स्थितीत पडली आहे. उशाला हाताचे गुणीले चिन्ह डोक्यात भावनांचा गुणाकार. बाहेर पावसाळी हवेचा गारवा आहे आणि खोलीत मंद प्रकाशाचा दिवा आहे. गतस्मृती सरसरून वर येताहेत. एवढ्यात नजरेसमोरच्या छतावर जाणवणारी काळी पाल. ही वेदनारूपच नव्हे काय ? या दृष्याने कवयित्रीच्या भावना चाळवल्या ती जीवनाच्या भूतकाळात गेली. वारंवार चुकचुकून अशुभ अशंका आणणारी ती काळी पाल म्हणजे आपल्या सहचराच्या

मृत्यूची ती काळरात्र नसेल ना ? 'होय' तीच ती पावसाची रात्र म्हणजे थंडगार काळी पाल आहे. तिचा रंग काळा. जीवन थडगार आणि उत्साह ओसरून गेल्यामुळे नुसती बसून आहे. पण सावध आहे. बाहेर आकाशातील मेघसुद्धा असेच. त्यात चैतन्य नाही. चलनवलन नाही. आहे ते कर्तव्य. कसे कुंदकुंद आहे. धरतीवर पहावे तर तिथेही ती रडकथा. बिचारी बेडकी आपला दैनंदिन कार्यक्रम कसातरी कंठीते आहे. दिवस जात होते पण त्यात राग नव्हता. ती फुगत होती पण त्यात सौभाग्य नव्हते. वादळी वारे असे घोंगावत होते की, तिच्या आक्रंदनाचा आवाज त्या डबक्याच्या परिसराच्या बाहेर पोहचत नव्हता.

ही दुष्ट नागीण. तळमळणारी रात्र. त्यापेक्षा मरण येईल तर बरे. मृत्यूची कथा ती तिला स्त्री हृदयाची दुःखे ठावूक आहेत ती हाती विष घेऊनच आली आहे. ते मी पिणार आहे, प्रियाला भेटणार आहे आणि अमृतत्वात विलीन होणार आहे.

" इंदिराबाईच्या जीवनात ओतप्रोत दुःख आहे. प्रियकराच्या जीवनात आत्मार्पण करण्यासाठी हपापलेले मन आहे. पण नशिबी आलेले निरंजनाचे आक्रंदन आपल्याला जाणवत रहाते " [२६]

**आत्मविषयक कविता**

सहानुभूती, सौंदर्य, साधेपण व सूक्ष्मदृष्टी हे इंदिराबाईच्या काव्यातील काव्यगुण रसिकमान्य झालेले आहेत. तरल भावनांचे नाजूक सफाईदार हळुवार चित्रण प्रासादिक भाषेत करण्यात त्यांची प्रतिभा रमलेली आहे या साऱ्या गोष्टी कवयित्रीमधील इंदिराबाईचे ज्येष्ठ स्थान स्पष्ट करणारे आहे. काहीतरी जे अमूर्त आहे. अव्यक्त आहे. शब्दांनी पुरेसे नीट सांगता येत नाही व कितीही अन कसेही फुलवून, खुलवून सांगितले तरी त्यातला अर्थ संपत नाही असे जे काहीतरी त्याला मूर्त साकार आणि व्यक्त करण्याचा त्याला शब्दात पकडण्याचा इंदिराबाईनी प्रयत्न केला आहे. ' आणि अंतरावरून । आई अंधाराचा लोक ' बसे तया न्याहळीत । क्षीण दीपिकांची ओळ । यासारख्या ओळीतून धावणाऱ्या क्षणाक्षणाला पुढे जाणाऱ्या, कालप्रवाहाला पकडून ठेवण्याची त्यांची वृत्ती सहज लक्षात येते.

जीवनातील सुखदुःखाला त्या आनंदाने सामोऱ्या गेल्या आहेत. आनंद उधळला आहे. दुःख काळजात जपून ठेवले आहे.

काव्यात कवीचे दुःख त्याचे जीवन, व्यक्तिमत्व यांचे प्रतिबिंब सहजतेने उमटते. कुठेतरी कवीच्या भावनेचा एखादा भाग नकळत तरळून जातोच. इंदिराबाईच्या साऱ्या कवितांतून त्यांचे दुःख, त्यांची वेदना डोकावणारी असली तरी काही कविता त्यांचे वैयक्तीक जीवन वाचकांच्या समोर उभ्या करणाऱ्या आहेत. या काव्यातून मोठ्या सूक्ष्मतेने त्यांचे वैयक्तिक जीवन उभे रहाते. त्यांच्या व्यक्तिमत्वाची खोच, त्यांचे वैयक्तिक भावजीवन त्यांची उध्वस्त झोपडी, त्यांची

रूपेरी स्वप्ने, त्यांचा उदास चंद्र, त्यांची वेडी फुलझाडे हे सारे त्यांचे जग आत्मनिष्ठा असणारे ज्या काव्यात प्रकर्षाने त्याच जाणवतात. आनंदाला सामोरे जाताना त्या म्हणतात –

" कळचा माझ्या आनंदाच्या
साठविल्या माझ्याकडे
फुलवा या तुझ्यापुढे "

आईची माया स्नेहरूपाने उभी रहाते तर –

" प्रारब्धा रे तुझे माझे । नाते अटीतटीचे । प्रारब्धाशी झगडण्याची वृत्ती ही त्यांची आहे. त्यातूनच त्यांचे वैयक्तिक भावजीवन उभे रहाते. बोर्डिन्गमध्ये शिकत असताना ' आई ' चो आठवण मनात दाटून येते. हे आईचे चित्र आईपासून दूर रहाणाऱ्या प्रत्येकाचे आहे असेच वाटते. व्यक्तीच्या जीवनात आईचे स्थान हे महत्त्वाचे असते. इतरांपेक्षा वेगळे असते. आनंदाच्या कळचा साठवून ठेवाव्या. या फुलवायला मात्र आईकडे पाठवाव्यात असे त्यांना वाटते. तर आठवण येता पापणीचा काठ दाटून येतो. त्याला वाट करून द्यावीशी वाटते. आईच्या मांडीवर झोपून खूप काही तरी बोलत रहावेसे वाटते. बोर्डिन्गमधला हा काळ फार नसतो तरीही तो खूप वाटतो. 'कधी आई भेटशील । जीव माझा उतावीळ ।'होऊन जातो.

मनातील हळवी हुरहुर त्या प्रकर्षाने टिपतात. या हुरहुरीने त्यांची डावी पापणी शकून दर्शविते. ' त्याच्या ' येण्याची ज्यांच्यामुळे त्याचे भावजीवन फुलले त्या प्रियकराचे स्थान त्यांच्या काव्यात महत्त्वाचे आहे. मनात हुरहुर येते. दर्पणात पहाता पहाता सारे जीवनच नवीन वाटते. दिवसाच्या मनी चांदणे दाटून यावे तशी प्रियकराची ओढ त्यांना वाटते.

सुरुवातीस हे नाते निव्वळ शुद्ध मैत्रीचे होते. मनाला सहवासाची ओढ लागलेली असायची. मनात नाना भावना दाटून यायच्या. कधीतरी एखादा अश्रू निखळून पडायचा. फुलांवर दव पडावे, दंवबिंदूत फुले न्हावून निघावीत तसेच ते अश्रू त्यातून विवाह. विवाहाची माळ तुझ्या कंठात घातली. त्याचवेळी तू डोळ्यात स्वर्ग आणून माझ्याकडे पाहिलेस. मांगल्याचे अश्रू डोळ्याच्या गाभाऱ्यात निखळले. सौख्याने हृदये भरून आली. तुझ्या स्पर्शात जादू होती.

" जे आले अश्रू उसळून आनंदाने
जाहली तयाची फुले तुझ्या स्पर्शाने " [३७]

इंदिराबाईचे सारे जीवन ' आसवे ' या कवितेत त्यांनी उभे केले आहे. प्रीतीच्या स्पर्शाने ते न्हावून गेले. तसेच ओघळत्या अश्रूनी त्यांचे मनही दग्ध झाले. " जी आसवे तुझ्यासाठी होती, तुझ्या स्पर्शात हंसली, खुलली होती. ती आसवे आज लुप्त झाली आहेत. दग्ध झाली आहेत. इंदिराबाईची

' आसवे ' दग्धतेने आटून जातात. त्यातून त्यांचे दग्ध जीवन वाचकांच्यासमोर उभे रहाते.

जीवनाचा हा रस्ता त्यामुळे त्यांना वैराण वाळवंटासारखा वाटतो. सारे भोवतालचे रान जणू पेटले आहे व इंदिराबाई एखाद्या हरिणीच्या पाडसासारखा सापडल्या आहेत. स्वतःच्या दुःखामुळे त्यांना भोवतालचे सारेच दुःखमय वाटते. तारेचे खांब–ज्यातून असंख्य जीवांचे गुणगान चालते–ती गिरणी धडपडते आहे. माझे जीवन हे यंत्रासारखे झाले आहे. त्यामुळे यंत्राची भाषा यंत्रास उमजू लागली आहे.

मनातील प्रेरणा त्याच अर्थांच्या प्रतिमा धारण करतात. नागिणीसारखे धावणारे रूळ, घाबरट चिमण्या आणि शेवटी कवयित्रीचे सुन्न मन.

प्रियकर निघून गेला तरीही त्याच्या स्मरणाने (वस्तू स्मरण संवेदना स्मरण) मन परत विषण्ण होते. सागराच्या काठावरील त्या सागरवेल होतात. फुलांनी शृंगारून वाट पहात रहातात. पण तू येत नाहीस तर आठवणीचे तुषार मनात आठवून येते. तुझे देखणे रूप तू जवळ नसतोस तरीही सागराच्यारूपाने भेटतोस. तुझ्या भव्य रूपाची, भोवतालच्या माळाची, तुझ्या निश्वासीतांची, त्या निश्वासीतांनी फुललेल्या या फुलांची दुनिया पाहून मी लहरून येते. बेभान होते व तुझ्या आठवणींची दासी होते. ' आठवणीची दासी ' होणे या रचनेत खरी इंदिराबाईची भक्ती उभी आहे.

प्रियकराच्या निघून जाण्याने कवयित्री आंधळी होते. पूर्ण आंधळी. अजूनही गोठल्या रक्ताचा स्पर्श जागा असतो. थंडगार ओठांची स्मृती असते. निळचा शाईतील रेखीव अक्षरांचे पत्र असते. त्यांचे तुकडे समोर असतात. नसानसातून तूच असतोस तुझे अस्तित्व असते.

प्रेमी जणांना रात्रीची व्याकुळता अधिक जाणवते. कवयित्रीचे मन असेच मध्यरात्री व्याकुळ कासावीस होते. ही तिन्हीसांज त्यांना करकरणारी वाटते. कातर रानपांखराचा स्वर अशुभ वाटू लागतो. धरित्रीच्या अंतरात कापून उमटून ती काळवंडून येते. तारकांच्या कुंडलीत कवयित्रीस मात्र तिच्या दुःखाचे उत्तर मिळत नाही. अंधारात फक्त उमटत राहतो एक उसासा, एक फडफडणारा पक्षी, रात्रीचा उसासा, फडफडणारा पक्षी या प्रतिमा मुळी जीवघेण्या आहेत भोवताली सारे असे विषादपूर्ण मनास बरे वाटावे म्हणून इंदिराबाई सागराचा आश्रय घेतात. त्याना सागर म्हणजे प्रियकराचा सखा वाटतो.

कोवळचा अंधारात दर्याच्या काठावर त्या एकाकी बसून असतात. प्रियकराच्या विचारात, त्याच्या विचारात रंगून जाण्यातही एक मस्ती आहे. ही मस्ती सुखद आहे. सप्तर्षी या वेडचा इंदिराबाईना पहात रहातो. त्यांच्याकडे

पाहिल्यानंतर इंदिराबाई परत भूतकाळात प्रवेशतात. त्यांच्या आत्मविषयक काव्याचा विचार करत असताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती ही की त्यांना वर्तमानकाळ प्रिय नाही. त्यांचे मन भूत-भविष्यांतच रेंगाळत रहाते आहे.

सप्तर्षींची दाढी ओढावी, मंगळ-शनीची बटने प्रियकराच्या शर्टासाठी आणावी,लाटेचा पदर खेचावा, खारट पाण्याचे नितळ थेंब अंगावर घ्यावे,तसेच दुःख त्या बोलत रहातात. स्वतःच्या अनुभूतीशी त्या पूर्ण प्रामाणिक राहिल्या आहेत.

" एक कळावे . . . खेळच सारा
बघत दर्पणी चालायाचा
उलट्या छपरावरूनी चालत
निळ्या आभाळी पहावयाचा " [१८]

अनुभूतीतील प्रामाणिकपणा इथे सहज जाणवून जातो. त्या 'वाघूळा' चे रूप घेतात. एकाएकी वटवाघूळ, स्वतःस उलट टांगून घेणारे – काळवंडलेले पहाणाऱ्यास त्याचे दुःख वाटत नाही. तरीही मनात केविलवाणा सूर दाटतो. इंदिराबाईंचे हे वाघूळ विदीर्ण आहे. शून्यातून येणारी तीक्ष्ण नखे, विद्रुप डोळे, कापरे पंख हे वाघूळ म्हणजे इंदिराबाईंच.

शब्दावर प्रभुत्व असणाऱ्या कवयित्रीस काही मीलनांचे क्षण टिपता आले नाहीत. याबद्दल हुरहुर वाटते. 'लिहायचा तर लिहीता यावा । अशा क्षणांचा अर्थ सुसंगत' असे त्यांना वाटत रहाते. पण मनात एक शून्य दाटलेले असते.

बाळपणाचा काळ सुखाचा आठवतो. घडीघडी असे म्हटले जाते. बालपणीच्या गमती जमती आठवतात. बालपणीचे आभासाचे गंभीर नाटक आठवते. निवडुंगाच्या शीर्ण फुलाचे झुबे कानावर ल्यावे ही ममोमन इच्छा अजूनही मनात आहे. त्यांचे बालपण खेड्यात गेले. त्यामुळे त्यांना त्या सुखाची चव पूर्ण कळली आहे, तो स्वादही जिभेवर आहे. ती आठवण अजूनही पदराशी आहे. ते जाणीव नसणारे स्वप्नाळू जग अजूनही भोवताली आहे असे वाटते. पण ते कधीच न परतून, मिळणारे जग आहे याची जाणीव होता मन कसे काळवंडून येते. मिळणाऱ्या स्वप्नांचे, जगाचे, क्षणाचे मानवी मनाला विलक्षण आकर्षण असते. स्वप्नाळू जगात जगणे त्यांना प्रिय आहे. मावळतीला घराचे दार, त्या दारी उभे राहून नक्षत्रांचा निरोप द्यावा असेही स्वप्न अजून उराशी आहे. नक्षत्रांचा निरोप देता देता रात्र कधी होते तेच त्यांना कळत नाही. त्या अंधाऱ्या रात्रीही –

" अवचित ढळतो एकच तारा,
एक ओढीने घेतो कोसळ,
बघून होते मुके मुके मन . . .
निरोपातले स्वागत व्याकुळ " [१९]

स्वर्गातून जणू निरोप घेऊन तो येतो आहे असे वाटते. तुझ्या स्मृतीचे लाख काजवे पदराशी जपावे, अधांतरी उभे राहून तुला घ्यावे नी केसात केवडा घालून तुझे स्वागत करावे. कचभार उदवून त्यात मुखचंद्रमा लपवावा, तुझे ओले अंग टिपावे. चांदण्याने तुला न्हाऊ घालावे. प्रियतमेची प्रामाणिक भूमिका त्यांनी वटविली आहे.

हिंदू स्त्रीचा आदर्श त्यांच्या व्यक्तिमत्वात जाणवतो. दारात तुळस उभी असणे हे हिंदूना प्रिय आहे. मनात चांदण्यांचे आंभाळ कलंडून जावे. काळोखाचे मृगजळ ओठांनी प्राषण करावे. तरीही मंत्रविद्ध रात्र मनास व्याकूळ करते व दिवसाच्या राखेत त्या तुळस होऊन उभ्या आहेत. स्वाभिमानाची झालर त्यांच्या ताठ मनातून त्या स्पष्ट करतात.

" ही या इथली खुलास ताठर
कधीच फुटली बावटळीने " [१०]

बावटळीने त्यांचे जीवन पूर्ण उध्वस्त झाले आहे. तरीही लाल धुळीतील पदचिन्हे, त्यांचा हिशेब वाचकांना निरखावा ही अपेक्षा आहेच. आठवणीबरोबर मानव चालतो का ? या प्रश्नाचे उत्तर होय असेच द्यावे लागेल.

" असते एक हट्टी जाणीव
दंडापाशी . . . . पदरापाशी
मनामनाला जी संवेदित
तुझ्यासवे मी असते चाळत " [११]

तुझ्या स्पर्श संवेदना वरती आभाळ बरोबर असतेच ना ? कधीतरी मी बेभान होऊन तुझ्याकडे येणार आहेच. रात्र स्तब्ध उभी असेल, खिळलेले पाऊल, गिळलेले स्वर, सावरलेला बोल, खिळलेला तोल, ओठावर शपथ त्यावेळी रेंगाळत असेल.

प्रत्येक व्यक्तीस वाटत असते, ' मी कसा आहे ? मी कसा दिसतो ? ' आपल्यातील ' मी ' ला शोधण्यातसुद्धा एक आनंद असतो. एक शिक्षिकेची भूमिका वटवत असताना त्यांना असे वाटते, ' उभे राहूनी मध्ये पहावे । रूप आपुले छंद मनाला । व्यासपीठावर उभी असणारी शिक्षिका मेजापाशी बसून सह्या करणारी प्राचार्या, तळाशी उभी असणारी मनस्विनी ही सारी रूपे त्यांच्या मनास मोहिनी घालत असतात. या रूपातही त्या मनातील खोल हुंदका विसरत नाहीत. हसत जगावे, जगत हसावे, हसत रडावे ही जीवनाची नांदी आहे. हे जीवन त्या मानतात. अंगावर कष्ट झेलत जीवनाची समाधी त्यांना उभारावयाची आहे.

स्वतःच्या प्रणयी जीवनाच्या तीन अवस्था इंदिराबाईनी ' आले मी ' या कवितेत व्यक्त करतात. वर्षातील संध्येपरी त्यांचे येणे, वर्षेतील रात्रीप्रमाणे

अश्रू सावरणे, हृदयातील वीज जमणे, धगधगते जीवन ओंजळीत घेऊन जाणे यातच त्यांचे जीवन आहे. निखाऱ्यावर तडफडणारा शिपला एकदाच त्यांना झेलावा लागला. त्या दिवसापासून शापीत जीवन जगत, दुःख वेगळी होऊन त्या हसत राहिल्या.

'ऐक जरा ना . . .' ही कविता अनेक जुन्या गहिऱ्या आठवणींची जाणीव करून देते. घराभोवती अंधाराचे कडे असते. जलधारांनी कौलारावर झडप घातलेली असते. दिशादिशातून पसरलेले एकाकीपण, कवयित्री एकटी निपचित डोळे मिटून पडते. त्याचवेळी एकेक वस्तू त्यांचा स्पर्श घेऊन जवळ उभी. घराचे दार, किलकिलणे, पुटपुटणे, 'आठवते' त्याच्या बोटाचा टकटक. बाजूची आराम खुर्ची कानाशी कुजबुजते 'आठवते का कातरवेळा' त्यावेळी तो तुझी वाट पहात होता. मध्यरात्रीची वादळी अवस्था होती. एवढ्यात कौलारावरून एक थेंब ओठावरती ठिबकला. म्हणाला –

" या डोळ्याची चोरी
वीज चोरटी
हेच मला भय " [१२]

प्रियकराच्या डोळ्यावर लुब्धावलेली प्रियतमा वस्तूवस्तूतून धावत सुटली. प्रेमाची समाधीच ही. चराचर वस्तूवस्तू ओरडत होते. 'ऐक जरा ना. . . . ऐक जरा ना. . . .'

त्याच्यासमोर उभे असणारे हे दुःख पहाडासारखे आहे. कडवट काळा प्रकाश धारण करणारा पहाड स्वतः कवयित्रीलासुद्धा वाटत होते की आपले जीवन दगडासारखे व्हावे, दगडावर उन पडो, पाऊस पडो त्याच्या संवेदना जशा भिजलेल्या असतात. पण दगडालाही हे भिजलेलेपण चुकले आहे का ? हा दगडच एकेदिवशी म्हणाला, नको नको तुझे जीवन आहे तेच बरे आहे. सळसळणारे, जळणारे जीवन हेच चांगले. बाईचे दुःख इथे निसर्ग शब्दबद्ध करतो आहे.

ना. मा. संत आजारी असतानाचे असेच एक चित्र त्या 'काहूर' या कवितेत सांगून जातात. हिरमुसवाणी मोसंबी ग्लासवर असणारी शून्य रिकामी नजर व उरात काहूर घरून थांबलेली कवयित्री भीतीने बेभान, चुकचुकणारी पाल.

मनात काहूर एवढे काही आहे की, पलंग जरी करकरला तरी कवयित्रीचे मन वेडे होते. आजारात फक्त आजारीच हळवा असतो असे नाही, तर त्याबरोबर जवळ असणारे माणूससुद्धा. प्रियकराच्या मृत्यूनंतर काचाकवड्यांचा खेळ संपला असे इतरांना वाटत होते. तो खेळ कधीच संपणारा नव्हता. उलट अजून तो तसाच आहे.

ज्वाला खोविल्या केसात
निमाले तलम आभाळ,
राखेवरती मांडला
काचाकवडयांचा खेळ " "

मानवी संसार हा एक खेळ नव्हे काय ? कवयित्रीच्या बाबतीत तरी तसे आपणास दिसून येते.

वेडातच जगणे माणसास प्रिय असते. कवयित्री दमून भागून घराकडे परतते. एवढ्यात ओझे सावरलेली, हातात भांडे, डबडबलेला घाम, ओठावरील परके शब्द–असे एक रूप उभे. कोण तुम्ही ? प्रश्न अगांतुक. एवढ्यात दुसरी हातात कागद, शिणवटलेला चेहरा, ओठावरती कोरडे शब्द ' कोण तुम्ही ' तीही विचारते. स्वतःच्या दुःखापासून परकी व्हायचा जरी प्रयत्न केला तरी कवयित्री त्या दुःखापासून वेगळी होऊ शकत नाही. ऑफिसात वावरत असताना ओठावरती कोरडे शब्द, तर घरात ' ओचे सांवरून काम करणारी गृहिणी. '

ही त्यांच्यातील गृहिणी कधीतरी बाळरूप धारण करते. त्या बालेचे दुःख मात्र प्रौढेचे असते. घरातला चिमुकला बाजार झोपी गेलेला असतो. घरकूल उभे करते. मनोराज्यातच जगणे माणूस प्रिय मानत असतो. त्यांच्यातील शिक्षिका तीन चार रूपे घेते. पहिल्या तासालाच त्या वैतागतात, दुसरा तास स्मरणाचा, आठवणींनी फुललेला, तिसरा तास पाठशिवणीचा, स्वप्नांचा, धुक्याचा, तर शेवटच्या तासाला कवयित्री स्वतः एकटी उभी. आभाळही दिसेना, नजर पोहचेना अशा अवस्थेत अतिव दुःखात पिचलेले मन या ठिकाणी स्पष्ट होत आहे. तरीही मनात एखादे वेड धरण्याची अनावर हौस आहेच. कधी दरियावरचे सागरपक्षी पहाण्याचे तर कधी लाटावरती झुलण्याचे.

आत्मविषयक कवितामध्ये सारे जीवन नजरेसमोर उभे रहातेच. तरीही भेट हवी तर ही कविता विलक्षण शब्द बांधणीचे शब्दचित्र रेखाटण्याचे सामर्थ्य असणारी आहे. या काव्यात फक्त इंदिराजींची वेदना शब्दबद्ध होते असे नाही तर त्यांचे सारे जीवनच.

' भेट हवी ना ? ' खुशाल जा. दारावर हंसून स्वागत करायला चहाबरोबर खायला आपली ती वेडी सुगरण असेल. तिच्याबरोबर गप्पा मारायला पुष्कळ विषय आहेत. तू तिला बागेतल्या एखाद्या वेलीचे नाव विचार. भिंतीवरच्या चित्रासंबंधी विचार. पण( ? )नको विचारू ती मिटलेली आराम खुर्ची, जपणारा तो सुगंधी स्पर्श, ती का एकटीच उभी आहे. तो बकुळवेल आज का वाळून गेला आहे. तरीही तो तू तसाच का जपून ठेवला आहेस ? जर तू एखादा प्रश्न विचारशील तर . . . ती डोळे बारीक करेल, विचारमग्न होईल. हसेल थोडी आणि म्हणेल –

'सहज . . . उगीचच . . . . . अशीच गंमत . . . . . असेच काही.'

स्वतःच्या दुःखात तुम्हास मी गुरफटून ठेवणार नाही. उलट परत प्रश्न विचारेल. तुम्हास मरण आवडते का ? काव्यावर ती बोलेल. स्तब्ध होईल. तूच फक्त बोलत रहाशील. ती तुझे बोलणे ऐकते, की नाही ते सुद्धा कळणार नाही. फक्त ऐकत राहील. तशीच, ऐकत राहील. स्तब्धशी . . . .

" बघशील मागे वळून जर तर
दिसेल ती तुज
दारावरती मस्तक ठेवून
उभी, परंतु . . . कोसळलेली "

भेट हवी ना ? मग जा. पण भलतेसलते प्रश्न विचारू नको. वाचकांनाही दुःखाचे दान स्विकारायला लावणारी ती कविता आहे.

नोकरीवरती जाण्यासाठी बाहेर पडणाऱ्या कवयित्रीच्या अंतरंगात असेच काहूर दाटून येते. पदर खोचावा कामासाठी बाहेर पडावे तर कठोर रस्ता आडवा. कठोर रस्ता असे म्हणून रस्त्याचे पुरुषीपण त्यांनी स्पष्ट केले आहे. बाहेर पडता पडता अघटीत घडावे, वाऱ्याने पदर सुटा व्हावा. कुंतलबंध सापडू नये 'धुके' मुलासारखे रांगत आडवे यावे. दुधाचे ओठ घेऊन कवयित्रीचे वात्सल्य, आईपण जागे होऊन त्यांना रोखत असते.

कधीतरी त्यांच्यातील व्यवहारी स्त्री जागी होते. पगाराचे जमाखर्च मांडता मांडता जीवनाचा जमाखर्च मांडून जाते. त्या रटाळ जमाखर्चातूनही उचमळणारा चंद्रमा त्याना जाणवत रहातो. काही होवो कवयित्रीला जगलेच पाहिजे. काळ–कामाचा वेग मनावर असतो. सारे जगच जगाचे स्वप्न परके असते. तरीही जगणे निसर्ग म्हणून त्यांना प्रिय असते.

" चाखत चाखत चहा जांभळा
मुले खेळवित पायावरती
मनात बसते जमवित
अवकाशाचे लहानगेपण
शिखरांचे उन्मत रितेपण,
अरण्यातले अलिप्त भीषण,
सशासारखे कान उभारून
टकमकणाऱ्या . . . . . .
अस्त्विाचे परके स्पंदन " [१४]

वारंवार त्यांच्यातील दोन मूर्ती जाग्या होतात. एकमेकीना प्रश्न विचारतात. तो सुद्धा घायाळ पांखराचा असतो. कापऱ्या पंखाचा असतो. दुभंगलेल्या हिरव्या

रंगाचा आणि बंध तोडलेल्या पावसाचाही. सारी वेदना जपत चालणेच त्यांना प्रिय आहे. त्यांच्यातील वेदना वजा करता त्यांच्या जीवनात शून्याशिवाय आपल्याला काहीच मिळणार नाही. त्यांचे हे दुःख आकाशाला, वाऱ्याला, दरडीला साऱ्यानांच कळले आहे. जीवनाच्या प्रवासात बाहेर पडणाऱ्या या दुःखी कवयित्रीस विजेचे खांब, गंभीर वृक्ष रिझविण्याचा प्रयत्न करतात. तरीही जीवनाची भयाण रात्र सरते आहे असे त्याना वाटत नाही.

" केव्हा कधी संपणार
माझ्या मनातली रात
किती काळ शेकोटीशी
असे बसावे " [१५]

शेकोटीची प्रतिमा वापरून कवयित्रीनी आपल्या दुःखास अधिकच तीव्रता आणली आहे. या दुःखाने त्यांची अवस्था काळोखातून धावणाऱ्या मनाचा बांध फुटलेल्या वेलीसारखी झालेली आहे. ही वेली कधीतरी थांबते दुःखाचा उसासा टाकते. शून्य नजरेने आभाळाकडे पहाते. काळजाच्या कुपीत दुःख भरून ठेवते आणि हसतच रहाते. आपल्या प्रियकरास जास्वंदीची शपथ घालून येण्याची विनवणी करते. त्याच्या स्वागतासाठी बाहूची कमान उभी ठेवते. पण तो प्रियकर कधीच येत नाही. ' घर ' या कवितेत कवयित्री आणि तिच्या भोवतालचे जग शब्दबद्ध केले आहे. दिवसभराच्या श्रमाने थकलेली कवयित्री घरी येते. मैत्रिणी-सारखी तिची सोनकेळ वाट पहात असते. रान गुलाब झुलत असतो. दरवाजा नाचत असतो. खुर्ची आसुसलेली असते. ताम्रवर्णी पाण्याचा हंडा आतूर असतो. बर्शेन पलंग सारे कसे स्वागतास सिद्ध असतात. पण आपल्याच वेडात दंगून रहाणे कवयित्रीस प्रिय असते. कारण नियतीचा शाप तिच्या उराशी आहे. या शापामुळे तिची स्वप्नेसुद्धा जळून भस्म होतील अशी भीती तिला वाटते आहे. तिच्या अश्रूंना फक्त आभाळच साक्ष आहे. कारण समाजातील इतर घटकाशी त्या दुःखाचे नाते जोडू शकल्या नाहीत. आभाळासारखे मन असणाऱ्या कवयित्रीचे मन मुके मुके होते. सावलीच्या स्पर्शानिसुद्धा आज त्यांचे मन झाकळले गेले आणि डोळ्यांच्या यमुना पुराने दुथडी भरून गेल्या. पायाखालची वाट घरापर्यन्त पोहोचेना माथ्यावरती भरलेली पाण्याची घागर. म्हणून कवयित्री म्हणते –

" मयसभा होवूनीया
उभे अवघे जीवन
काय त्यातील हे एक
एक अटळ दालन "

जीवनातील दुःख एकटचा कवयित्रीस भोगले पाहिजे. कारण हा नियतीचा

शाप आहे. स्वतःच्या प्रारब्धास जरी त्या दोष देत असल्या तरीसुद्धा स्वाभिमानाची जपणूक करणारे त्यांचे स्त्री मन शरण गेलेले नाही. नशिबाच्या रेशमी जाळ्यात त्यांचे दुःख कासाविस झाले. हृदयातील कढते रसायन तापून उठले तरीही–

" जिद्द माझीही तशीच
नाही लवलेली मान
जरी फाटला पदर
तुझे झेलते मी दान " [१६]

इंदिराबाईना घडणारे प्रियकराचे दर्शन विश्वव्यापक आहे. प्रत्येक वस्तूत त्या प्रियकरांचा स्पर्श शोधत आहेत त्यामुळे–

" नकळता तुला मी ही
फूल एक उचलले
तुझ्या पावलाची खूण
फूल तेथेच वाहिले " [१७]

प्रियकराचे रूप त्यांना शुभ्र आणि पांढरे वाटले. अशीच ती दवाखान्यातील एक रात्र. भयाण काळोख, परिचारिकांची धावपळ, झपाटलेले झाड, काळीज आत ठेवून बाहेर कठडचाशी उभी असणारी कवयित्री, झाडांच्या रसवाहिन्यातील धो–धो प्रवाह अणि त्यातच प्रियकराचा मृत्यू, प्रियतमाच्या मृत्यूची चाहूल लागण्यापूर्वीच तो निघून गेला हे स्पष्ट करत असताना विलक्षण शब्द सामर्थ्य त्यांनी आपल्या काव्यात प्रकट केलेले असते.

असंख्य आठवणींचा कळप. चंद्र, सूर्याचा चुरा. लांबून दरवळत येणारा कृष्ण कमळाचा सुगंध, शांत असणारे कवयित्रीचे मन एकदम दुभंगले, त्याला दोन वाटा फुटल्या. या दोन वाटा स्पष्ट करत असताना विरहाची दाहकता मोठ्या व्याकुळतेने शब्दबद्ध केली आहे.

" एक थांबते घरामागच्या बागेतील
तुळशी कट्टयापाशी मावळत्या उन्हात
तिथे मी जमवीत असते आपल्या
आयुष्यातील तुळशीपत्रे
त्यावर शिंपीत असते डोळा भरून आणलेले गंगाजळ
ढलत्या कातरवेळी समोरच्या दरीत भरून
येणाऱ्या अंधाराकडे
टक लावून ती शोधत असते
आपल्या सैरावैरा आयुष्याचे समर्थन " [१८]

दोन पायांची वल्ही वल्हवत आयुष्याची रात्र तडीपार करणारी कवयित्री

दुडक्या पावलाने चालण्याचा प्रयत्न करते आहे. आणि त्याचवेळी पहाट–किनारा आक्रोश करतो आहे. हा आक्रोश एका स्त्रीचा आहे. एका प्रियतमेचा आहे. संसार मोडलेल्या एका गृहिणीचा आहे. पूर्णत्वात विलीन होण्यासाठी एक सोबत संपलेल्या पण मागे उरलेल्या सावलीचा आहे. आत्मविषयक कवितांतून त्यांचे वैयक्तिक जीवन वाचकांच्या समोर उभे राहिलेच, त्याचबरोबर वेदनेने काळवंडलेली दुःखाने व्यग्र झालेली एक प्रियतमा त्यांच्याच शब्दात सांगायचे तर–

" माझी कविता माझ्याबरोबर वाढली आहे. माझ्या सुखात रंगली आहे. दुःखाने कोसळली आहे. प्रक्षोभात अस्वस्थ झाली आहे. " [१९]

कवयित्रीबरोबर त्यांच्या काव्याची कोसळलेली अवस्था ती अधिक सहज आहे. व्यक्तीपासून त्याचे काव्य वेगळे काढताच येणार नाही. इंदिरांची वेदना म्हणजे त्यांची सावलीच. त्यांची कविता ही मला त्या सावलीसारखीच वाटते. सावलीला माणसापासून आपणास दूर काढता येत नाही तशीच त्यांची कविता.

## इंदिराबाईची प्रेम कविता

इंदिरांची प्रेमगीते सफलतेपेक्षा त्यांच्या वियोगाचे दर्शन अधिक पद्धतीने घडवतात. त्यांच्या विरहगीतातून नवनवीन छटा उमटलेल्या दिसतात. या सर्वच कविता लक्षवेधक आहेत. आपल्या जीवनात अनेक व्यक्ती येतात व जातात. काही निवडक येतात व योगायोगाने दूर होतात. त्यातील एखाद्या व्यक्तीवर मित्र म्हणून, प्रियकर किंवा पती म्हणून आपण उत्युत्कट प्रेम करतो. आपले सारे जीवन त्याच्या जीवनात मिसळून टाकतो. त्याच्या व्यक्तित्वात विलीन होऊन जातो. पण कालांतराने नियती आपल्यावर निर्दय प्रहार करते. त्या व्यक्तीपासून आपला चिरवियोग होतो. त्याच्या यातना अतिशय दारुण असतात. असह्य होतात. मन हिरमूढ होते. आपल्या जीवनाची समाप्ती करून टाकाविशी वाटते. जीवन उजाड, उदास, एकाकी भासू लागते. जीवनाबद्दल विरक्ती निर्माण होते. पण परत काही काळ निघून जातो. आपल्याला नकळत आपल्या मनावर काळ विस्मृतीची पटले हळूवार हाताने घालीत असतो. एकीकडे आपण आपल्या प्रिय व्यक्तीच्या वियोगाने विषण्ण आणि निराश असतो. त्याच वेळी दुसऱ्या काही अदृश्य मूर्त वा अमूर्त गोष्टी आपल्या मनात अभावितपणे प्रवेश करीत असतात. आपल्या ते लक्षातही येत नाही. इतकी त्यांची चाल मंद व संथ असते. रात्र केव्हा संपते व पहाट केव्हा निश्चित सुरू होते हे सांगता येणे कठीण असते. तसेच काही या भावनेच्या बाबतीत होते. मनात संभ्रम निर्माण होतो व एकदम मन कावरेबावरे होते. या नव्या भावनेची जाणीव मनास सोसवत नाही. कारण आपण दीर्घकाळ जिची जपवणूक करीत असतो त्या भावनेशी ही नवी भावना आपल्याला प्रतारणा करावयास लावते, असे सारखे आपल्याला टोचत रहाते. हे

शल्य कितीही दूर सारले तरी पुन्हा मनात येतेच. ही भावना वर्णन करावयास कठीण आहे. ही भावना संमिश्र आणि गुंतागुंतीची आहे. पण त्याची उकल हलक्या हाताने करतात. प्रेम आणि त्यातील वेदनेची हळूवार चित्रणे आपल्या कवितेत केलेली आहेत. त्यामुळे त्यांची भावगीते तरळ, उत्कट व कलात्मक भावनांनी सौंदर्यपूर्ण झालेली आहेत. यातून सूक्ष्म दृष्टी प्रतीत होते. त्यांच्या मनोविश्लेषण, प्रतिभेचे आपल्याला प्रत्यंतर येते. हे मान्य करूनही " पतीच्या निधनानंतर त्यांची कविता विरहाच्या रंगाने साकळल्यासारखी आहे. छटा भिन्न आहेत. विविध आहेत पण रंग एक आहे. " [४०]

प्रा. मालती किर्लोस्कर यांच्या वरील विधानात इंदिराजींची विविध प्रेम कविता व विरह कविता एकच रंगाचे रूप घेतात, असे म्हटले आहे. आणि हा रंग अधिकच गहिरा आहे.

प्रीतीचा ज्वालामुखी जागृत झाल्यानंतर त्या रसायनाच्या डोहात बुडून जाणारे मन आपल्या अल्लड प्रीतीचे, निरागस प्रीतीचे व तेथूनच निर्माण झालेल्या अतिव दुःखाचे, प्रत्यक्ष काही चित्रण वाचकांच्या समोर ठेवते. रानातल्या एखाद्या फुलासारखी असणारी प्रीति लाजाळूच्या रूपापेक्षा लाजरी आहे हे मुग्ध प्रेम बोलून दाखवायचे नसते तर –

" अल्लड प्रीत माझी
सर तिला पाखराची
तुझ्या मनी आढळली
जागा तिला निवाऱ्याची "

नाजूक असणाऱ्या प्रीतीस कुठेतरी निवाऱ्याची जागा हवीच असते. ना. मा. संताच्या हृदयात ही निवाऱ्याची जागा त्यांना मिळाली. प्रियकराच्या मृत्यूनंतर जीवन गारठून टाकणारी वेदनाही कातरवेळेला आपला प्रियकर येईल म्हणून प्रतिक्षा करणारी प्रियतमा. स्वयंपाकाचा थाट मांडून तयार असतो पण कधीही परत न येण्याच्या प्रवासास गेलेला प्रियकर परत येणार नाही. याची जाणीव होता त्यांचे मन भयकंपित होते.

" तुजविन आता तुझ्या या संसारी
अंगाराच्या सरी वर्षतात
आत बाहेरून लागलीसे आग
तुझा घेत माग येवू कोठे "

प्रियकरापेक्षा वेगळे जीवन त्यांना नाही. त्यामुळे या निर्जीव जीवनात सुख व दुःख या दोनही भावांची त्या जपणूक करतात.

प्रियकरास पत्र लिहिण्यास बसलेली त्यांची प्रियतमा मोठ्या डौलाने

अक्षरांना डौल देते. भावजीवनाचा झरा पत्रात रिकामा करते. काही वेळेला त्याच्याकडे जाण्यासाठी अंगणाच्या बाहेर पडते. निळे पाखरू, पाऊस, धारा, चंद्र किरण प्रियकराच्या घराची वाट दाखवतात. तेवढ्यात त्याना जाणीव होते त्यांच्या उध्वस्त जीवनाची. उंबरा अडखळतो, काया लुळी पडते. देह निष्प्राण होतो आणि कोरड्या लोचनात, कासाविस डोळ्यात प्रियकराचे डोळे कुठे दिसतील का ? त्याची करारी भुवई, भावगंभीर पापणी, पौरूषाची कमान सारे काही शोधण्याचा कवयित्री प्रयत्न करते. कारण त्यांच्यातील वेढ्या प्रियतमेस प्रियकराचे अखंड पूजन करावयाचे असते. नक्षत्रांची फुले त्याच्या पावलावर वाहायची असतात. खोडकर नजरेने त्याच्याशी बोलायचे असते. पण –

" नाही, येणार तू नाही
तरी स्वागताचा थाट . . . .
आणि पाहते मी वाट. " [११]

एका बाजूला आशेची कविता जशी दिसून येते तशीच व्याकूळ झालेल्या पक्षिणीची.

पूर्वी काहीतरी प्रियकराबरोबर बोलता यावे म्हणून त्या हॉटेलात गेल्या. उत्साहाने पुष्कळ पदार्थ मागितले. बोलायचे म्हणून दोघेही एकत्र आली आणि न बोलताच हॉटेलातून बाहेर पडली. प्रेमी लोकांच्या जीवनातील सर्वसामान्य अनुभव इथे स्पष्ट केला आहे. होनाजी बाळाने पतंगाचे प्रेम श्रेष्ठ मानले. किंबहुना प्रेम करत असताना जळणे महत्त्वाचे मानले. प्रेमात जीवनाचा आत्मयज्ञ पेटवलाच पाहिजे. पंख पेटून घेतलेच पाहिजेत हे महत्त्वाचे असते.

" त्याच ओढीने वेडाने
कोसळतो ज्योतीवरी
पंख जळत्या कायेची
तळमळ काचेवरी "

प्रियकराचा स्पर्श अजूनही शरीरावर आहे. त्याच्या अंगाचा सुगंध श्वासात खेळतो आहे. त्याच्या डोळ्यातील बोल अजूनही रक्तात आहे. कारण त्याला विसरणेच अवघड आहे. भुंगा असा कमळाच्या फुलावर बसतो. तिथेच अडकतो. तसेच प्रेमाच्या राज्यात असते. ' चतुर कुशल तू ' या कवितेत त्याचेच एक रूप स्पष्टपणे जाणवते आहे. कवयित्री रसिक, कुशल चतूर मैत्रीण आहे. तिच्या भाषणात गोड जिव्हाळा आहे. वनातून फिरताना ती स्वप्न सखी आहे. तर तळव्यावरची सुपारी उचलताना ती प्राणमूर्ति आहे. हस्तांदोलन करण्यास हात पुढे करणारी ती प्रणयानी आहे. तर अबोल स्पर्श जपणारी ती तपस्विनी आहे. आज हे सर्व आठवून किनाऱ्याला भेटायला येणारी ही लाट फसवी स्वप्ने

कवटाळत रहाते. मनाची व्यर्थ भुलावन करत रहाते. कारण फक्त जगत रहाणे एवढेच आज तिच्या हातात आहे. प्रेमातील वेदना, दुःख जपणे त्यांना प्रिय आहे.

" पण कसला डाग इथे
जखमेतील रक्तच ते
वरून जरी नितळ निळे
आतून का भळभळते " [४२]

अति विरहाचे दुःख या कवितेत कवयित्रीने रेखाटलेले आहे. प्रियकराने सारे काही शिकविले पण एकदा पसरलेले पंख आवरायला मुळीच शिकविले नाही. म्हणून त्यांचा जीव भांबावला आहे. प्रेम ही एक साधना आहे. एक कठोर व्रत आहे. हे अक्षरात गोवता येणार नाही. शब्दाने सांगता येणार नाही. इवल्याशा रानफुलांचा स्पर्श शरीरास होतो व विजेचे नर्तन साऱ्या शरीरात सुरू होते हे जसे न स्पष्ट करता येण्यासारखे तसेच प्रेमाचे अधिक्य आहे. दोन विश्वातील फरक शब्दातून त्या स्पष्ट करतात.

प्रियकराचा रूमाल, शर्टाची बटणे, पुस्तकातील मोरपिस, राखी पेन, नाजूक पाकीट, रूपेरी घड्याळ सारे काही जवळ आहे. पण प्रियकर नसल्याने मनाचा गाभारा रिकामाच आहे. सुरंगीच्या वेलीसारखी रेलू पहाणारी कवयित्री एकटी आणि एकटी आहे. पायातले घुंगरू सुटल्याची स्थिती ढगाढगातून चालताना तोल सावरता येत नाही. ही अवघडल्याची स्थिती सार्थ उपमांचा आश्रय घेऊन त्यांनी व्यक्त केली आहे.

मीलनाची अनावर झालेली इच्छा. उतरासाठी कान आसुसलेले आहेत. पण उत्तर येत नाही. तेव्हा त्या उत्तरातूनच त्याम चुंबावे की काय ? अशी एक मनाची संभ्रमित अवस्थाही आहे. यासाठी उत्तरातले अधिरे काहूर त्यांनी व्यक्त केले आहे.

" प्रश्न तुझ्या डोळ्यात उभा की,
घनभरीत ये घन ओथंबून
ओठावर लखलखते उत्तर
शब्दामध्ये कसे धरू पण " [४३]

शब्दामध्ये उत्तरसुद्धा पकडता येत नाही हे शब्दप्रभूत्व असणाऱ्या कवयित्रिचे भांबावलेले अस्वस्थपण आहे. स्वतःस त्या वेडी कुजा समजतात. बापड्या कुजेस बासरीचा आनंद होता पण कवयित्रीस ?

" विश्वच अवघे ओठा लावून
कुजा प्याली तो मुरलीरव
डोळ्यामधूनी थेंब सुखाचे
हे माझ्यास्तव .... हे माझ्यास्तव... " [४४]

डोळ्यातील अश्रूंचे दान स्वीकारणारी ही वेडी प्रियतमा आहे. प्रीतीच्या दहा अवस्था प्रस्तावनेत स्पष्ट केलेल्या आहेतच. ' उन्माद ' ही अशी अवस्था असते की, यावेळी काही काहीच सुचत नाही. मातीची ओढ, गगनाचा वेध, पाण्याचं गडद मौन वाऱ्याचे अधिरेपण, हे सारे कळत नाही. ते प्रियकराच्या भोवती आहे असेच वाटते.

पावसाच्या पहिल्या सरीचा आवेग, प्रितीचा आवेग यात तसा फरक नाहीच. तृप्त सुखाच्या निवांत कुरणी प्रियकराची वाट पहाणारी ' ती ' पेक्षा –

" वाट पाहते तुझी अशी मी . . . .
वाटेवरी भावोत्कट होऊन,
वाटच होऊन,
वाट पहाते तुझी अशी मी " [४५]

ही प्रियतमा अंतःकरणात ठसणारी आहे. प्रियकराबरोबर खूप काही बोलायचे असे आपण ठरवून येतो. पण प्रत्यक्ष बोलताच येत नाही. त्याच्यासमोर येता मनातले भाव मनातच रहातात. असा हा वादळवारा यासारखा, कभिन्न काळचा मेघासारखा, दुर्गम पाऊस धारासारखा प्रियकर आहे. पण त्याच्यातच हरवून जाणे प्रिय आहे.

" अशी हरवली राणी मीरा
अशी हरवली राधा गवळण
असेच मी मज हरवून जावे
हेच तुझ्या मनी जागत का " [४६]

' इंदिराबाई वर्तमान काळात उभ्या आहेत. पण त्यांचे विश्व भूतकाळात आहे ' हे त्यांचे काव्यविश्वच आहे.

प्रियकराच्या सान्निध्यात ज्या वस्तू आल्या त्या वस्तूंचे त्यांना पुनःपुन्हा स्मरण होते त्या स्मरणाने त्यांच्या अंगात आता बळच उरले नाही. त्या स्वतःतच बुडून गेल्या आहेत.

भूतकाळाचे स्मरण जागृत ठेवणारी ' मघाशीच की ' ही कविता पहाता येईल. या कवितेला संवादरुप देऊन अर्थ, भाव, अधिकच गहिरा केला आहे.

" आलीस केव्हा ? "
" आताच ही ना तुझ्यापुढे मी
तू आल्यावर "
" किती वर्षांनी भेट पुन्हा ही . . . . "
" वर्षे कुठली . . . . मघाशीच की
होतो आपण त्या माळावर . . . . .

माझ्या पदराची कुसळे तू तुझ्या हळव्या हाताने काढली होतीस. आज सारे

हे खोटे आहे. उभा इथे तू हेही खोटे. सारे भूतकाळात जमा. आज कवयित्रीस स्वतःचे अस्तित्व नाही. ती स्वतःला पूर्ण विसरून गेलेली आहे.

" तू गेल्यावर नसते मीही
नसते माझे .... माझे काही,
उरलेली ही अशी कोण मी
माहित मजला नाही .... " [४७]

तू गेल्यावर मी 'माझी' उरले नाही. एवढी कवयित्री प्रियकराच्या भावजीवनात मग्न झाली आहे.

## वेदनेची गीते

इंदिराबाईच्या वेदना ही एखाद्या नागिणीच्या वेटोळ्यासारखीच वाचकास गुरफटून टाकणारी. म्हणून प्रा. मालती किर्लोस्कर म्हणतात, " त्यांची कविता सफलतेपेक्षा विफलतेचे चित्रण अधिक करते. " [४८] प्रा. किर्लोस्कर यांच्या या विधानाची यथार्थता सर्वच संग्रहातून स्पष्ट होते. माणूस सुखापेक्षा दुःखाचे ऋण घेऊन जगत असतो. दुःखच त्याचे वरदान ठरते. मानवी जीवनात दुःख हा शाप नाही, तर ते वरदान आहे याची यथार्थता पटून जाते. इंदिराबाईच्या 'वेदनामयी काव्याचे' असे एक स्पष्ट रूप इथे मांडले आहे.

प्रीतीचे अद्वैत दर्शन काव्यातून सहजपणे घडून जाते. ऐकून घेणारा समजून घेणारा तू असे ज्यावेळेस कवयित्री म्हणते त्यावेळी प्रेमातील अद्वैत स्पष्ट होते. कवयित्रीच्या भावजीवनाची दखल प्रियकर असताना सारेच घेत होते. आज खुरटी झुडपे, भिजलेली माती, सारेच जण 'तू कोण ?' असा प्रश्न विचारत आहेत. एक अनामिक पोकळी कवयित्रीच्या मनात निर्माण झाली. ज्याच्यावर सुख उधळले, क्षितीजावरची चित्रलिपी ज्याच्यासह वाचली, कल्पतरूंच्या चिमण्या ज्याच्यासह निरखल्या त्याच्याविना आज कवयित्रीच्या मनातील वेदना विझता विझत नाहीत, काळोखाचे अवघड ओझे मनावर पडून राहिले आहे. वाळूच्या ढगासारख्या भींती भासू लागल्या आहेत. पलंग भुंडचा डोंगरासारखा दिसतो आहे आणि हे सारे अश्रूंच्या राशीने पहावे लागते आहे. जणू काही आभाळाचा भयंकर शाप या क्षितीजाहून त्या क्षितीजावर पसरलेला. ज्याच्यात गदगदणारे तुफान आहे. या सर्वाचा दोष स्वतःकडे घेतात.

" नाही बासरीची धुन
नाही कशी विष बाधा
अशी कशी ही पापीण
हसे मिरा हसे राधा " [४९]

स्वतः इंदिराबाई आपली तुलना मीरा व राधेशी करीत आहेत. माता व

माती या दोन शब्दात फरक नसतोच मुळी. कारण स्त्री ही धरणीसरखीच असते. या मातीचे बंधन तिला सोसावे लागत असते. पण या मातेचे दुःख 'नाहीस तू' यासारख्या कवितेत मोठ्या अगतीकपणे मांडले आहे प्रियकर म्हणजे चांदण्याचा तुकडा. अर्ध्या रात्री पापणीच्या काठावरती तोललेला. आज त्याच्या स्मरणाने ओठाची राख होते. दिवसातून कितीदातरी जीवन कडू होते. 'मी कधीच मिटून गेले आहे. रात्रीच्या कृष्ण कमळात' असे म्हणणारी ही प्रियतमा आशाळलेले डोळे, केस मनस्वी दुःख यासारखे नवीन शब्द तयार करून या वेदनेस अधिक तीव्रतर करते आहे. अंधार कोठडीत एखाद्या वेडीने आक्रंदन करावे तसे हे त्यांचे आक्रंदन आहे. एखाद्या वैरिणीसारखी रात्र तिच्याभोवती फेर धरून नाचते आहे आणि सन्यासिनीसारखा एकटीची जीवनयात्रा चाललेली आहे. 'तू घरी आलास त्यावेळी घराचे दालन आणि दालन हसले होते, चिमण्यांनी वार्ता साऱ्या असमंताना दिली होती.तुझ्यासाठी चतूर उषासखी मेणा घेवून आली होती. अभिसारिकेचे दर्शन याठिकाणी त्या घडवितात आणि मग विजेची जखम पहाता पहाता 'वाढविलेले माझे रेशमी कांकण' असे स्वतःचे 'विधवापण' स्वतःच्या शब्दाने वाचकांसमोर प्रकट करतात. कवयित्रीची ही वेदना लाल, तांबडी, संगमरवरासारखी बधीर आहे. प्रलयाच्या एकेक आठवणी तिच्यासमोर नर्तन करत येत आहेत. वाटले होते

"द्यावे लोटून जीवन
हेच माझे . . . बळ
एक तुझ्यापाशी मात्र
माझी जुळते . . . . ओंजळ
एक एक भूक माझी
तुझ्या मूळ आवंढ्याची
तहान ही एक एक
एका अश्रुच्या धुण्याची." [५०]

स्वतःचे अश्रू स्वतः पिण्याची किमया कवयित्री करते आहे. प्रियकराच्या दुःखाचे समुद्र एका अश्रूच्या पापणीत झेलले असे जेव्हा त्या म्हणतात त्याचवेळी शब्दातील विलक्षण ताकद स्पष्ट होते. उन्मळून पडलेल्या वृक्षासारखे एकाद्या वादळ वेलीचे जीवन म्हणजे त्यांचे जीवन होय. हे जगणे काही वेळेला असह्य होते. जन्माचा हा कारावास कधी संपेल असे वाटून जाते. कारण त्याच्यासाठी ओठ भुकेलेले असतात. बाहूत घेण्यास हात आतुरलेले असतात. मनाला रंग बावरेपण आलेले असते. ज्याने वाट मोडून टाकली तोच कनवाळू हृदय जाणील याची खात्री मनात असते. मग गोकुळचे वैभव मनात भरून कवयित्री जागी

रहाते. त्यादिवशीचा साज अंगावरती असतो. सोनमखमलीची चोळी, बावरलेली काजळरेषा, उन्हाचे वस्त्र, जललहरीच्या सपाता, बुकळवलेसर पण अंगावरील साज निरखण्याला एक कुंकवाचे बोट लावायला तो येणार नाही. राजघराण्यातील क्षत्रिय स्त्रिया जोहार मांडत असत. असा जोहार इंदिरानी मांडला पण शेवटचे कुंकवाचे बोट लावायला प्रियकर येणार नाही. याची जाणीव होती. काळचा जळातील मासळीसारख्या त्या तळमळू लागल्या. ग्रीष्माचे स्वागत करायला तयार झाल्या. त्यांचे शरीर बधीर झाले. डाव मोडून गेला. तरीही एखाद्या वृतस्थ सोनकेळीसारखी कवयित्री उभी आहे.

" ओठावरी आले विष
आल्या वेदना डोळ्यात
हाक आभाळायेवढी
गोठविता हुंदक्यात "

आभाळाएवढा हुंदका त्याच्या आठवणीतून निर्माण झाला. गदगदणाऱ्या आभाळाची उपमा आकर्षक ठरते.

कवयित्री काहीवेळा स्वतःलाच प्रश्न विचारत रहाते. प्रीतीचे दान, हसणे, रूसणे, थट्टा, चिडणे हे सारे तिने स्विकारले होते. ओठातून गेलेल्या शब्दास व्याकुळतेने जपले होते पण आताचे तिचे दिवस म्हणजे भुंडे आभाळ बघणे, आर्त चांदण्याचे निश्वासिते ऐकणे एवढेच ठरले आहे.

तात्पर्य– त्यांची कविता वेदनेने झाकळून गेलेली आहे. ही वेदना अध्यात्मिक वेदना आहे. एखाद्या मीरेसारखी. मीरेस जसे श्रीकृष्ण येईल असे वाटत होते तसेच इंदिराबाईनाही वाटते.

डाव्या पापणी नको ग
अशी वाजवू नौबत
अरे अधिऱ्या हृदया
नको धावू धडाडत "

स्त्रियांचा शकुनावर विश्वास असतो. डाव्या डोळ्याची पापणी फरफरणे म्हणजे प्रियकराच्या भेटीचे सूचन. उन्हांनी आकाशात भेटावे तसेच हे. पण आज मृत्यूचे चिंतन त्या करत आहेत.

" एका घोटात गिळून
पाय रस्त्यावर यावे
आणि उरल्या रस्त्याचे
रस्तेपणच संपावे " ५१

अतिव वेदनांची जाणीव त्यांच्या या वेदनामय कवितेतून स्पष्ट होते.

**वात्सल्य गीते**

इंदिराबाईची प्रीतीगीते, वेदनागीते, निसर्गगीते व त्यातून स्त्री मनाचा 'हुंकार' आपण पाहिला. स्त्री ही स्त्री असते. मुळात तिच्यात मातृत्व वसत असते. लहान मुलींपासून ते वृद्धेपर्यन्त स्त्रीच्या शरीरात असणारी 'मातृत्व ही एक सहज भावना आहे.' या मातृत्वाच्या भूमिकेतूनच ती जगाकडे पहात असते. तिची नजर पूर्णतेची असते. ममतेची असते. अशी वात्सल्य गीते त्यांची आहेत की, ज्यातून त्यांचे मातृत्व स्पष्ट होते.

त्यांचे हे मातृत्व निसर्गाच्या प्रतिभातूनसुद्धा स्पष्ट होते –

" बहरला आज दोघे
हासू आले आठवून
किती वेडी मी दोघांची
दृष्ट टाकीली काढून "

'सोनचाफा व चाफेकळी' यांच्याकडे पहात असताना त्याना ती अवखळ मुलांसारखी दिसतात. लहान मुलांना दृष्ट, भूतबाधा होऊ नये म्हणून आई तीट लावते, दृष्ट काढते. येथे कवयित्री या सोनचाफा व सोनकळीची दृष्ट काढते. इंदिराचे काव्यवैशिष्टय म्हणून याची नोंद ठेवता येईल की, त्या निसर्गातून प्रीती, वासल्य वा अन्य भावना स्पष्ट करत रहातात. निसर्गाचे विलक्षण वेड त्यांच्या रक्तात आहे. निसर्गातील वृक्ष, लता, आभाळ, डोंगर, पशु, पक्षी त्यांच्या वेदनेला शब्दरुप करतात. या वेदना, भावना निसर्गातून आलेल्या. त्यामुळे निसर्ग हा मानवी जीवनाचा अविभाज्य घटक आहे. जसे प्रत्येक स्त्रीत मातृत्व हे सुप्त असते तसे निसर्गाचे आकर्षणही. स्त्रीचे मातृत्व व निसर्गाचे बोलकेपण या दोन घटकांचे अपूर्व मीलन इंदिरांच्या वात्सल्य कवितेत आहे. मुलांसाठी खेळणी आणायचा अट्टाहास सामान्य माणूस वेगळ्या दृष्टीने विचार करून पहातो. मुलांसाठी आणलेली खेळणी 'शब्द होतात खेळणी' असे त्या जेव्हा म्हणतात त्यावेळी त्यांची ही खेळणी सरस्वतीच्या दरबारातील पुष्पे वाटतात.

मराठीत 'स्त्री' च्या शारीरिक भावना चित्रीत झालेल्या नाहीत. ज्या पद्धतीने त्या व्हायला हव्या त्या पद्धतीने.

स्त्रीला विटाळ येत असताना तिला काय वाटते ? तिची शारीरिक व मानसिक अवस्था काय असते ? याचे काव्यात चित्रण नाहीच. गरोदर असताना स्त्रीला काय वाटते ? मराठीतील असे दुर्मिळ चित्रण इंदिराबाई प्रथमत: करत आहेत. इथे इंदिरा वेगळ्या आहेत इतरापेक्षा.

उदरामध्ये वाढणाऱ्या राजहंसाची मिळालेली स्त्रीस चाहूल तिच्या शरीराच्या रोमरोमात बहरून टाकणारी असते. अशी चाहूल मिळाल्यामुळे स्त्री

त्या चिमुकल्या जिवाचे सौंदर्य कसे असेल ? याची रूपे मनात चित्रित रहाते. रात्रं दिवस ती बेभान होते. रात्रंदिन डोळ्यात त्याचेच रूप तरळत रहाते. जण येणारा जीव म्हणजे –

" विश्वदर्शनाची अनिवार हौस
काय धरिलिस अंतरात ?
म्हणूनी सारिखा चालविला चाळा
असा अचपळा उन्मादक " [५१]

उदरात होणारी मुलाची हालचाल उनुक्त असते. जेव्हा तो कुसूम कोमल जीव या विश्वात पाऊल ठेवेल त्यावेळी या जगाचे दर्शन कवयित्रीस ' स्वर्गच ' भासेल. मूल म्हणजे स्त्रीचा स्वर्ग. मराठीत गरोदर स्त्रीच्या भावनांचे असे हळुवार चित्रण इंदिरांनी केले आहे.

जन्मास आलेले बाळ मोठे झाल्यावर त्यास अंगडी, टोपडी, दुपटी या स्त्रीच्या विश्वातील गोष्टी आहेत. चांदोमामा दाखवत त्यास भात भरवणे. त्यांना प्रिय असते. या बाळाची तक्रार मग ती साहजिकच चंद्राकडे करते. ' तुझा भाचा खोडकर आहे. तुझ्या पंगतीचा तो हट्ट धरतो आहे ' अशी ती तक्रार असते. बाळासाठी ती आणते ते ताटमुद्धा चांदीचे असते. रूसलेल्या लाडक्यास ती परत परत पुनःपुन्हा समजावीत रहाते. शेवटी चंद्रास आपल्या मानसबंधूस ती म्हणते –

" बाळ आहे कडे वरी,
हाती घेऊनिया ताट
किती वेळ वाट पाहू
तुझी आता अंगणात ? " [५१]

इंदिराबाईनी साकारलेल्या चित्रात समजावणी असते.

लहान मुलांचा रागसुद्धा स्त्रीस आकर्षक वाटत असतो. बाळाला सुरुवातीस येणारे दोनच दात त्याने वारंवार दाखवावेत, त्याने हसावे असा सुप्त हेतु ती ठेवते. बाळ रागावते गोबरे गाल फुगीर करून बसते त्यावेळी ती म्हणते ' हंस ना हंस ना ' त्यावेळी बाळाचा चेहरा तिला निळ्याभोर आभाळासारखा वाटत रहातो. उमलत्या कमळासारखा वाटत रहातो. त्यांचे दोन्ही डोळे राजहंसासारखे वाटत राहातात. ' गवसली बाई चोरी चाळवणी पुरे करी ' असे म्हणून शेवटी तिने हसावेच. चिमुकले दात दाखवावेतच असे प्रार्थिते.

रडणाऱ्या मुलास स्त्री निर्सगातील दृष्ये दाखवून समजावत असते. भाऊ, चिऊ, व काऊ असे ते जग असते. या जगाची वाट चांदण्याची असते. सुख-शांतीचे तिचे साम्राज्य असते, कारंज्यांची धमाल असते. रंगाची विपुलता चौखूर असते. सारे बाळ जग मोहमयी आकर्षक स्वप्नाळू असते. या जगाची बाळास व

स्त्रीसही विलक्षण हौस वेड असते. बाळ रडत असताना आई हे जग त्याच्या नजरेसमोर मांडते व त्यास समजावत रहाते. ही आई मग बाळाच्या डोळ्याचे पापे घेते. या आईच्या पायात चांदण्याचे चाळ असतात. ती करांगुळी जाळावर टेकून चिमुकल्यास हसवत रहाते.

इंदिराबाईच्या मनातील आई प्रवासाला बाहेर पडते. आगगाडी पुढे धावत असते. आईच्या मनापुढे तिची चिमणी पाखरे उभी रहातात. दोन वस्तूतील तादात्म्यता ही चित्राची समाधीच असते. आगगाडीत बसलेल्या कवयित्रीस या तादात्म्यामुळे समोर सारी घरची दुनियाच दिसते. या साऱ्या पोरी म्हणजे –

" आल्या आल्या तोच सानुल्या
किती सुखी मी सांगत मजला,
किती विलक्षण नादी पोरी
मला बिलगल्या " [५४]

आभाळाच्या, ग्रहमालेच्या रूपात येऊन उभ्या रहाणाऱ्या या साऱ्या नादिष्ट पोरी, स्वतः आगगाडीत बसलेली कवयित्री खिडकीच्या बाहेर त्यांची चिमुकली दुनिया. खिडकीचे अंतर असते. दोहोंच्यामध्ये –

" धुके अडकले केसामधुनी
गारगार किती गाल नी ओठ,
शिखरावरचा मेघ सावळा
चुंबून आली ही तर थेट " [५५]

खिडकीच्या बाहेर दिसणाऱ्या या पोरी म्हणजे जणू रानपऱ्याच. केसात रानफुलांचे तुरे खोवून येणाऱ्या त्यांच्या कुंतलातील फुलामुळे घमघमून येणारी काया. या स्वप्नाळू जगामुळे आठवणींच्या कवयित्री स्वप्नांच्या जगात जाते. त्यांच्या बरोबर स्वप्नांच्या गोळणी.

मांडीवर बाळास झोपवून त्यास हालवणे आईस प्रिय असते. ही हालणारी मांडी म्हणजे ' शिकारा ' अशी अभिनव उपमा या ठिकाणी त्या देतात. संथ जलाशयात डोलत राहणारा शिकारा. आईची मांडी या शिकाऱ्यापेक्षा वेगळी कशी असेल ? या शिकाऱ्यात असणारे बाळसुद्धा ' आलमशाही ' रूपाचे असते. त्याची एक मूठ आईच्या दंडावर असते तर दुसरी ओठाशी. या मुठीतून आईस मिळते चांदण्याचे दुध. स्त्रीचे मूल्य स्त्रीचे स्तनपान करते असे नव्हे तर बाळाच्या मुठीतूनही तिला दुधाचे चांदणे पिण्यात मिळत असते. आईच्या हातामुळे मुलाचे अंग अंग पालवते. त्याच्या लुब्धावणाऱ्या डोळ्यातून, ओठांतून अमृताचा कुंभ नजरेस जाणवत असतो.

आईपासून मुलास वेगळे रहाणेच नको असते. शिकाऱ्यास किनारा नको. डोलावणे हवे असते. हे चित्र मराठीत दुर्मिळ दिसण्यासारखे आहे.

एखादी स्त्री नोकरी करीत असते. आईचे आपल्या जगापासून वेगळे होणे त्यास मुळीच पसंत नसते. आई ही फक्त त्याची असते. त्याच्या जगात सारे काही 'आई' किंबहुना आईपेक्षा त्याला जगच नसते. या अवस्थेत वाढणाऱ्या चिमुकल्याची आई जर नोकरी करत असेल तर, तो कसा आपल्या आईस आपल्यापासून दूर करणार ? त्या बापडीस मात्र नोकरीवर जाण्याची घाई असते असेही वेधक शब्दचित्र इंदिराच्या काव्यात आहे.

" मला चालायची ओढ
आहे पोचायाची घाई,
वेडचा उचल पाऊल
आता वेळ फार नाही " [५५]

स्त्रीच्या समाजातील जबाबदारीचे दर्शन या चार ओळीतून स्पष्ट होते, तरीही तो बाळ आईला कित्येक प्रश्न विचारत रहातोच. 'मान करूनी वाकडी असे कवयित्री म्हणते. तेव्हा नजरेत एकच दृश्य दिसते. मान वेडावून प्रश्न विचारणारा, रागावलेला चिमुरडा व पदर पर्स सावरत चिमुकल्याच्या हातास धरून गडबडीने नेणारी, कामावर जाणारी 'आई.'

मुलगी घरात यावी. घरात सोन्याच्या क्षणाचे दाणे पसरावेत. या चिमुकल्या पाहुणीचे स्वागत एक स्त्री खालील मोहमयी शब्दात व्यक्त करते.

" चिमुकल्या पाहुणींचे
घरी आज आगमन
वास्तू झालीसे तबक
आणि मीच निरांजन " [५६]

मुलांसाठी झिजणारी आई मराठी मनास नवीन नाही. तरीही 'मीच झाले निरांजन' ही भाविक स्त्रीची उपमा निश्चित आहे. या चिमुकल्या पाहुणीची झोप, खेळ सारेच काही कौतुकाचे असते.

'दारापुढच्या आंब्याखालून' या कवितेत स्वतः कवयित्री प्रसूती वेदनांचा अनुभव साकारते आहे घरादारात फिरणारी राजसबाळी कुठेच दिसेना. म्हणून दाराची पायरी उदास मलूल आहे. पायरी हे स्त्रीचे प्रतिक तर तिची विचारपूस करणारी हळवी सावली तिची मैत्रीण. मग स्त्रीच्या वेदना स्त्रीला समजणार नाहीत का ? पायरीनी सावलीस जवळ बसवून कथन केले. " चैन नसे पळ घनीन माझी राजसबाळी। तिची कुठे ना लागे चाहूल. " सावलीने पायरीस आलिंगन दिले व हर्षाने म्हणाली –

" अलिंगून तिज हर्षभराने
म्हणे सावली, दगडी तू तरि
मीच जाणले गुपीत जधी ती
दबत राहिली हिरवी कैरी. " ५७

एखाद्या स्त्रीने गुपीत दुसरीच्या कानात सांगावे तसेच ते गुपीत सावलीने पायरीस सांगितले. त्या नव्या पावलांच्या दर्शनासाठी सारीच दैना सारेच आतुर कवयित्री एक स्त्री ती म्हणते –

" अवघी वास्तू रूणझुण कोमल
कशी वावरू ( वास्तूच्या मनातील प्रश्न )
. . . धांदल दैना . . .
माझी वाणी, माझे पाऊल
कसे असावे रीत कळेना. " ५८

वास्तूस स्त्रीपण लाभण्याची ही किमयागारी वेधक आहे. शब्दप्रभू असणारी कवयित्री बाळासाठी शब्दांचे रांजण भरून ठेवते. त्याच्या एका शब्दातच आभाळ असते. तो पहिला शब्द ऐकण्यास ती उत्सुक असते. त्याच्या पहिल्या बोबडच्या शब्दात तिला महाकाव्य दिसते. अंगणात खेळणाऱ्या बाळासाठी आंबा सावली ढाळतो. त्याच्या हाताशी फुले यावीत म्हणून सावली खाली वाकते. पण बाळास हे माहित असते काय ? तो तर–

" बाळ उतरे अंगणी
भान कशाचे ना त्याला,
उंचावून दोन्ही मुठी
कण्या शिपीतो चिऊला " ५९

बाळाचे जग हे चिऊ–काऊचे जग. सावलीपेक्षा त्या चिऊ–काऊस त्याची चाहूल अधिक लवकर लागते. ती बाळाची राखणच करीत असते.

लहान मुली भातुकली मांडतात. चिमुकली चूल, चिमुकला संसार, सारे चिमुकले, दोन पाटाच्या मधील घरकूल, पोळपोट इटुकला. त्यावर गोळ्याच्या पोळ्या, ठेचलेल्या शेंगदाण्याचा भात, चिरमुऱ्याची आमटी, बाहुलीला न्हाऊ घालणे. दागिन्यांनी मढविणे. मांडवातील भांडण सारे असे मोठ्यासारखे. ' मांडलेली भातुकली अशी रंगते . . . . अशी रंगते आणि केव्हा एकदा पेटाऱ्यात मिटून जाते. ' ६०

लहान पोरी हट्टी असतात. एका बाहुलीसाठी त्या हट्टून बसतात. विसर-भोळेपणाने ती हरवूनही टाकतात. मग परत दुसरीचा हट्ट तीही हरवून जाते. असा हा परत परत हट्ट आणि मागणी परत हरवून बसणे.

आई नोकरीवर गेलेली. बाळ परतून शाळेतून आलेला. आई नाही असे दिसताच त्याचे रडणे सुरू. त्याची समजावणी करायला हत्ती, घोडे, चिमण्या, कावळे, गाई, म्हैशी सारे आहेत. पण–

" ओठ काढूनिया बाळ
उभा बंद दारापाशी
येऊनिया गेले सारे
आई नाही आली कशी ? " [१]

इंदिराबाईंच्या वात्सल्य गीतांचा परामर्ष घेत असताना त्यांच्या मनाचा हळूवारपणा जाणवतच राहतो. हेच स्त्रीपण आहे. बाळांचे जग– त्या जगात रमून जाणे स्त्रीस प्रिय असते. नेमक्या त्या स्त्रीच्या भावना त्यांनी टिपल्या आहेत. " त्या आईचे अंतरंग तर अत्यंत हळुवार आहे. " [१]

**जीवनाविषयक काव्यात्म चिंतन**

" इंदिराबाईंच्या काव्याचा विचार करता पती सहवासाची अपेक्षा ही त्यांच्या पहिल्या कवितांचे स्फूर्तीकरण आहे. तर पती विरहाचे दुःख हा नंतर त्यांच्या काव्याचा भाव आहे " [१] असे वा. ल. कुलकर्णी यांनी म्हटल्याप्रमाणे इंदिराबाईची कविता ही विशुद्ध भावकविता आहे. हा भाव अर्थातच प्रेमाचा आहे. हा प्रेमाविष्कार मात्र नाटकीपणापासून, नकलीपणापासून तसाच सांकेतिक कल्पनांच्या प्रभावापासून अलिप्त आहे. प्रेम सर्वस्व, पतीचा चिरविरह हा एकच भाव त्यांच्या बहुतांश कवितांतून व्यक्त झालेला असला तरी त्यातसुद्धा त्या भावाच्या विविध स्वरूपांच्या अनेक सूक्ष्म, अबोध छटा व्यक्त झालेल्या आहेत. " प्रेमळ व कलाभिज्ञ अंतःकरण सागरावर उठलेल्या विश्व–सूक्ष्म स्मृती लहरी आणि त्या निमित्ताने जागृत झालेले अनेक सूक्ष्म भावतरंग असे इंदिरांच्या काव्याचे विशेष स्वरूप आहे. " [१४]

डॉ. अ. ना. देशपांडे यांनी म्हटल्याप्रमाणे पती प्रेमाशिवाय बाईची दृष्टी पलीकडे गेली नाही का ? असा प्रश्न निर्माण होईल. प्रा. देशपांडे तर म्हणतात की, " इतरांचे सुखदुःख जाणवून घ्यावे असे त्यांना कधी कधी वाटले आहे. " [१५] कधी कधी म्हणण्यापेक्षा त्या जरी आत्मनिष्ठेत दंग झाल्या असल्या तरी जीवनाचा एक सात्विक विचारही त्या करतातच.

त्यांचे वैयक्तिक जीवन व त्या जीवनदृष्टीतून व्यक्त होणारी त्यांची जीवनदृष्टी आणि त्यासाठी शब्दबद्ध झालेली त्यांची कविता यांचा विचार येथे मी मांडणार आहे.

मानवी जीवनाचे वर्णन करण्यासाठी अनेक कवींनी आपली प्रतिभा खर्च केली आहे. कोणाला हे जीवन म्हणजे वाटचाल वाटते.

" अजूनि चालतोची वाट
माळ हा सरेना " [१६]

तर जीवन हा एक क्रिकेटचा खेळ आहे तसे एखाद्या कादंबरीकारास वाटते. जन्मापासून मृत्यूपर्यन्त पसरलेला हा काल म्हणजे जीवन.

' बाळ होता रंगला ' या कवितेत बाई मानवी जीवन म्हणजे विटीदांडूचा खेळ असे स्पष्ट करतात. हे सांगत असताना आई व मूल यांचे प्रतीक त्यांनी वापरले आहेच. खेळणारे मूल आणि एवढ्यात त्याची आलेली आई. दिवसभर आई जवळ नाही. म्हटल्यावर ती आल्यावरोबर तिच्याकडे झेपावणारे तिचे पोर ही सहजभावना. ती नोकरी करून श्रांत झालेली एक शिक्षिका, हातात वह्यांची चवड, इथे स्त्री जीवनाचे दर्शन किंबहुना स्वतःचाच एक अनुभव शब्दबद्ध झालेला आहे. मूल म्हणजे आईचा ठेवा.

" बाळ गेला रंगून खेळण्यात
विटी दांडूचा खेळ अंगणात " [१७]

गरीबांचे जीवन हे दुसऱ्यासाठी असते. असा एक मानवतावादी दृष्टीकोन ' चिमुकले डबके ' या काव्यात त्यांनी स्पष्ट केला आहे. गरिबांनी जीवनाचा अर्थ शोधत असताना तो दुसऱ्यासाठी आपण किती जगलो या अर्थाने शोधायचा असतो. यासाठी माध्यम म्हणून कवयित्री प्रतिके वापरतात. हे प्रतिक रस्त्यावरच्या डबक्याचे असते. रस्त्यावर डबके सर्वांनाच दिसते पण त्या डबक्याचे अंतःकरण कुणास दिसते असे मूक आक्रंदनाचे दर्शन इथे घडवित आहेत. त्यांच्या मूळ दुःखाबरोबर जीवनाचा एक संदेश वाचकांच्यासमोर ठेवीत आहे. पावसाची सर आली. जिकडे तिकडे पाणीच पाणी झाले. पानांतून पाणी ठिबकत होते. रस्त्यातून पाणलोट चालले होते. कुणी गडबडीने चालले होते. जणू त्यांना कसली तरी घाई लागली होती. या घाईगर्दीच्या जगात मगा चिमुकले डबके कवयित्रीविना कुणा दिसणार ?

या डबक्याचे दर्शन जसे त्यांच्यातील कवयित्रीस झाले, तसेच त्यांच्यातील ' आईस ' झाले. एखादे हट्टी बालक रस्त्यावर हटून बसावे असेच ते डबके. ओढे, नदी, नाले यांना मिळणे अजून त्यास पसंत नाही. मग तिथे का थांबले ? या प्रश्नाचे विचार आईच्या भूमिकेतून घेतात. गढूळ डबके, वर घोंघावणारी चिलटे, खेळणारी पोरटी. दगडांनी त्यांचे अंतःकरण विदीर्ण होत होतेच. हा सर्व ताप कशासाठी ? एखादाच रविकिरण येई. त्याचे कौतुक करी. तरीही उदासीनता त्याची गेली नाही.

" हास्यछटा मुळी दिसे न वदनी
खिन्नपणाने राही बसूनी

स्थितप्रज्ञ हा कुणी मुनिश्वर
घोर तपाते इथे आचरी " [१८]

या डबक्याच्या रूपात समीक्षकाला वेगवेगळे दृश्य दिसेल. या ठिकाणी दिसते एका स्थितप्रज्ञ मजुराची संकल्पना. जगाची पर्वा न करता स्वतःत दंग असणारा परोपकारी मुनिश्वर असे दृश्य जर स्पष्ट करू द्यायचे तर ते बालकवींच्या औदुंबरमधील - जळात टाकूनी पाय बैसला. . . . .

असला औदुंबर येथेच फक्त आहे. मराठी काव्यात अगदी थोडीच अशी दृश्ये आहेत. हे स्थितप्रज्ञाचे चित्र दखल घेण्यासारखे आहे. कडक उन्हात कष्ट सहन करून जीवन कंठणारे डबके त्यावर पाणी पिण्यास आले तेही एक श्वान. मरतुकडे, अंगात ताकद नाही. क्षीण मरणास जणू साद देणारे. अंतकाळचीच जणू त्याची ती तहान ती भागविण्यासाठी त्या कुत्र्याने डबक्याचा आश्रय घ्यावा, यातच नवल आहे. दोनच जीभा त्या श्वानाने बुडविल्या पण –

" आणिक पल्वल क्षणिक उजळले
जणू जगाचे सार्थक झाले,
चमकुनी किंचित रविच्या किरणी
पहाता पहाता गेले सुकूनी. " [१९]

इथे जीवनाचा अर्थ त्यांनी सुचविला आहे. हा अर्थ शोधत असताना मनातला झंझावात त्यांनी मनातच कोंडून ठेवला आहे. ' मानवी जीवन एक झंझावात ' असे त्यांना वाटते. त्याच्या दृष्टीने त्यांचे जीवन म्हणजे निश्चित एक झंझावातच आहे. हे जीवनाचे झंझावात त्यांनी 'झंझवाते' या काव्यात स्पष्ट केले आहे.राक्षसासारखा एकदा पाऊस कोसळला धुवांदार, पिसाटासारखा, वेडयासारखा वेताळासारखा. सर्वत्र पाणीच पाणी. ही पृथ्वी माठ कटी माथ्यावर घेऊन उभी, ओलेती. तिचे हे दर्शन पहाण्यासाठी हे आले सौंदर्य न्याहाळण्यासाठी सारेच आतुर. बाहेर बेबंद गारठा म्हणून घराची दारे बंद करून गरम चहाचे घुटके घेत खिडकीशी विसावणारी कवयित्री सोबत लाडका प्रियकर त्याच्या हातात पेटती सिगार जवळ सैगलचे मंदमधुर गाणे, जणू एखादे स्वप्न ! सुखाची ही तृप्ती अंगांगांवर येणारी. सुटणारा झंझावात. उध्वस्त झालेल्या झोपडया. त्याबरोबरच कवयित्रीचे जीवन.

' मानवी जीवन हा सुखदुःखाचा झोपाळा. अनेक ऋतूंचे संवेदन. एक रंगतदार स्वप्न तर एक झंझावात. '

सकाळी उठल्यापासून ते झोपेपर्यन्त आपणासमोर घडयाळ,कॅलेंडर, टिकटिक असते. ही तीस घरे म्हणजे पक्षीणीचे घर. तीस घरांचा भातुकलीचा संसार.

या नियतीच्या भातुकलीबरोबर त्यांनी आपला संसार मांडला. अखेर त्या साऱ्या पळून गेल्या. जाता जाता हिणवून गेल्या. मनातील ही विषण्णता संपणार

कुठे ? जीवनाचा अर्थ ' जगणे ' एवढाच या ठिकाणी कवयित्री घेते आहे. घड्याळ जसे फिरत रहाते. काळ जसा चालत रहातो तसेच चालत रहाणे. या तीस घरांतून चालणे आपण जीवन मानतो.

जीवनाचा हा मार्ग चालत असताना कधी रस्त्यावरची सोबत संपते. मार्ग तरी अपूरा असतो. बरोबर सोबत नसते. पण चालायचे असते. दुख: उराशी घेऊन एखादी पोकळी उराशी घेऊन.

" तिष्ठते कुणीतरी
समोरच्या खिडकीत
केव्हढी तयाची
सोबत आणिक साथ " [७०]

वाट पहात राहाण्यातसुद्धा सुख असते. कुणाची वाट पहायची ? ज्याची पहायची त्याची संगत कधीच संपलेली असते.

मानवी जीवन एक रंगमंच. या उजळत्या रंगमंचावर कवयित्री राधा बनते. मणीपुरी, कथ्थकली करत रहाते. पावलांचा तोल सावरताना ती घाबरते. कधी ठोका चुकतो, घुंगूर गळून पडतो. पण या दु:खात हरपून जाणेच जीवन असते. ' भिल्लीण पार्वती ' हिमालयासह वितळून गेली तशी. आमचा कलासक्त आत्मा आम्ही या यांत्रिक युगात विकत असतो. याचे मनस्वी दु:ख इंदिराना आहे. ' अजंठा 'च्या लेण्यात मनस्विनी बनून उभी असणारी इंदिरा व भितीवरून खुणावणारी लेणी या लेण्यांचा आस्वाद न घेता आपण ' तीन कप पाणी – सहा चमचे साखर ' या विश्वात गुरफटून जातो.

खरा जीवनाचा अर्थ आपणास येथे कळत नाही. अशीच तक्रार कवयित्रीची आहे.

जन्मास येताना आपण एकटे येतो आणि एकटेच निघून जातो. कुणाचाही आधार आपणास पुरेसा होत नाही. आधार देणारे हातही अपुरे असतात. ध्येयपथावर दृष्टी ठेवून आपण चालत राहतो. पैशावर नजर ठेवून पराक्रम करतो. आणि शेवटी प्रभूचा हात या सर्वांवर फिरतोच. प्रभूच्या या कराल दाढेतून फुटणारे रक्त पाहून मातीसुद्धा काळीठिक्कर पडते. धूर पाहून या दु:खाचा आभाळाच्या उरी हुंदका दाटतो. अश्रूंचा पूर सांडतो. तेव्हा इंदिरांना वाटते –

खोटी माती नभही खोटे
कुणी न पुरते आधाराला,
दुभंगते ना माती अजुनी
गगन उघडीना तिसरा डोळा " [७१]

मातीतला देह मातीत जाणार हे खरे असले तरी मानवाचे जीवनाविषयी

आसक्ती असते. या आसक्तीतून जगण्याची उमेद त्याच्या उरी येते व या उमेदीतून तो जीवनाची वाट चालत राहतो.

" तरीही घेणे धुळीत लोळण
आणि याचिणे हात नभाचा
टिळा मातीचा पूज्य कपाळी
ईश्वर होतो आकाशाचा " [७१]

आधार देणाऱ्या हातांचा शोध घेत जगणे म्हणजेच जीवन. कधी हे जगणे पोटासाठी असते. घरात चार चिमुकली असतात. त्यांच्यासाठी असते. ' मनुष्य जगत रहातो तो एकेका आकर्षणातूनच. ' बाळपणीची पंगत रंगत असते. अभ्यास; भातुकली, पतंग, भोवरा, घर सारे काही जवळचे जग. या बाळजगात मन रमते ना रमते एवढ्यात जाणीव होते ' उघड्या दाराची ' इथे उघडे दार मनातील पोकळी स्पष्ट करणारे असते. सांज टळली तरीही कुणीतरी मागे येईल असे वाटत असते.

" संपवाया हवी वाट
लावावया हवा दिवा
पोटासाठी मुकाट्याने
हवा टाकायला तवा " [७२]

जीवन जेव्हा नीरस होते. तेव्हा जगणे हे पोटासाठीच असते. सामान्य माणसाचेच काय, सर्वच माणसांचे जीवन असेच असते. पोटासाठी जगणे. काही माणसे ' मी पोटासाठी जगतो ' हे सांगायला कचरत असतात. शेवटी सारीच पोटासाठी जगत असतात. हा जीवनधर्म इथे मांडत आहेत.

' जन्ममरण एक पदयात्रा ' कोणीतरी अज्ञात शक्ती शाप देते आणि ही पाऊल वाट सुरू होते. पावले चालू लागतात. पावलामागून पावले चालत रहातात. कित्येक वाटा ओलांडल्लेया असतात. काळ मागे सरकलेला, क्षितीजे दूर गेलेली असतात तरीही पावले चालत रहातात. जीवनाची ही पदयात्रा पुढे सांगितल्याप्रमाणे त्या स्पष्ट करतात –

' धुक्यात पावले ओलावतात आणि पावलावर चढतो गार शहारा 'ही पावले मानवाचे बालपण स्पष्ट करणारी आहेत.

' हिरवळीत पावले सुखावतात आणि त्वचेवर चढतो हिरवा सुगंध ' बालपणानंतरची ही विवाहाची हिरवी किमयागारी अंगावर हिरवा रंग जणू त्वचाच हिरवी झालेली असते.

' अंगावरून पावले धडपडतात आणि ओंजळीत जमतात तांबड्यालाल ठिणग्या ' वृद्धपण जुने स्मरण यांचे पाथेच पाठीवर असते. तरीही ही पदयात्रा

चालूच असते. मग चालता चालता एक क्षण असा येतो, जेव्हा वाट उरतच नाही. पावले घाबरतात, थबकतात. बापुडवाणी उभी रहातात. त्याचवेळी एकच कवयित्री करते--जुन्या साऱ्या आठवणी गोळा करून आभाळात ती उधळत रहाते. डोळ्यात पाणी न आणता आणि–

'आणि पायाखालची मूठभर माती घट्ट धरून ठेवायची असते. त्याच मुठीत.'

जीवनाचा अर्थ अखेरच्या दोन ओळीत परत कवयित्री कथन करून जाते. मातीतला देह मातीतच जाणार हे स्पष्ट करून जाते.

कवयित्री काळाबरोबर बदलत गेलेली आहे. हा वयाचा परिणाम, बदलत्या परिस्थितीचा. वि. स. खांडेकर म्हणतातच, "माणसाचे मन दर बारा वर्षांनी बदलत असते." [७१]

ठोकरत-ठोकरत चालणे हेच जीवन. जीवनविषयक कवितांची ही सर्व सामान्यता रूपरेखा त्यातून स्पष्ट होणारी त्यांची जीवनदृष्टी. "माणसाचे विचार त्याच्या पायाखालील रस्त्यावर अवलंबून असतात. जशी पाऊलवाट तसे जीवन."[७२] हेच जीवन इंदिराचे आहे. तेच त्यांनी काव्यात लिहिले आहे.

## स्त्री जीवनाचे पडसाद

स्त्री जीवन व्यक्त करण्यासाठी इंदिराबाईची दृष्टी संजीवनीबाई, लक्ष्मीबाई, बहिणाबाई या सर्वांपेक्षा भिन्न आहे. त्यांच्या या काव्यातून जीवनाच्या कठोरतेची स्त्रीला जाणीव झाली आहे. 'चाहूल' ही कविता यादृष्टीने पहाता येईल. वास्तविक आपत्याची चाहूल हा स्त्री जीवनातला परमोच्च आनंद होय. पण या भिषण व स्वार्थी जगाच्या अनुभवांनी इंदिराचे मन उद्विग्न होऊन गेले आहे. त्यांचे मन म्हणते –

" कुसुमकोमल तुझे पाऊल
बाळा ठेवशिल विश्वात ज्या
नाही रे ते आता इंद्राचे उद्यान
भीषण भयाण उग्ररूप "

देवाघरून येणाऱ्या या निष्पाप निरागस पुष्पाला 'तू उमलूच नकोस' असे कठोरतेने सांगवेल का ? कोणत्या मातेला ? पण सध्याच्या यांत्रिक व स्वयंकेंद्रित जगात स्त्रीला आपली ही कोमल भावनासुद्धा भारून टाकण्याइतके कठोर बनावे लागते आहे. इंदिराबाईच्या अशा काव्यातून त्यांचे मन अंतर्मूखतेचा कोश हळूहळू फोडू लागले आहे. अशी आपणास सूचना मिळते व ती खचित स्वागतार्ह आहे.

रेखीव व उठावदार शब्दचित्रे हा त्यांचा आणखी एक काव्यगुण. सांडगे घालत उभी असणारी त्यांनी रंगवलेली ही नववधू –

" दाराशी तू उभी नेसूचे लुगडे गुंजेपरी
लालभडक अन् तंग नेसणी तशीच गुडघ्यावरी
उभार उघडी नुसती चोळी तारूण्या सावरी
लाल मण्याच्या गळचात पोती, मध्ये रूपाची सरी. "

हे वर्णन किती मोहक आहे. त्यांची रंगाची आवड, बाभळ काटेरी ओढणी पांघरणे, ही त्यांचो प्रिय कल्पना अशा अनेक गोष्टींचा त्या परिचय करून देतात. [७५]

" मंजुळा कुणबी जातीतली
बांध्याने नीटस अन् काळीसावळी
जरतारी पातळ नव्हती ती नेसली
मोहना फुलांचा गजरा वेणीवरी
वर्णही नोहता जरी केतकीपरी
निर्व्याज खुलेपण हीच तिची माधुरी "

इंदिराबाईचे वर्णन व काव्यविहारीचे हे वर्णन एकाच खुलावटीचे वाटते.

पुरूषाच्या भूमिकेतून त्यांनी काढलेले चित्र ' चतुर कुशल तू ' या काव्यात किती साधे आहे. या काव्याची भावना तर नाजूक सुगंधासारखीच आहे. फुलांचे विविध रंग स्थूल मानाने आकार यांची चित्रे काढणाऱ्याला अशा भावनेचे चित्रण करणे कठीण गेले असते. पण इंदिराबाईनी चतुराईने हे काम केले आहे. ज्या स्त्रीवर आपली प्रीती आहे पण परिस्थिती व इतर बंधने यामुळे तिला आपल्याला प्रतिसाद देता येत नाही अशा स्त्रीच्या सहवासाची, स्पर्शाची, मनावर ओढ एकीकडे व ज्या सावधतेने ती वागते त्यामुळे मनाला घालावा लागणारा विवेकाचा बांध दुसरीकडे, या दोन्ही भावनांचे चित्रण यात आहे. भावना तर तरल व विरोधी आहे.

" विरक्तीची अन् आसक्तीची
अशी कशी ही तुझी भुलावण
चिडतो, चिडतो परंतु भुलतो
अशी कशी ही तुझी भुलावण "

या शब्दाने पुरूषाच्या मनात उद्भवणाऱ्या परस्पर विरोधी भावना नेमक्या अचूक शब्दांनी त्यांनी टिपल्या आहेत.

एक स्त्री जेव्हा जीवनाचे, जगताचे दर्शन घडवते तेव्हा ते चित्र पुरूषांनी रंगविलेल्या चित्रापेक्षा वास्तववादी असते. ग्रिष्माच्या शुभ्र प्रभाती सांडगे घालणारी एखादी स्त्री त्यांचे स्त्री मन टिपते. चमचा वाटी हातात घेऊन' अंगणात बसणारी बालिका, सुंदर वस्त्रावर सुंदर नक्षी रेखते आहे.

" नव्या वधूचा साज, कंकणे हिरवी साडी तिची
शोभा वदनी, मदीरा नयनी, चमके नवलाईची
उन तापते जरी वरोनी, भान न तिजला मुळी
लालबुन्द जरी जाहली वदनकळी कोवळी " [७१]

सांडगे घालीत बसणारी ती नववधू आहे. डोळ्यातील मदिरा, उन्हाचे भान नसणारी, तरीही वदनकळी सुकलेली ही नववधू सांडगे का घालते आहे ? ' दुसऱ्यांना भरवणे हे स्त्रीस नेहमी प्रिय असते. ' ' येवून त्यांना धनी जिवाचा करिल किती कौतुक । ' अशी अंतरीची इच्छा आहे. सांडगे घालणाऱ्या स्त्रीचे चित्रण एका स्त्रीने रेखाटलेले असल्यामुळे त्यात जीवंतपणा आहे. तसेच ती स्त्री शब्दात बांधलेली, उठून सांडगे घालतेच काय ? असे वाटून रहाते.

मुळात ही नववधू माहेरी आलेली, या नववधूचे कौतुक किती मायेनेच सारे करतात. अरविंद गोखल्यांच्या ' कातरवेळ ' या कथेतील भावनांचे दर्शन इथे घडून जाते. कथावाङ्मय प्रकार कमी आहे असे नव्हे तरी जे कथेत मांडले तीच भावना कमी शब्दात साकारली नाही का ? ही नववधू अजून हृदयाची राणी झाली नाही ही खंत आहे.

" नव्या संसाराची राणी
राणी नाही हृदयाची "

असे सूचन करून या काव्याचा शेवट वेगळाच त्यांनी केला आहे.

स्त्री म्हणजे घरची भाग्यलक्ष्मी घरात दारात वावरणारी, तिच्या मागूनही सुगंधी वास फिरत असतो. जिच्या ओठात आनंदाची फुले आहेत. कायेमध्ये वीजेची लव आहे. हाती अमृताची चव आहे. एवढेच नव्हे तर–

" घरादाराचा विसावा,
शेजाऱ्यांना नित्य ओढ,
आल्या गेल्या पाहुण्यांचे
निघताना पाय जड " [७७]

स्त्रीचे गृहिणीपण हे महत्त्वाचे असते. अशी ही भाग्यलक्ष्मी गृहिणी इथे आहे.

स्त्रीचे चरित्र्य म्हणजे भरलेली घागर. त्यातील पाणी उचमळणार कसे ? त्या पाण्यास एक संथपणा हवाच. असाच संथपणा माथ्यावर व कडेवर घागर घेऊन जाणाऱ्या स्त्रीच्या ठिकाणी आहे. पाणवठ्यातून घराकडे परतणारी ती स्त्री संथ पाय उचलत धुळीतून चालली आहे. तिन्हीसांजेची वेळ बापडीस भीती कशी वाटत नाही. तिच्या कंकणात कंपन नाही कसे ? कळशीवरची तांबूस बोटे खड्याची प्रतिक्षा करत आहेत का ? तिच्या पावलातील जोडवे अडखळले का ? आज तिच्या उरात धडपड नाही. आज ती मागे पहात नाही. ओठी काहूर नाही.

" भरली घागर माथ्यावरती
मुळी न उचमळते पाणी
कमरेवरती भरली घागर
मुळी न कसे उचमळते पाणी " ७८

शाळेतील शिक्षिकेचे काढलेले चित्र वाचकांना सहजपणे पटून जाते. स्वेटर विणीत बसणारी ही शिक्षिका, गडबड गुंड्याबरोबर मनाचे हिंदोलन सांभाळते आहे. हातात छडी, कपाळावर आठी, ओठावर कडवट थंडाई, डोक्यात राख अन् शब्दात तडतडणारी वाळू, समोरून बसून सत्तर बाळे जणू दावणीची गुरेच झाली आहेत. जागा अपुरी, जमिनीस खाचखळगे, कौलारातून येणारा झरोका, खिळ्यास टांगलेला एकच तक्ता, तोही जुना पुराणा, आंधळा फळा, बाईंबरोबर शाळेचे चित्रही उमटून जाते.

केविलवाणी बाळे बाईना घाबरली आहेत. बोलता येत नाही तरीही अधूनमधून हाताची घडी सोडून, ओठावर बोट ठेवणे चालू आहे. काही दुबळी पेंगत, झुंजत, कर्कट चाळा करीत बसले आहेत. त्यांचे डोळे मधून-मधून पाटीवरती फिरत आहेत. पण या गुदमरलेल्या वातावरणी बाईंच्या मनातील हलकल्लोळ कवयित्रीने टिपला आहे.

" गुदमरलेल्या वातावरणी
ताप चढत असे मनामनाला
अढीत येथे ताजी कमळे
धजे न अश्रू बघावयाला " ७९

स्त्रीचे सौंदर्य हे पुरुषासाठी असते. प्रियकराच्या समोर जात असताना ती नटून थटून जात असते. त्यासाठी साडी विणून घेतली जाते. आडवे उभे रेशमी धागे वापरले जातात. कशीदा रेखला जातो. चित्रा–मंगळस्वातीची किनार असते. हे सारे का ?

" तुला सामोरे येताना
घडी मोडावी म्हणून "

इंदिराबाई स्त्री जीवनाचे दर्शन घडवता घडवता त्या नायिकेशी हितगुज करतात. खेड्यात वावरणारी ही त्यांची नायिका एकाच व्यथेने ग्रासून गेलेली आहे. दोघींच्या व्यथेबरोबर खेड्याचे दर्शन इथे घडते. आणि ही हळवी कथा –

" काय बाई सांगू कथा . . .
पाणी आणून डोळ्यात
एवढेच बोलली ती
घागरीला हात देत " ८०

खेडचात पोरीचं गप्पास्थळ, एकमेकींची दुःख एकमेकींना सांगण्याचं स्थळ म्हणजे गावाबाहेरील पाणवठा असतो. अशाच पाणवठ्यावर कवयित्री या दुःखी नायिकेस भेटली आहे. घागरीस हात घालता घालता तिची हळवी कथा तशीच स्पर्शत आहे.

" माझ्या कवितेवर जुन्या ओव्यांचा परिणाम आहे. " " असे इंदिराबाई म्हणतात. पहाटेच्यावेळी जात्यावर दळतादळता गाणारी खेडूत स्त्री ' माझा भाऊ सौदागर आहे. मी त्याची लाडकी बहिण आहे ' असे म्हणते. ती त्याबरोबर स्वतःची आवडनिवड स्पष्ट करते. निळे तलभ वस्त्र तिला प्रिय आहे. त्या वस्त्राच्या काठावर चंद्रफुले, भरजरी वस्त्रात राजहंस, चंद्रकला तर तिच्या आवडीच्या पदरावर चंद्रच चंद्र लगडलेले. या स्त्रीचा आवडीचा रस्ता पाणवठ्याचा आहे. या पाणवठ्यावर माहेरचा एखादा माणूस परतणारा प्रियकर यांचे दर्शन घडणारे आहे. आणि यावेळी माझा भाऊ येणार. मग तिची धांदल काय ती –

" काय पाहू काय नेसू
कांही, कांहीच सुचेना,
भाऊ पाहुणा समोर
तोहि डोळ्यांना दिसेना "

भांबावलेली पुराणातील रुक्मिणी व ही लाडकी बहीण एकाच प्रदेशातील वाटतात. महाराष्ट्रीय स्त्री पराक्रमाची पूजक आहे. महाराष्ट्राच्या या साऱ्याजणी पंचारती घेऊन ओवाळायला तयार आहेत. सह्याद्रीच्या कडचावर नौबत ऐकू आली व या तयार झाल्या. या नौबतीबरोबर समोर एकेक वीर स्त्री प्रतिभावानं स्त्री येते. शकूनाचा दीप हातात घेऊन आलेली महंदबा, नामयाची जनाबाई सडासमार्जन करून वाट पहाते आहे. लक्ष्मीबाईनी मोडक्या काठीची लेखणी केली. प्राण करून चित्रे रेखिली. अहिराणी बहिणाई तापला तवा घेऊन भाकरी घेऊन ओवाळायला तत्पर झाली आहे. पुण्यतिथीचा कलश हाती, बरोबर समशेर तळपत्या पात्यास रक्ताचा थेंब अशी अहिल्या ओवाळायला या महाराष्ट्रास जिजाऊ कोटी सूर्याचे तेज घेऊन हाती महाराष्ट्राच्या या दिव्य परंपरेचा या स्त्रीचा अभिमान इंदिराबाईना आहे.

हळव्या नाजूक पावलाने सप्तपदाची वाट चालणारी, सांजलक्ष्मी संध्याकाळी दिवे लावते. यातील प्रत्येक दिव्याच्या पाठीमागे त्या स्त्रीची एक विशिष्ट भूमिका आहे. समाधानी स्त्री हाच घराचा ठेवा असतो. ही स्त्री पहिला दीप देवघरात ठेवते, या देवघरातील प्रकाशात तिला स्वतःचा चुडा निरखायचा असतो. त्या चुडचावर तिचे भाग्य असते.

दुसरा दीप तिने वृंदावनात ठेवला आहे. मनात एक समृद्धता आपोआपच दाटून आलेली आहे. गोठ्यादारी तिने ठेवलेल्या दिपाच्या पाठीमागे समृद्धीचा संकेत आहे. बागेतल्या सोन हासऱ्या शेवंतीच्या दालनातही ती दीप लावून ठेवते आहे. पांचवा दीप अतिथीच्या स्वागतास तयार आहे. तर हवेलीच्या माथ्यावर असणारा दीप घरादारात, आवारात प्रकाश झळकवतो आहे. घराची ही गृहलक्ष्मी दीप इथे तिथे ठेवते आहे. ही गृहलक्ष्मी दिपलक्ष्मीच आहे.

नवी नवरी घरी येणार, घराची ती सून गृहलक्ष्मी. तिचे स्वागत करायला, तिची सोनचफ्यांची पावले निरखायला घरातील प्रत्येक वास्तू उत्सुक आहे. दारास तोरण बांधले अन घर नाचू लागले. कधी येणार ती सोनचाफ्याची पावले म्हणून प्रतिक्षा करू लागली. भितीवर रंग चढला तो स्वप्नांचा. खिडक्यांचे गज गज उरले नाहीत तर ते कर्दळीचे झाले. दार मौन धारण करते झाले. सूर्याने आज रांगोळी घातली. पायांवर दंवाची पागोळी शिंपडली. सोनकेळ आशिर्वाद देण्यास आतूर झाली. तिच्या हातात बागेतील अनेक फुले आहेत. या साऱ्याबरोबर वाऱ्याचीही तगमग झाली आहे. एका सोनचाफ्याच्या पावलासाठी.

" येरझारा घाली वारा
गंध मोतीया घेऊन
सोनचाफ्याची पाऊले
कधी येतील अंगणी " [१]

मातृत्वाचा लाभ झाल्यावर स्त्रीला दोन दोन सुखे मिळत असतात. एक तर बाळाचा चेहरा समोर दिसत असतोच पण बाळाच्या चेहऱ्यात प्रियकराचा मांडीवर झुलणारा बाळजीव, सानुल्या मुठी नाचवतो आहे. त्याच्या त्या वृत्तीकडे पाहिल्यानंतर कवयित्रीचे मन अनंतकाळ दूर गेले आहे. समोर त्यात तू उभा आहेस. दोघांच्या नजरेत मी चूर झाले आहे. बाळाचे सारखे पहाणे आणि माझ्याकडे तुझे मातृत्व लाभल्याच्या गौरवाने पहाणे म्हणजे अमृतसुखाची वृष्टीच आहे.

जीवाचा चोळामोळा झालेला असतो. मन शिणलेले असते. कित्येक सांगावे धाडलेले असतात. तू येशील, नेशील म्हणून ती तयारीतच असते. सारे काही आवरते. पण तू येत नाहीस.

" कसा नसेल पोहचला
एक सांगावा येऊन ?
कसे नसेल ठाऊक
इथे मोजते मी क्षण ? " [१]

सासूरवाशीनींना माहेरी जाताना सांगावा मराठीस परिचित आहे. पत्नीचा पतीस जाणारा सांगावा मात्र दुर्मिळ ! पतीची ओढ स्त्री नेहमी जपत असते.

मराठी विभाग
2860
निबंध 3999
9/4/04

म्हणूनच तिने हा सांगावा पाठवला आहे. तो येत नाही हे पाहून ती व्याकूळ झाली आहे. कळवळून म्हणते आहे –

" दक्षिणेच्या झंझावाता
कधी येणार धावत,
माझे मातीचे हे घर
कधी घेणार मिठीत " [८४]

' दक्षिणेच्या झंझावाता ' असे विशेषण प्रियकरास देऊन त्याचा पुरुषार्थ इथे स्पष्ट केला आहे. मातीचे घर ती स्वतः आहे. स्त्री शेवटी मातीच असते. दारिद्र्याच्या खाईत सुखाची रांगोळी होते. दारिद्र्य नष्ट होवून स्वप्ने बाळ फुलवेल ही इच्छा मनात असते. रात्रीचे असेच स्वप्न रेखाटणारी एक स्वप्नांतरित इथे इंदिरांनी रेखाटलेली आहे.

कंदील जळतो आहे. अर्धी रात्र उलटून गेली आहे. काच काळी झाली आहे. त्याच कंदिलाजवळ चिमुकला बाळ झोपला आहे. कसल्यातरी दुपट्यावर काळ्याभोर जावळाचे, डोळाभर काजळाचे, मनगटात मणी, पायात वाळे, पाय नाचवणारे, मुठी चोखणारे बाळ त्याच्याच जवळ त्याची थकलेली आई कांबळ्याच्या कडेला बसलेली आहे. जुनेर नेसलेली झोप विस्कटलेली, चेहरा ओढग्रस्त कळपटलेली श्रमीत कांकणे साऱ्या शब्दातून त्या स्त्रीची अवस्था स्पष्ट होते आहे. कष्ट करून हात निबरट झाले आहेत. क्षीण प्रकाशरेषा न्याहाळत ती पाची रंगाची स्वप्ने घेऊन बसली आहे. बाळाच्या कपाळावर स्वतःचे भाग्य वाचत आहे.

" हा मोठा होईल
आम्ही शिकलो नाही, हा खूप शिकेल
आमच्याजवळ पैसा नाही, हा खूप मिळवील
आमच्याजवळ घर नाही, हा बंगला बांधेल
आमचे हात पसरलेले,
अशा पसरलेल्या कैक हातांच्या मुठी
हा मिटवील " [८५]

मग आपणही सुखात राहू आपणास जेवायला सुग्रास मिळेल. जरीकाठी वस्त्र नेसू असे म्हणत तिने हात पदराशी नेला. सारा काठ फाटून ती दचकली. स्वप्नभंगाचे दुःख उराशी घेऊन पुटपुटली –

" छळवादी पोरटे झोपू देखील देत नाही
नशीबात नाही म्हणजे काही नाही
एवढीशी झोप
तीही नाही " [८७]

मध्यवमर्गीय स्त्रीचे हे बोलके दर्शन आहे. ना. मा. संतांचा झालेला अकल्पित मृत्यू घरची सासरची माहेरची दूर गेलेली माणसे, पदरात तीन चिमणे जीव त्यामुळे वैतागलेल्या पण स्वप्नांसाठी आतुर असणाऱ्या हे स्वप्नांतरीचे जीवन आहे.

इंदिराबाईचा पिंड एका शिक्षिकेचा आहे. डोळस निरीक्षण, अचूक मार्गदर्शन हे त्यांच्या लेखणीचे वैशिष्टय. प्राचार्य पदावर काम करीत असताना एक स्त्री दुसऱ्या सहकारी स्त्रियांचे दर्शन कसे घडविले ते 'ही अशी ती तशी' या कवितेत स्पष्ट होते. एकूण सात शब्दचित्रेच आहेत ती. या प्रत्येक शब्दचित्रातून स्वतंत्रपणे एकेक व्यक्तिमत्व आपल्या नजरेसमोर उभे रहाते. समाजात अशा स्त्रिया असतातच का ? त्याचेच हे प्रतिक आहे. एका नखरेल बाईचे दर्शन त्या – 'हिचे चालणे डौलदार आहे. थोडाफार नखरा आहे. जार्जेटशिवाय नेसणं नाही. वेणीवरती गजरा आहे. लांबवर रूळणारं मंगळसूत्र आहे. भोवती बाईचा गराडा आहे.' या शब्दात करतात. एखाद्या शाळेचे डोळस निरीक्षण केले तर हे नेहमीच दिसते .

याच चित्रात एखादी 'स्वप्नदग्धा' आहे. बापडीने स्वप्न जपण्याचा वृथा प्रयत्न केला. एकही स्वप्न पुरे झाले नाही. सारीच कशी दग्ध झाली. या स्वप्नदग्धेचे वर्णन करताना– 'हिरवा चुडा पिचण्यापूर्वी हिचा संसार पिचला आहे.' या शब्दातून स्पष्टच करतात. तरीही बापडी जीवनाची रुपरेखा ठरवून गेली आहे. सासरमाहेरचे जवळ कुणीही नाही. एकटीनेच जगायचे आहे. स्वतःचे दुःख स्वतःच प्यायचे आहे. वैयक्तिक दुःख कुठं ना कुठं तरी असं व्यक्त होत इंदिराच्या काव्यात.

डोईवरून पदर, अंगावर श्रीमंतीची खूण, भडक लुगडं. बोलण्याचालण्यात मोकळेपणा दहा ठिकाणी थांबते आहे. दूर पती,घरी मुले अशी ही एक. एक डौलदार नखरेल तर दुसरी स्वप्नदग्धा एक श्रीमंती जपणारी तर दुसरी पक्षिणी. बापडीचा नवरा छंदीफंदी तरीही खेडयापाडयात वर्ग काढून जगते आहे. सुट्टीत मुलांना भेटते आहे, संसार थाटते आहे. मुलांसाठी सारे त्रास सहन करते आहे. ही एक अशी.

नेसणे चापून–चोपून, दररोज परीटघडी, मानेवरती खोटे केस, अंबाडा मात्र मोठा. उतरलेल्या गालांवर खोटी पावडर, चालण्यातसुध्दा नखरेलपणा, ही अशी तर ... हिचे वडील दमेकरी, मोठा भाऊ उनाड, लहान बहीण भावंडं तशीच आई तर क्षयी आहे. सारे घरच दीनपण पहाते आहे. लग्नाचं वय कधीच टळून गेले तरी बापडी कुंवारपणी संसार करते आहे. घरादाराची भावंडांची ती संजीवनी आहे. एकीचे नेसणे जुने–पाने, केसात काळा रंग आहे. अंगावरचे वस्त्र तर फाटके नाही ना ? म्हणून परत परत पहाते आहे. अंगावर पाठीपुढे मुले

आहेत. तरीही उन्हातून अनवाणी चालणारी ही मनस्विनी आहे.

हिचा नवरा कमवीत नाही. मिळालेली नोकरी टिकवित नाही. तंबाखूची गुळणी धरून तासन् तास बसून मात्र रहातो आहे. त्याच्या पापामुळे कर्माचा डोंगर वाढला आहे. तरीही ही ओली बाळंतीण शाळेत पोर नेते आहे. मानिनी स्वतःस संसारास जपते आहे. अशा या साऱ्या जणी वार्षिक वाढ म्हणजे जीवनातले फार मोठे सुख. एक सिनेमा, एक गजरा म्हणजे त्यांची चैन. आत्म्यावरती काळा रंग चढवित या जगत आहेत. यात रेखाटलेली चित्रे हृदयस्पर्शी आहेत. जीवंत अनुभव शब्दबद्ध होऊन स्त्री मनाचा वेध घेतो आहे.

स्वतः एखादी नागिणीचा डौल घेऊन जगणारी स्त्रीही त्यांच्या काव्यात आहे. जहर उतरायचे असेल तर जहरच प्यावे लागते. व्यथा घेऊनच फुले द्यायची असतात. या जगात ताठ मानेने चालायचे असते.

" जिथे टाकशी पाऊल
तिथे सांडतात फुले,
ओठा डोळ्यातून तुझ्या
घोस फुलांचा उमले " ८८

आणि या फुलांच्या घोसातून जाणारी ती एखाद्या नागिणीसारखी वाटते आहे.

नवरा निघून गेला की स्त्रीचे जीवन जणू हरवल्यासारखे होते. बंदिस्त होते. राहणे, बोलणे, चालणे, बघणे अधिक काही नाही तर सारे कसे रेखल्यासारखे. कसरतीच्या तारेवर चालावे ना, तसेच अगदी ! तिला समज आली त्या दिवसापासून ती फक्त एवढेच जाणते की, सरळ रेषेत चालायचे आहे. तीच तिची कपाळीची ललाट रेषा आहे. तरीसुद्धा जीव घेणे पतीस्मरण, तळघात खडा टाकावा तसा होऊन जाते.

' तरीसुद्धा केव्हा केव्हा काय चमत्कार होतो. घरात-दारात, तळघात, मळघात एकदम कसा तोल जातो.' आकाशातील चंद्रदेखील एकदम कसा कोसळतो असे हे पतीचे स्मरण आहे.

एखाद्या स्त्रीच्या डोळ्यावर लुब्धावलेल्या इंदिरा दिसतात. तिच्या डोळ्यात जणू आभाळच असते. पापणीच्या काठावर उन्हापावसाचा खेळ असतो. कधी आमावस्या पौर्णिमेचा अशी ही मोठ्या डोळ्यांची हरिणी. बापडीच्या या सुखास कोणाची बरे दृष्ट लागली ?

" भाळी उतरे पाऊस
गालावरी आली उन्हें,
उमलत्या ओठावरी
ओले हांसरे चांदणे " ८८

सारे दुःख तिच्या सुखी जीवनास कुणाची बरे दृष्ट लागली ? शब्दातून पाझरणारा कळवळा पुढे स्पष्ट होतो आहे –

" मोठ्या डोळ्यांच्या हरिणी
दृष्ट कोणा ग लागली ?
अवसेची काळी बीज
कुण्या वृक्षाने झेलली ? " [८]

डोळ्यावर लुब्धावलेली कवयित्री ओंथंबलेले दुःख स्पष्ट करते आहे.

पती म्हणजे स्त्रीचा ठेवा. तिला दिलेलं कुंकू तिने सांभाळून ठेवायचे असते. आई–वडील चार चौकांच्या वाड्याचे घर बघून देतात. गोठा भरलेला असतो. गुरे–ढोरे मळ्यात असतात. गोकुळाची माया असते. दीर, जावा, नणंदा बरोबर अश्रीतांच्या रांगा उठत असतात. तरीही तिने –

" दिला पित्यांने हा ठेवा,
दिले आईने वळण,
ही ग सोन्याची कोयरी
सई सांभाळ जपून " [९]

पती म्हणजे ' सोन्याची कोयरी ' कुंकू तिने हा जन्माचा ठेवा जपायलाच हवा. प्राणापेक्षा ज़ास्त. हिंदू स्त्रीचे मन इथे डोकावताना दिसते आहे.

यांत्रिक युगास प्रारंभ झाला. मुली नोकरी करू लागल्या. मुलं घराबाहेर पडली. तरीही मुलगा व मुलगी यांच्या नोकरीत फरक आहे. स्त्री व पुरुष यातील हा बोलका फरक इंदिरा स्पष्ट करत आहेत. मुलगी नोकरी करत असते. धाकटचा भावाची की बहिणीची रिबन, वडिलांचा चष्मा, यासाठी जमले तर सणावारी सिनेमाला जायचे. सारा पगार आई बापाच्या हातात ठेवायचा.

मुलाची नोकरी ' टणटण फुटाणे ' या शब्दातच सारे काही उमगून जाते. बापडा नोकरी करतो. म्हणजे उपकारच ? इस्त्रीचे कपडे सायकल तीही दुसऱ्यांनी पुसणे, घड्याळ, वेळेत डबा, दररोज सिनेमा त्याचे उपकार केल्यासारखे जगणे.

" मुलीची नोकरी
मिंधेपणाचे सुख भोगणे, क्षणाक्षणाने–
आकसत जाणे
मुलाची नोकरी
घशात सारखे दाटून येणे ओले सुके–
धुमसत राहणे.

आईवडिलांची स्थिती दुःख, दोघांच्या नोकरीतील फरक असा इथे स्पष्ट होतो आहे. ' स्त्रियांच्या सुखी जीवनापेक्षा दुःखी जीवन मांडण्यात इंदिरांची

लेखणी अधिक रंगून गेली आहे. ' त्यांच्या नजरेसमोर दुःखाने काळवंडलेली प्रौढा, कुमारिका, नोकरी करणारी शिक्षिकाच अधिक उभी रहाते. चारजणीसारखे स्वप्न जपणारी पण ते उध्वस्त झाल्यावर न झोपणारी. असे का ? या प्रश्नाचे उत्तर आपली समाजरचना व कवयित्रीचे वैयक्तिक जीवन असेच द्यावे लागेल.

याच स्त्रीला आम्ही गृहलक्ष्मी म्हणतो. जरा बोलू लागली तर गार्गी. नोकरी केली तरी चूल पेटवून कुकर लावणारी ही आजची स्त्री–

" संसाराच्या भक्कम कुंपणावरून येताना
अडकलेला पदर फाडून घेणारी
खरचटलेल्या जागी उभे असलेले
रक्ताचे थेंब हळूवार पुसत
व्याकुळसे हसणारी स्वप्नसखी प्रेयसी. " [९]

स्त्रीचा सामाजिक दर्जा, तिचे वैयक्तिक जीवन अगदी शेवटच्या चार ओळी वाचल्या तरी स्पष्ट होणारे आहे. म्हणून इंदिराच्या काव्यात " स्निग्ध स्मृतीचा भावगंध अधिक प्रभावी ठरतो " [९] असे डॉ. अ. ना. देशपांडे म्हणतात.

या स्मृती गंधाबरोबर स्त्री जीवनाचे पडसाद उमटलेले दिसतात.

## प्रासंगिक कविता

इंदिराबाईच्या प्रासंगिक कवितांची संख्या तशी फारशी नाही. अगदी हाताच्या बोटावर मोजता येईल एवढी. तरीही मला असे वाटते की काव्यात प्रसंग हा असतोच. इंदिराबाई भावनेस महत्त्व देतात. एखादी भावना निर्माण व्हायला प्रसंगच महत्त्वाचा असतो. तो प्रसंग घडल्याबरोबर लगेच त्यातून काव्य निर्माण होते असे नाही. प्रसंगानंतर ती कविता काही वर्षानंतरही निर्माण होईल. स्वतः इंदिरा या संदर्भात म्हणतात, " अनुभव जाणवला रे जाणवला की लगेच तो शब्दबद्ध करण्यास माझे सामर्थ्य आहे. " [९]

म्हणजेच काव्यनिर्मितीची प्रक्रिया मनात सुरू असतेच. तो कागदावर उतरायला वेळ लागेल. कागद स्वच्छ असतो. भावना सौंदर्यपूर्ण असते. प्रसंग हा कागदासारखा व भावना ही सौंदर्यासारखी. यांच्या एकत्र येण्यातूनच काव्याची निर्मिती होते. इंदिरा असे म्हणतात, ' काव्यातील सारे प्रसंग माझे वैयक्तिक आहेत असे नाही पण त्या पाठीमागे कुठे तरी एखादी अनुभवाची जाण मात्र आहे. ही नस व भावनांचे झंझावत यातूनच काव्य निर्माण झाले आहे.

' साधारणतः आपली अशी समजूत आहे की, एखादा प्रसंग घडतो आहे, होणार आहे. नुकताच घडला आहे व त्यानंतर जे लिहीलं जातं त्यास प्रासंगिक काव्य असे आपण म्हणतो. ' या स्पष्टीकरणातून काही काव्यांचा परामर्श घेता येईल.

माणसाची वेदना काळाला उमजते. धरणीला समजते. पण ती माणसापर्यन्त

जातेच असे नाही. ती वेदना समजून घेण्याचे माणसाचे सामर्थ्य तोकडे पडते. मानव कमी पडतो. विश्व काळवंडावं असं दुःख आपण मे २७ ला भोगलं. पण त्याचा सळ आमच्या अंतःकरणात अजूनही उठला नाही. २७ मे – गुलाबी दिवस. उडत बागडत अलगद या धरणीवर उतरला पण अचानक त्याचे पंख गळून पडले. तो जड झाला. त्याला ब्रह्मांडाचे दुःख झाले. २७ मे – पंडितजींचा मृत्यू. विश्वाची वेदना नेहरूंच्या मृत्यूनंतर सारा भारत काळवंडून गेला. नियती उद्विग्न झाली पण त्यांचे तत्त्वज्ञान आचरणात न आणता आम्ही त्याचा आत्मा जणू विकत बसलो. कवयित्रीस होणारे हे दुःख आहे.

१९४८ पासून आम्ही भारतीय उध्वस्त मने घेऊन जागतो आहोत. १९४७ ला स्वातंत्र्य प्राप्त झाले. ज्या वास्तूसाठी आपण रक्ताचे पाट वाहिले ती वास्तू दुभंगून गेली. जिच्या पंखाखाली आपण वाढलो, जिच्या ओढीने आपण इथपर्यन्त चाललो ती वास्तू ४७ च्या वनव्यातील एक आहुती ठरली. भिती विद्रुप झाल्या. ढिगारे कोसळले. स्वतःच जळून गेलेलं घर व मन कवयित्रीस या भितीपेक्षा दिसलं ते उध्वस्त स्वैपाकघर ज्या स्वैपाकघरात आईनं पानं वाढली, आशीर्वाद दिले हे देवघर, ज्या देवघरात, कवयित्रीने प्रार्थना केली, ' येग लक्ष्मी ' ते देवघर – घराचे माजघर – ज्या माजघरात पंडित मोरोपंतांचे महाभारत कवयित्रीने ऐकले होते.

मोडून जोडून पडलेली खिडकी याच खिडकीतून उभे राहून कवयित्रीने हिरण्यकेशीच्या पुराचे लाल पाणी पाहिले होते. ही भव्य घराची चौकट, जिने घराची अस्मिता शिकवली होती. ते सारे आज भग्न विदीर्ण आणि उध्वस्त झाले आहे. एकेकाळची संपन्न वास्तू आज उध्वस्त झाली. आणि आज त्या वास्तूस आकाशाने जवळ घेतले आहे. तिचे जळके जग हलक्या हाताने फसले आहे. धरणीने तिला कुशीत घेतले आहे. आपल्या मायेचा हिरवा हात तिच्या माथ्यावरून फिरवला आहे. दुःखाच्या या वणव्यातही इंदिरा रंगाची हिरवी माया विसरलेल्या नाहीत.

आज ही उध्वस्त झालेली वास्तू आमची कुणाचीच नाही. तिच्या उघड्या भिती उन्हात तळपत आहेत. ठिकठिकाणी गवत लोंबते आहे. खाचीखाचीतून चिमण्यांनी संसार थाटला आहे. देवघराच्या जागेत एका कुत्रीने आपली पिल्ले मोठ्या विश्वासाने ठेवली आहेत. हा दगडी चौकटीचा दरवाजा, बिनदाराचा रिकाम्या अभद्र दगडधोंड्यांनी बुजवलेला. मुका केविलवाणा. सारे हे दृश्य पाहून कवयित्रीचे हात मन कसे थंड पडले आहे. उध्वस्त वास्तू–उध्वस्त प्रसंगात जिवंत रूप देऊन गेली आहे. बिनदाराचा रिकामा अभद्र, मुका, केविलवाणा दरवाजा या शब्दातून या प्रसंगातील उध्वस्ताची जाणीव वाढवली आहे.

घराबरोबर तुळशीवृंदावन ही उध्वस्त व्हावे. परसदारी असणारे तुळशी-

वृंदावन – त्यावरील चुना कधीच लोपून गेला आहे. पण 'श्री' अजून स्पष्ट आहे. धुळीने माखलेली एक पणती अजूनही देवळीत आहे. फांद्यावर जळमटे उतरली आहेत. कवयित्रीची पावले जवळ जातात. मन-डोळे भरून येतात. आणि दिसतात दोन हिरवी पाने. फिकुटलेली त्या पानांना अजून वाटत असेल का ? धनीन येईल. हळदीकुंकू वाटील. झारीने पाणी शिंपील. कौतुक भरल्या पायांनी प्रदक्षिणा घालील. अशी वेडी समजून घेऊन ते वृंदावन ती तुळस, ती हिरवी फिकुटलेली पाने थांबली असतील. पण त्याची समजूत घालताना आभाळही हरले आहे. तुळशीपत्राची समजूत आभाळालाही घालता येत नाही. एवढे हे दुःख गहिरे व खोल आहे.

इंदिराबाईनी दुसरे महायुद्ध, स्वातंत्र्याचा झगडा, स्वातंत्र्यानंतरचे दिवस पाहिले आहेत. या तिन्हीचे एक चित्र त्यांनी 'आयुष्यात सुरवातीला' या काव्यात व्यक्त केले आहे. आयुष्याच्या सुरवातीस एक युद्ध गडगडून गेले. डोक्याला दिसले नाही. चित्रमय जगत्‌च्या अंकात उध्वस्त तसबीरी मात्र पाहिल्या. आयुष्याच्या चढतीवर दुसरे युद्ध पेरलेले दिसले. डोंगर पेटले होते, टंचाईच्या झळा साऱ्यापर्यन्त पोहोचल्या होत्या. रॉकेलच्या एका बाटलीसाठी रांगेत उभे रहावे लागत होते. याच प्रसंगाने तिष्ठण्याची चवही समजून दिली.

आता आयुष्याच्या उतारास सगळीकडे स्तब्ध आहे. स्नेहभावाच्या ताणाने आकाश दाटले आहे. केकाटणे आहे. आपला हात आपलाच गळा दाबतो आहे–

"माझी थोडीच राहिलेली पावले
भयाच्या सावलीने गिळून टाकली आहेत." [९४]

प्रासंगिक काव्याची निर्मिती ही स्वातंत्र्यानंतरची आहे. भारत-पाकिस्तानचे अलगपण त्यातून झालेला होमकुंड व आलेली पोकळी भयाणपण या साऱ्या प्रसंगानाही दुःखाची किनार आहे.

## सामाजिक कविता

एकच एक वेदना जपणारी मीरा, असे इंदिराबाईना संबोधून आम्ही त्यांच्यावर मर्यादा लादली आहे का ? त्यांच्या काव्यात फक्त दुःखच आहे का ? त्यांनी फक्त वेदनाच जपली आहे का ? जीवनातील इतर घटकांना स्पर्श केलेला नाही का ? या साऱ्या प्रश्नासंबंधी असे म्हणता येईल की, इंदिराबाई जशा वेदना मांडतात तसेच जीवनातील इतर भावही. इतर घटकांवर, सामाजिक, प्रासंगिक, वात्सल्य इत्यादी त्यांच्या कविता आहेत. पण या काव्यातून कुठेतरी मध्येच त्यांची वेदना डोकावते आहे.

मध्यमवर्गीयांचे दुःख मध्यम वर्गातच जन्म झाल्यामुळे त्यांनी निरखले आहे. समाजात वावरत असताना नोकरीच्या निमित्ताने घरातील वातावरणाने त्यांचा संबंध समाजाशी सातत्याने येत गेला. साधारणतः महाराष्ट्रीयन स्त्री ही घरातून

बाहेर पडत नाही. तिची नजर भुईवरच असते. तसे त्यांच्या बाबतीत घडले नाही. त्यामुळे त्यांची सामाजिक कविता अधिक वास्तववादी आहे. तरीही ती माळासारखी बेचैन आहे.

'स्तंभ' ही पहिली सामाजिक कविता. आशय आणि अभिव्यक्ती या दोन्हीही दृष्टीने महत्त्वाची वाटते. गावाच्या बाहेर एखादे मंदिर असते. मंदिरास असणाऱ्या स्तंभाच्या आकाराशी जशा कवयित्रीच्या जाणीवा निगडीत आहेत तशाच खांबाच्या भावनेशी. प्रकाराला सावरणारे खांब एकदम का काळवंडले ?

" अशी सदाची स्तंभापाशी
रेंगाळावी अखंड वर्दळ,
तन मनाचा दर्प साहुनी
काळवंडले पापणी दळ ? "

तनमनाचा दर्प साहण्याएवढी सहनशक्ती निर्जीव अशा स्तंभात आहे. कारण 'घोटीव काळचा पाषाणावर। कंगोऱ्याची नक्षी सुंदर। उंच उभे हे स्तंभ हारीने। ध्यान मग्न की मुनिश्वर ?' एखाद्या मुनीश्वराच्या आत्म्याचा वास जणू या काळचा पाषाणात आहे. चंगीभंगी जीवनाला आराम देणारे हे स्तंभ, कष्टी जीवनास आधार देणारे हे स्तंभ, अनेकांच्या भल्या बुऱ्या कर्मांचे एकमेव साक्षीदार आहेत. मात्र स्तंभाला टेकून एखादा चोर बसला होता. इथेच चोरट्या भेटी घडत होत्या. इथेच फुले वाहिली जात होती. समजातील दृष्कृत्ये ही देवळात घडत असतात. आणि याची जाणीव सर्वांना असते. तरीही ती प्रार्थना मंदिरे असतात.

जीवनाचा प्रवास करणारी कवयित्री स्वतःच्या जीवनाबरोबर इतरांचे जीवन दर्शवते. ठळकवाडी ते वडगांव जवळजवळ तीन मैलांचा प्रवास ही नित्याची पाऊलवाट. या पाऊलवाटेने जाताना श्रीमंत आणि गरीब या दोघांचे भिन्न भिन्न विश्व नजरेसमोर उभे रहाते.

" सुख वस्तूंचे महाल इकडे
इकडे कोंगाट्यांची पाले
इकडे हिरवा माळ तापतो
एकडे पिवळी लक्ष्मी खेळे " [१५]

पिवळचा माळावर तापणारी पाले व पिवळी लक्ष्मी असे अर्थपूर्ण शब्दसूचन कवयित्रीने केले आहे. कैद्यांची कवायत, गुरांचा कळप, गांवकुस, दमट पापाच्या भावना, हिरवा माळ, या सर्व शब्दांच्या पाठीमागे सामाजिक जाणीवाच आहेत.

सामाजिक विषयास स्पर्श करत असताना कधी त्या वैयक्तिक भावजीवनातून व्यक्त करतात तर कधी निसर्गाच्या माध्यमाद्वारे –

" माळावरल्या पालामधली
रंगीत वाकळ, तशी जुनेरी
विसरू बघतो रंग आपुले
उन्हात हिरव्या आणि रूपेरी " [९६]

या समाजरचनेत गिधडे, सौख्याचे उन्हं टिपून घेणारी आहेत. मनात उडणारी फुलपांखरे माळावर टाकली आहेत. दोन थरातील भेद मार्मिकपणे व्यक्त केला आहे.

सर्वसामान्य कुटूंबातील मुलगी नोकरीची सुरूवात करते ती वेळ दवडावी, परिस्थिती सावरावी, लग्न करावं, निघून जावं या बेताने पण ती एस. एस. सी. झाली पुढे काय ? दोन दिवसातच हा आनंद मावळतो. आणि निर्णय होतो लग्नापर्यन्त नोकरी–टपालाने मुलाखतीची तारीखही येते. मध्यमवर्गीयांचे जीवन या देशातल्या कसे आहे ? याचे हे यथातथ्य दर्शन.

" ज्या दिवशी टपालाने
मुलाखतीची तारीख आली
त्याच दिवशी तजविजीला आंगठी साखळी
निघून गेली. " [९७]

बापडीची निवडही होते. नोकरीची सुरूवातच ना ती. पहिल्या दिवशी मोठ्या झोकात ती सही करते. सत्तर पोरांचा वर्ग ताब्यात घेते. शाळा ही मध्यमवर्गीयांच्या संसारासारखी. ओसाड भिंती, उखाड भुई, किलकिलणारी पोरं बघून तिचा जीव गळ्यात गोळा होतो. खुर्चीवर ती घाण पुसून बसते. दंगा कमी होत नाही. दुसरी बाई वर्गाचा ताबा घेते. दुसऱ्या दिवशी ही मोठ्या तयारीने येते. मुलांना जिजाईच्या गोष्टी सांगते. पण मुलं ऐकत नाहीत. हेडबाई आज वर्गाचा ताबा घेतात. सरीही तिने धीर सोडला नाही. मुलांना गणित शिकवावं म्हणून तिने गोट्या आणल्या. साऱ्या बायांनी तिची टिंगल केली. त्या फिदीफिदी हासल्या. नंतर फक्त ती गजराची वाट पहात राहिली व त्यानंतर आयुष्यभर एक तारखेची हातात पडणाऱ्या एका मोठ्या नोटेची लग्न जमेपर्यंत नोकरी हे पालूपद कधीच संपले नाही.

" त्याच घरात रहाते आहे, घरदार थंड आहे
लग्नापर्यंत नोकरी चर्चा मात्र बंद आहे " [९८]

मध्यमवर्गीयांची दुःखे त्यांना खाव्या लागणाऱ्या खस्ता, मारावी लागणारी मने, यांचे हे बोलके चित्रण आहे. फिरते संसार आणि फिरते लोक या संस्कृतीला नवीन नाहीत. आपण नेहमीच पहातो. शहराच्या बाहेर एखाद्या माळावर अशी वस्ती अचानक होते. बेचैन माळावर अकल्पितपणे पालं थाटली जातात, कुठून

तरी घोड्यावर ओझी लादून माणसे येतात. त्यांच्याबरोबर झेपा टाकत त्यांची कुत्री असतात. खिदळणारी पोरं असतात. कुणाकुणाचे असे ते पांच-पंचवीस संसार त्या माळावर विसावतात. माळ माणसात येतो. अंगावर कुत्री खेळू लागतात, पोरं लोळू लागतात, घोडी पळू लागतात, फिरू लागतात. चुलीतील खमंग वास त्या माळावर भरून रहातो. झोळीला दिलेल्या झोक्याने अवघा माळ थरारतो. हरवून जातो. माळ माणसात येतो. आणि अचंबा वाटावा असे घडते. पोलीस येतात. पाल मोडून टाकतात. घोड्यावरून ओझी, पोरं, कुत्री सारे जातात. उरली रात्र माळाला कठीण जाते. मागे उरतात तीन दगडांच्या चुली, एखादा पोरका कुत्र्याचा जीव चुकून राहिलेला.

थरथरणारा . . . कुडकुडणारा तो पोरका जीव त्याच्या करूण आक्रोशाने माळ बेचैन झाला आहे. हात नसलेल्या माणसासारखा अगतिक होवून माळ आभाळाकडे बघतो आहे. इथे माळ बेचैन नसतो, मानवता असते. कुत्र्यासारखी ती विव्हळत असते तर टॉर्च घेऊन या समाजातले पोलीस त्यांना लाथाडत असतात. इथली सामाजिक स्थिती काही वेळेला पोरक्यासाखीच असते.

इंदिराबाईच्या ज्या चार–पाच सामाजिक कविता आहेत. त्यांच्यातून समाजाचे दर्शन घडते. त्या कवितांचा विचार करता या कवयित्रीने समाजाचे बोलके दर्शन घडविले आहे. मध्यमवर्गीयाच्या समाजाचे चित्रण त्यांनी केलेले नाही. त्याची आपण अपेक्षा करावी का ?

**राष्ट्रीय कविता**

एखाद्या कवीने कोणत्या विषयावर काव्य लिहावे, कोणती भावना काव्यात साकारावी याविषयी आपण रसिक सुचवू शकत नाही. कवीने केलेल्या काव्याचा आस्वाद घेणे एवढेच त्याचे काम असते. तरीही कवीकडून एखाद्या भावनेची अपेक्षा करण्यास हरकत नाही. इंदिराचे प्रसिद्ध झालेले सहा संग्रह व अप्रकाशित असणारा त्याचा संग्रह यांचा विचार करता त्यांच्या काव्यात राष्ट्रीय भावना नाही असे म्हणावेसे वाटते.

ध्वजवंदन आणि आम्ही ' ही त्यांची एक राष्ट्रीय कविता पण या कवितेचा तोल जसा राखायला पाहिजे तसा राखला गेला नाही. ही एक फसलेली कविता आहे असेच म्हणावे लागते.

इंदिराबाईकडून राष्ट्रीय भावनेची अपेक्षा का करावी ? असा एक प्रश्न निर्माण होतो. मुळात या कवयित्रीचा पिंड एका शिक्षिकेचा आहे. शिक्षिका म्हणून जगत असताना ही भावना आपोआप शिक्षकाच्या मनांत निर्माण होते. या देशाचे अनेक राष्ट्रीय सण आहेत. या सणांशी आमचे जीवन बांधलेले असते. आपण राष्ट्राचे काही तरी देणे लागतो ही भावना या कवयित्रीच्या मनात जरूर असेल

पण ती शब्दात पकडता आलेली नाही असे वाटते–

" लहरतसे विहरतसे
आकाशी ध्वज संपन्न,
आम्हीही रस्त्यावर,
केवळ पण प्रेक्षक जण " ९९

राष्ट्रध्वजाजवळसुद्धा बाईची भूमिका एका प्रेक्षकाची आहे. कारण १९४८ साल मनात अजूनही जागे आहे. मळलेली मने, किटलेले हात, हृदयातील कोळीष्ठके, उरातली जखम हे सारे कवयित्री विसरू शकत नाही.

राष्ट्रीय भावनेचा अभाव आहे असे मुळीच म्हणता येणार नाही. ती फक्त काव्यात साकारली नाही एवढेच.

**आध्यात्मिक रचना**

व्यक्तीचे वय जसे वाढत जाते तसे व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचा विकास होतो. या व्यक्तिमत्वाच्या विकासाबरोबर त्याचे विचार बदलले असतात. विचारांना प्रगल्भता आलेली असते. वाढत्या वयाबरोबर माणूस कोणत्याही गोष्टीचा सूक्ष्म विचार करतो. तशीच त्याची ओढ आध्यात्माकडे अधिक लागते. जीवनाच्या इतर फाफटपसाऱ्यापेक्षा त्याला परमेश्वराचे चिंतन, जीवन म्हणजे काय ? आपण कोण ? आपण कोठून आलो ? कोठे जाणार ? जीवनात आपण काय मिळवले ? या साऱ्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याची त्याची धडपड असते.

लहान वयात असताना मनातील औत्सुक्य असणारे आता ओसरलेले असते. तारुण्यात जळत्या मशाली विझलेल्या असतात. संसारातील कर्तव्याची पूर्तता झालेली असते. साहजिकच मन ' मी ' चा विचार करू लागते. ' विश्वाचा ' विचार करते. ' ईश्वरी ' सामर्थ्याचा विचार करू लागते. तिची अवस्था एकांतिक होते. एकाकी जीवन बरे वाटू लागते. आध्यात्मिक रचना आवडू लागते.

इंदिरांच्या आध्यात्मिक रचनेचा विचार करत असताना ही गोष्ट सहजपणे ध्यानात येते. त्यांचे मन हे एकाकी मात्र पूर्वीच बनले आहे. वडिलांचा मृत्यू, काकांची कडक शिस्त, विवाहाची धामधूम, प्रियकराचा मृत्यू, दूर गेलेली नाती–गोती त्यामुळे त्यांचे जीवन वादळात सापडलेल्या एकाकी पक्षिणीसारखेच झाले आहे. या साऱ्यांचे पडसाद त्यांच्या आत्मिक कवितात आपण शोधले. त्याबरोबर त्यांच्या मनाचा आध्यात्मिक विकास कसा झाला ? याचा विचार येथे आहे.

आठवणींचे अनेक फास मनाभोवती आहेत. सारे कसे हसतायत. पायतळीचे खोटे फळकूट अजूनही का सुटत नाही ? त्या एका क्षणाची वाट पहात कवयित्री रहाते. ' मृत्यूची ओढ ' फारशी मनात असतेच असे नाही. पण चिरंतनाची असते.

' कलावंताचे वलय ' शोधणारे कवयित्रीचे मन आध्यात्मातून प्रियकराच्या शोधात असते. असा शोध मीरेनेच फक्त घेतला आहे. मराठीत भा. रा. तांबेच्या काही कवितातील अशी उदाहरणे देता येतील.

" नादी लागून तुझ्या चेटक्या
जारीण मी ठरले
' स्व ' सुखा आंचवले रे
तोंडघशी पडले " १००

अंधाराचे बाळकडू संपल्यावर त्याची जाणीव होते. त्याच्या अफाट शक्तीचे त्याचे काळेशार पाणी पिऊन वावरत असताना आपणास आपली जाणीव नसते. पायाखालील वाट काटेरी असते. ठेचा लागतात, पावले रक्ताळतात, जमीन तुटते आणि आपण तेजाचा शोध घेत चालत असतो. ध्यास तेजाचा असतो. प्रकाशातले पहिले पाऊल असते. तेज मात्र दूर असते मनास प्रश्न पडतो --

" अशा भलत्यावेळी
कोण कुठे निघाले आहे ?
काळोखाच्या तुफान घोड्यावर
इतके चाबुक
कोण ओढते आहे ?
आणि वाऱ्याची चाके तरी
केवढ्या मोठ्याने गाजत आहेत. " १०१

यशवंतांच्या ' मालका ' या काव्याचे सूर असेच नाहीत का ?

' झोका ' या काव्यात कवयित्री स्वतःस विसरते. उंच उंच झोका चढवित असताना पदराचा वारा होतो. लाल मातीचा रंग पावलाला चढतो.

" झोका चढतो उंच उंच
पाय पोचती मेघावरती
इंद्राच्या डोहावरी
लाल पाखरे पाण्या येती " १०२

इंद्राच्या डोहावर जाणारा झोका नंतर आवरता आवरत नाही. अपत्याची गती ही अशीच आहे. हे एक वेळच आहे. एकदा आपण त्यात सापडलो म्हणजे आपली अवस्था कमलिनीतल्या भुंग्यासारखीच होते. याच वेळी आपल्यास आपले घर ओळखता येत नाही. सारे ब्रह्म गुंजेएवढे वाटू लागते. हा ' झोका ' आत्म्याचा आहे. ' झोका चढतो उंच उंच । मला थांबता थांबवेना । गुंजेएवढे माझे घर । त्याची ओळख आवडेना । इथं घर सर्वांना विसरण्याची अवस्था आहे.

दोन मनांतील द्वंद्व त्या शब्दबद्ध करतात. कल्पक हात लेखन करी. डावा

ते लेखन जपून ठेवी. जीवनभर सारे असेच सहकार्याने चालत असते. डाव्या उजव्याच्या एकमेकांच्या सहकार्याविना हा जीवनाचा प्रवास चालताच येत नाही. साधूसंताच्या वाटेची धूळ माथी लावल्याविना आद्यात्मिक वारसा लाभत नाही. ज्या भोवऱ्यात स्वतःच गाडून घ्यायचे त्या भोवऱ्याचा शोध घेण्यातही गंमत असते.

" असा डाव्या उजव्याचा
पीळ भरला भरला
सुटेल का क्षण एक
जळी गिंळील भोवरा " १०३

त्या एकाच क्षणासाठी ही धडपड असते. मनास माहित असते हा सारा मनाचाच खेळ आहे. शीळ घालता घालता तोल सावरायचा असतो. पाखरू घायाळ होते. पंखात कापरा वारा भरतो. रक्त चोचीत येते. एकच थेंब हवा असतो. त्या एका थेंबास समोर ठेवूनच सारे काही मिळणारे असते. म्हणून इंदिरा म्हणतात –

" डोळ्यातील थेंबासाठी
चोच वासते गोजिरी
एका थेंबानेच ताजे
पुन्हा घ्यावया भरारी " १०४

एका थेंबाचा शोध घेत घेत पुन्हा कवयित्रीचे मन भरारी घेते. कैलासाचा वास पृथ्वीवर येत असतो. मुरलीची गोड सूरावट कळक बनातून पुकारत असते. प्रपातास षट्जाचा स्वर लाभलेला असतो. सागर ओंकार गात असतो. महेश्वरांचे अश्रू टिपण्यास मांडवी प्रकटलेली असते. शरीराचा कण न् कण कसा अधिर झालेला असतो.

" कुलागार कधी झिरमिरताना
स्वर गुच्छांची सतार शिंपण
आभाळातून मृदंग घुमता
नादून जातो अवघा कणकण " १०५

आभाळाचा मृदंग घुमताना साऱ्या चराचरास नादरूप येते. इंदिरांच्या मनाची तन्मय अवस्था इथे स्पष्ट होते.

डोळ्यापरीस लहान
आज वाटते आकाश,
रात्र दिवसांचा काळ
झाला निमिष निमिष. " १०६

शरीराच्या मिठीतून सुटू पहाणारे शरीर विश्वाच्या पलिकडे असणाऱ्या स्पर्शाची ओढ व लहान डोळ्यापेक्षा वाटणारे आभाळ माणूस जसजसा मोठा

वाटतो तसतसा या जीवनाची किंमत त्यास कमीकमी वाटू लागते व आभाळा-एवढे ब्रह्म-विश्व वाटू लागते. हीच आध्यात्माची ओढ आहे.

काहीवेळा इंदिराबाईना पश्चाताप होतो. आजवरी आपण जे शिकलो, जे जगलो ते मुळी जीवनच नव्हते. आभाळ कधी खांद्यावर तोलून धरता आले ? सारे जीवन म्हणजे एक खुळेपण. जर या जीवनात आपणास आले असते, वाऱ्यावर जुळवायला स्वर गुंफायला आला असता पाकळीचा गंध ? तरच आपण त्यास जीवन म्हटले असते. 'आभाळ तोलणे, गंधाचा हार गुंफणे' ही किमयागिरी जीवनात आपणास कधीच करता येत नाही तर त्यासाठी त्या दिव्य प्रवासास बाहेर पडले पाहिजे.

बहिणाबाई चौधरींनी 'मना' ची तुलना 'मन आभाय आभाय' अशी केली आहे. माणसाचे मन आभाळाएवढे होते. काहीवेळा तीच उपमा इंदिराबाई देतात.

" अजाणाहून अजाण हे मन रूपबावरे
बघत न्याहाळून रूप आपुले
पहाट ताज्या दवबिंदूमधी जळराशीमधि
धुके उसळत्या खोल दरिमधि, गहन गढुळशा
आभाळामधि " १०७

या मनास कधी रंगाचे बंधन पडते, तर कधी हे मन आपलेच आरसे फोडून आपणासच पहात रहाते. आपले रूप निरखते. ज्या रूपावर आपला श्वासही नाही असेही भीषण सुंदर रूप शब्दांकित होतच नाही. ही व्यथा इंदिरांची आहे.

" पदावलीचे असल्या किचकट एकच येते
उत्तर शून्य शुभंकर
शून्य नव्हे ते कमळ अमरसे लक्षदलांचे
मिटून जावा जीव ज्यामध्ये हळूच अलगद " १०८

मानवी जीवन म्हणजे अगम्य अक्षरावली की उमजत नाही. ज्याला शोधायचे तर शून्यातच जावे लागते. जगाची उत्पती ही विश्वातून झाली आहे.

आपला प्रियकर इंदिरांना आकाशासारखा वाटतो. त्या म्हणतात, 'असा कसा तू आकाशासारखा.' दहा दिशांनी तुझ्यावर सारे कांही उधळले आणि ओंजळीत मुख लपवून ती 'शून्या' झाली. एकाद्या उत्कट घगधगत्या प्रश्न-चिन्हांसारखी. माझ्या मनाच्या आभाळात एखाद्या वीजेसारखी तुझी आठवण येते.

" एक तुझी आठवण
मुक्त झाली माझ्यातून
माझ्या इवल्या विश्वाला
झाली गगन निर्गुण . . . . १०९

निर्गुण गगनासारखी आठवण व स्वत:चे मर्यादित जग याची जाणीव इथे आहे.

विश्व इवलेसे असेल तरीही या इवल्याशा विश्वास भेटणे प्रिय असतेच. ' उन्हे भेटती आकाशा । वारा भेटे अवकाशा । तशीच ही आहे भेट । व्हा ना बाजुलाच कशा.

वयानुसार बाईचे मन विश्वदर्शनासाठी आतुरले आहे. वेदना व निसर्ग या दोन गोष्टी कवयित्रीस कमालीच्या प्रिय आहेत. निसर्गावर त्यांचे अनासक्त प्रेम आहे. त्यामुळे अध्यात्माचा त्या वेध प्रीतीप्रमाणेच निसर्गात घेतात. ' आध्यात्म ' हा जीवनाचा एक घटकच मानावा लागेल. कारण मनुष्य कधी ना कधी त्यात रमून जाताना दिसतोच.

" रानवारा झाला श्वास
गंध रंगला चैतन्यात
घट गौरी ही पूजियेली
माझ्या तनामानसांत " [११०]

श्वासात रानवाऱ्याचे रूप लाभावे. विश्वात स्वत:चे दर्शन घडावे. स्वत: विश्व दिसावे असे हे कवयित्रीचे जीवन, मन. त्यांचा आध्यात्मिक विचार स्पष्टवणारा आहे.

## संकीर्ण कविता

इतर विषयांना स्पर्शीणाऱ्या कवितेत स्त्री मन कसे उमटून गेले आहे त्याचाच शोध इथे मर्यादित स्वरूपात आहे. वृत्तपत्रांचे हे युग आहे. सकाळी चहाबरोबर वृत्तपत्रे ही आवश्यक बाब बनून गेली आहे. काळचा काळचा मथळचात एखाद्या महात्म्याचा वध कसा झाला हे आपण वाचीत राहतो. घुसमटलेला आक्रोश ऐकत रहातो. स्त्रीचे मन घरात रमते. त्यामुळे या मजकूराबरोबर वृत्तपत्रांची घडी करून ठेवत असताना मन यांत्रिकच असते. चहाच्या उष्टचा कपाचे जग वृत्तपत्रावरचे वर्तुळाकार दिसत रहातात.

घरातील जमीन ही अशीच इंदिरांच्या भावजीवनाशी निगडीत वस्तू. ही सारवलेली जमीन कवयित्रीस प्रेमळ आईसारखी वाटते. मुलांना खेळवणारी झेलवणारी जणू ती आईच आहे.

लहान वयात जडणाऱ्या सवयी लवकर सुटत नाहीत. लहान वयात ' इसापनीतीतील ' कथा आपण वाचीत-ऐकत रहातो. त्यात शेवटी तात्पर्य काढलेले असते. कडू-गोड अनुभवांचे ते तात्पर्य आपण आयुष्यभर जपून ठेवतो. पुढेपुढे मनास ती एक सवयच चिकटून राहते, प्रत्येक गोष्टीतील तात्पर्य काढण्याची. या तात्पर्याच्या कोडचातून माणूस बाहेर पडू शकत नाही. स्त्री ही पुरुषापेक्षा

अधिक 'व्यवहारवादी' असते. समाजात वावरत असताना तिच्या वृत्तीत संथपणा जाणवतो. उताविळपणे ती कोणताच विचार करत नाही. तात्पर्य काढण्याची वृत्तीही त्यापैकीच.

घरात असंख्य वस्तू असतात. या सर्वच वस्तूंना आपल्याविषयी काय वाटत असेल? या प्रश्नाचा विचार आपण कधीच करीत नाही. नोकरीवरून परतणारी कवयित्री, घरात आल्या आल्या प्रत्येक वस्तूच्या भावसंवेदना जाणून घेते. स्त्रीच्या हळव्या मनाचे हे दर्शन आहे. भिंतीवर घड्याळ असते. हवेत त्याची टिकटिक भरून रहाते. आपण त्या अधीर आतुर घड्याळाकडे कधी लक्ष देतो ? आराम खुर्ची जणू हात पसरून बसलेली असते, स्वागत करायला तयार असते. तिच्याकडून आलेली पाकिटे वाट पहात असतात. त्याचबरोबर चूल –

" मंद गान हे तेलचुलीचे
भाव दाविते अधिरपणाचे
अल्लड आधण वरती नाचे
सळसळ करूनी वाकवाकुनी शोधीत कोणाला ?" [१११]

चुलीवर असणारे आधण, अल्लड असते. त्याची सळसळ कवयित्रीस ऐकू येते. ते एखाद्या लहान बाळासारखे दिसत राहते.

रस्त्यावरची धूळ किती सोशीक. स्त्रीही तशीच. लहान मुले, गुरे, ढोरे, अधिकारी या रस्त्यावरून जातात. या गोष्टीची दखल आपण कितपत घेतो ? कवयित्रीस ही धूळ एखाद्या सुकूमार तरुणीसारखी वाटत रहाते. सुकूमार तरूणीचे अंतःकरण कोण बरे तुडवणार ? वारा येतो. या धुळीने जपलेल्या खुणा पुसून टाकतो. त्याचे अवखळपण कवयित्रीस लोभसवाणे वाटते. मातीवरची खूण कवयित्री मात्र जपून ठेवते.

" लाल मऊ धुळीतील
उमटली खूण खूण
माझ्या अंतरीचा ठेवा
पहा गडे न्याहळून "

रस्त्यावरच्या धुळीतील या खुणा कवयित्रीस ठेवा देतात. वस्तू जपून ठेवण्याची वृत्ती स्त्रीत असते. धुळीवरील खुणा जपण्यामागे हळवे स्पंदन आहेच. त्याबरोबर स्त्रीवृत्तीसुद्धा.

कवयित्रीचे बालपण 'तवंदी' या खेड्यात गेले. त्यामुळे खेड्यांचे आकर्षण अजूनही त्यांच्या मनोवृत्तीत आहे.

" तिथेच आहे तुझे चिमुकले गवतांचे झोपडे
काळेकाळे तिथे कोकरू दाराशी बागडे "

खेडूत ग्रामीण स्त्रीस नागरी धडे शिकवायला कवयित्रीचे हळवे मन तयार होत नाही. साध्या साध्या विषयातसुद्धा इंदिरानी स्त्री मनाचे दर्शन घडविले आहे.

## काव्यप्रवास – सहवास ते बाहुल्या

### दोन प्रणयी मनांचा "सहवास"

इंदिराबाई संत व ना.मा.संत या पती-पत्नींचा पहिला संग्रह म्हणजे सहवास. नवीनपणाच्या काही खुणा अर्थात या संग्रहात आहेतच. प्रामुख्याने यातील कविता या विवाहपूर्व आहेत. 'दोन प्रणयी जीवांचा हा मुक्त सहवास' आहे असेच या संग्रहाबाबत लिहावे लागेल –

'आई' ही इंदिराबाईची पहिली कविता. या कवितेसंबंधीची त्यांची भूमिका 'इंदिराबाईची काव्यदृष्टी' या प्रकरणात नोंदली आहे. खेडचापाडचातून वसतीगृहात रहाणाऱ्या मुलांचे हे आईविषयीचे आकर्षण आहे. या कवितेवर माधव ज्यूलियन, यशवंत यांचा प्रभाव आहे. असे आपणास मुळीच म्हणता येणार नाही. मा. ज्यूलियन व यशंवत यांच्या कविता व 'आई' ही कविता इंदिराबाईनी वाचली होती. एका बाजूस बालमनाचे तसेच स्त्रीमनाचे दर्शन या काव्यात स्पष्ट केले आहे.

लहानपणी इंदिराबाईचे वडील वारले. काकांचा कडक स्वभाव व शिस्त. 'आम्हास केसात फुलंसुद्धा त्याकाळी उघडउघड माळता आली नाहीत.' [११]

शाळेस जायची वेळ व्हायची. एवढचात धुण्याचे पीळे नजरेसमोर यायचे. बापाविना पोरीस आईचा लळा अधिकच लागला. 'आई हे मानवाच्या जीवनातील श्रद्धास्थान असते.' माणूस ज्यावेळी एकटाच असतो, बसतो त्यावेळी त्याचे मन भूत-काळाच्या मैदानावर स्वैर अश्वाप्रमाणे धावू लागते. या लहान वयात जीवनातील सुखदुःखे सांगावीत तर ती आईलाच. सुखाचे टिपलेले क्षण साठवावेत व ते आईकडे पाठवावेत दुःखाचे कढ सोसावेत, अश्रूंना वाट आईपाशी करून द्यावी. तिच्या मांडीवर झोपावे. खूप खूप बोलावे असे आईचे स्थान. ती जर दूर राहत्या गावी राहिली तर भेटीची आतूरता अधिकच होणार. प्रत्येक विद्यार्थ्यांच्या जीवनातीलच हा क्षण आहे.

काव्याची उपासनाही इंदिराबाईना गुप्तपणेच करावी लागली. काकांच्या दृष्टीपुढे ती येता उपयोगाची नाही, फर्ग्युसनच्या होस्टेलवर रहात असताना एके दिवशी श्री. संत आले व म्हणाले 'तुमच्या कविता मासिकासाठी हव्या.' या प्रश्नास त्यांना उत्तर देता आले नाही. त्या मौनच राहिल्या. संत निघून गेले. पण मनांत हुरहुर दाटून राहिली. या फंदात आपण कशास पडलो ? जर चुकून काकांच्या नजरेस हे आले तर ?या भीतीनेच त्यांचे मन गारठून गेले. पण या मनाची धडपड सुरू होतीच.

'स्त्री' ही २०–२१ व्या वर्षी मनस्विनी असते. स्वतःचे रुप न्याहळणे तिला प्रिय असते. मनात एखादी हुरहुर असते. ही हुरहुर कशाची ? अनामिक रुप असते त्या हुरहुरीचे तरीही त्यांनी ती टिपली आहे.

लहान वयातच इंदिराबाईना निसर्गाचे वेड जडले ते वेड त्यांनी आजपर्यन्त जपलेले दिसते. या वेडातूनच त्यांनी स्वमनाची ओळख करून दिली.

" नका बाई घाई करू,
जीव माझा भांबावला
कुठे येऊ सांगा मला ? "

हे पाखरांना विचारले नाही. तर प्रीतीच्या निळ्या पक्षास. त्यांच्यातील प्रियतमा पक्षाचा सहारा घेते प्रीतीचा दुरावा होऊ नये म्हणून त्या व्याकुळही होतात. आपली अल्लड प्रीत आहे याची जाणही त्यांच्यातील या प्रियतमेस आहे. त्यामुळे प्रा. मालती किर्लोस्कर म्हणतात, " सहवासामधील त्यांच्या कविता या विवाहोत्तर काळातील जीवनाचे फुललेले नंदनवन स्पष्ट करणाऱ्या आहेत. " ११३

इंदिराबाईंच्या या काव्यमनास साथ देणारा तेवढाच कविमनाचा प्रियकर आहे. 'सहवासा' ने उमललेले ना. मा. संतांचे कविमन म्हणते.

" माझे प्रेम तुझ्यावरी नच तुझ्या प्रीतीवरी लोभले
प्रीतीच्याच कुशीत पोसून तुझ्या प्रेम गे जन्मले
ताऱ्यांच्या हृदयी जगी उजळावी ज्योती निशा श्यामल
तेवीं पेटविलीस ज्योंत हृदयी तू प्रीतीचे उज्वल. " ११४

प्रीतीसाठी आसुसलेला त्यांच्या अंतरीचा प्रियकर प्रीतीचे क्षण जपत रहातो. तरीही त्यांना अल्प सहवासाची कल्पना आली असावी का ?

" झाला हा सहवास अल्प आपुला ऐसाच की प्रेमले,
काटेरी फुलवन हे फुलविले ज्याने स्मृतीचे मळे. " ११५

प्रियकर अथवा प्रियतमा यांना स्वप्ने जपणे कमालीचे प्रिय असते. जळी, स्थळी, त्याचाच किंवा तिचाच भास होत रहातो. स्वप्नांचे जगत असते ते ना. मा. संतांच्या दुनियेतसुद्धा तशीच स्वप्ने आहेत.

" स्वप्नातून तुझ्याच सखये येताच ही जागृती
होतो जीव शिणूनिया विकल हा मायेमुळे अन्यथा
रात्री पाशुनी प्रीतीने सुखमयी आकंठ स्वप्नामृत
व्हावा चंद्र मलूल पांडुर नभी दुःखी प्रभाती जसा " ११६

पारंपारीक उपमाच या असल्या तरी आत्मा एका सच्चा प्रियकराचा आहे. हृदयात ठाव नसेल तर अंतःकरणाची समाधि मुक्ती देईल याची इच्छा आहे. काव्य प्रदेशातील ही दोघांची मुलूखगिरी होती तरीही त्यांचे प्रेम, त्यांचा सहवास

कसा होता ? हे पुढील कवितावरून स्पष्ट होते. इंदिराबाईचे पत्र संताना ' या 'असे गेले. ना. मा. च्या या कवितेतून इंदिराबाईनी काय लिहिले असेल ते स्पष्ट होते.

" मी येईन निघून तेथ जवळी आता गडे लौकर
कामाचा मग शीण काडिभरही होणार नाही बरं
नेणे होईल हो परंतु कधि न्यावे आता ना त्वरे
आहे लागुन जीव सर्व तिकडे येथे कुडी वावरे "

" पैशाच्या सवडीनुसार आपला संसार थाटीन मी
बेताचा गरिबीतला जरी असा, प्रेमास कोठे कमी ?
लक्ष्मीची आमुच्यावरी अवकृपा सध्या जरी ही दिसें
केव्हांही न उणे दिसेल म्हणूनी मी सर्वपूर्ण असे. " [११७]

अडचणीतून संसार थाटता थाटता मनाची होणारी कुचंबणा, लक्ष्मीची असणारी अवकृपा तरीही सुख देणारा तिचा चेहरा मनास व्याकुळ करणाराच आहे.

' सहवास ' ही इंदिराबाईची प्रथम पावले. काही नवेपणाच्या खुणा असतील तरीही पावलात धीटाई आहे. शब्दावर प्रभुत्व. विषयात तसे नाविन्य नसले तरी मांडणीत आहे. त्यामुळे ' सहवास ' ही एका होऊ घातलेल्या कवयित्रीची आकर्षक भेट आहे.

" हृदयातील संगीत, सहवासात फुलले, मनातले शरीरातले अंतर नाहीसे झाले. अमृतांच्या वर्षावात मने भिजली. तृप्तीची लकेर गळचात उमटली व त्यातून ' सहवासाची ' बाग उमलली, फुलली, सुगंध दरवळला.

**नितळ बांधणीची ' मेंदी '**

' मेंदी ' हा इंदिराबाईचा तिसरा काव्यसंग्रह. ' नुकतीच सकाळ झालेली. उन्हं वर वर यायला लागली अन् तिचं मन अधिकच मोहरू लागले. शरीराचा कण न् कण उमलून आला. अनामिक सुखसंवेदना मनात तरळत होत्या. एवढ्यात सखींच्या गोंगाटचात ती बुडून गेली. माथ्यावर शिदूर घातला गेला. डोईवर शालू, नाकात नथ, कुंतलातून ओघळणारी बिंदली, अन् गालावर. . . हातावर. . . चेहऱ्यावर. . . रंगलेली मेंदी. . .

आता जवळ कुणीच नव्हतं. फक्त दोघांचं विश्व. हार्दीच्या मनोऱ्यावर भेटणाऱ्या ' त्या ' दोघांसारखेच. हसण्यात–रूतण्यात सर्वत्र मेंदीच मेंदी भरली होती. नरवानरवांचे पाऊल मेंदी भरून साथ देत होते. पण...

झंझावात सुटले. तो वाऱ्यासारखा निघून गेला. झाडांनी – वृक्षांनी माना टाकल्या. गाभाऱ्यातली ज्योत फरफरली, तुळस खिन्न झाली. ती एकटी आणि एकटी. आता जवळ कुणी नव्हतं. ' तो ' नव्हता. ' त्या ' नव्हत्या. 'ते ' सारेजण नव्हते. होती तीन चिमुकली पांखरं पंखाखाली. घाबरून

बसलेली तिन पाहिलं .... नरवानराची मेंदी उडून गेलीय. ... ती घाबरली. विलक्षण घाबरली. पण जाणीव झाली अंतःकरणात ' मेंदी ' शिवाय दुसरं काहीच नाही. ' प्रीतीचा, वेदनेचा, सभोवतालच्या जगाचा, जीवनातील साऱ्या क्षणाचा रंगच होता मेंदीचा.' त्यांच्याविना जगणे म्हणजे निव्वळ वेड. कुडीतून आत्मा गेला. फक्त शरीर. ती गिरक्या मारत राहिली, फिरत राहिली. त्याच्याभोवती, त्याच्या स्मरणाभोवती त्यातूनच एक वर्तुळ रेखले. तेच वर्तुळ म्हणजे 'मेंदी' .....

"काव्यनिर्मिती, त्यातल्या त्यात भावकविता ही मनाला जाणवणाऱ्या विविध भावांच्या, जाणीवातून, शब्दरूप घेते. या जाणीवा किंवा अनुभूती अशा आपल्या स्वतःच्या जीवनातील अनुभवावरून मनाला स्पर्श करतात. त्याचप्रमाणे भोवतालच्या परिसरातून, जीवनातून, वाचनातून, निरीक्षणातूनही मनाला जाऊन भिडतात आणि त्याही शब्दरूप होतात. तेव्हा आपल्या भोवतालचे जे छोटेसे विश्व असते त्याचा आणि काव्यनिर्मितीचा संबंध असतो. " ११८

इंदिराबाईच्या वरील विवेचनावरून काव्य व जीवन यांचा संबंध स्पष्ट होतो. ' मेंदी ' हा इंदिराचे भावजीवन अधिक स्पष्ट करणारा त्यांचा कवितासंग्रह. प्रीति आणि व्यथा एकाच शरीरातून प्रवास इथे करत आहे. मनात जे उकळत होते तेच इथे शब्दबद्ध झाले आहे. त्या उकळण्यापासूनच आनंद मिळत होता.

कळीतील सुप्तसुगंधाप्रमाणे अनुभव घटकात आलेल्या क्षणांना, घटकांना इथे शब्दबद्ध केले आहे. इंदिराबाई मेंदीच्या संदर्भात म्हणतात, " शेल्यापेक्षा मेंदीतील कविता अधिक चांगल्या वाटतात. नितळ भावजाणीवेची नितळ बांधणी हे स्वरूप आता माझ्या कवितेत फारच कमी प्रमाणात दिसते. प्रीतिचे केवळ प्राथमिक भाव आणि त्यांना विरहाची जाणीव यापेक्षाही अधिक संमिश्र स्वरूपाचे प्रक्षोभक भाव आणि त्यांना तितक्याच उत्कटतेने उभ्या करणाऱ्या प्रतिमा यांची मला साधारणपणे इथे सांगड घालता आली आहे. सर्व कविता एक भावप्रतिमा व्हावी, जिव्हारी लागावी अशीही कविता मी आता लिहू शकते."

प्रीतीचे प्राथमिक भाव, विरहाची जाणीव, वैयक्तीक जीवनांचे पडसाद यापेक्षा वेगळे विश्व या संग्रहात इंदिराचे नाही असे वाटते.

निसर्गाच्या प्रतिमा वापरण्यात मेंदीत इंदिराबाई अधिक यशस्वी झाल्या आहेत.

" टाकून अवघा तोल तुझ्यावर
ढगाढगातून चालायचे
कुंपण तारांवरून विजेच्या
खुशाल पाऊल टाकायचे "

यासारखी हृद्य वाटणारी निसर्गाची प्रतिमा – किंवा

" भरदुपार साठवते
ओळीने दृष्य असे,
साठविता आठवते,
मनि काही नसलेले " ११९

या प्रतिमांतून कवयित्रीचे भावजीवन उलगडत रहाते. वाचकांच्या मनावर एक नीतळ, कोरीव अनुभव कोरीत जातात.

' पादाकुलक,' ' ओवी ' या दोन वृत्तांचा वापर या संग्रहात कवयित्रीने केला आहे. प्रक्षोभक जाणीवा, निसर्ग प्रतिमा, आभासशिल्प इ. या संग्रहात दिसून येतात. प्रीती-निसर्ग यापेक्षा काही वेगळ्या भाववृत्तीही इथे जाणवत रहातात. ' स्तंभ, ' ' हस्त, ' ' दावण ' या कवितांचा उल्लेख या संदर्भात करायला हवा.

' मानसिक शारीरिक ' प्रीतीच्या संवेदना, व्यथेची जाणीव, कातर दुःख, वियोगाची मनास लागणारी बोच, याबरोबर ' वर्तमानकाळात उभे राहून भूतकाळाचे स्मरण, चिंतन या संग्रहात विपुल प्रमाणात आहे ' असे म्हणता येईल.

कधी एकेकाळी इंदिराबाई मेंदी भरून आल्या होत्या. त्यावेळी त्यांचे भावजीवन निखळ मेंदीचे होते. मेंदी भरल्या नरवानरवाचे हळवे पाऊल त्यांच्यातील स्त्रीमन जपत होते. या स्त्रीमनाची जाणीव त्यावेळी निसर्गासही लागली होती.

हट्टी गवत कवयित्रीचे बोट धरून चालत होते. लाल पऱ्या तिच्याशी हितगुज करण्यासाठी उमलल्या होत्या. सारे जगच मेंदीमय. एका मनाची भोवळ भोवरा जाणीवेचे रुपच आहे हे.

" दिमाखात पण तसेच पाऊल
निघून गेले, होऊन ओले,
बाळतणाला निळ्या आभाळी
मेंदीवाचून काही न दिसले " १२०

स्वतःच्या अनुभूतीशी कवयित्रीचा प्रामाणिकपणा सतत मेंदीत जाणवत रहातो.

' मेंदी ' भरलेल्या या पावलांना लवकरच खडकाची वाट चालावी लागली. प्रियकराच्या दुःखातून ओघळणारी वेदना ओठांनी टिपावी लागली. इथे इंदिराबाईची अवस्था एखाद्या वेडीसारखीच झाल्याचे आपणास जाणवते. जखमेतून रक्त वहात होते पण अंतःकरणाला डाग मात्र मुळीच दिसत नव्हता.

" मी सुटले, मी सुटले
मी हसले, मी खुलले
जीवांचे गगनागण
चांदण्यात नितळ निळे " १२१

अतिव दुःखाची ही भावछटा सहजगत्या काव्यात उमटत गेली आहे. अंधाराच्या जीवनाची झटापट अंधाराशी चालली आहे. डोळे थकून गेले आहेत. मनाच्या भेसूर आकृती अंधारातून दिसतात. मनांस भिववतात. सारी मानवाकृती. भुतेच ती. त्या आकृती, ती चित्रे अर्थाविण सारा भास वाटत असला तरी थकल्या डोक्यातून तुझे रूप साकारते का ? ही वेडी भावजाणीव इथे आहे.

'वाघूळाची' प्रतिमा ज्यावेळी इंदिराबाई वापरतात त्यावेळी व्यथेची तीव्रता अधिक स्पष्ट होते. मनाचे हे वाघुळ विदीर्ण या विशेषणातून त्या व्यक्त करतात.

" शुन्यातून ये धावुन वाघुळ
तीक्ष्ण नखे अन् पंख कापरे
बघते रोखून विद्रुप डोळे,
भिजता भिजता रक्त थरारे " १२२

माथ्यात ओघळणारा व्यथेचा प्रवाह त्यामुळे एखाद्या पिवळा मोहरही या वाघुळास नको वाटतो. माणसे पशु-पक्षी सरळ चालतात. तसे चालणे वाघुळास का पसंत नसावे ? त्या उलटचा टांगून घेण्यात एक भाबडेपण आहे. तसेच पूर्वस्मृतींचे वलय आभाळाच्या रूपाने नेहमी डोळचासमोर दिसते आहे. वाघुळ ही प्रतिमा गहिऱ्या व्यथेची भावनिदर्शक आहे असे वाटते.

उरात व्यथा कितीही असली तरी व्यवहार तरी सोडता येत नाही. चिमण्यांसाठी तरी हा व्यवहार जपावाच लागतो. त्या व्यवहारात त्या गुरफटून जात नाहीत पण व्यवहारातील बथ्थडपणा मात्र त्यांना सलत रहातो. दुधामिठाचे हिशेब बथ्थड । निळचा कागदावरी लिहावे । निळा रंग हा मीलनाचे प्रतिक मानला जातो. प्रियकराच्या अकस्मित निघून जाण्याने ते निळे कागद तसेच उरले आहेत. आज या कागदावर प्रीतीचे उन्मुख गीत लिहिण्याऐवजी हिशेब लिहिणे आले आहे. उमलत्या कळीला मिटता आले असते तर किती बरे झाले असते. स्वतःची ओळख स्वतःस न पटावी एवढी ही कळी खुळी बावरी झाली आहे.

वेडात डुंबत राहून, वेडात बुडून जीवनाची असंख्य कोडी तिच्यापरीने ती उलगडायचा यत्न करते आहे.

" शिकविलेस तू सारे जरीही,
शिकवलेस तू काही न मजला
पंख पसरले जरी एकदा
येती न पुन्हा आवरायला " १२३

उमलत्या कळीचे न मिटलेपण पसरल्या पंखाचे न आवरणें या दुःखी छटा आहेत तरीही-

" प्रौढत्वी निज शैशवास जपणे
बाणा कविचा असे "

केशवसुतांच्या या उक्तीपासून कवयित्री अलग कशी असेल. खेड्यातील ग्रामकथा अजूनही त्यांच्यात रेंगाळते. त्यांना उठून बसवते. म्हणते, ' चल निवडुंगाची फुले तुझी वाट पहात आहेत. पदर खोचून करवंदे काढू या. त्यांचा खारट, आंबट स्वाद सेवू या. ' बालपण निघून गेलेले हे खारट-आंबट स्वादाचेच असते. या बालमनास त्यावेळी कुणाची जाणीव नसते. मनात कुणाचे स्वप्न नसते. डोंगर चढणीवरचा एकटा चढ असावा, तसेच हे एकटेपण. भात्यातून निघून जाणाऱ्या बाणासारखेच ते असते. परत नाही मीलन.

" पुन्हा कधि न का मिळायचे ते . . . .
ते माझेपण . . . . आपले आपण,
झुरते तनमन त्याच्यासाठी,
उरते पदरी तीच आठवण
निवडुंगाच्या लाल झुल्याची,
टपोर हिरव्या करवंदाची " १२४

प्रीती एक व्रत आहे.ओठ मिटून मूकपणे जपण्याचे हे कठोर व्रत असेच चालणार का?

" निखळे कधी अश्रू एक,
ज्यात तुझे प्रतिबिंब दिसे,
निखळे निःश्वास एक,
ज्यात तुझी याद असे "

प्रियकराचे अस्तित्व भिन्न असूच शकत नाही. श्वासात, नयनात, हुंकारात, तृप्तीत सर्वत्र तोच दिसावा असे हे व्रत आहे. हे वेड जपणारी महादेवी वर्मा, मीरा इथे इंदिराबाईच्या रुपाने जाणवत रहाते.

निरोप आणि स्वागत या जाणीवा त्या एकत्र गुंफतात. आकाशातून कोसळणारा तारा जसा निरोप घेतो तसेच त्याचे मूळ स्वागत कुठेतरी झालेले असते.

' उशी ' ही इंदिराबाईची अशीच स्वप्नील कविता आहे. ' उशी ' च्या भोवती असंख्य स्वप्ने आहेत. स्पर्श आहे. स्पर्शाची जादू मनातून अजून झिरपते व ती शब्दाकार बनते. वास्तविक हे नवकाव्याचे दर्शनच आहे. ' उशी ' ही भाव-जाणीवांची वस्तू असेल पण मराठी कवितेत तिचे येणे हे नवीनच मानावे लागेल.

दोन स्थितीतील भेद म्हणजे जीवनांची कुंपणे. मग हा भेद गरीब-श्रीमंत या दोहोंमधील असेल. या दोन भेदावरूनच कवयित्रीच्या जीवनाची मोटार चालत रहाते. वाटचाल करणारी ही मनाची मोटर उतरणीस नाही चढणीस माथ्यावर ओझे घेऊन, दमलेला, थकलेला एखादा प्रवासी चढतीवर चढत रहावा तसेच हे

इंदिराबाईचे जीवन.

रूक्ष जीवन भासत असल्यामुळे भोवतालची कवायत, गुरे, म्हैशी, सारेच त्यांना रूक्ष वाटू लागते. या रूक्ष वाटचालीतून मग जीवन म्हणजे एक तुरूंग त्यांना भासू लागतो. खरे तर मानवी जीवन म्हणजे काराच आहे.

मानव हा नियतीच्या हातातील खेळणे आहे. त्या मालकाच्या आज्ञेशिवाय आपले जाणे-येणे होतच नाही. अशा भकास जीवनात मिळणारी हिरवळ जर मध्येच खुरटली तर ते जीवन अधिकच नको वाटते. मरण येईपर्यंत जगणे एवढाच त्याचा अर्थ रहातो. प्रियकराच्या मृत्यूमुळे शरीराचा हा पिंजरा रिकामाच आहे. विरहाची तीव्र जाणीव इथे आहे.

" तुझ्याविना हा तुझा पिंजरा,
तुझ्याविना हा तुझा पहारा,
मुक्त मला कर इथुन एकदा
प्रीतिस्तव का....का....ही कारा....."

सुरंगीसारखी रेलणारी प्रियतमा ज्योतीसारखी जळणारी भाववेडी अभिसारिका, पायातील घुंगूर निखळून पडल्यामुळे, जीवनाचा तोल सुटलेली भावनर्तिका, मीलनाची ओढ जपणारी मिलनोत्सुक रागिणी, डोळ्यातील उत्तर शोधण्यासाठी धडपडणारी प्रणयिनी, पहिल्या सरीचा आवेग जपणारी नाजूक वेल, भावोत्कट वाट, नक्षत्रांची स्वर्गगंगा, पदरामध्ये काजवे जपणारी उषा, हेमंताच्या शेल्याने अंग टिपणारी, केवडा माळणारी स्नाता, तर –

सशासारखी घाबरणारी, केविलवाणे अश्रू जपणारी मंत्रमुग्ध वेडी, सावली हरवलेली छाया, उचमळणारी घागर, सावरणारी पोरं, वेडी कुब्जा,हरवलेली राणी, मीरा, राधा गवळण ही सारी मेंदीतील इंदिराबाईची रूपे आहेत.

इंदिराबाई वर्तमानकाळात उभ्या आहेत. पण त्यांचे सारे विश्व मात्र भूतकाळात आहे. भूतकाळात उभे राहिल्यामुळे त्या स्वतः कोण ? या पण विसरून गेल्या आहेत. स्वतःचे अस्तित्व विसरणारी कवयित्री मनावर कोरीव अनुभव ठसवून जाते.

" तू गेल्यावर नसते मी ही
नसते माझे . . . . माझे कांही,
उरलेली ही अशी कोण मी
माहित मजला नाही . . . नाही. " [१५]

मनातील खोल हुंदका जपणारी निःश्वासाचे पंख फडफडवणारी निसर्गातून स्मरण, स्मरणातून दुःख, जपणारी ही इंदिराबाईची मेंदी आहे. जीवनातील खरा मेंदीचा रंग कधीच निघून गेलाय. पुसट पुसट जाणीवा मात्र उराशी आहेत.

## मृगजळ ते रंगबावरी

'शेला, मेंदीपासून मृगजळापर्यंतच्या इंदिराबाईंच्या काव्याची वाटचाल मनात अनेक प्रश्न उपस्थित करणारी ठरते. इंदिराबाई यांच्या कवितेची ती एक वाटचाल होती. त्यांची कविता एका अर्थाने प्रयोजनशून्य होती. अथवा आत्मनिवेदन हे त्या कवितेचे कसेबसे प्रयोजन मानता आले असते. ज्या काळात त्या कविता लिहिल्या जात होत्या. त्या काळच्या जवळजवळ सर्वच मराठी कवितेहून इंदिराबाईची कविता स्पष्टपणे वेगळी जाणवत होती. हे वेगळेपण सूचीत होते; आपल्या मनाला साकार सशब्द करताना जवळजवळ अपरिहार्यपणे ती निसर्ग प्रीतीचे साह्य घेत असे. बहुधा ती कविता अगदी मोजक्या, सोप्या, धावत्या गतीच्या दोन-तीन छंदाचा आश्रय घेणारी होती. तिच्या अविष्कारात असलेला नेमकेपणा व साधेपणा वाचकांच्या नजरेतून सुटण्यासारखा नव्हता. ज्या प्रतिमांच्या एकतानतेतून मन अविष्कृत व्हायचे त्या प्रतिमांचे नाते बालकवीशी जुळल्याचे स्पष्ट दिसत होते. पुष्कळवेळा तर असे वाटे की, ठिपक्यांची संख्या तिच राहून रांगोळी मात्र बदलते आहे. राग तोच ठेवून वेगवेगळ्या मैफलीत गायक वेगळाच प्रत्यय आणून देतो तशी.

मराठी कवितेत अलिकडच्या वीस-पंचवीस वर्षात तरी शुद्ध भाववृत्तीची निर्मिती इतक्या कौशल्याने, सहजपणे आणि सुंदरपणे दुसऱ्या कोणीही केलेले नाही, केलेली नव्हती. या साऱ्यांचे प्रबळ अस्तित्व असूनही इंदिराबाईची कविता साकल्याने विचार करणाऱ्यास थोडी खट्टूच करणारी ठरली. एका टीकाकाराने तर ती कविता म्हणजे, 'आपल्या प्रिय पतींशी चाललेला अखंड एकतर्फी संवाद' असल्याचे नोंदले आहे. या टीकाकाराने या कविताचे यश मान्य केले आहे. कोणत्याही प्रामाणिक रसिकाला ते करावेच लागेल. खट्टू होण्याचे कारण एकच श्वास, एकच छंद, एकच भास असा एकच एक प्रत्यय. 'विषयवैचित्र्य' अशा संज्ञेने एकेकाळी टीकामूल्यांचे स्थान पटकावले होते. त्या परंपरेचे सातत्य ठामपणे नाकारुन 'एकच एक' विषय पुन्हा पुन्हा मांडणारी कवयित्री म्हणजे इंदिराबाई. या घटनेचा परिणाम अपरिहार्य तोच होत गेला. तेच ते शिल्प पुन्हा पुन्हा खोदणारे कलाकार विस्मृतीत गेले. त्या त्या सुट्ट्या कलाकृती, शिल्पाकृती पाहणाऱ्याला आनंद देतात. केव्हा तरी तो बेभान प्रेक्षक विचारतो, 'हे कुणी केले ?' प्रश्नाचे उत्तर शोधण्याची खटपट तो करीत नाही. लेण्यातील प्रतिकृतींचा संच पाहताना केव्हातरी रसिकाला खट्टू व्हावेच लागते. तो मनाशी विचारतो, 'हे सारं तेच पुन्हा पुन्हा का ?' या प्रतिभावंताला अन्य काही शिल्पीत करता येत नाही का ?' इंदिराबाईची ( कोणतीही कविता ) कोणत्याही सुट्या कलाकृतीचे सौंदर्य वाचून मोहून जाणारा रसिक त्या कवितेला स्थान देत होता. परंतु इंदिराबाईना

थान देत नव्हता. ते देणे शक्य नव्हते. कारण मर्यादित अर्थाने पाहता ते महत्वाचे उरले नव्हते.

" जनाबाईची अभंग रचना सुंदर खरी. पण कोणताही एक अभंग, फक्त त्यातील प्रीती त्यातला भोळाभाव, हे अमर झाले. जनाबाईला स्थान गौणच. " मृगजळ संग्रहापर्यन्तची वाट निरखीता या कवयित्रीच्या काव्यावर अन्याय झाला असेच वाटते. ' इंदिराबाईच्या काव्यात एकतर्फी संवाद असतो ' या टीकेस अलोचनातील वरील विवेचनाने पुष्ठीच चढते.

इंदिराबाईचा सहवास ते मृगजळापर्यंतचा प्रवास पहात असताना त्यांचा एकतर्फी सूर ऐकला त्यांची इतर काव्यातील मुलूखगिरी लक्षात घेतली नाही.

**' मृगजळ ' च्या संदर्भात**

१. मृगजळामध्ये प्रतिमासृष्टी बदलली नाही.

२. आशयही फारसा बदलला नाही.

३. या संग्रहात इंदिरा 'सुबोध' उरली नाही. या संग्रहाचा काळ १९५७. तेव्हा दुर्बोधता हे मुळी मूल्यच आहे, असा गैरसमज विकोपास पोहोचला होता. ' कालाय तस्मै नमः ' म्हणतच इंदिराबाईची प्रतिमा या नव्याकडे ओढली गेली काय ? अशी शंका मनास येऊ लागते.

४. प्रतिमांचा सरधोपट खेळ बंद झाला होता. त्या संकीर्ण होऊ लागल्या होत्या. एकमेकांत गुरफटून राहिलेल्या रंगीत धाग्याप्रमाणे प्रतिमा जटील बनल्याचे प्रथम दिसते.

५. ' मृगजळ ' च्या प्रतिमा फार फार अंतर्मुख बनून केवळ व्यक्तीवादी झाल्या होत्या. ' काजळ ' तेच पण त्या काजळाने नेमके काय कार्य करावे याचा अंदाज लागेनासा झाला होता. ' निवडुंगाच्या फुलांना ' फक्त स्वतःलाच जाणवणारी काही भावछटा उरली. मृगजळ अशातऱ्हेने दुर्बोधतेच्या, अति वैयक्तीकतेच्या नव्या रस्त्याने गेले. १२६

इंदिराबाईच्या वरील आक्षेपांचा विचार करताना इंदिराबाईना इतर विषय स्पर्शीले पण या विषयात त्यांची कुठेतरी वेदना प्रियकराचे स्मरण करताना डोकावले आहे असे आपणास दिसते.

याचा अर्थ त्यांनी इतर विषय स्पर्शीले नाहीत असा नव्हे.

**नव्या वळणाची रंगबावरी**

इदिराबाईच्या रंगबावरीचे वाचन करताना पूर्वग्रहाने होता उपयोगी नाही. कारण येथे इंदिराबाईच्या प्रतिभेने नवीन वळण घेतले आहे. अधून मधून येणाऱ्या काही कविता सोडल्या तर अखेरपर्यन्त हे नवेपण पुरेपुरे लक्षात येते. मन भारून टाकते. एकाच गुलाबाच्या झाडावर ' बावरून ' टाकतील इतक्या रंगाचे गुलाब

फुलल्याचे स्पष्टपणे आढळते. अन्यत्र प्रकाशाची प्रतिमा अनेकदा वापरली आहे. रंगबावरीत प्रथमच प्रतिभेने गगनाकार पूर्णावस्थेला आरंभ केल्याचे पटते.

' मृगजळ ' पर्यन्त लक्षातही आल्या नव्हत्या. अशा गडद पण वैचित्र्यपूर्ण भाववृत्ती हे या रंगबावरीचे महत्त्वाचे वैशिष्टय ठरेल. केवळ शब्दाने चित्र उभे करणारी ही प्रतिभा इथे कार्यप्रवण झाली आहे. ' रंगबावरी, ' ' हिमशिखरे उंच उभी, ' ' अरे वेडचा सोनचाफ्या, ' श्रावणा आणि स्थिरचित्रे या कविता केवळ शब्दचित्रे आहेत. या कवितांचे सौंदर्य अर्थातच त्यातील भिन्नतेत आहे. 'रंगबावरी' ची शब्दकळा भारावलेली, जड उतरली आहे. तसे पाहिले तर, शब्दचित्र साधे सरळ आहे. पाला खाणारी बकरी, तिची धनीन, धनिनीचे भडक कपडे, खास चर्चा आणि लाल, पिवळा, काळा, रूपेरी, हिरजळी रंग यांच्या शिडकाव्याने रंगबावरी नटली आहे. जेथे स्वतःचे काही सांगायचे नाही अशा कविता इंदिराबाईनी क्वचितच निर्मिल्या आहेत. या संग्रहात अशा कविता आढळतात. दुसऱ्या एक ठिकाणी सोनचाफा, पारिजात, यांच्या संदर्भात सोनगौर, चाफेकळी, बालीचे चित्र फक्त आढळते. पण ' रंगबावरीत ' जड बनलेली शब्दकळा चाफेकळीत मोकळी झाल्यासारखे वाटते. कारण या चित्र दर्शनात केवळ साक्षात सौंदर्य दर्शनाऐवजी मनात होत गेलेली तुलना आहे. सौंदर्याने मन आणि प्रतिमा जड व्हावी, भाऊक व्हावी, तशी काल्पनिक तुलनेच्या वेळी होण्याची शक्यताच नाही. या दृष्टीने ' श्रावणा ' या कवितेची वृत्ती तर अधिकच विचार तरलतेने भरली आहे कारण कवयित्री स्वतःच–

" श्रावणा, कुणाचे, मनस्वी हे क्षण
निसर्गचित्रात, पावले स्पंदन "

असे आत्मविस्मृतीचे दर्शन जणू घडविते आहे. सारखा कवितेचा एक असाच नमुना स्थिर चित्रामध्ये आढळतो. ओसाड, रूक्ष, भग्न वास्तवाजवळ–

" एक पोपटी वेल
वळसेदार रांगणारी
रांगत रांगत पाषाणावर
हिरवी बोटे टेकणारी "

आहे. हे चैतन्य विरोधाने जाणवून देऊन होताच कविता संपते. काळचापांढऱ्या संपूर्ण विरोधाच्या रेषांनी परिणाम साधत कविता संपते. संपूर्ण कविता अशा केवळ चित्रमयी निर्माण करूनही त्यातले साहित्यिक लालित्य टिकवून धरणारी ही प्रतिमा ' मृगजळ ' पर्यन्त सहसा आढळत नाही. आता ती नजरेत भरण्याइतकी आढळते. हा ' रंगबावरी ' चा अगदी सहज ध्यानी येणारा विशेष व रूचिर रूपपालट.

इंदिराबाईच्या या संग्रहात आणखी एक महत्त्वाची जाणीव होते. कवयित्रीला स्वत:लासुद्धा आपल्यात झालेला बदल ध्यानात आला आहे. हे वाचकांच्या लक्षात येते. ' मृगजळ ' पर्यन्तच्या इंदिराबाईच्या दृष्टीला एक दृश्य दिसत होते. श्रुतीला एकच हांक ऐकू येत होती. या संग्रहाला खरोखर ' रंगबावरी ' हे नाव सार्थ ठरेल इतके रंगवैविध्य आहे. ' मीही लाडकी बहीण ' ही पहिलीच कविता हा बदल ध्यानात आणून देते. विषय पाहिला तर तो सांकेतिकच आहे. निसर्गाचे उदार दान आणि ते घेता घेता गोंधळून जाणारी मी. पण इंदिरांच्या कवितेत असा मुक्त आनंद पूर्वी क्वचित सापडला असेल.

" लाख लाख मोरपिसे
थरथरली कोषांतून,
गुंजेची धुंद माळ
उलगडली रक्तातून,
विस्मरते त्रिभुवन मी
स्मरते पण हे लाघव,
आदी ना अंत असे
गोकुळचे क्षणवैभव "

अशा क्षणभर तू कृष्ण होऊन माझ्या चित्तवृत्ती भारून टाकतोस. हे सांगणारे धुंद ' लाघव ' मध्ये आढळते. सुख, समाधान, तृप्ती टिपणाऱ्या इंदिरा पूर्वीही होत्या. परंतु त्या साऱ्यांना केवळ स्मृतीत स्थान होते. त्यावेळी वास्तवातल्या दु:खाची एकाकीपणाची तीव्र जाणीव प्रभावी होत जायची.

" उठली लगबग उन्हें मनातील
उभी टिपाया . . . . जंतर--मंतर
मेघ सरकुनी गेल्यावरची
पापणीतली हसरी धांदल "

ही धांदल नवी आहे. नव्या आशेने, नव्या जीवनाकडे भूतकाळ विसरून पहाण्याची ईर्षा नव्याने निर्माण झाली आहे.

" माध्यान्हीच्या मनी येते
चाहून कांही व्हावे
व्हावा उन्हाचा केवडा
केवडयाचे अंग व्हावे.

नव्या जीवनाचा प्राजक्त कधी फुलेल ? गंगा कधी उसळेल ' त्याची वाट पहाणारी स्थितीही अशी आकर्षक निवेदिलेली ' किती उबावे, उबावे ' मध्ये आढळते. केव्हा केव्हा तर, इंदिराबाई व्यथा टिपणारी कवयित्री आहे असे वाटणार

नाही इतकी निर्भर धुदी काव्यात भरली आहे. ' स्वप्नशहारे ' ही कविता त्यादृष्टीने पाहण्यासारखी आहे. वास्तवाच्या पलीकडे पुण्याची धरणी असेल. वारूवरून दौडताना लक्ष चांदण्या हाती येतील, इंद्रधनुचे पराग भागावर रेखता येतील, मग माणिक पलिकडे पांचूंचे तळनक्षत्र असेल, तिथे एक राजपुत्र असेल.... इत्यादी स्वप्ने रंगताहेत हे सारे पलिकडे असेल. या स्वप्नांचे चित्र रंगते जणू स्त्रीत्वाच्या पहिल्या जाणीवेतूनच रंगत गेलेले हे एक स्वप्न असावे व म्हणून –

" डोळ्यामधले मोर नाचले,
फुलवून थै थै स्वप्नशहारे "

असे इंदिराबाई म्हणतात. (थै थै या शब्दावर 'गार' गालीचे सारिखे अतिशयोक्ती-पूर्ण लिहिणे शक्य आहे.) धुंदीत रंगलेली, स्वप्नात जगलेली राजकन्या ही 'मृगजळ' करतीची भावस्थिती नव्हे. अशा अनेक छोटया मोठया कविता आहेत. चंद्राचा कोमल किरण, फुलतुळशीचा वाहता गंध, धुक्याची दुलई यांच्यातून –

" अशी जेव्हा येते जाग
माझा भाग्यकाल येतो,
माझा अवघा दिवस
जाई जुईतून गातो "

असे मोकळेपणाने म्हणणारी इंदिराबाई हे एक नवे दर्शन आहे. हे नवे दर्शन खूप खूप वेगळ्या प्रतिमांनी होते. प्रतिभेचे वैचित्र्य जणू पणास लावल्यासारखे वाटावे असे येथे जाणवते. यःकश्चित पत्राला ' पत्रलिही, पण या कवितेत केवढे हळूवारपण या प्रतिभेने दिले आहे. शाईत काजळ, वेलांटीत भुवई, पूर्णविरामात तीळ, कागदातला स्पर्श, वहीतील वीज, असल्या शब्दांची माळ ओढते. त्यात विशेष नाही. परंतु शेवटी –

" पाठविसी ते सगळे
पहिल्या ओळीमध्येच मिळते,
पत्रच पुढचे त्यानंतर पण
वाचायाचे राहुनि जाते "

या छद्मी ओळी येतात. सांकेतिक आशयाला दिलेले हे अभिनव रूप मोठे रुचीर वाटते. नवेपणाच्या आणखी कितीतरी खुणा या संग्रहात जाणवतातही. ' माझे ' या नावाची छोटीशी कविता आहे. मराठी कवितेत ही भाववृती यापूर्वी क्वचितच प्रगट झाली असेल. स्वप्न हा एक सार्वत्रिक अनुभव आहे. स्वप्नातून मनुष्य सत्यात येतो. जागा होता. स्वप्न पाहिल्याचे आठवते. परंतु स्वप्न काय होते ते आठवत नाही. त्याची हुरहुर पुष्कळ वेळा आपला छळवाद आरंभिते. दिवस संपतो, पुन्हा रात्र येते वाटते की, आता निद्रा आणि मग ते स्वप्न पुन्हा येईल. पण तसे

होत नाही. उलट उत्कंठेमुळे झोपही नाहीशी होते. ही अनुभूती प्रत्येकाला येते. या अनुभूतीला आलेले काव्यरुप वाचकाला हर्षित करणारे आहे. स्वप्न म्हणजे सोनवर्खी मासे जागृतीच्या तीराशी रेंगाळणारे. अस्वस्थ करून टाकणारे ते मासे –

" आठवेना काही काही
स्वप्न मिटले रात्रीत
पहिल्याची खूण मात्र
घरादाराच्या व्यापात "

प्रत्यक्षाच्या प्रत्येक क्षणावर त्या स्मृतींचे चांदणे झुकते. पावलापावलाशी चंद्रफूल उमलते. रात्र येते आणि डोळे पडल्या पडल्या छताशी भिडतात, व

" काळचा जळातील मासा
कसा लागेना हाताशी "

म्हणून हळहळतात. प्रतिमासृष्टीचे नाविन्य सौंदर्य व सहज सुबोधत्व साकार झालेली ' मासे ' ही कविता या संग्रहात एक अत्युत्कृष्ट अनुभव देऊन जाते. तुलना करायची झाल्यास पु. शि. रेंग्याची ' राधा. '

प्रतिमासृष्टीचे हे नवेपण एकसाची नाही. त्यातही रंगबावरेपणा आहे. युवतीने सौंदर्यासाठी कानात दागिना घालावा, या दागिन्यांची दुःखी छटा–

" घातली ना कानामध्ये
तुझी काळी प्रश्नचिन्हे ? "

अशा प्रतिमेने व्यक्त होते. तर एक भयानक रात्र अशी येते की सांगताना ' काळी हत्तीण ' मोकाट सुटल्याचे ती सांगते. जीवनातली उध्वस्ती प्रकट फक्त मत्सरालाच तृप्त करील म्हणून–

" उध्वसांत उभी तृप्त
काळचा मत्सराची गोण "

अशी कवयित्री सांगते. आपण व आपले प्रतिबंध यातले वैर सांगताना–

" सोलिव ही कांत इथे
नागीन अदृश्य दूर "

अशा उग्रसुंदरांचा ती आधार घेते. केव्हा केव्हा दृश्यावर श्रुतीची झूल टाकणारी किमया आढळते. उदा. ' लास्य रंगता कैलासावर ' ह्या कवितेची निर्मिती लक्षवेधक ठरेल. घाटावरची वळणे मोठी मोहक असतात. सापासारखी वळवळणारी म्हटली तर विशेष काय ? विशेष आहे इथे की जिथे–

" घाटावरची वळणे वळणे
तानच शिल्पित सारंगीची "

असे इंदिराबाई लिहितात.

त्या सगळ्याच कवितेत असे ओतप्रोत प्रतिमाविश्व आढळते. कुळागारात ' स्वरगुच्छांची सतारशिपत ' पदन्यासात ' रतन अबोली ' आढळते व गोमंतकातला मंगेशाचा स्वरसंगम ठरतो. ( एरव्ही त्या कवितेत सारे सामान्यच आहे. ) कवयित्रीवर मृगजळापर्यन्त इंद्रिय संवेदनांचा संस्कार प्रबळ होतो. भावाविष्काराचे ते जवळजवळ एकमेव माध्यम होते. ' रंगबावरी ' मध्ये त्या माध्यमाच्या आहारी गेलेल्या नाहीत. ' मृगजळ ' पर्यन्त माध्यम त्यांच्यावर सत्ता गाजवित होते. केव्हा केव्हा माध्यमाचा वाव येईल तिकडे जाणाऱ्या इंदिराबाई 'मृगजळा'त व तेथपर्यंत आढळते. ' रंगबावरी 'त सुजाणपणा, प्रतिमा नियंत्रण लक्षात रहावे. काजळाच्या कुपीतले हवाबंद दुःख (फुलवेली) उंच कुतुबमिनारचा कन्टमापक (स्थिरचित्र) स्वप्नांच्या तडकलेल्या खळखळणाऱ्या काचा (स्वप्ना) नीरस जीवनाची गतिमान यंत्र टांकसाळ ( कित्येक दिवसात ) सहनशक्तीचा इथर ( ऑपरेशन ) इत्यादी आपातत, रूक्ष, नीरस रूपकाश्रयी प्रतिमा वापरताना इंदिराबाईच्या कवितेने केलेली वाटचाल लक्षात येते. शब्दप्रतिमा पुरतीच ही वाटचाल मर्यादित नाही. ' ऑपरेशन ' ' स्थिरचित्रे ' ' घर ' ' कित्येक दिवसात ' आणि ' उलटलेली रात्र ' या कविता पंचकाचा संपूर्ण नवेपणा कुणाच्याही ध्यानात येईल. स्वप्नभंगामुळे भावाकूल होऊन हळुवारपणे हळाळणारे मन येथे आठवत नाही. ' ऑपरेशन ' हाही 'मासे'प्रमाणे एक नवा अनुभव आहे. वस्तुतः एखाद्या कलावंताच्या शैलीबद्दल वा शब्दकलेबद्दल आपण करीत असतो. ती ठोकळ विधाने खुळचासारखीच असतात. शब्दकळा अनुभवाशी एकात्म व्हायची असली, तर अनुभूतीच्या शक्तीनुसार ती बदललीच पाहिजेत. इंदिराबाईना ही वस्तुस्थिती पुरती उमगली आहे, हे या काव्यपंचकावरून स्पष्ट होते.

" असह्याय्य मान
विरूद्ध बाजूला कलंडलेली
नाकातोंडातील नळ्यातून
मेंदूपर्यन्त पोचवलेला
सर्वांगातून खेळवलेला
बधीर करणारा इथर
सहनशक्तीचा "

वाचता वाचताच या रचनेची अपरिहार्यता जडता, रूक्षपणा – सारे सारे मनात भरते. अगदी अशीच प्रतिक्रिया –

" बाळाजवळ त्याची आई
कांबळ्यांच्या कडेला बसलेली, थकलेली
केस विस्कटलेले, झोप विस्कटलेली,

नेसूचे जुनेर विटलेले – विरलेले
ओढलेला चेहरा, दाखवणारा ओढग्रस्त
कळपटलेली कांकणे,
निबरट हात "

सगळीच काळजी सगळेच कावाडकष्ट. अगतिक, श्रांत निष्प्राण जीवनाचे हे चित्र सांकेतीक सुंदर नव्हे. पूर्वीच्या इंदिराबाईना या चित्रांनी असे खेळवून भारून टाकले नव्हते. इंदिराबाईच्या दर्शनी हा आणखी एक नवा रंग इथे भाव व वृत्ती परस्पर लीन झाल्या आहेत. इंद्रियसंवेदनाच्या माध्यमाचा उपयोग न करता दुःख समर्थपणे व्यक्त करू शकणारी ती नवी प्रतिमा म्हणता येईल.

मुक्तछंदात्मक रचना पूर्वीही इंदिराबाईनी केली आहे. परंतु येथे या नव्या जडरूक्ष जीवन दर्शनासाठी झालेला उपयोग त्या छंदालाच नवा रंग निर्माण करून जातो.

'रंगबावरी' मधल्या आणखी काही कविता आणखी काही वेगळेच रूप धारण केलेल्या आहेत. या वेगळेपणात दुर्बोधतेची झालेली माफक वाढही ध्यानात येते. 'मृगजळा' त ती प्रथम लक्षात आली. येथे ती वेल वाढते आहे. हे अपयश असावे की काय ?

त्यातले अनुभव नवे तर खरेच, पण खरोखरीचे कवयित्रीचे असतील काय असे उगाच वाटत रहाते. 'कढ' नावाची ही कविता अशा अतिवैयक्तीकतेच्या जाणीवा करून देणारी आहे. भोवताली असलेल्या जीवनाचा तिच्यावर केवढा तरी दाब पडला आहे. निंदकाला नमस्कार दुरावा करणाऱ्याचा सत्कार, साऱ्यासाठी माझे 'मीपण' शिकायला लावणारी नियती, इतरांसाठी उपास सहन करण्याला अखेर एकटेपणाने गिळावे ही अवस्था असह्य खरी. या एकटेपणाचे चित्र रेखाटणारी 'कढ' ही कविता काय अथवा 'माझा पदर वाऱ्याने' ही आणखी एक कविता काय, एकटेपणाचे, रितेपणाचे, उत्कट दर्शन त्या कविता घडवितात. आपल्या अस्तित्वामुळे काही झाकलेलं, काही कोमेजलेलं कशाला झळ लागेल म्हणून ते नाकारून–

" म्हणून मी क्षितीजाशी
सारे तोडूनिया बंध "

असे म्हणणाऱ्या मनाचे एकाकीपण मन सुन्न करून सोडते. 'सांगावा' ही कविताही अशीच मन व्यथित करणारी आहे. हा जीव नकोसा झाला आहे. चोळामोळा झाला आहे. मृत्यूला सांगावा केला. त्याच्या स्वागतासाठी तोरणे उभारली, स्वस्तिके रेखाटली, संसार आवरला, सारा बेत सज्ज केला परंतु तो अजून का येत नाही याची मनाला विवंचना लागून राहिलेली. अशा मनःस्थितीत–

" दक्षिणेच्या झंझावाता
कधी येणार धावत
माझं मातीच हे घर,
कधी घेणार मिठीत "

असे जेव्हा कविमन सांगू लागते तेव्हा एक वेगळाच विचार मनात येऊ लागतो. इंदिराबाईच्या कवितेत पूर्वीही दुःख होते व म्हणून ती मृत्यूला सामोरी जायला तयार होती. इथे एक उदास उन्मनस्क अपरिहार्यतेचे दडपण मनावर स्पष्ट पडलेले जाणवते. आपल्या अस्तित्वामुळे सौंदर्य नाहीसे झाले. आपले ( बहुधा ) दुःख आपल्याशी ठेवावे. इतरांना त्याचा छळ नको. अशा वृत्तीने रहावे एवढेच नव्हे तर हवाबंद दुःख काळजाच्या पेटीत ठेवून खोटेच हसावे, फुलावे ही चाललेली कसरतही पीळ पाडणारी आहे. " भास्करराव तांब्यांच्या कवितेत जे मृत्यूचे दर्शन घडते त्यानंतर इतके हृदयस्पर्शी दर्शन मराठी कवितेत प्रथमच घडत असेल. " १२७ एका कवितेत तर अंतरमनाच्या हांकेमुळे पैलतीराकडे निघाल्याचा उल्लेख आहे. अशी आहे ' रंगबावरी इंदिरा ' एका नवेपणाची ही वाटचाल.

मृत प्रियकराशी चालू असणारा संवाद अजून पूर्णपण ओसरलेला नाही. मधूनच ते आपले अस्तित्व जाणवून देतो. पटवून जातो. त्या एकोक्तीच्या छटा परिचयाच्या आहेत. सहजीवनातले सुख व विरहानंतरच्या वास्तवाचे दुःख त्यातून पहिले सुखच मृगजळ वाटावे अशा अपेक्षाभंगाचे धक्के याच ठराविक पद्धतीने त्या भाववृत्तीचा अविष्कार झाला आहे. तो अविष्कार पूर्वीइतकाच हृद्य आहे. भावरम्य आहे. पण रंगबावरी हा काव्यसंग्रह अशा कवितांमुळे रंगदार झालेला नाही. इंदिराबाईच्या मनाचे हे बदलते रूप लक्षात आले की वाटते–

" नाटक सुरू व्हायला झाले आहे. सूर लावलेला आहे. रंगमंच धूपाने भारून टाकला आहे. कोणत्याही क्षणी तो मखमली पडदा वर जाईल व नाटक सुरू होईल. इंदिराबाईच्या प्रतिमेचे नवेनवे उन्मेष उलगडणारा तो पडदा वर जाईल. रंगबावरी ही त्या मनाची अवस्था.

असे वाटते की, सिग्नल मिळताच आभाळात उड्डाण घ्यायला सज्ज झालेले हे विमान म्हणजे रंगबावरी– या ' रंगबावरीने ' किती तऱ्हेतऱ्हेच्या बाहुल्या हातात घेतल्या आहेत. त्या बाहुल्यांचे स्वरूप, नाविन्य, रंगभरणी विचारात घेतली पाहिजे " १२८

## बाहुल्यातील इंदिरा संत

जी पिढी आता आजची म्हणणे योग्य दिसणार नाही अशा पिढीतील कवयित्री इंदिराबाई आहेत. अनुभव दर्शन, अनुभव स्पंदन, अनुभव आत्मसात

करणे, या व्यतिरिक्त ज्यांच्या कवितांना बाह्य उद्दिष्टये नव्हती, अशा या कवयित्रीचा अखेरचा संग्रह म्हणजेच ' बाहुल्या. ' तो नवा संग्रह आहे. इंदिराबाईच्या दृष्टीने काव्याच्या दृष्टीने नव्हे. ' रंगबावरी ' वाचत असताना इंदिरा संत या अधिकाधिक अंतर्मुख होऊन गूढत्वाकडे झुकलेल्या दिसल्या. त्यामुळे ' रंगबावरी ' हा केवळ अनुभूतीचा अतिवैयक्तिक अविष्कार वाटला होता. कालमानाला अनुसरून किंवा ज्यात अडकून त्या थोड्याफार दुर्बोधतेकडे वळल्या आहेत असे रंगबावरीवरून वाटते. बाहुल्या हा संग्रह तसा नाही.

हा संग्रह नवा याअर्थी, की यात गूढ दुर्बोधता कमी दिसते. दुसरे व त्याहून महत्त्वाचे म्हणजे नसलेल्या प्रियकराशी चाललेला एकतर्फी संवाद आता कमी झाला आहे. व जीवनातले अस्पर्शित अनुभवही जगण्याइतके त्यांचे कविमन शांत व तटस्थ झालेले दिसते. तू शुंभागी उषा होशील, राजपथा तू बहरत येशील, नक्षत्र निरांजनानी ओवाळिन, हे आहे एक स्वप्न पण वास्तवात मात्र घर चंद्रमोळी आहे. ही जाणीव या विरोधातून फुललेली ' होऊन येशील उद्या शुभांगी ' ही दुसरीच कविता पहाण्यासारखी आहे. कुठेतरी रात्र, उषा, यांच्याबरोबर एकाद्या सोनपावलांने गृहप्रवेश करणाऱ्या 'नववधू' कडे पाहून मनात येणारे विचार असेच नसतील का ? त्या एकतर्फी संवादाचा मागमूस इथे नाही. ' ही अशी – ही तशी' ही तर एक प्रकारची कथात्मक कविताच. संपूर्ण एकटी जीवन एकटेपणाने जगणारी नी दुसरी डौलदार, ' नखरेल ' ' काळी पोत असणारी ' श्रीमंत शिक्षिका याच्या जीवनात विरोध स्पष्ट करणारी. कविता त्याच्यापूर्वी इंदिरा संतांनी लिहीली असते असे वाटत नाही. ' कुंवार राहून संसाराला हिने जुंपून घेतले आहे ' असे या दोघीत साम्य शोधणारे मन सहानुभूतीने भरले आहे. पण तरी ' ती ' किंवा ' ही ' आता ' मी ' होत नाही.

" ही अशी ती तशी . . . . यांचे जग वेगळे आहे. त्यांच्या सुख–दुःखातून कळ निघून गेली आहे. " १२९

अशा संवेदनेवरच कवितेचा शेवट झाला आहे.

या संग्रहाचे हे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणता येईल, की इंदिराबाई आता जगाकडे अधिकाधिक धीटपणे पाहू लागल्या आहेत. परंतु हे असे पहाणे प्रत्येकाच्या बाबतीत यशस्वी होतेच असे नाही. नावीन्याने भरलेल्या या बाहुल्या मात्र आकर्षक, अर्थपूर्ण, यशस्वी व प्रसन्न वाटतात.

अठ्ठेचाळीसच्या वणव्यातील वस्तूंचे दर्शन त्या घडवितात, ' ती ही वास्तू ' मध्ये गांधीवधाच्या भयंकर हाःहाःकाराचे वर्णन अनेकदा आपण वाचले आहे. जिथे आईने भरून भरून वाढले व आशीर्वाद दिले ते स्वयंपाकघर केवळ कोसळलेले ढिगारे झाले. वडिलांनी महाभारत सांगितले ते माजघर उंच नदीतून पाहिलेला

नदीचा लाल लाल पूर, घराची अस्मिता शिकवणारी घराची चौकट, श्रद्धावंत करणारे देवघर, सारं-सारं आता उध्वस्त झालं आहे. अशा आपल्या घराच्या दर्शनाचा अनुभव घेणाऱ्या इंदिराबाई पूर्वी भेटल्या नसत्या चिमण्या, कुत्री, गवताचा हिरवा हात, साऱ्यांनी त्या वाड्याची आठवणच बुजली आहे. कवयित्रीला मात्र ते भग्न दर्शन होताच –

" हा दगडी चौकटीचा दरवाजा . . . बिनदाराचा
रिकामा मुका . . . . केविलवाणा
तो पाहूनच
माझे हात कसे थंड पडतात " १३०

हा अनुभव येतो.

नव्या नव्या अनुभूतीबद्दल जागरूकता व त्यांचे कवितेतून होत गेलेले दर्शन लोभसवाणे आहे. कुणीतरी आपल्या भग्न जीवनाला रूप देईल, पणती लावील, भोवती प्रदक्षिणा घालील, हळदी-कुंकू वाहता वाहता नव्या जीवनाची साक्ष मिळेल, म्हणून वाट पहाणारे ' तुळशी वृंदावन ' शैक्षणिक जीवनातला आनंद हरवून बसलेली, लग्न होईपर्यन्त नोकरी सांभाळणारी, एक तारखेची वाट पहात पगार पत्रकावर सही करण्यापुरती ' बाई ' प्राचार्या इंदिराबाईनी पूर्वीही पाहिली असेल. पण तेव्हा कवयित्रीचे लक्ष ,तिकडे गेले नव्हते. मृत्यूचा अनुभव त्यांनी अनेकदा सांगितला असेल, पण

" यावेळी एकच करायचे असते
वाटेवरल्या सगळ्या खुणा मुठीत धरून
त्या समोरच्या अवकाशात
उधळायच्या असतात
डोळ्यात पाणी न आणता
आणि पायाखालची मूठभर माती घट्ट
धरून ठेवायची असते – त्याच मुठीत "

हा अनुभव मोडताना झालेले विकारहीन मन, क्वचित पूर्वी अभिव्यक्त झाले असेल. ' आज माळ बेचैन आहे ' या कवितेत विस्तीर्ण तांबड्या ओसाड माळावर रित्या डोळ्यांनी पाल, कुत्रे, पोरे-बाळे यांच्यासह वस्ती केली. क्षणकाळ पुढे निघून गेली सारी. पुन्हा माळ एकटाच ' हात नसलेल्या माणसासारखा अगतिक होऊन आभाळाकडे पहाणारा ' असा माळ आपणास भेटतो. ' एकटेपणा ' त्या अटळ जीवानानुभवाला शब्दरूप देणे आता इंदिराबाईचा रिवाज होतो आहे.

" एका भीषण लाटेने
गेले धुवून जीवन

गेला देवधर्म, गेले
जे जे कोमल प्रसन्न " [१११]

अशा एका उध्वस्तितून पुन्हा जीवनाला सुस्थिरपणा आणणारे मन (देवदेव्हारा मांडला), उताराची वाटचाल करणारे मन, (आयुष्याच्या सुरवातीला) जन्मलेल्यांचे चैतन्य व 'पोचायाची घाई' असलेले कवीमन, (तुझी खुली पावले), जन्मापासून विवाहापर्यंत वाढत गेलेल्या मुलीच्या जीवनाचा वेग व आनंद ( चिमुकली पाहुणी ), कुतुबमीनारावरचे, घटप्रभेच्या पुलावरचे, शिडीच्या पायरीवरचे, अशी भेदरलेली मुले स्वप्नांत येतात. आपण त्यांना आश्वासून 'इकडे बघा, इकडे या' असे ओरडतो. पण त्यांना ऐकू येत नाही. त्यांना कुणी वाहून नेत नाहीत. याबद्दलची तडफड (जेव्हा कधी स्वप्ने पडतात) आधुनिक काळातील दंग, अतृप्त विकासशील, चाकरमानी, मध्यमवर्गीय इत्यादी कविता केवळ बदललेल्या 'इंदिरा संताच्या प्रतिमा नव्हेत, तर संतांच्या सुंदर प्रतिमा आहेत. अशा सर्व कवितांतील सर्वसुंदर कविता म्हणजे 'फासील'या कवितेचे संपूर्ण वाचनच महत्वाचे–

" मी म्हणजे ना, झिळमळ वारा चढणीचा
मी म्हणजे ना, कोसळणारी समुद्रवीची
मी म्हणजे तर प्रतिमाधुरी गवतफुलांची
मी म्हणजे तर तत्पविराणी अंगाराची
अशीच होते, अशीच आणिक सदाकदाही
प्रसन्न दाहक वसुंधरेची, मी तर इवली लाही
अवर्षण वादळ वारे
उसळे लाव्हा, पडती तारे,
घटना मागुन चढती घटना,
दिवसामागून दिवस कोसळे
आणि युगांती. . . . .
मी म्हणजे केरवारा, स्वैंपाक पाणी,
मी म्हणजे आवक जावक, बिले, पावत्या
मी म्हणजे बौद्धिकांची रतीब गाळणी
मी म्हणजे हेच काही
चैतन्याची चमक नाही, चालत्या बोलत्या
पाषाणाला सुख नाही दुःख नाही
तरी पण आंत कुठे एक चित्र उमटून आहे
एक लहर, एक लाट, एक ठिणगी
गवत फुल हसते आहे "

या काव्याची कल्पना वाटते ॲरॉपॉलॉजीला जवळची. पण कुठे मानववंश शास्त्रज्ञ आणि कुठे त्यांचा प्रतिभासिक प्रत्यय. आपल्या व्यक्तीमत्वातले सारे सारे एकत्रित. सुंदर संचित म्हणजे चढणीवरचा वारा, कोसळणारी समुद्रवीची, गवतावरची प्रीतमाधुरी, अंगाराची तप्तविराणी. आपले अस्तित्व संपूर्ण जाणवून देणारी ओळ येते. 'प्रसन्नदाहक वसुंधरेची मी तर इवली लाही' एका बाजूने असणारे 'मी' पण वादळ वारे वाटतात. अवर्षण होते, भूकंप होतो, लाव्हा उसळतात, तारे पडतात आणि या अशा रौद्रातून येतो युगात हा जीवनधर्म. हा युगात केवळ अस्तित्वातला अन सत्य असावे फक्त 'केरवारा' स्वैंपाकपाणी, बिले, पावत्या, आवक, जावक, सारे 'मी' पण पाषाणमय बनलेले ? जिवंत सुंदर 'मी'चे रूप फक्त मागे उरते पाषाणरूप.

केवळ विरोधमयता व्यक्त करून ही कविता संपली असती तर नवल नव्हते. पण शेवटी येणारी लहर, लाट आणि गवतफूल या साऱ्यांचे पाषाणाच्या अंतरंगात धुकधुकणारे उद्याचे जीवन, पहिल्या टप्प्यातल्या वाऱ्याची 'लहर' 'समुद्रवीची लाट' 'अंगाराची ठिणगी' नी गवतफुलाचे हास्य या साऱ्यांना कल्पनेने समांतर करून मग कविता वाचली तर हे सौंदर्य अधिकच खुलते. 'फासील' सारखी कविता आज कित्येक वर्षात मी वाचली नाही. म्हणून असे एक अनामिक समीक्षक म्हणतात, "सहजाला शोभावे, सुंदराला शोभावी अशी इंदिराची कविता आहे."[११२]

जगात अखंड वेगाने घडून गेलेल्या अपरस्पर घटकांनी वाचकांचा जीव दडवून जातो. पण फक्त थोडा वेळ अखेर या साऱ्यावर पडून राहताना चहाच्या कपाची वर्तुळे, वर्तुळाचे डाग. हा अनुभव आपल्यापैकी प्रत्येकाचा तोच इंदिराबाईनी टिपला आहे.

प्रतिमातला ताजेपणा, अचानकता, औचित्य या गोष्टी कवयित्रीच्या सामर्थ्याचे दुसरे लक्षण म्हणता येईल. या संग्रहात प्रतिमांचे हे सामर्थ्य चांगलेच वाढले आहे. 'आयुष्य हे एक प्रतिमेतील प्रमेय बनणे' जीवन म्हणजे गहनगूढ शून्य असे उत्तर येते. तेव्हा त्या शून्याचे 'लक्षदलांचे कमळ' बनते व त्यातच जीव मिटून जावा असे वाटणारे कवीमन किंवा शून्य म्हणजे 'काळलहरीने केलेला तो 'आ' च खरोखर या प्रतिमेमागे उभे असलेले कृष्णाचे विश्वरूप दर्शन, 'गुलाबाच्या लोणीयाची' पाऊले भयभीषण गिधाडांची सोनटक्क्यांची फुले, मी म्हणजे बर्फात रोवलेली बधीररस शोषून घेणारी सुई, शब्द म्हणजे रांजण, संतप्त हत्तींच्या कळपासारख्या अंगावर धाऊन येणाऱ्या आठवणी, सैरावैरा आयुष्याचे समर्थन शोधणारी वाट, डोळे म्हणजे दोन पावच्याची वल्ही, ठिकरीच्या खेळातल्या ठिकरीसारखे आयुष्य, कौलारातून बरसणारी झुरझुर किरणे अशा कितीतरी प्रतिमांचे दंव थवे काव्यकमलावर सतेजपणे हालताना दिसतात. प्रतिमांच्या या

दर्शनातून दर्शन घडते ते एका संवेदनाशील चपखलपण असणाऱ्या कविमनाचे.

बाहुल्या रंगीत असतात. लहानमोठ्या असतात, लाकडाचे उभे ठोकळेही असतात. बाहुल्या गाणाऱ्या असतात. नृत्यांगनादेखील असतात. कधी झेपावताच डोळे मिटतात, उभ्या करताच घायाळ करतात. या संग्रहात अशाच साऱ्या बाहुल्या आहेत. ' उभा बाळ दारापाशी ' या बाहुलीत आहे. वात्सल्याचे, ' एक ' मध्ये आहे एक चिंतनशील मन. ' बाई पाऊस पाऊस ' मध्ये आहे मस्त तृप्ती. ' तेवढा तरी राहू रे ' मध्ये आढळते कोंढलेले प्रणयी मत, ' फुल फुलता फुलेना ' मध्ये आढळते पुन्हा परत न मिळणारे जीवन, ' कृतघ्न ' मध्ये आढळतो एक गूढ दुरावा, ' सोन्याच्या कोयरी ' त आढळणारी प्रसन्न प्रौढता, ' ती रात्र ' मधील मृत्यू आणि आणखी कितीतरी कवितांतून दिसणारे हे संमिश्र व संकीर्ण व्यक्तीमत्व वाचकाला जीवनाचा बहुकेंद्रीत प्रत्येय आणून देईल.

' रंगबावरी ' त वेळीच लक्षात येणारी आणखी एक गोष्ट होती. ' मुक्तछंद ' इंदिरा संताना अपरिचित नव्हता. पण " रंगबावरीतली कविता जीवनाचा वेध घेताना क्वचित तोल न सांभाळणारी आहे. ' बाहुल्या 'तील रचना सफाईदार आहे. ' पादाकुलक 'चा आधार कमी झाला असला तरी वाचता वाचता एक ताल साधला जातो. कविता ठेक्यावर मोठ्याने वाचाविशी वाटते. "[१]

बाहुल्या संग्रहाचा विचार करताना सदरचे समिक्षक म्हणतात. ' बाहुल्या हे इंदिराबाईचे आणखी एक नवे परिवर्तन ' आणि मग विजया राजाध्यक्ष यांनी रेडिओवर केलेले विधान ' इंदिरा आता विझल्या आहेत ' हे चूक आहे असे वाटते.

महाराष्ट्र साहित्य पत्रिका (जाने. फेब्रुवारी–मार्च १९७२ मधील कविता) पृ. ४५ या लेखात प्रा. यशवंत मनोहर म्हणतात, ' बाहुल्याच्या पूर्वीच्या कविता ( बाहुल्या ) तरळ, आर्त, प्रेमभावनेत बुडून जाणाऱ्या होत्या. ' बाहुल्या ' तही उदासपण, अस्वस्थता, एकाकीपण या भावछटाचे दर्शन घडते. इंदिराबाईच्या भावविश्वाला मर्यादा आहे असे नेहमीच म्हटले जाते. पण कविता ही व्यक्तीमत्वाची अनिर्बंध असेल तर भावविश्वाच्या मर्यादांचा प्रश्न गौण ठरावा.

' बाहुल्या 'त काळोख व अंधाराशी कवयित्रीचे नाते सघन आहे. कदाचित जीवनाच्या अंतिम टप्प्याची ती जाणीव असेल. त्या म्हणतात, आता उताराच्या वाटेवर सगळीकडे स्तब्ध आहे. स्नेहभावाच्या ताणाने आकाश दाटते आहे. वाकते आहे.

" आपला हात आपला गळा दाबतो आहे
माझी थोडीच राहिलेली पावले
भयाच्या सावलीने गिळून टाकली आहे "

तात्पर्य– एकीकडे स्नेहभावाची कृतार्थता व दुसरीकडे भयसावली अशा

संमिश्र टप्प्याचा हा प्रवास आहे. 'बाहुल्या' हा इंदिराच्या पूर्वानुवाचा एक परिपुष्ठ अविष्कार असला तरी काही रंग स्पर्शिल्याशिवाय रहात नाहीत. अनुभव दर्शन, अनुभव स्पंदन याची उत्कृट जाणीव इथे आहे. त्या अधिकाधिक अंतर्मुख होऊन गूढत्वाकडे जाणाऱ्या इथे दिसतात

**इंदिराबाईंची काव्यवृत्ते**

इंदिराबाईनी आपल्या काव्यासाठी प्रामुख्याने तीन वृत्तांचा वापर केला आहे. लहानपणी त्यांना कविता वाचनाचा छंद होता. या छंदातून पुढे त्यांनी स्त्री गीते जमविली. आवडीतूनच हे स्त्री गीतांचे संकलन झाले. तवंदी या खेडयात झुंजूमुंजू झालं की, जात्याच्या सुरावर रेखलेले ओवीचे सूर कानी पडत. 'इथेच' ओवी त्यांच्या बालमनावर ठसली. त्यानंतर सापडेल त्या ठिकाणी, मिळेल त्या कपटयावर त्यांनी 'ओव्या' जमवल्या. अंबाबाईच्या देवळातही हा त्यांचा छंद चालू होता. आजही त्यांच्या संग्रही हजाराच्यावर ओव्या आहेत. त्या म्हणतात, तीन चार ओळीच्या काव्यातली अनूभुती आणि ती अभिव्यक्त करण्याचा कमालीचा साधेपणा आणि ज्या प्रतिमातून ती व्यक्त झाली. त्या प्रतिमांचा जिवंतपणा याला तोड नाही असं मला वाटतं.'

" दुष्टाच्या संगतीने, मन माझे विटले
वाऱ्याच्या संगतीने, पान केळीचे फाटले "

यासारख्या स्त्रीगीतांचा मनावर असा संस्कार झाल्यामुळे, त्यावेळी जे काव्य माझ्या वाचनात आले त्यात मला फारसा रस वाटला नाही. आणि म्हणूनच मी ज्यावेळी जाणीवपूर्वक कविता लिहू लागले त्यावेळी वृत्त-जाती-राग यांचा स्वीकार न करता सरळ ओवीवृत्तांत कविता लिहू लागले. माझी बहुसंख्य कविता ओवीतच लिहिली गेली." [११४]

स्वत: इंदिराबाईची ओवीविषयी असणारी ही आवड, संस्काराचा परिणाम त्यामुळे सुरवातीच्या कवितातून त्यांनी 'ओवी' या वृत्ताचा आश्रय घेतला आहे.

" त्यांच्या ठिकाणच्या कवितेला कुणी जागं केलं असेल तर ते जानपद ओवीने. त्यांचा रसास्वाद घेता घेता त्यांची काव्यशक्ती वाढीस लागली. " [११५]

" बाई पाऊस पाऊस । गरीबाशी खेळे मस्ती
ओलीचिंब चिरगुटे । आणि घरात गळती
बाई पाऊस पाऊस । पोरे आली चुलीपाशी
माऊ आली मांडीवरी । आणि मोत्या वैरणीशी.
बाई पाऊस पाऊस । घरधनी आले घरी
शिवारी कामकाज । मनी त्याची झुरभुरी
बाई पाऊस पाऊस । आहे गारठा घरभर
घालू वाटे चहामध्ये । पाती चहा आले चूर

बाई पाऊस पाऊस । कोसळतो एकचित,
खमंग लोणच्याशी । हवा वाफेचाच भात " [१९]

वरील ओवीवृत्तात स्त्रीमनाचा अविष्कार आहेच. त्याबरोबर–

" वळवाचा पाऊस । पडून ओरला
भावाला झाल्या लेकी । मग बहिणीला विसरला । "

या लोकगीताचे स्मरण होते. तरीही चहा, गरम वाफ हे शहरी थाटाचे शब्द या ठिकाणी डोकावतातच.

इंदिराबाईची ही ओवी ज्ञानेश्वर, एकनाथ यांच्या ओवीपेक्षा भिन्न आहे. ज्ञानेश्वरी ओवीत पहिल्या तीन चरणात सामान्यतः आठ अक्षरे असतात व चौथ्या चरणात चार ते सहा अक्षरे असतात. पहिल्या तीन चरणांच्या शेवटी चमक असते.

जो सवी भूतांचे ठायी । द्वेषाने नेणेचि कांही ।
आपपर जया नाही । चैतन्या जैसे । " [१७]

एकनाथी ओवी ही ज्ञानेश्वरापेक्षा लांबट आहे. पहिले तीन चरण व चौथ्या चरणाच्या यां च्या शेवटी यमक साधलेले असते.

" करी वीण घेऊनी ब्रह्मसुत । शिवाजवळी आला ।
म्हणे हे विश्वंभर विश्वनाथ । तुझे भक्त देखिले आकस्मात । " [१८]

तर इंदिराबाईची ओवी आठ अक्षरी असून १–३, १–४ असा यमकबंध साधला आहे. तर काहीवेळा १–२, २–४ असा.

ओवीनंतर 'पादाकुलक 'या जाती मात्रावृत्ताचा वापर इंदिराबाईनी केलेला दिसतो. या जातीवृत्तात सोळा मात्रा असून, मात्रांचे ८–८ असे दोन गट असतात.

" वाट पहाते तुझी अशी मी . . .
तृप्त सुखाच्या निवांत कुरणी " [१९]

बाहुल्यामध्ये मात्र इंदिराबाई 'ओवी पादाकुलक' या जातीय वृत्तापेक्षा 'मुक्तछंदाचा' च वापर अधिक करतात. एवढेच नव्हे तर त्या म्हणाल्या 'आता मला ओवीत लिहावेसे वाटत नाही. मी आपोआप मुक्तछंदातच लिहून जाते.' [२०]

मुक्तछंद हा अगदी अलिकडील काव्यप्रकार शरचंद्र मुक्तीबोध ( नवी मळवाट व अनिल ( भग्नमूर्ती ) यांनी मराठीत अधिक अर्थाने रूढ केला. अक्षरसंख्या, मात्रासंख्या, लघुगुरूक्रम वा कसलेच बंधन या वृत्तात नसते. मनातील आशयाची प्रभावीपणे मांडणी या वृत्तातून केलेली असते.

" कधीतरी या आठवणी येईनाशा होतात
सारे प्रक्षोभ थांबतात
सारे हर्ष विसावतात
त्या नितळ पाण्यात खाली बघतांना वाटते

किती घाबरले होते. . . केवढा वेडेपणा. . .
किती वेडी झाले होते. . . केवढा मुर्खपणा. ." [१४१]
" माणूस एकदाच थकत असतो
तसा थकवा आयुष्यात एकदाच येत असतो
मग तो मुळीच थकत नाही
प्राणपणाने उठाव घेत राहतो कुणासाठी,
कुणासाठी "[१४२]

तात्पर्य-इंदिराबाईनी सुरवातीस ओवी, पादाकुलक व सध्या त्या मुक्तछंदाचा बापर कवितेत करत आहेत.

## रंगात तरंगणारी कवयित्री

इंदिराबाईना रंगाची फार हौस दिसते. या रंगतरंगामुळे काव्याची वेधकता जशी वाढते तसेच मूळ कवितेतील सौंदर्यही अधिकच खुलून दिसते. भावमधुर, सुकुमार शब्दात लहानशीच पण खोल भावना समर्पक रीतीने त्या सांगतात. ' तुझा सहवास ' या कवितेतील ' तुझा सहवास ' झिरीझिरी चांदण्याचा । यातले झिरी झिरी हे शब्द वाचले की चंद्रप्रकाशाचा झोतच अंगाला स्पर्श करून गेल्याचा भास होतो. चंद्रप्रकाशाचा असाच कलात्मक उपयोग कुसुमाग्रजांनी केला आहे. ' काढ सखे गळ्यातील तुझे चांदण्याचे हात ' या शब्दातून त्यांचे सौंदर्य प्रतीत झालेले आहे. " रंग, चांदण्याची आवड इंदिराबाईच्या प्रेम व निसर्ग काव्यातून व्यक्त होते. " [१४३]

रंगाचे हे आकर्षण इंदिराबाईना लहानपणापासून आहे. रंगाच्या पाठीमागे एखादा संकेत असतोच. या संकेताची गहिरी जाण या रंगमाध्यमातून व्यक्त होत रहाते.

" इथली इवली ही कारंजी
उडती ज्यातून हिरव्या धारा
हिरवे शिंपण अंगावरती,
रंग सजळतो त्यातुन न्यारा " [१४४]

इतल्या कारंजातून बालमन व्यक्त होते, व धाराना आपोआप हिरवेपण प्राप्त होते. हिरवा रंग हा तृप्तीचा दर्शक असतो. अंगावरती हिरवे शिंपण घेऊन, रंगाचे न्यारे सुख अनुभवायला कवयित्री नित्यच तयार आहे. रंगाची भाषा ऐकायला त्या उत्सुक आहेत. ' अजाण ' मनाची जाणीव असूनही –

" त्या रंगाची हिरवी भाषा
अजाण मी, मज मुळी न कळे तर,
तरंगतो परि मनोमनावर
त्या रंगाचा तवंग सुंदर " [१४४]

मदी भरल्या पावलांचे नाजूकपण त्या गवताच्या पात्याच्या माध्यमातून स्पष्ट करतात. ' मेंदी ' चा हा रंग पऱ्यांना आवडतो. फुलपाखरांच्या पंखाचांही तोच रंग, स्वप्नांचा तसाच.

मनाचे विशाल प्रतिबिंब मग त्या निळचा आभाळात पहायला उत्सुक आहेत. अतिविरहाचे दुःखही मग या रक्ताच्या भळभळण्यातून त्या स्पष्ट करतात 'अंधार' ओळीत व्यक्त करून मनाची निराशा त्या मांडतात तर प्रपाताच्यासारखे त्यांना कोसळणारे दुःख वाटते. मनातील सुखाचे गहिरे क्षण, पिवळा मोहर स्पष्ट करतो. तर धूसर संध्येचे वस्त्र ' कुसुंबी ' रंगाचे असते. घोटीव काळचा पाषाणावर ध्यानमग्न मुनिश्वराचे चित्र दिसून जाते. जुनेरी रंगीत वाकळ दारिद्र्याचे चित्रण करते.

प्रियकराचे पेन मुलायम आहेच. त्याबरोबर हिरवट राखी रंगाचे, जांभळे पाकीट अजून कवयित्री जपते आहे. रूपेरी घडचाळ समोरच्या भितीवरचा सोनेरी अधिकच स्पष्ट करून जाते आहे आणि –

" रंग रंग हे जमती भिनती,
मीच होतसे इंद्रधनु अन्
तुझ्या जिवाच्या आकाशावर
अशी सुरंगा राहते रेलून " [१५]

अजूनही मनात इंद्रधनुष्य तरळत रहाते स्वतः कवयित्री सुरंगा होते आणि स्मरण वृक्षावर स्वतः रेलून रहाते. स्मरणाच्या वृक्षावर रेलून रहाण्याची ही किमया ' स्त्रि ' ला पुरूषाचा आधार हवाच असतो हे स्पष्ट होते.

धूसर संध्या, नागीन काळी, निळेपाणी, निळी हवा, काळचा पाखरांचा थवा, काळचा रात्रीचे रेशीम, हिरवी उतरण, उजळ मोकळा चेहरा, निळा प्रश्न, दिवसाचे निळेपण, काळोखाचे विष, हिरवट वारा, नटरंगी पतंग, तलम आभाळ, रूखे केस, फिके पातळ - यासारख्या रंगाच्या उपमा इंदिराबाईनी वापरल्या आहेत. त्या त्यांना आवडतात असे जाणवते.

## इतर कवींचे मिसळलेले सूर

" फर्ग्युसन महाविद्यालयाच्या निसर्गरम्य वातावरणाचा परिणाम, त्यातच पु. य. देशपांडे, अनिल यांच्या काव्यात्मकतेची भर. यामुळेच माझी काव्यात्म वृत्ती मोहरू लागली."[१६]

प्रखर टीकाविषयक झालेली पु. य. देशपांडे यांची व्यक्तीवादाबद्दलची ओढ त्यांच्या कादंबरीत आढळते. ' सदाफुली ' मध्ये व्यक्तीस्वातंत्र्याच्या कल्पनेवर आधारलेला व वडिलांच्या विरोधाची तमा न बाळगणारा निमा व अशोक यांचा प्रेमविवाह सफल झालेला दाखविला आहे. ही प्रेमविवाहाची कथा सांगितलेली आहे.

'सदाफुली' चे कथानक विशाल जीवनामधील दिलीपची भावव्यथा यांचे आंतरिक नाते इंदिराबाईच्या भावविश्वाशी जुळणारे आहे. हे नाते विद्यार्थीदर्शन जडले. अनिलाचे प्रेम आणि जीवन किंवा अनिलांची स्फुट कविता चिरयौवनाचे दर्शन घडविणारी आहे. यशवंताची आई, इंदिराबाईच्या मनात ठसली आहे. अनंत काणेकरांची 'चांदरात' त्यांना मनावरसंस्कार करणारी वाटते मा. ज्यूलियन, यशवंत, अनिल, पु. य. देशपांडे यांच्या साहित्याचा मनावर परिणाम झाला आहे. साहित्यावर नाही. महाविद्यालयीन जीवन जगत असताना आपल्या मनावर कोणाचे काव्यात्म संस्कार झाले याची स्पष्ट कबुली इंदिरा देतात.

## इंदिरा संताच्या काव्यमर्यादा

कायमच्या दुरावलेल्या प्रियकराशी कवयित्रीच्या मनाचा चाललेला संवाद असेच इंदिराबाईच्या काव्यांचे मुख्यतः स्वरूप आहे. तरीही याला काही अपवाद जाणवतात. 'दावण' या त्यांच्या कवितेत शाळेमध्ये गुदमरून गेलेल्या मुलांचे चित्रण आहे. या चित्रणात असणारी सफाई जाणवत असली तरी ही कविता पोटतिडकीने लिहिण्यासारखी वाटत नाही. अंधांतरीच्या निळ्या तळ्यातून उतरून येणाऱ्या आजोबावरची कविता नितांत सुंदर वाटते. कवयित्रिच्या विरही मनाचा मागमूसही या कवितेत सापडत नाही. "दिग्दर्शन" ही कविता उखाने वजा झाली आहे. त्यामुळे ही कविता अर्धी फसली आहे व अर्धी जमली आहे." [१७] असे प्रा. गंगाधर गाडगीळ याना वाटते.

अवचितपणे मनाला वाटणाऱ्या उत्साहाचे चित्रण 'अशीच येते कधी एकदा' या कवितेत आहे. हा क्षणीक उत्साह म्हणजे इंदिराबाईच्या विरही मनाची दुसरी बाजू आहे. एकंदरीत कवयित्रीचे मन तिच्या विरह व्यथेने बंदिवान केले आहे आणि हा विरहाचा अनुभव कवयित्रीला जर आला नसता तर हे काव्य सामान्य पातळीवर राहिले असते.

त्यांच्या काव्यातून व्यक्त होणाऱ्या अनुभवाची चौकट ही अशी एकापरिने लहान आहे. त्या चौकटीत काव्य लिहिताना त्यांनी स्वतःवर काही मर्यादा, लादून घेतल्या आहेत. त्यांच्या काव्यात शारीरिक आकर्षणाला उघडपणे स्थान दिलेले नाही. प्रीतीचा भाग त्यांनी हलक्या हाताने पुसून टाकला आहे. ही शालिनता त्यांच्या काव्याला मारक ठरलेली नाही. शारीरिक आकर्षण जर त्यांनी अनुभवले नसते तर त्यांच्या अनुभवाला एक प्रकारचा तोकडेपणा आला असता असा हा अनुभव 'तुळशी' सारख्या कवितेतून जाणवत रहातो. पण कवयित्रीच्या अंगाच्या नैसर्गिक शालीनतेमुळे हे अनुभवाचे बोल निराळ्या प्रकारे प्रकट होतात. आंधळ्या माणसाचे कान तिखट असावेत तसेच हे घडले आहे.

बिभत्स अगर भेसूर अनुभवांना त्यांच्या कवितेत स्थान नाही. असले अनुभव

त्यांनी उपभोगले नाहीत असे नाही, पण हे अनुभव भीतीदायक, भेसूर स्वरूपात काही ठिकाणी व्यक्त करून त्याला त्या दुय्यम स्थान देतात.

इंदिराबाईच्या काव्याचे स्वरूप पहाताना त्यांच्या अनुभवाची लहान असणारी चौकट आपल्या लक्षात येते. त्यांची कविता वाचल्यावर विलक्षण समृद्ध व उत्कट आपल्या हाताला लागेल असे वाटते, पण ते सारे प्रियकराभोवती पिंगा घालणाऱ्या मनाचे दर्शन असते. त्यांच्या प्रियकराचे स्वरूप पहाताना त्याला शरीर नाही असे जाणवते. सुरंगा या कवितेत असा स्पष्ट उल्लेख आहे. अंगठीतल्या खड्याचा, चष्म्माच्या निलीम्याचा, उल्लेख निसर्गावर उधळलेल्या राखेसारखा आहे. त्यांचा प्रियकर निळे आकाश, चांदण्यांचा ओघळ, निळी कुंसुंबी धूसर संध्या हिरवा माळ आणि पिवळा मोहर, भणभण वारा, ओल्या वगताचा वारा या सर्वांशी एकरूप झाला आहे. तो आता साडेपाच फूट उंचीचा माणूस उरला नाही तर विश्व व्यापून राहीला आहे.

भक्तीमार्गी कवींच्यापेक्षा इंदिराबाईचे काव्य निराळ्या स्वरूपाचे आहे. त्यातील अनुभवाची उत्कटका व घडण वेगळी आहे. विश्व व्यापून राहिलेल्या या प्रियकराला स्वतःचे व्यक्तिमत्व नाही. तरीही प्रियतमेच्या सर्व वृत्ती उफाळून आणणे हेच त्यांचे काम आहे. कवयित्रीचे त्याच्यावर अपार प्रेम होते. वेलीला आधार देण्यासाठी वापरलेल्या खांबासारखी त्यांची अवस्था आहे.

विश्व व्यापून राहिलेल्या या प्रियकराच्या भोवती कवयित्रीचे मन सतत पिंगा घालत असते. त्याला ते सदा शोधत असते. आणि हा कधीही न संपणारा शोध चाललेला असताना कवयित्रीचे मन मोहरलेल्या डहाळीसारखे मोहरून जाते. व्याकुळ होऊन ती म्हणते–

वर्षेतील संध्येवरी
आले मी आवरीत
रक्ताचा जाळ लाल
दुःखाची गडद लाट ''

दुःखाचा आवेग जपणारी, मधुस्मृतींना कुरवाळणारी, प्रियकराच्या ध्यानापलीकडे काही सूचन नाही. तेव्हा स्वतःचे अस्तित्व वितळून टाकणारी, गुदमरणारी, प्रतिक्षेच्या वाळवंटात उभी असणारी कवयित्री आहे.

इंदिराबाईनी एकापरीने मर्यादित अशा अनुभव विश्वातून समृद्ध, उत्कट असे काव्य निर्माण केले आहे. ही किमया साधण्यासाठी आपल्या प्रियकराला त्यांनी अतिमानुष स्वरुप दिले. आभाळाएवढे मोठे केले. निसर्गाशी एकरूप केले. निसर्गातील सर्व रूपे त्यांचीच आहेत असे ठरवून टाकले. या सर्व गोष्टी त्यांनी मुद्दाम केल्या असे नाही तर त्या नकळतपणे झाल्या आहेत.

## इंदिराबाईचे काव्यसौंदर्य

इंदिराबाईच्या काव्यातून व्यक्त होणाऱ्या अनुभव विश्वाचे स्वरूप वरीलप्रमाणे आहे. पण त्यांच्या या अनुभवाची गुणवत्ता, काव्याचे सौंदर्य लक्षात घ्यायचे तर आपल्याला त्यांच्या कवितेतील शब्दप्रतिमा व त्यांची घडण याकडे वळले पाहिजे.

त्यांच्या काव्याच्या घडणीकडे पाहिले की, त्या घडणीतला साधेपणा व सोपेपणा आपल्याला जाणवतो. एकत्र, सलग अशा अनुभवातून त्यांची कविता निर्माण झाली आहे. दोन वेगवेगळ्या अनुभवांना एकत्र आणून कलात्मक संगती करण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला नाही. किंबहुना कवयित्रीच्या मनाचा तो पिंड नाही. त्यांच्या मनाची तशी प्रवृत्ती नाही. त्यांच्या कवितेत असणारा सलगपणा आणि साधेपणा प्रतिमांच्या मालिकेत देखील आढळून येतो. या सलगपणाचे कारण शोधू जाता त्यांच्या साऱ्या प्रतीमा निसर्गांच्या विविध रूपांतून त्यांनी वेचलेल्या आहेत असे आपल्याला दिसून येते. पुष्कळवेळा एखाद्या प्रसंगाच्या अगर निसर्गातील एखाद्या दृष्याच्या आधाराने त्यांची कविता लिहिलेली असते. त्यामुळे त्यातील प्रतिमेला सलगपणा प्राप्त होतो. ज्या प्रसंगातून कविता स्फुरली त्या प्रसंगात कविता अडकून राहिली पाहिजे हा मराठी कवींचा संकेत त्यांनी मानलेला आहे.

इंदिराबाईची कविता साधी असल्याचे कारण म्हणजे ती साधर्म्यात अधिक रंगते.

" निबरट कीरटी
हडबडले अशा बायका
उष्टी भांडी उरकून बसल्या
विनीत चिमणे जीवन "

हा मर्ढेकरांच्या काव्यपंक्तीत दचकून टाकणारा विरोध इंदिराबाईच्या काव्यात नाही. त्यामुळे त्यांची कविता साधी वाटते. या साधेपणामुळेच ती सोपी वाटते. या साधेपणाच्या चौकटीत राहून देखील त्यांच्या कवितेने अस्पष्ट तरल अनुभवांना जसेच्या तसे शब्दांकित केले आहे. त्यांच्या कवित्वाने काव्यविषयक संकेतावर मिळवलेला हा विजय आहे. आपल्या कवितेतून साधे, परिचित आणि स्थूल असे त्या काहीतरी सांगत आहेत असे वाटते. व एकदम तरल अपरिचित व विलक्षण असे त्या सांगून जातात.

" किती आग्रह चहाचा
तशी सुपारी स्वादीष्ट
पुन्हा कधीची सलामी
निघताना नजरेत "

अशा भुईवरून सरपटणाऱ्या ओळी त्या लिहितात. तेव्हा सर्वसामान्य वाचक आपल्याला समजले म्हणून आनंदतो व रसिक वाचक नाराज होतो.

" चहावरील वाफेचे
धुके दाटले वाटेत
सुपारीच्या आग्रहाने
अश्रू दाटे तळहात "

या ओळी येतात. जे सोपे होते ते तिकके सोपे रहात नाही. जे परिचित होते. ते एकदम नवीनतेत नटून जाते.

" मी सुटले मी सुटले
मी हसले मी खुलले
जीवाचे गगनागण
चांदण्यात नितळ निळे "

या ओळीत अकृत्रिम, साधे, सौंदर्य आहे पण त्यानंतर –

" वरून जरी नितळ निळे
आतुनि का भळभळते "

या दोन ओळी जेव्हा येतात तेव्हा नितळ निळे या दोन शब्दातील ' ळ ' व ' भळभळ ' या शब्दांतील दोन ' ळ ' एकत्र आल्यामुळे त्या शब्दांना व कवितेला निराळाच पण कठीण असा अर्थ प्राप्त होतो व कविता वाटते तेवढी सोपी रहात नाही.

" पण तिथेच ते तिथेच
मिटून ओठ संपणार
वृत्त कठोर हे असेच
हे असेच चालणार "

या ओळी देखील साध्या असल्या तरी त्यात काहीतरी अवघड साधले आहे. ' तिथेच ' व ' असेच ' या शब्दांच्या पुनरुक्तीने व त्यांना एकत्र आणल्यामुळे कांहीतरी साचते आहे. हळुहळू, थोडे थोडे साचते आहे असे जाणवते. मिठून ओठ या शब्दाचा मनावर होणारा मर्यादित परिणाम तोकडया तोकडया शब्दानंतर येणाऱ्या संपणार या लांब शब्दामुळे एकदम गडद होतो व वृत्तकठोर हे शब्द दगडासारखे तरंगत रहातात. वाचकाच्या दृष्टीने वेडावून टाकणारे असे इंदिराबाईच्या काव्याचे सौंदर्य आहे. अनुभवाच्या ज्या छटा वेचता येणार नाहीत असे वाटत होते त्या अवचितपणे त्यानी वेचल्या आहेत. अवचितपणे उमलणारे आणि पहाता पहाता कोमेजणारे ताजे टवटवीत अनुभव त्यानी ओंजळीत पकडले आहेत. व हे सर्व तारेवरच्या कसरतीसारखे मनातल्या धुक्यातली ही कोरीव लेणी कोरण्याचा

चमत्कार इंदिराबाईना साधून गेलाय म्हणून आस्टीन या कवयित्रीबरोबर गंगाधर गाडगीळ त्यांच्या अनुभव स्वरूपाची तुलना करतात. १४८

युद्ध, अन्वस्त्रे, लाल क्रांती, दारिद्र्य, बेकारी, पंचवार्षिक योजना यापैकी कोणत्याही ज्वलंत विषयांना त्यांच्या कवितेत स्थान नाही. एवढेच नव्हे तर आप्त, मित्र, मुले, यांना देखील तिच्यात स्थान नाही. ती पूर्णतः समाजविन्मुख आहे. सामाजिक जाणीवेचा मागमूसही येथे नाही. तरीही कुठेही कमतरता आलेली नाही.

**समीक्षकांच्या दृष्टीतून इंदिराबाई**

इंदिराबाईंच्या कवितेचा विचार करत असताना वा. ल. कुलकर्णी (सत्यकथा १९५२), माधव आचवल (बाई तू उभी रहा 'जास्वंद') गंगाधर गाडगीळ (सत्यकथा, ऑगस्ट १९५५), मालती किर्लोस्कर (सप्तसरीता) डॉ. अ. ना.देशपांडे (मराठी वाङमयाचा इतिहास) या समिक्षकांच्या समीक्षेचा विचार केला पाहिजे.

इंदिराबाईच्या कवितेविषयी लिहित असताना अवचितपणे उमलणाऱ्या आणि पहाता पहाता कोमेजणाऱ्या आठवणींना त्यांनी टिपलेले आहे असे म्हणून गाडगीळांनी जेन् ऑस्टिनबरोबर त्यांची तुलना केलेली आहे. पुढे ते म्हणतात, " त्यांच्या कवितेत व्यक्त होणाऱ्या अनुभवाचे स्वरूप एकापरीने अगदी मर्यादित आहे. त्यांची कविता म्हणजे कवयित्रीचा आपल्या दिवंगत प्रियकराशी चाललेला अखंड संवाद आहे. त्यांच्या कवितेत अशी दोनच पात्रे आहेत. कवयित्री व तिचा दुरावलेला प्रियकर. " १४९ गाडगीळांनी बाईच्या कवितेचे जसे नेमके स्वरूप व्यक्त केले असेच त्यांच्या कवितेमध्ये असणारी पात्रांची मर्यादितता स्पष्ट केली. म्हणजेच समाजाचा वेध त्यांनी कविता फारशी नसून वैयक्तिक सुखदुःखाशी ती अधिक जवळीक साधते आहे, असेच आपल्याला आढळून येते. इंदिराबाईच्या काव्याची आणि ओवी वाङमयाची तुलना करण्यात येते. पण ती अनेक बाजूंनी दिशाभूल करणारी आहे. ओवी वाङमय हे मूलतः सामाजिक आहे. पती, मुले, सासू, नणंदा, माहेरची माणसं या सर्व आप्तेष्टांनी व त्यांच्याशी जडलेल्या भावनेच्या सुबंधानी ते गजबजले आहे.

ओवी हा वाङमय प्रकार समाजाच्या एका विशिष्ट चौकटीतून निर्माण झाला आहे हे आपल्याला सतत जाणवत रहाते व त्यातून व्यक्त होणाऱ्या भावना पुष्कळवेळा प्रामाणिक व अभिजात असल्या तरी सामाजिक संकेतानुसार त्याचा आकार निश्चित झाला आहे. सामाजिक परंपरेने मळलेल्या पाऊलवाटेने या भावनांची वाटचाल चाललेली असते. थोडासाही निराळेपणा त्यात खचून जाणण्यासारखा नसतो. ओवी वाङमयाचा मूळ हेतू कलात्मक निर्मिती करणे हा नव्हे तर सामाजिक जीवन सुसह्य व आवंददायी करणे.

या सर्व बाबतीत इंदिराबाईचे काव्य निराळ्या स्वरूपाचे आहे, ते

समाजविन्मुख आहे. तसेच त्यांच्या अनुभवांचे स्वरूप सामाजिक संकेतांनी निश्चित झालेले नाही आणि सामाजिक संकेत असता तर तो दूरच्या आडवळणांनी जडलेला. त्यांचे अनुभव एका संवेदनाक्षम व वैशिष्टचपूर्ण व्यक्तिमत्वातून निर्माण झालेला आहे. त्यात एक प्रकारचा स्वैरपणा निर्माण झाला आहे. आत्मप्रकटीकरणापलिकडे दुसरा कसलाच हेतू नाही. समाजधारणेला ते पोषक आहे असे म्हणणे धाडसाचे ठरेल.

ओवी वाङमय प्रकारात सोपेपणा असतो. इंदिराबाईच्या काव्यातील हा सोपेपणा अनुभवाच्या साधेपणातून निर्माण झालेला नाही त्यांची कविता वाटते तेवढी समजायला सोपी नाही तरीही ती सोपी वाटते याला कारण अनुभवातील सांकेतिकता होय.

माधव आचवलांनी काव्यात्म, टीकेतून इंदिराबाईची कविता तपासलेली आहे. ' जास्वंद ' या ग्रंथातील त्यांची समीक्षा– ' बाई तू अशी उभी रहा ' मोठी काव्यात्म आहे. टीकाकार हाही साहित्यिक असतोच. याची जाणीव या लेखात पटून जाते. क्षणवादी पुस्तकाशी इंदिराबाईचे नाते आहे असे माधव आचवलांना वाटत रहाते. एवढेच नव्हे तर त्यांची समीक्षा अभ्यासल्यानंतर बाईंच्याविषयी त्यांचे पुढील निष्कर्ष आहेत हे दिसून येते.

१) अनुभूतीतील स्पर्श, रस, रूप व गंधांच्या पकडलेल्या संवेदना त्यांच्या कवितेत आहेत.

२) इंदिराबाईंची कविता ही द्वैताची कविता आहे.

३) जळत्या चांदण्याचे तोल सावरणारे त्यांचे भावविश्व आहे.

४) वर्तमानकाळात उभे राहून स्थितप्रज्ञतेने केलेले भूतकाळाचे निरीक्षण व त्यातून जाणवलेला प्रवास आहे.

५) संवेदना विश्वाकडून भाववृत्तीकडे त्याचा प्रवास आहे.

६) कवयित्री स्वतःला मोडते आणि जोडते.

आचवलांच्या या टीकेतून कवयित्रीची वेदना स्पष्ट झालेली आहे. जळत्या चांदण्यासारखी आहे असे त्या वेदनेचे स्वरूप आहे. जळते चांदणे असे म्हणून या टीकेला काव्यात्मकता प्राप्त झाली आहे. त्याच्या प्रतिमेतील खोली त्यांनी जाणलेली आहे व ओंजळीत पकडलेल्या क्षणांशी बाईचे नाते आहे.

" निघताना अन् हे घे एकच
शपथ तुला तर या सर्वांची
घेऊन जा ना
उरलेली ही....हा माझा स्वर " [५०]

या चरणातून इंदिराबाईच्या अनुभव विश्वाची प्रतिमेची खोली स्पष्ट होते. भावना, कल्पना, विचार यांच्या लाटा दुःखाच्या खडकावर आदळल्या फुटून गेल्या. खडक मात्र राहिला. म्हणूनच 'एकलेपणाचा शाप घेऊन जीवनाच्या उनाड वैराणात समंधासारखी झपाटलेली इंदिराबाईची कविता आहे' असे मत आचवलांनी व्यक्त केले आहे, ते यथार्थ वाटते.

मालती किर्लोस्करांची समीक्षा ही रसग्रहणात्मक स्वरूपाची झाल्यामुळे फारशी महत्त्वाची वाटत नाही. प्रा. वा. ल. कुलकर्णी यांनी सत्यकथा, १९५२च्या अंकात – "इंदिराबाईची कविता ही विशुद्ध भावकविता आहे' [१५१] असे मत व्यक्त केले आहे. प्रा. वा. ल. कुलकर्ण्यांच्या या विधानाचा परामर्ष घेताना आपल्याला असे जाणवते की बाईची कविता ही खऱ्या अर्थाने भावकविता आहे. प्रतिमातील ताजेपणा, अचानकता, औचित्य, या गोष्टी कवयित्री विलक्षण सामर्थ्याने मांडून जाते. ते त्यांचे सामर्थ्य शेलापासून बाहुल्यापर्यन्त आपल्याला जाणवत रहाते. जीवनाचा वेध घेताना रंगबावरीत त्यांना तोल संभाळता आला नाही. बाहुल्यामध्ये सफाईदार रचना घडत गेली. पादाकुलकाचा आधार कमी झाला व वाचता वाचता त्यांची कविता ताल धरून गेली. म्हणून आलोचना, १९६५ एप्रिलमधील रंगबावरीचे परीक्षण करीत असताना अनामिक लेखक म्हणतो, "लक्षात आल्या नव्हत्या अशा गडद पण वैचित्र्यपूर्ण भाववृत्ती त्यांच्या कवितेत आहे. भारावलेली शब्दकळा जड उतरली आहे. शब्दचित्र साधे आणि सरळ स्पष्ट करताना पाला खाणारी बकरी तिची धनीन त्या मांडून जातात व अलवार मनाचे हे चाफेकळी-सारखे मुक्त चित्रण वाटू लागते." [१५२]

डॉ. अ. ना. देशपांडे यांनी इंदिराबाईंच्या काव्यातील प्रेमाविष्कार नाटकीपणापासून, नकलीपणापासून तसेच सांकेतिक कल्पनांच्या प्रभावापासून अलग आहे असे म्हटले आहे. तरीही कवयित्रीची अभिव्यक्ती स्वतंत्र आणि वैशिष्टचपूर्ण आहे असे त्यांना वाटते." [१५३]

इंदिराबाईंची कविता समिक्षकांच्या दृष्टीने पहाता ती नितांत सुंदर अशी भावकविता आहे. तिच्यात असणारे भावचित्र ध्वनीत करण्यासाठी निसर्ग चित्रांचा बाईनी वापर केला आहे. ज्या प्रतिमा त्यांनी व्यक्त केल्या त्या तरल कोमल आहेत. एवढेच नाही तर त्या प्रतिमांच्याशी त्या एकरूप झाल्या आहेत. बाईचे जग वेदनेचे जग आहे. त्यामुळे वेदनेची गीते त्यांनी लिहिली आहेत असेच आपल्याला म्हटले पाहिजे.

## वेदनेत जगणाऱ्या मीरा व इंदिराबाई

### एकच एक वेदना

भारत हा धर्मप्रणीत देश आहे. या देशाच्या ऐतिहासिक परंपरेत व्यक्तीचे

जीवन, सामाजिक जीवन, सभ्यता, संस्कृती, आचार–विचार, नीती व्यवहार या घटकांना महत्वाचे स्थान आहे. वैदिक काळापासून ते आजपर्यन्त आपण या परंपरा जपत व जोपासत आलो आहोत. आमच्या लौकिक जीवनात धर्माने, सत्य, अहिंसा, प्रेम, त्याग, सेवा, संयम, सदाचार, सत्कर्म आणि संदेश यांचा एक संदेश दिला आहे की, ज्यामुळे व्यक्तीचे व समाजाचे स्वरूप मंगलमय स्वरूपात आपल्या दृष्टीस पडते आहे. दुसऱ्या बाजूस ईश्वरभक्ती आणि आत्मचिंतन या मार्गावरून आपण जीवनाचा प्रवास करत असतो.

भारतीय समाज हा असा धर्माने, नीतीनियमाने बांधलेला असल्यामुळे एखाद्या व्यक्तीचे जीवन या घटकातच परंपरेतच सामावले जावे असे आपला समाज मानतो हिंदु संस्कृतीत विवाह हा एक संस्कार आहे. जीवनात या संस्कारास वेगळे असे स्थान आहे. विवाहबाह्य लैंगिक जीवन हिंदू समाज निषिद्ध मानतो. जर एखादी व्यक्ती अशी जीवन जगण्याचा प्रयत्न करत राहीली तर सामाजिक रोषास त्या व्यक्तीला बळी पडावे लागते. मेवाडची सून मीरा एक विवाहीत स्त्री लग्नानंतर लौकीक पतीची सेवा करण्यापेक्षा आपल्या मानलेल्या पतीस श्रीकृष्णास – धुंडाळत रहाते. लहान असताना जिज्ञासेने विचारलेल्या या बालमीरेस एका साधुने उत्तर दिले 'ही मूर्ती म्हणजे तुझा पती आहे.' व आजन्म त्याला ती पती मानत राहिली.

तिचे हे प्रेम भारतीय संस्कृतीत बसणारे नव्हते. त्यामुळे तिचे प्रेम एक वेदना ठरली. याच वेदनेचा ध्यास इंदिराबाईच्या जीवनात आपल्याला सापडतो. पतीच्या मृत्यूनंतर त्यांचे जीवनही एक वेदना होते. मीरेचा श्रीकृष्ण निदान एकाद्या छटेतून तिला भेटत होता, मिळत होता. राधेसाठी मुरलीचा आवाज होता पण इंदिराबाईना –

" अजून नाही जागी राधा
अजून नाही जागे गोकूळ
अशी अवेळी पैल तीरावर
आज घुमे का पावा मंजूळ
मावळतीवर चंद्र केशरी
पहाटवारा भोवती भणभण
अर्ध्या पाण्यामध्ये उभी ती
तिथेच टाकून अपुले तनमन
विश्वच अवघे ओठा लावून
कुब्जा प्याली तो मुरलीरव

पण इंदिराबाईच्यासाठी मात्र –

ग्रंथ संग्रहालय वर्धा
2486
दि. 3999
विषय
स्थळ प्रत

भारतीय संताची ईश्वराबरोबर असणारी ही अद्वैत भूमिका आपणास ज्ञात आहेच.

" देवा तू चांद । मी चांदणी
तू नाग, मी पद्मीनी
स्वये दोन्ही " । – नामदेव

" तू माझी माउली
तू माझी साऊली " – तुकाराम

माणसातून त्यांची सावली वेगळी काढता येत नाही. दीपातून ज्योत, शरीरातून आत्मा या साऱ्या कल्पना अद्वैतपणा स्पष्ट करतात. प्रियकराच्या अस्तित्वाकडे पहात असताना इंदिराबाईची ही अवस्था आहे. त्यांची सहजभावना आहे. त्यामुळे हिंदू स्त्रीस आदर्शवत् ठरणाऱ्या भावना व कल्पना इंदिरा संतांच्या व्यक्तीमत्वात आहेत.

" दुःख तुझे, दुःख दुझे,
वेदनेस काय कमी....
प्रीतीचे भीतीचे
शस्त्र तया लाविन मी " १५७

ही वेदनेची जाणीव आहे. त्याबरोबर –

" एक विचारू ?.....एक विचारू ?
उगाच असले प्रश्न कशाला ?
आपुल्यामधली विरामचिन्हे
कधीच गळली माहित तुजला
नकोत शंका,
नको बोलणे.....नकोच लिहिणे.....
नकोच तू अन् नकोच मीही....
हे सगळे बघ वरचे वरचे,
हवे कळाया तुला.....मलाही " १५८

" वाट पहाते तुझी अशी मी
वाटेवरि भावोत्कट होऊन,
वाटच होऊन,
वाट पहाते तुझी अशी मी " १५९

प्रियकराशी इथे अद्वैत आहे.

**मीरा व इंदिराबाई – आत्मनिष्ठ भाव**

मानव हा समाजप्रिय प्राणी आहे. त्याचा सर्वांगीण व्यक्तिमत्वाचा विकास

हा समाजात घडत असतो. त्याचे जीवन अनेक व्यक्तींच्या स्नेहसंबंधाने गुंफलेले असते. मानवाच्या जीवनात अनेक व्यक्ती येत असतात. तरीही सर्व व्यक्तीवर त्याचे प्रेम असते असे नाही. 'एखादी अशी व्यक्ती जीवनात येते की, त्या व्यक्तीवर जीवन उधळून टाकले जाते.' त्या व्यक्तीचे न मिळणे, त्या व्यक्तीची भेट न होणे, किंवा मरणाच्या आत्यंतिक अवस्थेत निघून जाणे असे घडल्यामुळे येणारे दुःख अंतःकरण चिरून टाकणारे असते.

गिरीधर गोपाळाचे न मिळणे, त्याची भेट न होणे हे मीरेच्या संदर्भात व ना. मा. संताचे निघून जाणे त्यांचा मृत्यू हा इंदिरा संताच्या संदर्भात वेदनेचा परिपाक आहे. ही कधीही न मिटणारी वेदना आहे वेलीवरून हे तुटलेले फूल आहे. या आत्मनिष्ठेतूनच त्यांची कविता साकारली आहे. त्यांच्या काव्याचे वेगळे स्वरूप आपणास या वेदनेमुळे जाणवत नाही. अन्य कवितातूनही त्यांची वेदना प्रकट होतेच.

**न भेटणारा दोघींचा प्रियकर**

भगवंताच्या भजन आणि नामस्मरणासच भक्ती असे म्हणतात. या शब्दांची उत्पत्ती आपणास 'भज' या धातूपासून शोधता येईल. नारद भक्तीस प्रेमरूप आणि अमृतस्वरूप मानतो. या भक्तीमुळे मनुष्यास सिद्धता, अमरता आणि तृप्तता लाभते. शास्त्रकार भगवानाच्या प्राप्तीसाठी चार मार्ग सुचवतात. कर्म, ज्ञान, योग व भक्ती या चार मार्गांपैकी भक्ती ही सहज साध्य असते. भक्तीमध्ये इच्छित वस्तुविषयी प्रेम व श्रद्धा असते. आचार्य रामचंद्र शुक्ल भक्तीविषयी म्हणतात, "श्रद्धा और प्रेम के योग का नाम भक्ती है। जब पूज्य भाव की वृद्धीके साथ श्रद्धाभावसे साथी की प्रवृत्ति हो, उसकी सताके कई रूपोमें साक्षात्कार की वासना हो, तब हृदयमें भक्तीका प्रादुर्भाव होता है। जब श्रद्धेय के दर्शन, श्रवण, किर्तन, ध्यान आदिमें आनंदका अनुभव होने लगे जब उससे संबंध रखनेवाले श्रद्धा के विषयोंके अतिरिक्त बातोंकी ओर भी मन आकर्षित होने लगे तब भक्ती रसका संचार समझना चाहिए।" [१५०]

गिरीधर गोपाल भेटत नसल्याची तक्रार अनेकवेळा मीरा करते. पण त्याच्याकडे पहात असताना ती भक्तीस्वरूप या नात्याने पहाते. मीरास तिचा प्रभू मिळाला की नाही हा तूर्त विवाद्य मुद्दा आहे. पण त्याच्या भेटीसाठी ती तळमळणारी आहे. इच्छुक आहे, व्याकुळ आहे. म्हणून ती त्यास विनवते.

"मीरा के प्रभु कबरे मिलोगे, पूरब जनम का साथी।"
मीरा को प्रभु दरसन दिज्यो, जनमजनम की चेली।" [१६१]

या मीराच्या शब्दातून स्पष्ट होणारी व्याकुळता, तडफड, भेटीची आराधना स्पष्ट होते. तसेच मीराबाईस गिरीधर गोपालाचे दर्शन घडले असावे

अशी शंका तिच्या काही पदावरून येते. त्यापेक्षा ज्याच्यासाठी ती एवढी वेडी झाली आहे. तो कधीतरी भेटेल एवढी शाश्वती आहे. या ना त्या स्वरूपात दिसेल एवढी ओढ आहे. पण इंदिराना ती आशा मुळीच नाही. कारण त्या स्पष्टपणे म्हणतात–

" कातरवेळेला रिकाम्या दारात
उभी मी रहात केव्हाहून
श्रमीत आतुर येशील हासत
ओढ ही मनात वागते का ?– पण–
येई घेरून थंडगार अंधार
आणखी अंतर गारठते "

यापेक्षा दुःखाची तीव्रता त्या अशी व्यक्त करतात–

" तुजवीण आता तुझ्या या संसारी
अंगाराच्या सरी वर्षतात
आत बाहेरून लागलीसे आग
तुझा घेत माग येऊ कुठे ? " [१९२]

'तो भेटेल' याची खात्री नाहीच म्हणून वेदनेची तीव्रता जास्त जाणवते.

## विरहोणीच्या नाना कळा

'प्रेम' भक्तीचे प्रवेशद्वार असे म्हटले जाते. सर्वात प्रथम भक्ती करणाऱ्या व्यक्तीच्या मनात त्याच्या आराध्य दैवताविषयी, रुपसौंदर्याविषयी रुची उत्पन्न होते. त्याच्या सौंदर्य गंगेत वारंवार डुंबायला मिळावे असे त्या व्यक्तीस वाटते व त्यातूनच प्रीतीचा जन्म होतो. त्याच्या भेटीसाठी मन तडफडू लागते. त्याच्यावर सर्व काही उधळायला मन तयार होते. त्यातच धन्यता वाटते. प्रेमाची ठिणगीच त्यास भक्तीच्या पवित्र नगरीत पोहोचविते. या चिनगारीचे स्वरूप केवढे तीव्र त्यावर अंतःकरणातील व्याकुळता अवलंबून असते.

प्रेमात दोन पक्ष असतात. मीलन अथवा विरह. मीलनाच्या सुखापेक्षा 'विरहाची' वेदना अधिक तीव्र असते. तसे पाहिले तर मानव आपल्या जीवनातील सुख सहजपणे विसरतो पण 'विरहाची' भव्यगुण तो विसरू शकत नाही. 'विरह' जीवनातील एक मूलभूत घटक आहेच. सृष्टीच्या आरंभापासून ते आजतागायत विरहाने आपली सत्ता मानवी मनावर बिंबवली आहे.

यामुळेच सूर्य आणि चंद्राचा अव्याहत प्रवास सुरू आहे. तारे अथांग आभाळात कुणातरी अज्ञाताची वाट पाहतात. अग्नि जळत रहातो. जलतुषार इकडेतिकडे टपकत राहतात. सर्वत्र एकच एक वेदना. विरहाने घायाळ झालेला कोकीळ कुहूँ–कुहूँ करत रहातो तर क्रौंच पक्षाचे क्रंदन व्याकूळ वाटते.

विरह ही प्रेमाची कसोटी आहे. विरहाच्या या अवस्थेचे वर्णन करताना डॉ. द्वारकाप्रसाद सक्सेना म्हणतात, " विरह ही जीवन की वह पवित्र स्थिती है जिसमें प्रिय एवं प्रेमी दोनों निस्छल एवं निर्मल भावसे एक दुसरेकी निकटता प्राप्त करते है। एक दूसरेकी आँखोमें समाये रहते है । एक दूसरेके हृदयमें सदैव बसे रहते है और सोते जागते, उठते बैठते, खाते पीते, हंसते बोलते, रोते गाते सभी अवसरोंपर सदैव समीप बने रहते है । यह विरह प्रेम का वह पवित्र बंधन है जिसमें बंधकर प्रेमी कभी मुक्त होनेकी कामना नहीं करता । किन्तु सदैव अपने प्रियतमको हृदयमें बसायें रखने और उनकी स्मृतीके अंदर जलते रहनेमें ही अपूर्व आल्हाद का अनुभव किया करता है । " [१६१]

सूफी कवी विरहाला प्रेम प्रवासातील एक अनिवार्य भाग मानतात. त्यांच्या मते विरहाच्या तापातच तप असते. प्रेमाची मधुर फळे चाखायची तर विरहाची वेदना भोगलीच पाहिजे. जसे चातक मेघाची प्रतीक्षा करतो, मासा पाण्याची तसेच प्रियतमाच्या भेटीसाठी आपली शुद्धी बुद्धी विसरली जाते.

मीरा भगवानच्या प्रेमाचा चटका बसल्यामुळे हरिणीसारखी घायाळ झाली आहे. तेव्हा ती म्हणते–

" री म्हारा पार निकरं गयां, सावरे मारया तीर
विरह अनल लागा उर अन्तरी, व्याकुळ म्हारा सरीर " [१६४]

मीरेच्या विरहापेक्षा इंदिरासंताचा विरह हा थोडासा वरचाच मानला पाहिजे. कारण ती ' चिरविरह ' आहे. ती सर्वस्वी पराधीन आहे. घायाळ होऊन ती इकडे तिकडे फिरते आहे. प्रियकराच्या स्मृतीने झोप उडून गेली आहे. मीराचीसुद्धा. मीरा म्हणते–

" श्याम बिना सखी रह्याणां जावां " [१६४]

तर इंदिरा म्हणतात–

" फांसातील तुझे पेच,
तुझे अंधारीचे घाव
सोडविने नि सोसणें
हेच आयुष्याचे नांव. " [१६५]

मीरा व इंदिराच्या विरहातील तिव्रतेची तुलना करायची झाल्यास इंदिरा वरच्या दर्जाच्या वाटतात. दोघींच्या विरह वर्णनात आत्मानुभूती आहे. या विरह वर्णनात शारीरिक क्लेषांचे दर्शनही घडते.

" तन मन जीवन प्रीतर बारया थारे रूप लुभावां
खाण पाण म्हणे फीका सो लागां नैन रहां मुरझाया "
" आली अमृताची लाट

आली तुझी आठवण
साठवाया रक्तामध्ये
डोळे घेतले मिटून " १६६

मानसिक क्लेषाचे वर्णणात अत्युत्कटता लाभली आहे. मीरा व इंदिरा यांच्या काही पदातील, कवितांतील हे वर्णन आज इतरत्र दुर्मिळ दिसते.

ओळी ओळीत बेचैनी, व्याकुळता आहे. प्रियकराच्या निघून जाण्याचे त्या वर्णन करतात.

" प्रभु जी कहां गया नेहठो लगाय
छोडयो म्हां विस्वास संगाती, प्रेमेरी बात जलाय
विरह समंद में छोड गयागे, नेहरी नाव चलाय
मीरा के प्रभु कबरे मिलोगे थे विणरह्याणा जाय "
" ते दिवस बहर जाईचे,
हे अभाळ भुंडे बघणे,
त्या आर्त चांदण्यारात्री,
ही काळझोप नच ढळणे,
हे होते माझे जीवन,
ही आता नुसती श्वसने " १६७

इथे इंदिराची वेदता जीव घेणी आहे. मीरा प्रियकराची वाट पहात रहाते. इंदिरांनी तिलांजली दिली आहे. मीरा त्याच्या क्षणांची गिनती करते. कुठेच ती जात नाही. कारण तो येऊन जाईल ही भीती. इंदिराचे वेडे मन काही उदासीनतेने ग्रासून जाते. खाणे–पिणे वस्त्रही तिला नकोसे वाटते.

" कुठे असेल तो स्वामी
त्या ही वस्तूचा महान
ज्यांच्या पायापाशी आहे
टाळायाचे तनमन ? " १९८
" देणे आहे एक अश्रू
ओला होईना लोचन
मूठ वाळुचं काळीज
कसे काढावे पिळून. " १९९

अशा या विरहिणीच्या नाना कळा आहेत.

## प्रीती म्हणजे सुळावरील शेज

प्रेमातील विरहाचे एक दर्शन स्पष्ट केल्यानंतर इंदिरा संतांच्या संदर्भात प्रेमविवाह विवाहोत्तर प्रेम व नंतर चिरवेदना असे टप्पे पाहिले. प्रीतीची एकूण दहा

किंवा अकरा पायऱ्या शास्त्रीयदृष्ट्या मानतात. इंदिराचे जीवन प्रेम–असे आपणास विभागता येईल का ? याचा एक विचार येथे आहे.

**अभिलाषा**

" लाजरयी ही माझी प्रीत
लाजाळूच्या रोपाहून
नको पाहू वाट तिची
तूच घेई ओळखून " १७०

**चिंतन**

" अल्लडशी प्रीत माझी
सर तिला पाखराची,
तुझ्या मनी आढळली
जागा तिला निवाऱ्याची " १७०

**स्मरण**

ती कहाणी. . . ती स्वप्ने
ती आशा. . . . ती स्मरणे
ते सारे. . . .
येते जे मनी दाटून
घुमसत जे श्वसनातून
वितळत जे नयनातून
ते सारे . . . . . .
ते सारे तुजपाशी " १७१

**गण संकीर्तन**

" प्रश्न तुझ्या डोळ्यात उभा की
घन भरीत ये घन ओथंबून,
ओठावर लखलखते उत्तर,
शब्दामध्ये कसे धरू पण ?" १७२

**उद्वेग**

" पण कसला डाग इथे,
जखमेतील रक्ताच ते,
वरून जरी नितळ निळे
आतून का भळभळते ? " १७३

**प्रलाप**

" दुःख तुझे, दुःख तुझे

वेदनेस काय कमी. . .
प्रीतीचे भीतीचे
शस्त्र तया लावित मी ? १७३"

**उन्माद**

" आता निर्जीव उजेड
आणि ओसाड उध्वस्ते
एक एकटे त्यांतून
डोळे रोवीत हिंडते. " १७४

**व्याधी**

" केव्हा कधी संपणार
माझ्या मनातली रात
किती काळ शेकोटीशी
असे बसावे तिष्ठत. . . " १७५

**जडता**

" नको टाकूस उसासा
अशी दारांत राहून,
वळचणीच्या अबोलीचा
रंग जाईल उडून. " १७६

**मूर्च्छा**

" नाही बासरीची धून,
नाही कशी वीषबाधा,
अशी कशी ही पापीण
हसे मीरा, हसे राधा. " १७७

**मरण**

" आभाळाचा शाप भयंकर
या क्षितीजाहुन . . . त्या क्षितीजावर
ज्याच्यामध्ये
तूफान नुसते गदगदणारे. " १७८

प्रीतीच्या या पायऱ्यांचे विशदीकरण पाहिल्यानंतर इंदिराच्या काव्यातील वेदना अधिक सुस्पष्ट होते. त्यांच्या काव्यात विरहासच अधिक स्थान आहे. त्यास गती आहे. जीवनातील उत्कट अनुभवाची व्यग्रता इथे स्पष्ट होते. ' दर्द दीवाना दिल ' अधिक हुरहूर निर्माण करते.

प्रीती म्हणजे सुळावरील शेज, रमणीय उद्यानाची वाळवंट करणारी व

वाळवंटाची रमणीय उद्यान करणारी दाहक तशीच मोहक शक्ती म्हणजे प्रीती. हा एकदाच ग्रसणारा चटका पण भुणभुण मात्र आयुष्याची. म्हणून प्रीती म्हणजे सुळावरील शेजच नव्हे काय? 'मीरा व इंदिरा' या दोहोंच्या संदर्भात ती सुळावरील शेज ठरली. अग्नीचा बिछाना ठरली.

**वेदनेतून साकारणारी प्रेमसमाधी**

जगातील कोणत्याही दुःखाची आग अश्रूंनी विझत नाही. तरीही माणूस दुःख मूकपणे वा उघडपणे व्यक्त करीत असतो. वेदना जपण्यातही आनंद असतो. जर आनंद नसता तर त्या वेदनेचे वारंवार स्मरण झाले नसते.

श्रद्धा आणि प्रेम यातूनच भक्तीचा जन्म होतो. ही भक्ती एखाद्या मीरेची गिरीधर गोपाळाविषयी असेल, तुकारामाची विठ्ठलाविषयी असेल तर एखाद्या विद्यार्थ्याची गुरूविषयी, तशीच इंदिराबाईची पतीविषयी. भक्ती असणाऱ्या व्यक्तीचे भक्तास उठणे, बसणे, बोलणे, चालणे, फिरणे, हसणे प्रिय असते असे आचार्य रामचंद्र शुक्ल म्हणतात. [१७९]

"लौकिक प्रेम आध्यात्मिक प्रेम के निकट की प्राथमिक स्थिती है। प्रेमकी तन्मयतामें डूबा हृदय प्रेमकोही जीवन सर्वस्व मानता है!" [१८०]

डॉ. उर्वशी सूरत यांच्यावरील विचाराचा मागोवा घेता असे जाणवते की, ही अवस्था इंदिराबाईची आहे. सुरवातीस असणारी वेदना पुढे पुढे इंदिराबाईचे भाव, जीवनचे बनून जाते. वेदनेत जगणेच त्या पसंत करतात.

"न कळता तुला, मीही
फुल एक उचलले,
तुझ्या पावलाची खूण
फुल तेथेच राहिले." [१८०]

प्रियकराची पावले सर्वमय सर्वत्र फुले वाहण्याची किमया इंदिराबाई करतात म्हणजे ही एक समाधीची अवस्थाच मानावी लागेल. स्वतःच्या दुःखातच रमून जाणे त्यांना प्रिय वाटते.

**इंदिराबाईचा आध्यात्मिक शृंगार**

'शृंगारा' स विश्वसाहित्यात महत्त्वाचे व मानाचे स्थान आहे. शृंगार हाच विश्वातील प्रथम रस आहे हे चराचर त्याच शृंगाराचा मुक्तविलास आहे. सृष्टी निर्माण करणाऱ्या विश्व निर्मात्याला 'एक पेक्षा 'अनेक' बनण्याची ओढ होती ते सर्वश्रुत आहे.

स्त्री आणि पुरूष यांच्या परस्पर आकर्षणातूनच हा संसार सजला आहे. त्याचे मूळ शृंगारात आहे. शृंगाराचा मूळ विषयच संसार आहे. त्यामुळेच मानवी

जीवनात शृंगारास विशिष्ठ स्थान आहे. ' रति ' भावातून शृंगार निर्माण होतो.

शृंगार मानवी जीवनातील एक प्रमुख अंग आहे. सृष्टीच्या आरंभापासूनच या मोहमयी आनंदाचा स्वाद लुटतो आहे. शृंगाराचा हा भाव जेव्हा ईश्वराविषयी उत्पन्न होतो तेव्हा हाच शृंगार आध्यात्माचे रूप घेतो, हा शृंगार जेव्हा अमृत सौंदर्यात दंग होतो. त्या व्यक्तीस सर्वस्व अर्पायाला तयार होतो. त्यासच आध्यात्मिक शृंगार मानतात. १८२

' वृहदाख्यक उपनिषेदात ' आध्यात्म शृंगाराचे वर्णन पुढीलप्रमाणे मिळते. -

प्रियकर प्रियतमेच्या अलिंगनात जसा स्वतःस विसरतो. तसाच आपल्या प्रिय व्यक्तीविषयी भक्त भक्ती करताना स्वतःस विसरतो. यावेळी भक्तास व्यवहार, लोकमर्यादा, कूलपरंपरेची आठवण रहात नाही. पतीच्या स्मरणाने व्याकुळ झालेल्या इंदिरा लोकलाजेची जाणीव ठेवतात, तरीही त्यांच्या मानसिक स्मरण शृंगार सुरू असतो. याच स्मरण शृंगारास आद्यात्मिक शृंगार असे म्हणता येईल.

**प्रियकरापेक्षा वेगळे जीवन नाही**

परमेश्वर किंवा प्रियकर यांच्याबरोबर भक्ताच्या किंवा प्रियतमेच्या पाच भावना असतात–

१. शांतभाव
१. हास्यभाव
३. वात्सल्यभाव
४. रतिभाव
५. स्थायीभाव

भक्त यापैकी एका भावनेस जपत असतो. प्रेमाची भावना यात अत्यंत तीव्र असते. प्रेमाशिवाय श्रद्धेशिवाय भक्ती पूर्ण होऊ शकत नाही. त्यामुळे वरील पाच भावात कोठे ना कोठे प्रेमाचे अस्फुट दर्शन घडते. प्रकर्षाने प्रेम ही भावना वात्सल्य, रति या दृष्टीने अधिक असली तरी संत मीराबाईच्या व इंदिराबाईच्या कवितेत रति ही भावना अधिक आढळते.

मीरेने रति ही भावना जपत मुरलीधरास रिझवले आहे तर इंदिराबाईनी या भावनेच्या आठवणीवर जीवन जोडले आहे. डॉ. माधव म्हणतात. " सर्वात्म समर्पणकी पूर्ण अभिव्यक्ती यहां होती है. पत्नी पतिके प्रेमकी अधिकारिणी है. उसमें उसे कोई जज नही कोई दुराव द्विभाव नही. पत्नी पति के प्यार स्नेहाधिकी आधिकारिनीभी है. सेवा भी है. और पतिपत्नी का सखा, स्वामी, प्रेमी, प्राणनाथ भी है " १८१ डॉ. माधव यांच्यावरील वचनावरून आपण निश्चित असे म्हण शकतो की, प्रियकरापेक्षा वेगळे जीवन स्त्रीला नसते. इंदिराबाई व मीरा या दोघींना ते आहे असे आपल्याला म्हणता येईल.

"विशुद्ध भक्तीही मनुष्यका सर्वश्रेष्ठ कर्तव्य है."

मीराच्या भक्तीत 'कान्तस्नेह' ओतप्रोत आहे. तिने आपल्या आराध्य दैवतास प्रियतम मानले, त्यांच्यासाठी लोकलज्जा, मर्यादा, सामाजिक बंधन, नैतिक नियम, यांचे महत्त्व मानले नाही. या ठिकाणी पण तिच्या प्रेमाचा उत्फूल विहार होता. सर्वात्म समर्पणाची भावनाच होती. शरीराने यम-नियम ही ती मानत नव्हती. प्रियकरापेक्षा वेगळे जीवन तिला दिसत नाही.

इंदिराबाईच्या काव्यात पतीभक्ती ओतप्रोत आहे. आपल्या प्रियकरासच त्यांनी आराध्य दैवत मानले. लोकलज्जा, मर्यादा, सामाजिक बंधन, नैतिक नियम यांचे महत्त्व मानून त्या त्यांच्या पावलावर आत्मार्पण करत्या झाल्या. शरीराचे धर्म विसरल्या पण त्याच्यासाठीच जगल्या, वेदना जपत राहिल्या.

आपल्या प्रियकरासाठी सर्व गोष्टींची, सुखांची आहुती देऊन जगणे महत्त्वाचे असते. स्वतःचे अस्तित्व विसरून त्याच्या रूपात दंगून जाणे महत्वाचे असते. तात्पर्य- केवळ समर्पणाची भावना असायला हवी. ती भावना इंदिरा व मीरेच्या काव्यात आहे.

"मैं तो गिरीधर के घर जाऊं
जहां बैठावे तितही बैठू,
बेचे तो बिक जाऊं
मीरा के प्रभू गिरीधर नागर,
बार बार जाऊं" १८

"एका घोटात गिळून
पाय रस्त्यावरी यावे
आणि अुरल्या रस्त्याचे
रस्तेपणच संपावे" १९

## प्रियकर- अज्ञात वाटेचा प्रवासी

मीरा व इंदिराबाई, दोघींचा प्रियकर दोघांच्या जवळ नाही. तरीही तो त्यांच्या अतिनिकट आहे. ज्याच्यासाठीच हे आपले जीवन आहे असे दोघीनी मानले, तो अज्ञात वाटेचा प्रवासी होता. तो कधी भेटेल हे मीरेस माहित नव्हते, तर तो भेटणार नाहीच याची जाणीव इंदिराबाईना होती.

मीरास थोडीफार आशा, त्याच्या दर्शनाची इंदिराबाईना संपूर्ण निराशा, त्याच्या न मिळणाऱ्या दर्शनामुळे. तरीही गिरीधर गोपालाच्या घरी आपण जातो. तो आपणास भेटला, त्याचे आपणास दर्शन घडले असे मीरा म्हणते. प्रियकराच्या वस्तू त्याची पदस्पर्शाने भारावलेली भूमी, हीच त्यांची निशाणी असे इंदिराबाईना वाटते. मीरेच्या काव्यात त्यामुळे थोडाफार आशावाद आहे पण इंदिराबाईच्या

काव्यात मात्र पूर्ण निराशावाद, प्रियकराचे स्मरण–

" न कळता तुला, मी ही
फूल एक उचलले
फूल पावलाची खूण
फूल तेथेच वाहिले. " १८६

प्रियकरासाठी फूल उचलावे आणि जाणीव व्हावी की तो तर अज्ञात वाटेचा प्रवासी आहे. त्यावेळी तेच फूल त्याच्या पावलाची खूण असेल तिथे वहावे. इंदिराबाईचे दु:ख इथे जीव घेणे आहे.

## स्त्री हृदयातील मार्दव, अर्तता, वेदना, भक्ती

**१) मार्दव** : पुरुषापेक्षा स्त्री ही जात्याच अधिक संवेदनाशील असते. तिची प्राकृतिक व मानसिक रचनाही अशीच असते. त्यामुळे कवयित्रींच्या काव्यात मार्दवता अधिक असते असे म्हटले तर वावगे होणार नाही किंवा ठरणार नाही. ' प्रेमा ' च्या पायऱ्या पहात असताना ' जडता ' ही अवस्था आपण पाहिली. त्यात ती एवढी व्याकुळ, कोमल झालेली असते की, तिला दुसरे कांही सुचत नाही. तिच्या मनातील हे मार्दव तिच्या काव्यात उमटल्यास नवल नाही. स्त्री मनाचा हुंकार हाच मुळी मार्दव असतो.

" म्हा मोहणारो रूप लुभाणी
सुंदर बदन, कमलदल लोचन
बाँकाँ चितवन णेंणाँ समाणी
जमणा किनारे कान्हा धेनु चरावां,
वंशी बजावां मीठा वाणी
तनमन गिधरपर वारां
चरण कमल विलमाणी "

स्त्री हृदयातील मार्दवामुळे श्रीकृष्णाचे वर्णन असेच लोभसवाणे चित्रीत झाले आहे.

" हसरूसव्या लक्ष सरी
ओघळत्या गालावर
त्यावरती तर्जनीने
रेखिलेस आर्तस्वर " १८७

कमालीचे मार्दव हे इंदिराजींचे वैशिष्टय आहे.

**२) भक्ती** : प्रेमातून निस्सिम भक्ती उद्‌भवत असते. भक्त सारे काही अर्पण करायला तयार असतो. आपल्या प्रिय व्यक्तीच्या पावलांवर त्यासाठी मरण पत्करावे लागले तरी पाऊल टाकायची तयारी असते.

" मीरा बैठी महलमें, अुठत बैठत राम,
सेवा करस्यां साधू की,
और दूजो न काम ॥ १ ॥
बिसका प्याला पी गई रे,
भजन करे अुस ठर,
थांरी मारी नां मरूं,
राषण हारों और ॥ २ ॥ " [१८८]

" ऐकून घेणारा. . . तू,
समजून घेणारा. . . तू,
तुझ्याचपाशी म्हणून वागले,
म्हणून बोलले. . .
अुगाच काही खुळे भाबडे
मनमोकळे. . .
अर्थशून्यही. " [१८९]

३) **आर्तता** : तो येईल असं वाटत होतं, पण आला नाही. दिसेल असं वाटत होतं, पण दिसला नाही. निदान त्याचा साद तरी ऐकू येईल. पण छे, तो नाही.

" आज अखंड मी जागी
रात्र भरूनी डोळ्यात. " [१९०]

सारी रात्र तळमळून काढली.

" अेका जन्माच्या शेवटी
डोळे झाकून धरते
सारे सारे विसरून
वाट पहात रहाते. " [१९१]

डोळे झाकून सारे आयुष्य, स्वतःस विसरून वाट पहाणारे आर्त जीवन वरील शब्दात कवयित्रीने उभे केले आहे.

४) **वेदना** : इंदिराचे आयुष्य ही एक वेदनाच आहे. ( स्वतंत्रपणे त्याचा विचार व विस्तार अन्यत्र मांडला आहे. )

" अजूनही जसे तसे
बोल तुझे श्रवणात
आणि नयनीचे भाव
अुभे नीला रोहिणीत " [१९२]

" आले लोचनात पाणी

पाहुन ती वेडी ओढ
आले ओठावरी हांसू
पाहुनी ते वेड वेड " [१९१]

**मीरा – व्यवहारात प्रेम मान्य नाही**

" आयी है फस्ले बहार आह कोई क्या करे ।
जब नये पहेलू मे यार आह कोई क्या करे ।। "

प्रियकर सन्निध न आला तरीही बेचैन वाटून ' कोई क्या करे ?' असे होऊन जाते. तर दैवी प्रियकराने हात पकडल्यावर संसाराची पर्वा कोण करणार? आणि तरीही मीरा प्रत्यक्ष भगवंताला देखील ' मी तर परक्याघरची नार – माझ्या भरवंशावर राहू नका ' असे बजावायला चूकत नाही. ती जगापुढे कलंदर म्हणून उभी राहू इच्छित नाही. कल्पनाविलास आणि भाषा वैभव यांची करामत करणारी कवयित्री म्हणूनही ती जगापुढे उभी रहात नाही. अलौकिक ईश्वरी सौंदर्याने आणि प्रेमाने मीरा वेडावून गेलेली असली तरी एक कुलस्त्री या नात्यानेच ती जगापुढे उभी आहे आणि हेच मीराच्या विरहवेदनेचे, इष्काचे सौंदर्य आहे. [१९४]

" मीरा का विरह दिव्य भी है और पार्थिव भी। उसे भक्ती भी कह सकते हैं तो प्रेम भी। " [१९५]

मीराचे प्रेम तिच्या दृष्टीने उदात्त असेलही पण ते व्यावहारिक नाही. सामान्य समाजाची त्या प्रेमास कदापिही मान्यता मिळाली नाही. मीरा ही विवाहित होती असे असताना ती लौकीक पतीस दूर ठेवून त्या मुरलीधराचा वेध घेते हे व्यवहारात बसणारे नव्हते.

त्यामुळे मीरेच्या प्रेमात अडथळे आले. विषाचा प्याला प्राषण करावा लागला. सर्पाची पेटी भेट आली. या साऱ्या घटना तिच्या प्रेमास झालेल्या सामाजिक विरोधातूनच होत्या.

**इंदिरा–व्यवहारातून अध्यात्माकडे**

इंदिराचे प्रेम व्यवहाराच्या चौकटीत बसणारे आहे. सामाजिक नीती-नियमांची त्यांनी जपणूक केली आहे. त्यामुळे मीरापेक्षा इंदिराचे प्रेम समाजास रूचणारे आहे.

मीरा अध्यात्मातून व्यवहार पहात होती तर इंदिरा व्यवहारातून अध्यात्माकडे झेपावताना दिसत आहेत.

" कुठे फुलला मोगरा,
इथे दर्वळ पोचला,
येणारा तो येत आहे,
खूण मिळाली मनाला. " [१९६]

प्रियकराचे रूप अध्यात्मिक आहे. तो ईश्वर वाटतो आहे. त्याच्या पावलांचा सुगंध कधीच येऊन पोहोचला आहे. त्या गंधावरून त्याच्या आगमनाची खूण मनास पटते आहे.

" डाव्या पापणी नको गं,
अशी वाजवू नौबत,
अरे अधिऱ्या हृदया,
नको धावू धडाडत. " १९६

त्याचे येणे निश्चित आहे. डाव्या डोळ्याची पापणी ते स्पष्ट करून गेली आहे. सुखाला सामोरे जाताना अधिऱ्या हृदयांची प्रियतमा धडाडतच जाते आहे.

" उन्हे भेटती आकाशा,
वारा भेटे अवकाशा,
तशीच ही आहे भेट,
व्हाना बाजूलाच कशा " १९६

इंदिरांचे इथे व्यवहारातून अध्यात्माकडे जाणे आहे. वाऱ्याने आकाशास भेटणे तशीच ही प्रियकराची भेट. तो येणार त्या भेटीत निश्चित आवेग आहे. सहजासहजी येणार. मग बाजूस याच का ?

इंदिरांचा व्यवहारातून अध्यात्माकडे आलेला प्रवास विस्तृतपणे इतरत्र पाहिला आहे. तरीही एक गोष्ट सूचित होते की, इंदिरा, प्रियकराची आळवणी करताना दिसतात. पुढे पुढे ही विनवणी अध्यात्मिक रूप धारण करते.

## विवाह व प्रेम यांची सांगड

विवाह व पतीवर प्रेम, विवाहोत्तर प्रेम हे इंदिरांच्या संदर्भात महत्त्वाचे. इंदिरांचे प्रेम विवाह – विवाहोतर प्रेम असे रूप आहे. लग्न झाले ते सुद्धा प्रियकराशी. विवाहाच्या दृष्टीने त्या पूर्ण यशस्वी झालेल्या आहेत. मीरा या बाबतीत अपयशी ठरली. इंदिराबाई नाही. इंदिरेना सर्व काही मिळाले, जीवनात जे हवे होते ते त्यामुळे त्यांच्या काव्यात सर्व आहे.

एक घरंदाज, शालीन, पतिव्रता, गृहिणी चिमण्यांना भरवणारी पक्षिणी, प्रियकरावर रागावणारी मानिनी, भल्या पहाटें वाट पहाणारी अभिसारिका, वेदनेने व्याकूळ झालेली तेजस्विनी.

### अभिसारिका

" निघते जेव्हा
तुझ्याकडे मी येण्यासाठी,
आणि पहांटे

उषासखी तर चतुर नेमकी,
घेऊन येते मेणा. " १९७

**प्रियतमा**

" सुखावली वादळात
तुझ्या स्पर्शाची जाणीव
मृगजळाच्या तळाशी
तुझ्या प्रीतीचा आठव. " १९८

**गृहिणी**

" किती उशिर लावाया
अेक कुंकवाचे बोट. " १९९

**मानिनी**

" हसरूसव्या लक्ष सरी
ओघळत्या गालावर
त्यावरती तर्जनीने
रेखिलेस आर्त स्वर " २००

**संजिवनी**

" मावळतीला दार घराचे
शिणत्या जीवा कधी विसावा
अुभे राहुनी देहलीवरी
नक्षत्रांना निरोप द्यावा " २०१

**तेजस्विनी**

" विस्मरते त्रिभुवन मी
स्मरते पण हे लाघव,
आदी ना अंत असे
गोकुळचे क्षण वैभव " २०२

**पक्षिणी**

" बाळ आहे कडेवरी
हाती घेऊनिया ताट
किती वेळ वाट पाहू
तुझी आता अंगणात " २०३

**प्रतिक्षिणी**

" जन्माचा हा कारावास,

कधी संपेल कळेना,
श्रांत मिटल्या लोचना
दीस–रात्र अुमगेना. " [२०४]

**जोगिणी**

" अशा त्याच्या शब्दासाठी
माझी अुघडी ओंजळ,
शब्द शब्द साठवितो
जसे मेघांना आभाळ. " [२०५]

**निसर्गातून वेदना**

इंदिराबाई आपले प्रेम व वेदनांचे प्रकटीकरण करण्यास अनेकवेळा निसर्गाचा आश्रय घेतात. त्यांची या संदर्भाततु लना करावयाची झाल्यास विश्वकवयित्री महादेवी वर्मांशी आपणास करता येईल. प्रख्यात हिंदी कवयित्री महादेवी वर्मा आपल्या आराध्य दैवतांकडे पहात असताना निसर्गातून पहातात.

" जहां है निद्रामग्न बसंत,
तुम्ही हो वहाँ सुखा अुद्यान,
तुम्ही हो निरवता का राज्य,
जहां खोया प्राणों ने ग्यान. " [२०६]

'ही निसर्गदृश्ये त्यांना वारंवार आकर्षित करतात. जणू ती त्याना सांगतात, ' ज्यांचा तुम्ही शोध घेत आहात तो पहा माझ्यात आहे, ' अंतरबाह्य सर्वत्र निसर्गात आराध्य दैवताचाच आभास महादेवी वर्मांना होतो आहे.

असा आभास, असा साज, असे खुणावणे, निसर्गातून आम्हास इंदिरांच्या काव्यात जाणवते.

" विहीरीच्या तळी खोल,
दिसू लागले ग भिंग,
मन लागेना घरात
कधी येशील तू सांग " [२०७]

विहिरीच्या तळाशी प्राणसंख्याचे दर्शन व्हावे ह्या दृश्यातून कवयित्रीचे व्याकुळपण व अगतिक अवस्थावरील चरणांत इंदिराबाईनी स्पष्ट केली आहे.

" रंग रंग हे भिनती,
मीच होतसे इंद्रधनु अन्
तुझ्या जिवाच्या आकाशावर
अशी सुरंगा रहाते रेळून " [२०८]

निसर्गातील रंगाचे इंदिराबाईना आकर्षण आहे. तरीही त्या रंगाच्या

आकर्षणातून त्या इंद्रधनू बनतात. प्रियकराच्या बाहूबर विसावतात. निसर्गातून जशी प्रीती आहे तसेच निसर्गातून वेदनाही.

" घुसमटे श्वास, जाई
देह दुकुलाचे भान
वाटे मला आता व्हावे
त्याच वादळा स्वाधीन " २०९

वादळाच्या स्वाधीन होणे त्याना कमालीचे प्रिय आहे.


" या मुग्ध जिवांचे भान गाढ हळुवार
सागरा, तुला का कधी तरी कळणार ? " २१०

स्त्रीचे मन, पुरुषास कसे कळणार अशी तक्रार त्यांचे स्त्रीमन करते. तरीही इंदिराबाईची वेदना निसर्गातून प्रकट होते. ' मानव निसर्गाचे एक उपकरण आहे' निसर्ग मूळ. त्यातून मानवाची निर्मिती. मातीशी मानवाचे नाते चिरकालीन आहे. मातीची ओढ तो विसरत नाही. मातीशिवाय तो जगूच शकणार नाही. लहान पोर जसे आईकडे झेपावते, तसाच मानव निसर्गाकडे जातो, पहातो त्यामुळे निसर्गाचे एक उपकरण म्हणजे मानव.

या निसर्गाचा हुंकार इंदिराबाईचे कवीमन हळुवारपणे टिपते. त्याचा विस्तार त्यांच्या निसर्गकाव्यात पहायचा आहे.

**स्मरणातून जगणे**

स्मृती या लहरी अतीथीसारख्या असतात. स्मृती या वारूळातील मुंग्यासारख्या असतात. आयुष्य जेव्हा उध्वस्त होते तेव्हा मनुष्य हातातील मातीतून जीवन जगतो. त्या मातीकडे पहाणे स्मरण जपणे त्यास प्रिय असते. स्मरणात खरोखर जगंजगत असे म्हटले पाहिजे.




स्मरणाचे स्थूलमनाने असे प्रकार मानतात. प्रियकराच्या निघून जाण्यानंतर, मृत्यूनंतर इंदिरांच्या जीवनात तसे काहीच उरले नाही. जुन्या गोष्ठींची,

वस्तूंचे, सणांचे अनुभवलेल्या उत्कट क्षणांचे स्मरण करणे हेच इंदिरांच्या जवळ होते. त्या स्मरणातून त्यांना प्रियकराची मानसिक मूर्ती उभी करणे शक्य झाले. त्या जगल्या त्या स्मरणातून –

**वस्तूस्मरण – उशी**

" ती कहाणी . , . . ती स्पप्ने
ती आशा . . . . ती स्मरणे
ते सारे . . . .
येते जे मनी दाटून
धुमसत जे श्वसनातून
वितळत जे नयनातुन
ते सारे . . . .
ते सारे तुजपाशी. " २११

" पेन मुलायम हिरवट राशी,
गडद जांभळे नाजूक पाकीट,
पटचावरचा राजवर्ख अन्
गहन रुपेरी घडयाळचौकट. " २१२

**शारीरिक स्मरण**

" बाधा झिमझिमली काचेवर,
अर्थ धुमतसे शब्दा सोडून
केविलवाणे दोनच अश्रु ,
ओठ कोरडे गिळती त्रिभुवन. " २१३
" माझ्या चंद्रकळेचा पदर
ज्यांच्यावर अुमटले आहेत
तुझ्या हाताच्या चुण्यांचे
काळे तरंग – " २१४

**मानसिक स्मरण**

" आणीक तुझिया लाख स्मृतीचे
खेळवीत पदरात काजवे,
अुभे राहूनी असे अंधांतरी
तुजला घ्यावे, तुजला घ्यावे " २१५
" म्हणूनीच येता रात्र
मन जाई घाबरून

भयभीत सशापरी
बसे दडून लपून " २१६

**इंदिराचे मराठी कवितेतील स्थान**

इंदिरा संतांच्या एकूण कवितांचा विचार करता सहवास ते बाहुल्या असा त्यांचा काव्यप्रवास लक्षात घेता इंदिराबाई जवळ जवळ पस्तीस वर्षे लिहित आहेत. अनुभूतीतील स्पर्श, रूप, रस, गंधाच्या संवेदना आपल्या कवितेत त्यांनी मांडल्या आहेत. स्मृतीत जीवंत झालेला भूतकाळ हाच त्यांचा वर्तमानकाळ आहे. म्हणून माधव आचवल यांनी इंदिरा संतांची तुलना पाश्चात्य कवी आणि कवयित्रीच्या बरोबर पुढीलप्रमाणे केलेली आहे.

मार्सेल पुस्त या कवींच्याप्रमाणे इंदिरा संतांच्या कवितेत क्षणवाद आहे. मालारमे जसा क्षणाभोवती फिरत असतो तशा इंदिराबाई संत 'प्रतिभेचा' फास क्षणाला टाकून पकडतात. पेटत्या क्षणाला पकडणारी व्हर्जिनिया उल्फ या कवयित्रीसारखे त्यांचे कविता विश्व आहे. तात्पर्याने साऱ्यांचे प्रयत्न कालाची नवीन जाणीव पकडून तिच्यातून जीवनाचे दर्शन घडविणे. २१७

गतकालातील जमा झालेल्या अनुभूती व दुसऱ्या बाजूला हेतूशून्य भविष्य यांना शब्दांकित करतात. स्वप्नात भिजलेल्या स्मृतीवर अनंताची छाया पकडत रहातात. रंगाच्या प्रत्ययकारी जाणीवेत त्या मिसळून जातात. तरीही काळ्या रंगाची छटा अधिकपणे त्यांच्या गोठल्या स्वप्नाला स्पर्श करताना जाणवते. मरणाच्या गंधाची त्यांना ओढ आहे. पण जळत्या चांदण्याचे भावविश्व आहे. स्मृतीच्या आणि अंताच्या बदलत्या जाणीवेबरोबर त्या भूतकाळाला वर्तमानकाळात खेचतात. बाईची कविता कालची जाणीव देत रहाते. त्याचवेळी वर्तमानाच्या पडद्यावर पडणारे चित्र विलक्षण सामर्थ्याने शब्दांकित करते आणि तोल सावरत भावविश्वाच्या दर्शनातून उत्कट अनुभूती देवून जाते. त्यामुळे त्यांची कविता स्वभावतः अद्वैताची आहे. शांत, मंद, स्थिर, अशा स्वरूपाची त्यांची कविता नाही.

अनुभव घेण्याच्या ज्या पद्धतीने त्यांचे व्यक्तीमत्व घडले आहे त्याचा बोध घेतला तर बाईचे एकूण व्यक्तिमत्व आपल्याला बघता येते. इंदिराबाईचे व्यक्तिमत्व अत्यंत आत्मनिष्ठ व आत्मकेंद्रित आहे. जीवनातला सारा आनंद, दुःख त्यांचे स्वतःचे होऊन जाते. दुसऱ्याचे दुःख किंवा भावना त्या स्वतःच्या प्रकृतीत सामावून घेतात. त्यांचे अनुभव विश्व हे एका संवेदनशील स्त्री मनाचे टिपलेले आहे. सांकेतिक स्वरूपात जाणवणारी भाववशता वर्तमानाच्या स्मृतीत जाणवणारा क्षण, भूतकाळ जपण्याची वृत्ती, बारीक सूक्ष्म कशिदातून परिणाम साधण्याचे कसब, दुःखाचे पहाड सहजतेने झेलण्याची शक्ती या सर्वांतून त्यांचे स्त्रीमन सतत जाणवत रहाते. वस्तुतः हे

त्यांचे स्त्रीमन घरकुलात रमलेले आहे. पुस्तकात खुणेसाठी घालून ठेवलेल्या मोरपिसाच्या स्पर्शाने ते थरथरते. प्रियकराला सामोरे होताना पाताळाची घडी मोडण्याच्या कल्पनेने हरखून जाते. अक्षरांच्या वळणाने हेलावते. ज्या भावविश्वात त्या उभ्या आहेत ते सारे भावविश्व त्यांनी शब्दांकित केले आहे. तत्वचिंतन वा कल्पनेच्या पातळीतील अनुभव त्यांना स्पर्श करू शकले नाहीत. त्यांच्या प्रत्येक अनुभवाला संवेदना शरीर आहे व ते त्यांना स्पर्श, रूप, गंध यातून जाणवते. हे संवेदना विश्व इंदिराबाईच्या कवितेत प्रतिमा म्हणून येते. प्रतिक म्हणून नव्हे पण बाईच्या संवेदना विश्वात व त्यांच्या जाणीवेत हे अंतर नसते. त्यांचे हे अनुभव इतके उत्कट आहेत की रसिकालाही त्यांचे अनुभव अगदी निकटचे वाटू लागतात. रसिकाला त्यांच्या प्रतिमा भारून टाकतात.

इंदिराबाईच्या काव्यात प्रवाहात स्वत:ला झोकून देणारी गती आहे. त्यांच्या प्रतिमा निसर्गातून उतरल्या आहेत. निसर्गाशी त्यांचा अखंड संवाद चालतो. त्यांच्या व्यक्तिमत्वाचा निसर्गरूपाचा नि:शब्द खेळ मानवतो. त्यांच्या कवितेत येणाऱ्या प्रतिमाकडे बारकाईने पाहिले तर तो एक बाईचा निसर्ग आहे. डोळ्यासमोर दिसणारा नाही तर डोळ्यामागचा आहे. आपल्या भाववृत्तीच्या स्पंदनाचे प्रतिबिंब त्यांच्या या निसर्गरूपात आढळते. सलगपणे त्यांची जर कविता वाचली किंवा त्यांच्या जाणीवांचा आतापर्यन्तचा शोध घेतला तर त्यांच्या काव्यातील शब्द, शब्दसमूह त्यांच्या काव्याची बंदिश रचना पाहिल्यानंतर हे भावकाव्याते घटक अत्यंत निकटतेने एकमेकात गुंतलेले आहेत. असे जाणवत राहते.

जीवनात अनेक अनुभव आपणाला येतात. कल्पनेने जाणवलेले तर काही स्वत:ला आलेले काही वैचारिक स्वरूपाचे असतात. पण या सर्वांचे एक संमिश्र स्वरूप आपण व्यक्ती म्हणून भोगत असतो. एखादा अनुभव कोणत्या तऱ्हेने घेतला यावर त्याची सारी गुणवत्ता अवलंबून असते. अशा अनुभवाशी बाई पूर्णत: प्रामाणिक राहिल्या आहेत.

इंदिराबाई संत यांच्या काव्याचे टप्पे अभ्यासाच्या सोईसाठी त्यांचे प्रसिद्ध झालेले सहवास, शेला, मेंदी, मृगजळ, रंगबावरी, बाहुल्या हे काव्याचे टप्पे मानता येतील व त्यांच्या काव्यलेखनातील ते प्रगतीचे टप्पे आहेत. संत पती-पत्नींचा पहिला कवितासंग्रह 'सहवास' वाचताना इंदिराबाईच्या कवितेत फारसे काही हाताला लागत नाही. पण पुढील सर्व कवितासंग्रहापेक्षा हा संग्रह निराळा आहे. तो वाचल्यानंतर हा कवितासंग्रह इंदिराबाईचाच आहे हे मान्य करायला मन तयार होत नाही. तरीही या संग्रहाचे महत्त्व बाईचा काव्यप्रवास कोठून सुरू झाला हे दाखविण्यापुरते आहे. सांकेतिकता, शब्द, शब्दसमूह, कल्पना यांचे यांत्रिकी सूत्र या संग्रहात आहे. या कामासाठी रचना केलेली इंदिराबाईच्या प्रारंभीक कवितेत

आपल्याला जाणवते.

'शेला' या संग्रहाला स्वतःची वैशिष्ठ्ये लाभलेली आहेत. भाववृत्तीचे कसब इंदिराबाईच्या या कवितेत आपल्याला जाणवत रहाते. कदर करायला, प्रियकराला विनवताना किंचीत पुढे जाणारी, मागे सरणारी, लाजरी व थोडीशी धीट अशी प्रियतमा या संग्रहात आढळते. भाववाचक विशेषणे, सांकेतिक उपमा याही संग्रहात त्यांनी वापरल्या आहेत. स्थूलतेतून सूक्ष्मतेकडे त्यांचा काव्यप्रवास सुरू झालेला आहे. तरीही 'शेला' या संग्रहात सहवास या संग्रहातील काही पुनर्मुद्रीत कविता आलेल्या आहेत.

स्थूलातून सूक्ष्माकडे जाणाऱ्या भावनाशयाच्या घटकांची बंदीशी पहायची असेल तर

"अडखळे लिहिताना
हात कधी अवचीत
आणि निरखून डोळे
पाहातात अक्षरांची
कानावेलांटीची डौल
मोड तशी अक्षरांची
कधी द्यावी कधी नाही
रेघ अक्षरावरची
नकळत उमटली
कुणाचीही काय तऱ्हा
इवल्याशा रेषे माजी
भावजीवनाचा झरा
नव्हतीच अक्षेरे ही
स्मृतिसुमनांचे झेले
एका एका अक्षरात
भावगंध दर्वळे
म्हणूनिच लिहीताना
अवचित थांबे हात
धुके तसे आसवांचे
उभे राही लोचनात."

वैयक्तिक जीवनातल्या एका प्रसंगाभोवती ही कविता गुंफली आहे. पहिल्या दोन ओळीत ती घटना सांगितली. व पुढील तीन कडव्यात त्या अक्षरातूनच जाणवणारे कुणा एकाचे व्यक्तिमत्व स्पष्ट केले. अभिव्यक्तीतील हे टप्पे

बघितल्यावर अनुभवाची बंदीशी लक्षात येते. सूक्ष्म जाणीव सखोल गहिरी भाषा. मनावर परिणाम करीत रहाते. मध्यभागी प्रमुख कल्पना व तिच्याभोवती संवादी कल्पना असेही त्यांच्या कवितेचे सूत्र आहे.

वादळाच्या स्वाधीन होणारी ही कवयित्री प्रत्येक सूत्र पकडून अनुभवाचे दर्शन घडविते. या सूत्रात सखोलता आहे म्हणून माधव आचवल म्हणतात की, 'बाईचे सारे काव्य ही एक लावण्याची ठेव आहे.' 'शेला' या संग्रहात इंदिराबाईच्या खऱ्या कवितेला सुरूवात झाली. त्यांच्या पुढील प्रगतीच्या खुणा दिसून आल्या. सूक्ष्मतेकडे त्यांचा प्रवास सुरू झाला व स्वतःच्या कवितेचा शोध घेऊन त्यांचा 'मेंदी' हा संग्रह आपल्यासमोर आला.

वर्तमानाच्या उंबरठ्यावर तोललेला भूत आणि भविष्याचा कालभाग या दोन टोकात ताणलेली भाववृत्ती हा इंदिराबाईच्या कवितेचा स्थायिभाव आहे. वर्तमानातील क्षणाच्या या दोन टोकापासून बदलत असलेल्या अंतराने व त्यामुळे बदलणाऱ्या ताणाने या भाववृत्तीतील छटा कवितेत आल्या आहेत. जे शब्दात पकडणे केवळ अशक्य आहे. त्या भावछटांना त्यांनी शब्दाचे शरीर दिले आहे. जीवनाचे भकास पुस्तक वाचत वाचत आठवणींच्या मोरपिसांना कुरवाळीत रहाण्याची हळवीवृत्ती त्यांच्या कवितेमध्ये आहे. एकदा अनुभवलेल्या गहिऱ्या अनुभूतीची चटक त्यांच्या जीवाला लागलेली व आज हे सारे खोटे आहे याची जाणीव झाल्यामुळे जीवाची होणारी तगमग त्या व्यक्त करत रहातात. जुन्या स्मरणाने शरीराला बधिरता येते. तोल सावरला जाईल किंवा नाही असेही वाटत रहाते. तरीही वर्तमानाच्या उंबरठ्यात उभे राहून जीवनाकडे स्थितप्रज्ञेने पहाण्याचा बळेच केलेला प्रयत्न व अगतिकतेने हे होत नाही या जाणीवेने कोसळून पडतात. मनाला आलेला थकवा त्यांनी शब्दांकित केला आहे. त्यांच्या कवितेच्या भावनाशयाची विस्तार कल्पना देता येईल. पण खोलीची देता येणे अवघड आहे.

शब्दांचा सामान्य व्यवहारातील उपयोग आणि काव्यातील उपयोग यातील फरकाचे स्वरूप आपण आधी बघितले आहे. 'शेला' या इंदिराबाईच्या पहिल्या काव्यसंग्रहातही त्यांची शब्दाबद्दलची समज दिसते. ज्यावेळी संवेदनाचे अनुभव त्यांना कल्पनारम्य अशा स्वरूपात जाणवत होते. तेव्हाही अर्थ, नाद व सूचन या शब्दांच्या शक्तीच्या उपयोगातून त्यांना भाववृत्तीचे वाहन करण्याचे त्यांचे प्रयत्न दिसत होते. लालित्य हा त्यावेळच्या त्यांच्या कवितेचाही एक प्रधान गुण होता. कमितकमी हालचालीत एखादी कृती घडविणे व व्यर्थ गेलेला काळ श्रम किंवा उद्देश अशा हालचालीत यत्किंचितही नसणे ही लालित्याची एक कसोटी. त्यादृष्टीने-

"जी तुझ्यासाठी आली अन ओघळली
स्पर्शाने तुझीया फुलली, खुलली, हसली

ती आता आसवे कुठे जाहली गुप्त
जी ढाळून व्हावे दग्ध चित्त हे शांत. " २१८

किंवा

" तुझी तुफाने तुझीच शांती
तुझीच भीती तुझी भुलावण
तुझेच घ्यावे रूप मनाने
आणीक व्हावे तुला समर्पण. " २१९

आणि पुढे –

" प्रश्न तुझ्या डोळ्यात उभा की
घनभारीत ये घन ओथंबुन
ओठावर लखलखते उत्तर
शब्दामध्ये कसे धरू पण ? " २२०

या ओळीतील शब्दांच्या उपयोगामधील योजकता व काटकसर लक्षात घेण्याजोगी आहे. जेथे दोन शब्द जरूर आहेत तेथे तीन किंवा एक सापडणार नाही. आणि त्या दोघाशिवाय चालणार नाही. शब्दांना अर्थवाही करण्याचे अनेक दिशांनी होणारे प्रयत्न इंदिराबाईच्या कवितेत आढळतात. एखाद्यावेळी व्यवहारातल्य शब्दसमूहांच्या मान्य झालेल्या अर्थाकृतीपुढे एका नवीन अर्थाचा बिंदू निर्माण करीत त्यांच्याकडे त्या शब्दसमूहाला त्या घेऊन जातात.

" मी सावरले मन सावरला आंचल
अन् पुढे निघाया उचले हे पावुल
अडखळे उंबरा होवुन काया लुळी
कोसळे खालती काही न कळे मुळी. " २२१

किंवा

" जीवाचा करून धूप
तुझभवती घमघमते
हे असले का कळते " २२२

या शेवटच्या ओळीत एका विलक्षण हतबलतेचा प्रत्यय येऊ शकतो तो त्यामुळेच. शब्दांच्या विस्तारणाऱ्या किंवा आकुंचित होणाऱ्या नावाच्या जाणीवपूर्ण उपयोगातून इंदिराबाई आपले परिणाम साधतात.

" ही आता घरची सताड उघडी दारे
बेफाम धावती उभे त्यातुनी वारे
ते पहात तांडव उभी रहाते येथ
दडपून मनातील मनात झंझावात " २२३

पहिल्या दोन ओळीमधील विस्तारणाऱ्या 'आ' कारात ध्वनीच्या उपयोगाने दारे जास्तच उघडी वाटतात व नंतरच्या ओळीतील खेचलेले 'अ' कार त्यामुळे बेफाम वहाणाऱ्या तांडवात सापडलेल्या 'मी' ला जास्त स्थिर करतात. कधी अगदी साध्या शब्दातून एकाद्या गहिऱ्या अनुभवाचे सूचन मिळते.

" नाजूक भित्र्या डाळींबीची
लालभडक अन् तशी धिटाई," २२४

आणि कधी शब्दांच्या स्वतंत्र अशा अर्थापेक्षा शब्दांच्या विशिष्ठतन्हेच्या गुंफणीतून भाववृत्तीची लय जाणवते.

" कोवळ्या अंधारी दर्याच्या किनारी
बसते तशीच एकटी एकटी
एकटी कशी तुझ्या विचारात रंगता रंगता " २२५

कधी जाणीवेच्या पातळीवरील शब्दांच्या अर्थ, नाद, सूचन या शक्तींना सोडून देवून इंदिराबाई शब्दाला नेणीवेच्या पातळीजवळ नेतात. झोपेत लहान मूल घाबरले म्हणजे कण्हते आणि मग एक विचित्र अस्पुट नाद व शब्द यांच्यातलाच असा कांहीसा उद्गार त्यांच्या तोंडून निघतो. नेणीवेच्या पातळीवरील अशा उद्गारात कधी कधी अभिव्यक्तीची अपार शक्ती सामावलेली असते.

" धुरकट अंधारात
कोण टाकते उसासा
श्रांत, क्लांत, माझे मन
घेई सारखा कानोसा
इथे तिथे उगीचच
वावरत आहे कोण?
कोण आहे उभे तेथे
उगीचंच खोळंबून? " २२६

यातील किंवा - 'बेडकी बेडकी माझा पाय का धरलास?' असे आपल्या पायाला मिठी मारून राहिलेल्या व्यक्तीच्या केसातून बोटे फिरवीत काळोखाने विचारले म्हणजे कांहीच अर्थ नसताही या खेळाने मन शहारते. आणि–

" पुढती त्याने
विचारले का कांही
फसून त्याला
हात बिलगले की नाही
हे असले काही
घडले का की नाही? " २२७

या नेणीव व जाणीव यांच्या सीमारेषेवरील उद्‌गाराला विलक्षण आर्तता आहे. भाषेच्या सामान्य व्यवहारातील उपयोगामुळे शद्वाभोवती पडलेले अर्थाचे कडे मोडून तेच शद्व काव्यात्म पातळीवर निराळ्यात-हेने अर्थवाही करण्याचे हे प्रयत्न पण असे प्रयत्न करीत असतानाच शद्वांच्या विशिष्ठत-हेच्या उपयोगातून भाववृत्तीला आवाहन करण्याच्या एका निराळ्या दिशेच्या प्रयत्नांना सुरवात होते. या दोन दिशांतील फरक असा दाखवता येईल.

शब्द–शब्दातून चालविलेल्या अर्थाकृतीने आकारीत झालेली भाववृत्ती

शब्द–प्रतिमा – शद्वांच्याद्वारे निर्माण केलेल्या प्रतिमेतून होणारी संवेदना.

अनुभवांची जाणीव व त्यांनी जागृत केलेली भाववृत्ती.

दुसऱ्या दिशेच्या प्रयत्नात काव्यातील परिणामाच्या दृष्टीने काव्यातील लहानात लहान घटक शद्व किंवा शद्वसमूह न रहाता ' प्रतिमा ' होतो.

शब्दांचे शब्द म्हणून आवाहन शेवटी आपल्या मनातील त्या शद्वाभोवतीच्या मात्र अर्थाकृतीच्या संदर्भातच असल्यामुळे त्यांच्याद्वारे घडवून आणता येणाऱ्या परिणामाना मर्यादा पडतात. प्रतिमा आपल्या सर्व संवेदनानुभवाना आवाहन करून त्यांच्याद्वारे आपणास भाववृत्तीकडे घेऊन जात असल्यामुळे अनेक पातळ्यावरील व अनेक छटा असलेल्या भाववृत्तीचा अनुभव देणे त्यातून शक्य होते. इंदिराबाईच्या काव्यात प्रतिमेचा कसा उपयोग केलेला आढळतो तो बघू.

शब्द व शद्वसमूह या घटकांकडून प्रतिमेकडे जाणाऱ्या इंदिराबाईच्या प्रवासाची पहिली पाऊले ही ' शेला ' मध्ये आढळतात पण ती पाऊले अडखळणारी होती.

" दिस भरलेली ही काय तरी गर्भार
टाकीत पावले चाले रम्य दुपार. "

अशी विशिष्ठ भाववृत्तीने भारलेली त्यांना जाणवलेली दुपार त्या प्रतिमामधून व्यक्त करण्याचा प्रयत्न करतात, आणि–

" ही निळी, पांढरी शरदातील दुपार
तापल्या दुधापरी उन हिचे हळूवार
दाटली, साय की स्निग्ध शुभ्र आकाशी
फिरतात तशा या शुभ्र ढगांच्या राशी. "

किंवा

" साचल्या तळ्याचे पाणी लाल गढूळ
उमटले त्यामध्ये दुपारचे आभाळ
ती झाडी उलटी, धुंद हलेना पान
नजिकच्या पुलाची उलटी भव्य कमान. " २२८

अशा चित्रामध्ये त्या भाववृत्तीच्या जवळ नेण्याचे काहीसे सामर्थ्य आहे ही पण यात काय कमी पडते ते शोधून प्रतिमेलाच जास्त सामर्थ्य देण्याऐवजी चार वेळा 'धुंद' या शब्दांचा उपयोग करून इंदिराबाई ती भाववृत्ती अधोरेखीत करू पहातात. सुरुवातीच्या प्रयत्नात प्रतिभेचे वजन, तिची शक्ती याचा अंदाज येईपर्यंत असे होणे साहजिकच असते. इंदिराबाईच्या कवितेतील प्रतिमाविश्वाविषयी विचार करताना आणखीही काही गोष्टी लक्षात येतात. विस्तारांच्या दृष्टीने त्यांचे प्रतिमाविश्व अतिशय मर्यादित आहे. ते त्यांच्या स्थायीभावांच्या जाणीवेने मर्यादित केले आहे.त्या स्थायीभावांचा संवाद काही विशिष्ठ रुप,रस,गंध याशीच होऊ शकतो. त्यांच्याहून बाकीचे संवेदनाविश्व या स्थायी भावाला जवळचे वाटत नाही. अशा प्रतिमाविश्वाचे एक उदाहरण द्यायचे तर इंदिराबाईच्या आर्ध्याअधिक कवितांतून जाणवणारी प्रतिमा काळोखाची आहे हे देता येईल. त्याच्या प्रतिमा विश्वाच्या मर्यादितपणाचा त्यांच्या पहिल्या कवितावर फार परिणाम झाला आहे. या कवितेतील प्रतिमात तोचतोपणा व आवर्तपणा येऊ लागला. शब्दांप्रमाणे प्रतिमांच्याही लकबी झाल्या.

तशी एकादी प्रतिमा पिळून काढून त्यामधून साधता येणाऱ्या परिणामाचा शेवटचा बिंदूही काढून घेण्याची धडपड सुरु झाली. एखाद्या प्रतिमेचा उपयोग इतक्या वेळेला व त्याच त्याच पातळीवर होत राहिला की तिच्या आधीच्या वापराची बेडी पुढल्या कवितेच्या पायीच अडकवली, मग कविता जमिनीवरून खुरडत चालू लागली. ती पंख घेईना पण असे होत आहे हे लक्षात येताच इंदिराबाई काही काळ त्या प्रतिमा अजिबात सोडून देतात आणि मग पुन्हा जेव्हा त्या त्याच प्रतिमेकडे जातात त्यावेळी पूर्वीपेक्षा अगदी निराळ्याच पातळीवर त्यांना तिची जाणीव झालेली असते. अशा नव्या जाणीवेतून जेव्हा तीत प्रतिमा पुन्हा येते आधीच्या साऱ्या जाणीवेची शक्ती पाठीशी घेऊन येते. तेथे मग बाईच्या प्रतिमाविश्वाचा मर्यादितपणा जाणवत नाही. जाणवते ती त्यांची खोली. आणि तेथे त्यांचे काव्य खऱ्या अर्थाने समृद्ध होते. इंदिराबाईच्या 'शिलालेख', 'वाघुळ', 'हवा झुकत कजवा' 'आषाढ,' 'एकेतील जर पिंपळयाने,' आणि 'बाधा' यापैकी प्रत्येक कवितेतील 'काळोख' वा त्या काळोखाची जाणीव निराळी आहे. आणि –

"किती खोल घ्यावे श्वास
पिण्या काळोखाचे विष
रिते जरी लाख डोह
नाही जहराचा दोष
नाही बासरीची धून
नाही कशी विषबाधा" [१९]

अशी कशी ही पापीण
हसे मीरा. हसे राधा " [२२९]

यातील काळोख पुन्हा या सर्वांपेक्षा निराळ्या प्रकारचा आहे आणि त्याने स्वत:बरोबर आपल्या सहचाऱ्यांनाही निराळे केले आहे. या अर्थाने सांकेतिक प्रतिमांना बाईनी फार बोलके केले आहे. तसे पाहिले तर विरहार्त भाववृत्तीला चांदणे, संजावात, मेघ, सागरवारा, काळोख, यांनी वेढलेले वातावरण कालीदासापासून सर्वांनी दिलेले आहे. इंदिराबाई याच प्रतिमाविश्वाचा उपयोग अगदी मुक्त हस्ताने करतात आणि त्यातूनच अनुभवाची निराळी पातळी दाखवतात. कळशी घेऊन पाणवठ्यावर निघालेली बिचारी राधिकासारख्या बसणाऱ्या कवितांच्या खड्यानी आज कित्येक युगे ओलेती उभी आहे. पण ज्यावेळी ती –

" भरली घागर माथ्यावरती
मुळी न कसे उचमळते पाणी,
कमरेवरती भरली घागर,
मुळी न कसे उचमळते पाणी. " [२३०]

अशी झाली तेव्हा यात काही अपरूप घडले.

मराठी कवितेत अलिकडच्या कविता खऱ्या अर्थाने दोघांनीच जुन्या नायिका नव्याने उभ्या केल्या – पु. शी. रेग्यांनी ' त्रिधा राधा ' व इंदिराबाईनी कुब्जा –

" अजुन नाही जागी राधा
अजुन नाही जागे गोकुळ
अशा अवेळी पैलतीरावर
आज घुमे का पावा मंजुळ. " [२३१]

एखादी गोष्ट आपल्याला आवडते. अगदी खूप आवडते. तिच्याबद्दल आपण बोलत सुटतो. आणि मग एकाएकी स्तब्ध होतो. आपली आवड शब्दापलीकडे कुठेतरी भिडली आहे या जाणीवेने जिच्याबद्दल असे व्हावे अशी ही कविता.

इंदिराबाईना खऱ्या अर्थाने प्रतिभा सापडली आणि त्यांचे काव्य त्याना मिळाले. त्यांच्या प्रतिमांना सक्ती येते ती त्यांच्या संवेदनाविश्वाच्या भरीव आणि निकट अशा जाणीवेमुळे. ज्यावेळी त्या सांकेतिक काव्याच्या पहिल्या अवस्थेत होत्या त्यावेळीही त्यांच्या काव्यात ती जाणीव प्रकर्षाने दिसत होती. त्यामुळे त्यांच्या वर्णनात्मक काव्यातला त्यातील उपमा उत्प्रेक्षा रूपके यानाही त्यांचे स्वत:चे निराळेपण होते.

त्यांची कविता रूप, रसगंधाची सतत जाणीव देत रहाते. एकादे परिणामकारक चित्र शब्दातून त्या साधत रहातात. तर रिकाम्या दारात चौकटीचा आधार

घेत एकाकी अवस्थेत चिंतमग्न होऊन उभ्या रहातात. संवेदनाविश्व व भाववृत्ती यांच्या एकात्मतेचे सूत्र त्यांच्या 'हिरवे पिवळे तुरे उन्हाचे' 'मीच बुडविले' यासारख्या कवितेतून जाणवत रहातात.

गद्य रचनेची ठाशीव बांधणीही जाणवत रहाते. इंदिराबाईनी मुक्तछंद वापरला नाही तर सोप्या वृत्तांचा, जातीचा, छंदाचा त्यांनी आश्रय घेतला. आजच्या मराठी कवितेने वैयक्तिक अनुभवाची रसिकाला निकटची प्रचिती आणून देणारी त्यांची कविता आहे. दुर्बोधतेपासून त्यांची कविता अलग राहिली आहे. कारण कवयित्रीचे स्वतःचे एक भावविश्व त्यांच्या कवितेत आहे. 'रंगबावरी,' 'बाहुल्या' या संग्रहात त्या स्थिरपणे उभ्या आहेत. स्वतः पुन्हा पुन्हा मोडण्याची आणि जोडण्याची क्रिया त्यांनी केलेली आहे. अतिव समाधान वाचकांना देणारी व आपला कणा कायम राखून व्यक्तिमत्व विकसित करणारी त्यांची कविता आहे.

आज अनुभूतीच्या स्पंदनातून भाववृत्तीचा प्रत्यय देणाऱ्या इंदिराबाईच्या प्रवासाला पूर्णता आली आहे असे आपल्याला वाटू लागते.

**शिल्पसदृश्य कविता लिहिणाऱ्या – इंदिरा संत**

इंदिराबाई संतांने स्वत्वाने सुंदर ठरलेली विशुद्ध भावकविता लिहिली आहे. त्यांच्या कवितांतून भावानुभावांची विविध चित्रे त्यांच्या प्रतिभेने रेखाटली आहेत. त्यांची प्रत्येक कविता जणू त्यांच्या व्यक्तिमत्वाचा एकेक पैलू प्रकट करणारी असल्याने रसिक मनाला ती आकर्षून घेत नाही, तर वेड लावते. अत्यंत आत्मकेंद्री भावानुभूतीतून वा भाववृत्तीतून निर्माण झालेली ही त्यांची कविता विलक्षण वेधक आहे. अंतर्मुख वृत्तीतून निर्माण झालेली असूनही त्यांची कविता 'खासगी' नाही. प्रेमभाव व्यक्त करीत असूनही शारीरिक, कामुक अविष्कारापासून ती दूर राहिली आहे. एकाच भावनेच्या आवर्तात गुरफटलेली असून ती गतिमान आहे, चैतन्यदायी आहे. म्हणूनच त्यांची कविता एकसूरी न वाटता सुरेल वाटते. एवढेच नव्हे तर विविध स्वरुपाची प्रचिती आपणास देते. याचे कारण त्यांच्या कवितेत अवतरणारी आत्मनिष्ठा दर्जेदार आहेच. परंतु ती एका सुजाण, संपन्न, संवेदनशील, सौंदर्यप्रेमी, कलात्म व्यक्तीमत्वाची आहे.

**'शेला' ते 'रंगबावरी' – एक शापित प्रवास**

'सहवास' हा बाईंचा पहिला जोड संग्रह. प्रेमभावांचे स्वप्नमधुर चित्रण त्यांच्या या जोडसंग्रहात आढळते. परंतु 'शेला' ते 'रंगबावरी' या प्रदीर्घ काव्यरचनेत सर्वत्र पसरलेला दिसतो तो प्रीतीभावनेतील विरह. त्यांनी जवळ जवळ ४०० पर्यंत कविता लिहिल्या आहेत. या दीर्घ प्रवासात आपल्याला जाणवतो तो एक वेदनेचा दाह. शापित प्रवास. श्री. संत यांच्या अकाली निधनाने बाईंच्या जीवनाची सारी रंगतच उधळली गेली. उमलू पाहाणाऱ्या माधुर्याला

उध्वस्ततेने ग्रासून टाकले. मांडलेला डाव रंगत असतानाच भंगून गेला. विस्कटून गेला. चिरविरहाच्या जहराने भावनेचा बहर सर्वस्वी करपवून टाकला. स्वाभाविकच एका लोभसवाण्या व्यक्तिमत्वाला सोबत उरली ती रितेपणाची. शून्याकारतेची. जीवनाला शापिततेचा अर्थ प्राप्त झाला. आणि "कठोर कर्तव्याच्या सदा संगतीने हे तर कसले जीवन हे तर जगणे येथपर्यंत तो नेऊन पोहोचवला. हा प्रवास जितका दारूण तितकाच करूण. तीव्र तितकाच उत्कट आहे. अनेकदा तो कवयित्रीला छळत राहतो व या विरहाग्नीतूनच ज्वालेचे धगधगते रूप घेऊन त्यांची कविता जन्माला येते. भिजलेली आग सर्वत्रच अग्नीफुलांचा वर्षाव त्यांच्या काव्यात करीत असते.

'पतीविरह' हा आपल्या जीवनाला मिळालेला मोठा शाप आहे अशी त्यांची स्वत:ची मनोमन श्रद्धा आहे. त्यांच्या श्रद्धेनुसार खरोखर या घटनेला शाप मानले तर त्यांना लाभलेली काव्यात्म वृत्ती, त्यांचे निसर्गवेड आणि आठवणी यासारख्या गोष्टींना उ:शाप मानायला हरकत नाही. आपल्या आठवणीत त्यांचे वादळवेडे मन रमते. रसिकांना रमवते व रमवता रमवता अस्वस्थतेने चक्रावून टाकते. या प्रवासात शारीरिक आकर्षणाला अवसर नाही. परिणामत: उरली ती फक्त मनाची तगमग. जिवाची जीवघेणी क्रीडा.

## दाहक स्मृतीचित्रे

इंदिराबाईच्या कवितेत आठवणी भेटत राहतात. स्वप्ने आढळतात. ही स्वप्ने भविष्यकाळाची नसून भूतकाळात पडून गेलेली आहेत. म्हणजेच अनुभवांना रूप प्राप्त होते ते स्मृतीचे. स्वप्नांना रंग असतो तोही शापीत स्मृतींचा. म्हणूनच ज्या प्रेमभावनेचा त्यांच्या काव्यात एक आवर्त निर्माण झाला आहे त्या आवर्ताच्या परिघावर बिंदू-बिंदूंचे अस्तित्व स्वीकारून या स्मृती उभ्या रहातात.

तळघात टाकलेल्या खडयाने निर्माण होणाऱ्या वलयाप्रमाणे आठवणींची वलये वलये मनात उमटतात. एकातून दुसरे. दुसऱ्यातून तिसरे. या क्रमाने त्या स्वत: 'लक्ष' हे विशेषण आठवणींना त्यामुळे योजतात. मनातल्या फुलपाखरांचे रंगीबेरंगीपण, चंचलता, मोहकता, क्षणभंगुरता मन हरखून टाकते. आठवणींचे काजवे पदरात खेळवत त्या राहतात. जीवन म्हणजे भयाण शिक्षा वाटते. एक कसरत वाटते. जीवन म्हणजे डोळ्यात पाणी न आणता दर्दभरी आठवणी झेलायच्या, तगमगून जायचे, एवढी दाहक चित्रे त्यांच्या या काव्यप्रवासात आहेत.

निसर्गाचे देखणेपण आपल्या डोळ्यात त्या सामावून घेतात. मनस्वी दंग होतात. तर दंग होता होता विजेने धक्का बसावा तशा धक्काबून जातात. नित्याचा साचलेला रितेपणा अंधारात आणखी गडद बनतो. रिकाम्या मनाचा ताबा घेतो. छळत राहतो, संतप्त हत्तींच्या कळपासारखा.

त्यांच्या आठवणींच्या संभारात बालपणीच्या काही मधुर स्मृतींचे अस्तित्व दिसून येते. भातुकलीचा खेळ, मोरपीस, वाढत्या घराची वास्तू, देवघर, माजघर, तुळशी वृंदावन हे सारेच शापीत दग्ध जीवनात भर टाकते.

इंदिराबाईच्या काव्यप्रवासाचे पुढीलप्रमाणे टप्पे आपल्याला निरखता येतील.

१) दोन प्रणयी मनांचा 'सहवास' 'आई' ही इंदिराबाईची पहिली कविता. १९३१ साली लिहिली. येथून त्यांनी काव्यप्रवासाला सुरूवात केली. अद्यापि हा प्रवास संपलेला नाही. प्रीती व निसर्ग या दोन घटनांचे तरंग या संग्रहात आढळतात.

२) नीतळ बांधणीची ' मेंदी ' –सशासारखी, घाबरणारी केविलवाणी अश्रू जपणारी,सावली हरवलेली, प्रियकराच्या मृत्युमुळे शरीराचा पिंजरा रिकामा घेऊन मरण येत नाही म्हणून चालणारी वृतवेडी इथे आहे. मनात खोल हुंदका या वृत्तवेडीने जपला आहे. व मृगजळाच्या पाऊलवाटेने ती चालली आहे.

३) ' मृगजळा ' च्या संदर्भात

अ) मृगजळात प्रतिमा सृष्टी बदलली नाही

ब) एकतर्फी सुरामुळे आशयही फारसा बदलला नाही

क) थोडीशी दुर्बोधता झुकू लागली. नवीन प्रतिमा आल्या तरीही दुःख तेच राहिले.

४) नव्या वळणाची ' रंगबावरी – अजूनही मृत प्रियकराशी चालू असलेला संवाद या संग्रहात आहे. तरीही आपले अस्तित्व जाणवून देणारा भूतकाळाचे सुख हे मृगजळ व वास्तव तेच खरे, हे त्यांचे बदलते रुप आहे. ताब्यांच्या नंतर एवढे हृदयस्पर्शी दर्शन इंदिराबाईचेच आहे. त्यांच्या मनाचे बदलते रूप ' रंगबावरी ' मध्ये लक्षात येते.

५) ' बाहुल्या ' तील वेगळेपण

काव्यप्रांतात त्यांचे पाऊल पूर्ण स्थिर झाल्याचे इथे आढळते. यातील दुर्बोधता कमी. प्रियकराशी चाललेला एकतर्फी संवाद संपून गेला आहे. त्या अधिक अंतर्मुख व गूढतेकडे झुकल्या आहेत. त्यांचे कविमन शांत आणि तटस्थ झाले आहे. त्यामुळे त्या जगाकडे अत्यंत धीटपणे पाहू लागल्या आहेत. म्हणूनच त्यांच्या ' बाहुल्या ' आकर्षक, अर्थपूर्ण व प्रसन्न वाटतात.

इंदिराबाई संत यांच्या काव्याचे टप्पे अभ्यासाच्या सोईसाठी ' सहवास ' ' शेला, ' ' मेंदी, ' ' मृगजळ, ' ' रंगबावरी ' असे मानता येतील. त्यांच्या काव्यलेखनातील हे प्रगतीचे टप्पे आहेत. ' सहवास ' ते ' बाहुल्या ' हा एक शापित प्रवास असला तरीही भूत आणि भविष्य यांच्या काठावर उभे राहून प्रवासाला पूर्णत्व देणारी, त्यांची कविता आहे.

### काव्यप्रयोजन

इंदिराबाई आपल्या कवितेत आपणा स्वतःला मोडतात, आणि जोडतात. आपली कविता म्हणजे जिवाभावाची मैत्रीण आहे असे त्यांना वाटते. तिच्याशी सुखसंवाद करणे त्यांना प्रियच आहे. आपले दुःख आपल्या कवितेच्याच त्या सांगत राहतात. आपल्या अनुभूतीशी त्या अत्यंत प्रामाणिक राहिलेल्या आहेत. जेव्हा जेव्हा लिहावेसे वाटले त्याचवेळी त्यांनी लिहिले आहे. रिकाम्या मनाने कविता लिहिणे त्याना मान्य नाही. जर कविता लिहिली तर अक्षरा अक्षरात त्याना भुताटकीचे घर दिसते. म्हणूनच इंदिराबाईची कविता 'स्वान्तसुखाय' तशीच स्वान्तशोधाय' या प्रयोजनाने निर्माण झालेली आहे.

### इंदिराबाईंच्या चांगल्या कविता

'सहवास' ते 'बाहुल्या' पर्यन्त इंदिराबाई अनेक चांगल्या कविता लिहून गेलेल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे–

पावसाची रात्र, आसवे, वाघुळ, ऐक जरा ना, नीज, काहूर, भेट हवी ना? चतुर कुशल तू, कुब्जा, मेंदी, अरे वेड्या सोनचाफ्या, कातरवेळेला, कुटुंबातील नीटस् पोर, मीच झाले निरांजन, तू उमलूच नकोस, स्तंभ, झोका, आले मी, कळशी, रावण, तू गेल्यावर, तो चहा गुलाबी, उभी तुळस, वेल्हाळ, बाधा, सुरंगा, मरवा, काटा, हस्त, उशी, लाघव, रंगबावरी, नको नको रे पावसा, भातुकली, ऑपरेशन, ही अशी ती तशी, तुळशी वृंदावन, आज माळ बेचैन आहे, चिमुकली पाहुणी, उभा बाळ घरापाशी.

### 'पावसाची रात्र' – रसग्रहण

इंदिराबाईची 'पावसाची रात्र' ही एक चांगली कविता आहे. ज्या कवितेमधून त्यांच्या जीवनाचा प्रवास व काव्यप्रवास मनाची अवस्था स्पष्ट होते.

मानवी जीवनात पाणी आणि अमृत या दोन्हीपैकी तहानलेला मनुष्य पाणीच निवडील. खिन्न हताश मरगळलेल्या माणसाच्या डोक्यावरून पाण्याचा गार फवारा फिरवावा की तो एकदम तजेलदार व सचेतन होतो. मानवाला धुवांधार पावसाच्या वर्षावातील गात्रागात्रातून फुटणारा तृप्तीचा नाच परिचित आहे. पाऊस म्हणजे चैतन्य. पाऊस म्हणजे उन्माद. पाऊस म्हणजे केवळ आनंद.

रात्री सपाटून पाऊस कोसळतो. वारा नसला तरी चमत्कारिक गारवा घरभर पसरून राहिलेला असतो. सुरक्षित जागी राहून वेड्या पावसाचे कोसळणे बाई पाहतात. पावसाची वलये निरखीत राहतात. ह्या वलयांना तृप्तीचा स्पर्श असतो. पावसाच्या या लयबद्ध नाचात कवयित्रीच्या मनातही पाऊस खूलू लागतो.

तरीही पावसाची ही संवेदना भयानक रूप धारण करणारी आहे. त्या

म्हणतात –

" अंधारानी कडे घातले
घरोघरी
जलधारांनी झडप घातली
कौलारावर
एकाकीपण आले परत
दिशादिशातून
घेरायास्तव. "

प्रत्येकाचे एक आगळे व स्वत:पुरते संवेदना विश्व असते. करीमनाच्या संवेदनानाही पावसाची ही रात्र काहीवेळा भयाण वाटते. कारण याच कवितेत ही रात्र पावसाची रात्र भितीवरून सरकणाऱ्या पालीसारखी त्यांना वाटते. पाल हा अशुभ प्राणी. भितीवरून सरकणारा, गलिच्छ. रात्रसुद्धा अशीच थंड पालीसारखी. काही वेळा हीच रात्र–

एखाद्याला विचारले तर तो म्हणेल प्रियेशी बोलताना रात्र कशी गेली हे समजलेच नाही. पण ही पावसाची रात्र भितीवरील पालीसारखी गतीशून्य आहे. ही रात्र निश्चल होऊन स्थिर मनाला छळते आहे.

पुनवेची रात्र छळते असे सांगणारे हळवे प्रेमिक आहेत. कवयित्रीला मात्र पावसाची रात्र म्हणजे आपल्या तनमनावर पहारा करणारी सावध थंडगार पाल वाटते. काळ्यानिळ्या भितीवर पाल बसते. आभाळाच्या छतावर अशीच रात्रीची पाल बसलेली आहे. अशी ही थंडगार इंद्रिये थिजवून टाकणारी रात्र कवयित्री पुन:पुन्हा अनुभवते. अथवा त्या रात्रीचा काळासारखा अनुभव तिला वारंवार छळीत असतो हा अनुभव पालीच्या जागी बेडकीचे रूप पांघरूनही काहीवेळा प्रवेश करतो. बेडूक शब्दाइतकाच प्राणीही ओंगळ आहे. लवलवणारे पोट, त्रिकोणी बैठक. पावसाच्या आगमनाची वार्ता सांगणारा निरोप्याच. बेडूक जेव्हा ओरडतो त्यावेळी श्रुतिसंवेदनेला अस्तीत्व प्राप्त होते.

काळी पाल, विद्रूप बेडकी, दंश करणारी नागिण या प्रतीमा संवेदना–दर्शक आहेत.

" त्या झुबक्यामधी
क्षण कळवळली पाच फण्यांची
काळी नागीण
मीटता मीटता फडा मनस्वी ( क्षितीजावाचून )
तर – मन खुळमुळले, पुढे निघाले
पाय पायरीवरून उचलला

वळवळली अन् पायाखाली
नागीण. "

पावसाची रात्र या कवितेतील नागीण ही प्रतिमा वेगळी भावछटा निर्माण करते. ही नागीण मातीचा पंख घ्यायला धावते. या नागिणीने मातीला डंखून काय मिळविले ? वेडे समाधान ? सूडाची तृप्ती ? माती आणि स्मृती या शब्दात नाद साम्य आहे. कवयित्रीने ते साधले आहे.

मनुष्य सहानुभूतीवर जगतो. माणूस माणसाला सहानुभूती दाखवितो. ही सहानुभूती पाल, बेडूक, नागीण यांच्यापासून कशी मिळणार ?

जीवनाची रात्र एक पावसाळी रात्र. अशा एका पावसाळी रात्री कवयित्री आपल्या अंथरूणावर विमनस्क स्थितीत पडली आहे. उशाला हाताचे गुणिले चिन्ह डोक्यात भावनांचा गुणाकार. बाहेर पावसाळी हवेचा गारवा आहे. खोलीत मंद प्रकाश. गतस्मृती सरसरून वर येताहेत. येवढ्यात दिसते ती काळी पाल. या साऱ्यातून मरण येईल तर बरे असे वाटत राहते. तरीही पावसाची रात्र कवयित्रीला जागावीच लागते.

**'ध्वजवंदन आणि आम्ही' – एक बिघडलेली कविता**

" झिमझिमत्या पावसात, किरण नवे झिळमिळले
वाऱ्याच्या लहरीवर, वेलवृक्ष झुळझुळले,
पक्षांच्या गोड शिळा
सनईचे स्वरच जसे
ध्वजवंदन साधण्यास
पुण्यकाळ सज्ज असे
सज्ज असे बालकगण
शाळेच्या प्रांगणात
चंद्रकोर शुभ्र मधे
राष्ट्राची दिव्य ज्योत,
लहरतसे विहरतसे
आकाशी ध्वज प्रसन्न,
आम्हीही रस्त्यावर
केवळ पण प्रेक्षकगण
फडफडले अन् मनात
माझ्याही काही तरी
लवलीही उगीच मान
होऊनिया जखम ऊरी

नजर अशी मळलेली
हात असे किटलेले,
हृदयाच्या कोनकोनी
कोळिष्टक धरलेले

पाऊस न सरळ ठरे,
मानेतही मुळी न ताण
तेजाला भिडण्याचे
आत्म्याला नाही त्राण

वंदण्यास त्या ध्वजास
पायाशी राहू कसे
उंच करूनि वरूनि मान
दिव्य स्वप्न काढु कसे "

" स्फूर्ती नसताना जर कविता लिहिली तर त्यातील शद्ध म्हणजे भुताटकीचे घर वाटते, " असे स्वतः इंदिराबाई म्हणतात. ' ध्वजवंदन आणि आम्ही ' ही त्यांची एकच राष्ट्रीय कविता पण या कवितेचा तोल जसा राखायला पाहिजे तसा राखला न गेल्यामुळे ती एक फसलेली कविता वाटते.

इंदिराबाई यांचा पिंड असा कवयित्रीचा आहे. व्याकूळ विरहिणीचा आहे. तसाच प्रामाणिक शिक्षिकेचा आहे. शिक्षक म्हणून जगत असताना राष्ट्रीय सणात कवयित्रीचे जीवन बांधलेले असते. त्यामुळे आपण राष्ट्राचे काही तरी देणे लागतो या एकाच भावनेतून ही कविता निर्माण झाली आहे. याचा अर्थ कवयित्रीजवळ राष्ट्रीय भावनेचा अभाव आहे असे आपण म्हणू शकत नाही. पण या विषयाशी त्यांचे कविमन एकरूप झालेले नाही.

" लहरतसे विरहतसे
आकाशी ध्वज संपन्न
आम्हीही रस्त्यावर
केवळपण प्रेक्षकगण. "

राष्ट्रध्वजाजवळ आपली भूमिका एका प्रेक्षकाची आहे ही व्यथा कवयित्रीला स्पष्ट करायची आहे. पण ती एका प्रेक्षकाचीच झाली आहे. वरील ओळी वाचल्यानंतरसुद्धा वाचकांच्या मनातील दृक्संवेदना जाग्या होत नाहीत. तर पक्षांच्या शिळेने श्रुतिसंवेदना स्पष्ट होत नाही. ' आकाशी ध्वज प्रसन्न ' या ओळीमध्ये काव्य आढळत नाही तर सरळ सरळ ही ओळ गद्यप्राय वाटते. हजारो लोकांनी ज्या राष्ट्रध्वजासाठी स्वतःचे प्राण दिले, संसार उजाड करून टाकले

त्या राष्ट्रध्वजाचे व्यक्तीमत्व मनात मांडायचे असून सुद्धा कुठेतरी अपूर्ण राहिलेले आहे. इंदिरा संत यांच्या या सर्व कवितेत चिरविरहाचा एक व्यथित प्रवास आहे.


" तुजविण आता तुझ्या या संसारी
अंगाराच्या सरी वर्षतात
आत बाहेरून लागलीसे आग
तुझा घेत माग येऊ कोठे ?"

स्मृतीच्या जखमेने व्याकुळ झालेल्या विकल मनाच्या पक्षिणीचा हा व्याकुळ प्रश्न आहे. " मराठी कवितेत भावगर्भ आत्मनिष्ठा मर्ढेकरांच्यानंतर इंदिराबाईंनी साकारलेली आहे, असे आपल्याला आढळते. " आज मात्र काव्याच्या दृष्टीने कवयित्रीचे मन तृप्त आहे. त्यांच्या प्रवासाला पूर्णता आली आहे.

◆ ◆ ◆

**परिशिष्टापूर्वी**

कवयित्री इंदिराबाईंच्या मुलाखती घेण्याचा योग या निमित्ताने आला. या दोन मुलाखतीत १४ नोव्हेंबर, १९७५ व मे, १९७६ मध्ये त्यांनी ना. मा. संताच्या अप्रकाशित कविता, स्वत:चे काही प्रकाशित अप्रकाशित लेख दिले. त्याचा वापर प्रस्तुत प्रबंध लेखनात केला आहे. महत्त्वाचे वाटले म्हणून परिशिष्टात ते परत देत आहे.


मराठी ग्रंथ संग्रहालय दादर
28 ६७
निबंध 399 2
REFBK-0024676